# मॉडर्न महाविद्यालय

• कला, शास्त्र, वाणिज्य •

१९७५•७६



प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे
मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय

# मॉडर्न '७८

## नियतकालिक

**वर्ष सहावे : अंक सहावा**

**संपादक : प्रा. दत्तात्रय दिनकर पुंडे**

संपादन-समिती : अध्यक्ष प्राचार्य मो. भा. लिमये, उपाध्यक्ष उपप्राचार्य डॉ. ल. ह. गाडगीळ, आणि उपप्राचार्य डॉ. भीमराव कुलकर्णी, समिती सदस्य : डॉ. स. य. परांजपे, प्रा. सु. ग. दातार, प्रा. श्री. दा. संगोराम, श्री. चारुचंद्र भिडे, ( विद्यार्थि-प्रतिनिधी )
मुद्रक : शशिकान्त महादेव देव, सुलभ मुद्रणालय, २९१, शनिवार पेठ पुणे, ३०.
ठसे आणि मुखपृष्ठ छपाई : के. जोशी आणि कंपनी, भिकारदास मारुतीजवळ, पुणे ३०.
प्रकाशक : मो. भा. लिमये, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५.

"आम्ही रेमन बोनस स्टँप्स देतो"

औंध, पाषाण, सिंध हाउसिंग सोसायटी, बॉईज बटालियन, एन. सी. एल, पूना युनिव्हर्सिटी, चतुःशृंगी एरिया, अशोकनगर, जवाहरनगर, रेंजहिल्स, शिवाजी हाउसिंग सोसायटी, पोलिस वायरलेस सेंटर, ए. आर. डी. एल. ह्या विभागांतील रहिवासी यांच्या सेवेकरिता—

# योगेश मेडिकल्स

वैभव बिल्डिंग, गणेशखिंड रोड, पुणे १६
(औंध गॅस कंपनी शेजारी)

**सर्व प्रकारची देशी, विदेशी औषधे व कॉस्मेटिक्स्**
**योग्य भावात मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण**

☆
☆☆

**: खूष खबर :**

आपल्या वरील विभागांत कोणाकडेही नसलेली '**रेमन बोनस स्टँप्स**' योजना आम्ही सुरू केली आहे. आपण खरेदी केलेल्या औषधांवर आपणास 'रेमन बोनस स्टँप्स' मिळतील व आपणास निरनिराळ्या प्रकारच्या बक्षिसांचा लाभ मिळेल.

# संपादकीय

हे सारस्वताचे गोड । तुम्हीचि लाविलें जी झाड ।
तरी अवधानामृतें वाड । सिंपोनि कीजो ॥
मग हे रसभावफुलीं फुलैल । नाना फळभारें भरैल ।
तुमचेनि प्रसादें होईल । उपयोगु जगा ॥

पुण्याच्या ज्ञानेश्वर पादुका मार्गावरील हे महाविद्यालय ज्ञानियांचा राजा ज्ञानदेव यांच्या पुण्यस्मृतीस अभिवादन करीत आहे. आणि त्यांनी लावलेला ' ज्ञानवेलू ' निष्ठेने जोपासण्याच्या जिद्दीने कार्य करण्याचे सामर्थ्य आम्हांस लाभो अशी सुरुवातीलाच त्या महात्म्याच्या चरणी आम्ही विनम्र प्रार्थना करीत आहोत.

आपल्या मॉडर्न महाविद्यालयाने सहा वर्षांचे आपले शैक्षणिक कार्य अत्यंत यशस्वीरीत्या अनेक अडचणींना तोंड देऊन पूर्ण केले आणि शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडाविषयक अशा सर्व क्षेत्रांत नेत्रदीपक यश मिळविले. या यशाची व यशपरंपरेची शब्दप्रतिमा प्रस्तुत वार्षिकाकांच्या रूपाने आपल्या हाती देताना आम्हास मनापासून आनंद होतो आहे.

महाविद्यालयाने प्रगतीचे पहिले वर्षपंचक पूर्ण केले आहे आणि या शैक्षणिक वर्षी दुसऱ्या वर्षपंचकात प्रवेश केला आहे. माणसाच्या आयुष्याला अनेक वळणे असतात. प्रत्येक वळणावर माणूस क्षणकाल थबकतो; मागे वळून पाहातो; काय कमावले, काय गमावले; ह्यांची बेरीजवजाबाकी करून पुढील वाटचाल सुरू करतो. संस्थेच्या आयुष्याचेही असेच आहे. आमच्या दृष्टीने महाविद्यालयाची पहिली पाच वर्षे महत्त्वाची आहेत. या लघू कालखंडात मॉडर्न महाविद्यालयाने अत्यंत वेगाने प्रगतीची पावले टाकली. नानाविध अभिनव शैक्षणिक उपक्रम हाती घेतले, राबविले आणि यशस्वी करून दाखविले. अत्यंत थोड्या कालावधीमध्ये पुण्यातील नामवंत महाविद्यालयांच्या पंक्तीत या महाविद्यालयाचे नाव घेण्यात येऊ लागले. ह्या सर्व कार्याचे सिंहावलोकन करणे आवश्यक, उपयुक्त, उद्‌बोधक व मनोरंजक ठरेल. तथापि मा. प्राचार्यांच्या प्रदीर्घ लेखात हे सिंहावलोकन आलेले असल्यामुळे या ठिकाणी त्याची पुनरुक्ती करण्याची आवश्यकता नाही.

**अनुशासन पर्व**

यंदाचे शैक्षणिक वर्ष काहीशा अस्थिर वातावरणात सुरू झाले. शालांत परीक्षा आणि विद्यापीठाच्या विविध परीक्षा उशीरा झाल्या; त्यांचे निकालही उशीरा जाहीर झाले. परिणामी शैक्षणिक वर्ष जरी १ जुलै १९७५ ला सुरू झालेले असले तरी प्रत्यक्ष अध्यापनकार्यास काहीसा विलंबच झाला. तथापि नंतर हळूहळू परिरिस्थितीत बदल झाला. शिस्तीने व व्यवस्थितपणे अभ्यासक्रम पूर्ण करण्यास देशातील नवीन कार्यप्रेरक वातावरणाचा निश्चित फायदा झाला.

या वर्षी महाविद्यालयाचे क्षेत्र संप, बंद, मोर्चे इत्यादी शिक्षणबाह्य चळवळींनी दूषित झाले नाही. त्यामुळे कोणत्याही तऱ्हेच्या बेजबाबदारपणास वा गुंड प्रवृत्तीला महाविद्यालयाच्या कार्यात अडथळा, गोंधळ निर्माण करता आला नाही, ही अत्यंथ समाधानाची गोष्ट होय. अशा रीतीने अध्यापन—अध्ययनास सुयोग्य असे वातावरण शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभापासूनच निर्माण झाल्यामुळे आम्ही विहित अभ्यासक्रम व्यवस्थित व समाधानकारकपणे पार पाडू शकलो.

**उच्च माध्यमिक शिक्षण**

शासनाच्या नव्या धोरणाप्रमाणे उच्च माध्यमिक शिक्षणक्रमातील १२ वीचे वर्ग १९७६–७७ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयांकडे सोपविण्यात येणार आहेत. शासनाच्या या सुधारित धोरणाचे आम्ही स्वागत करतो. १२ वीचे वर्ग सुरू करण्याची तयारी आम्ही पूर्ण करीत आणली आहेच. तथापि शासनाने याबाबत आपली भूमिका निश्चित करावी, उच्च माध्यमिक शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांबाबतची निर्णायक तत्त्वे, नियम व अटी महाविद्यालयांना शक्य तितक्या लवकर कळविण्याची व्यवस्था करावी.

खाजगी महाविद्यालयांना मिळणारे सरकारी अनुदान आणि वेतन, साधनसामग्री, उपकरणे इत्यादींवर महाविद्यालयांना करावा लागणारा खर्च यातील प्रचंड तफावत शासनाच्या लक्षात आली आहे ही घटना शासनाबद्दल काही आशा निर्माण करणारी, शासनाकडून काही अपेक्षा करणारी अशीच आहे. अनुदान अपुरे पडू नये याकरिता शासनाने त्वरित कार्यवाही करून अनुदान-नियमावलीत सुधारणा करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा शैक्षणिक संस्थांच्या

आर्थिक दैन्याचा परिणाम शिक्षणक्षेत्रातील एकूण कार्यक्षमतेवर होण्याची दाट शक्यता आहे.

**शिक्षण ही नवसमाजाच्या उभारणीसाठीची गुंतवणूक**

देश किंवा समाज यांचे उद्याचे आधारस्तंभ म्हणजे आपले आजचे विद्यार्थी होत. ही गोष्ट लक्षात घेऊन शिक्षण ही नवसमाजाच्या उभारणीसाठीची महत्त्वपूर्ण गुंतवणूक मानली जावी. ही गुंतवणूक अपुरी असेल, अक्षम असेल किंवा घातक काटकसरीची असेल तर उद्याचा समाज दुर्बल, निष्प्रभ व कृतिशून्य होईल. आपल्यासारख्या खंडप्राय राष्ट्राला असा समाज भूषणावह तर नसेलच नसेल. पण तो थोडक्याच अवधीत राष्ट्राची वाताहत करील अशी भीती आहे.हे ओळखून शैक्षणिक प्रक्रियेतील शासनाचे धोरण, शैक्षणिक संस्थांचे व्यवस्थापन, प्रशासन निश्चित स्वरूपाचे आणि उद्याच्या समाजाच्या हिताचे रक्षण करणारे असे असले पाहिजे.

**भाऊसाहेब खांडेकरांना अभिवादन**

भारतातील सर्वोच्च बहुमानाचे असे भारतीय ज्ञानपिठाचे एक लाख रुपयांचे पारितोषिक वि. स. तथा भाऊसाहेब खांडेकर यांना बहाल करण्यात आले आहे. हा भाऊसाहेबांचा जसा गौरव आहे तसा मराठी भाषेचाही आहे. भाऊसाहेबांना आम्ही नम्रतापूर्वक अभिवादन करतो. अशा रीतीने भारतीय पातळीवर भाऊसाहेबांचा गौरव झाला आहे याचा आनंद आमच्या मनभर पसरला आहे. भाऊसाहेबांनी शिरोडे येथे आपल्या जीवनकार्याची सुरुवात एक तळमळीचा, जिद्दीचा खराखुरा शिक्षक या नात्याने केली. आणि त्यामुळेच ते आम्हाला अधिकच जवळचे वाटतात.

**हार्दिक अभिनंदन**

दिनांक १ मे १९७५ पासून प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सचिवपदी सन्माननीय श्री. वि. शं. गोखले यांची नियुक्ती झाली. महाविद्यालयाच्या वतीने आम्ही त्यांचे अभिनंदन करतो. सचिव म्हणून त्यांच्या कार्यास महाविद्यालयातर्फे शुभेच्छा !

दिनांक १० जून १९७५ पासून प्राचार्य मो. भा. लिमये, उपप्राचार्य डॉ. ल. ह. गाडगीळ आणि प्रा. स. य. गंभीर या तिघांची प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे. महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग आणि सेवकवर्गाच्या वतीने आम्ही त्यांचे अभिनंदन करतो, त्यांच्या कार्यात सुयश चिंतितो आणि शुभेच्छा व्यक्त करतो.

नव्या विद्यापीठ अधिनियमानुसार प्रा. सुरेश दातार, प्रा. मधुसूदन मराठे आणि श्री. श्रीपाद कुलकर्णी हे महाविद्यालयाच्या कार्यकारिणीवर प्रतिनियुक्त झाले आहेत. त्यांचे हार्दिक अभिनंदन. डॉ. शं. ना. नवलगुंदकर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, यांची पुणे विद्यापीठाच्या सिनेटवर निवड झाली व यायोगे त्यांना विद्यापीठात मॉडर्न महाविद्यालयाचेही प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली याचा आम्हास विशेष आनंद होतो आहे. डॉ. नवलगुंदकरांचे मनःपूर्वक अभिनंदन.

प्रा. राजेंद्र व्होरा, राज्यशास्त्र विभाग, यांना त्यांच्या ‘ महाराष्ट्रातील उदारमतवाद ’ या विषयावरील प्रबंधास पीएच्. डी. पदवी प्राप्त झाली. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. महाविद्यालयातील अनेक प्राध्यापकांनी उच्च माध्यमिक स्तरापासून महाविद्यालयीन स्तरापर्यंत विविध ग्रंथलेखन केलेले आहे व ही पुस्तके मान्यताही पावली आहेत. या सर्व सहकारी बंधूंचे मनःपूर्वक अभिनंदन.

**उज्ज्वल यश**

विद्यापीठाच्या विविध परीक्षांत कु. छाया जोगळेकर आणि श्री. पारसमल लुंकड या आमच्या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत प्रथम श्रेणीत द्वितीय क्रमांक

आणि पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत प्रथम श्रेणीत विद्यापीठात ९ वा क्रमांक मिळवला आहे. अशा रीतीने त्यांनी महाविद्यालयाच्या पहिल्या वर्षीपासूनची यशपरंपरा अखंडित राखली आहे. ( १९७१ ते १९७५ या पंचकातील विविध विद्यापीठीय परीक्षांत पहिल्या दहा क्रमांकात येणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती देणारे विवरण पत्र मा. प्राचार्यांच्या लेखात अंतर्भूत आहेच. )

**क्रीडाक्षेत्र :** क्रीडा क्षेत्रात मॉडर्नने फक्त आपली परंपराच टिकविली नसून त्यात आणखी बहुमोलाची भर टाकली आहे. आमचा विद्यार्थी श्री श्रीरंग इनामदार याने यंदाचा महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती पुरस्कार मिळविला आहे. श्री. इनामदारांचे हे सुयश मॉडर्नला निःसंशय भूषणावह आहे. त्याचप्रमाणे आंतर महाविद्यालयीन व्हॉलीबॉल ( महिला ) स्पर्धेत मॉडर्नचा महिला संघ विजेता ठरला आणि आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन ( महिला ) व आंतर महाविद्यालयीन खो खो ( पुरुष ) स्पर्धांमध्ये आमचे संघ उपविजेते ठरले. सर्वश्री अशोक काळे मुकुंद देवधर, सुहास सफाई, प्रकाश वर्तक ज्ञानेश्वर ढमाले, अनिल पांढरे, यशवंत शिंत्रे, राजेंद्र पानसरे, अतुल जोशी, सुहास शेटे आणि प्रदीप पंडित या विद्यार्थ्यांनी वैयक्तिक व सांघिक क्रीडास्पर्धांत विशेष उल्लेखनीय यश प्राप्त केले. महाविद्यालयास या सर्वांचा अभिमान वाटतो.

**सांस्कृतिक** या वर्षीच्या सांस्कृतिक कार्यक्रमातील यशात सिंहाचा वाटा वक्तृत्व मंडळाकडे जातो. कु. यशोधरा भालेराव, कु. उज्वला पारसनीस आणि श्री. अविनाश धर्माधिकारी यांनी विविध आंतरमहाविद्यालयीन आणि आंतरविद्यापीठीय वक्तृत्वस्पर्धा गाजविल्या. आणि आमच्या या विद्यार्थ्यांनी मॉडर्नची पताका महाराष्ट्रातच काय पण महाराष्ट्राबाहेर लखनौपर्यंत फडकविली. पुणे विद्यापीठाने कोपरगाव येथे आयोजित केलेल्या युवक महोत्सवात मॉडर्नच्या एकांकिकेस दुसरे पारितोषिक मिळाले आणि श्री. अजित दरेकर व कु. शैलजा सोनटक्के या विद्यार्थ्यांना अभिनयातील विशेष प्राविण्याबद्दल पदके मिळाली. तसेच चित्रकलेत श्री. हर्डीकर यासही पारितोषिक मिळाले.

श्री. विकास पुरंदरे याने आंतर महाविद्यालयीन रेकॉर्ड्स वादनस्पर्धेत तबलावादनात प्रथम क्रमांक मिळविला. पदवीपूर्व कला वर्गात शिकणाऱ्या कु. बासंती इनामदार ह्या आमच्या प्रतिभासंपन्न मान्यवर लेखिका व कवयित्री. त्यांच्या ' माझी बडबडगीते ' या बालगीत-संग्रहास या वर्षी राज्य पुरस्काराचा बहुमान प्राप्त झाला आहे.

या सर्व विद्यार्थ्यांचे उदंड अभिनंदन !

**कार्यक्रमांचे वैपुल्य** ज्ञानदानाबरोबरच विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्वाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आयोजित केलेली व्याख्याने, चर्चासत्रे, अनुबोधपट, शैक्षणिक सहली इत्यादी कार्यक्रमांची यंदा अगदी रेलचेलच झाली. या निमित्ताने पुण्यातील आणि पुण्याबाहेरील विविध क्षेत्रांतील मान्यवर व्यक्तींनी महाविद्यालयास भेट दिली. त्या सर्व व्यक्तींचे आभार.

**आमचे माजी विद्यार्थी** महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणजे आमचे दूर गेलेले कुटुंबीयच. त्यांच्याशी संपर्क साधणे, त्यांची चौकशी करणे आणि प्रतिवर्षी दि. २६ जानेवारीला त्याचा मेळावा आयोजित करून त्यांची भेट घेणे याबाबतीत महाविद्यालय अत्यंत जागरूक आहे. याच दृष्टीने प्रस्तुत अंकात तीन माजी विद्यार्थ्यांचे लेख संग्रहीत केलेले आहेत. माजी विद्यार्थ्यांच्या संघटनेने पुणे विद्यापीठाच्या निरंतर शिक्षणकेंद्राच्या साहाय्याने महाविद्यालयात ' स्त्री-उत्कर्ष वर्ष व्याख्यान-

माला' घडवून आणली आणि पुणेकर नागरिकांचा तिला उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला.

**स्त्री-उत्कर्ष-वर्ष व्याख्यानमाला**

यंदा महाविद्यालयातील अनेक उपक्रमांमधील महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणजे स्त्री-उत्कर्ष-वर्ष व्याख्यानमाला हा होय. या उपक्रमाबाबतची सविस्तर माहिती माजी विद्यार्थी संघटनेच्या अहवालात आलेली आहेच. तथापि या व्याख्यानमालेचे दोन लक्षणीय विशेष येथे नोंदविणे आवश्यक वाटते ते असेः—

( १ ) समाजाच्या विविध स्तरांतील स्त्री-पुरुष मिळून सुमारे १५० ते २०० श्रोते दररोज व्याख्यानास हजर असत. त्यामध्ये आमच्या महाविद्यालयाचा पालकवर्ग बहुसंख्येने उपस्थित असे.

( २ ) आमच्या महाविद्यालयातील जिज्ञासू विद्यार्थी या व्याख्यानाला आवर्जून हजर असत.

या संदर्भात हे लक्षात घेतले पाहिजे की पुण्यात मध्यवर्ती ठिकाणी उत्तमोत्तम व्याख्यानांनाही आज श्रोतृवर्गाची वानवाच आढळते. या पार्श्वभूमीवर आमच्या महाविद्यालयाच्या परिसरात या व्याख्यानमालेमुळे जे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले ते आम्हास निश्चितच स्वागतार्ह वाटते. या घटनेने आम्हास अंतर्मुख केले आहे आणि उत्तम व्याख्यानमाला व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या संयोजनाकरिता महाविद्यालयाच्या परिसरात एक उत्कृष्ट मध्यवर्ती सभागृह असण्याची गरज आम्हास पटली आहे. त्या दृष्टीने आम्ही पावले उचलायला सुरुवातही केली आहे. यासंबंधीच्या आमच्या योजना व हितचिंतकांना केलेले आवाहन याच अंकात शेवटी अंतर्भूत आहे.

**प्राध्यापकांचा पुढाकार**

महाविद्यालयाच्या विकास योजनेच्या कार्यवाहीत द्रव्याचा मूलभूत प्रश्न निर्माण होतो. आर्थिक बळ उभारण्याचे इतर मार्ग अवलंबण्यापूर्वीच आमच्या प्राध्यापकवर्गाने एकमताने येत्या चार वर्षांच्या काळात संस्थेकडे रु. ७५,००० ची रक्कम सेवाकालावधीपर्यंतची कायम ठेव म्हणून ठेवण्याची योजना कार्यवाहीत आणली आहे. आणि त्यानुसार गेले वर्षभर द. म. रु. १२०० चा हप्ता संस्थेकडे जमा होतो आहे. ही कृती निश्चितच कौतुकाची, अभिमानाची व आमच्या हितचिंतकांना अनुकरणीय अशी आहे.

**पालक-मेळावा**

महाविद्यालयाच्या यंदाच्या विविध उपक्रमांतील लक्षणीय उपक्रम म्हणजे दि. २६ फेब्रुवारी १९७६ रोजी आयोजित केलेला 'पालक मेळावा.' या मेळाव्यास पदवीपूर्व वर्गात शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांस अगत्याचे निमंत्रण होते आणि पालकही बहुसंख्येने हजर होते. विद्यार्थी हा केंद्रबिंदू ठेऊन पालक आणि प्राध्यापक-संबंध जोडण्याचा हा प्रयत्न महाराष्ट्राच्या महाविद्यालयीन जीवनात प्रथमच झाला असावा असे वाटते. तसेच तृतीय वर्ष बी. ए., बी.एस्सी व बी. कॉमच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे रविवार दिनांक २१-३-१९७६ रोजी निरोप देण्यात आला. त्यावेळीही तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या पालकांना या निरोप समारंभासाठी पाचारण करण्यात आले.

**मॉडर्न मित्र-मंडळ**

आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी या महाविद्यालयात पूर्वीपासूनच प्रयत्न होत आले आहेत. ह्याच प्रयत्नांचे क्षेत्र विस्तृत करून अशा विद्यार्थ्यांत परस्पर परिचय व्हावा, स्नेहभाव निर्माण व्हावा, त्यांच्यातील न्यूनगंड जाऊन त्यांची उन्नती

व्हावी या हेतूने मंडळ अस्तित्वात आले. या मंडळास उद्घाटनप्रसंगी कुलगुरू प्रा. देवदत्त दाभोळकर यांचे मार्गदर्शक विचारधन लाभले. मंडळाचा उत्कर्ष होईल याची आम्हाला खात्री आहे.

**स्वागत** या वर्षी महाविद्यालयात डॉ. एस्. एन्. नवलगुंदकर, प्रा. आर. बी. शहा, प्रा. जी. बी. नाळोले, प्रा. कु. एस्. जी. परब, सौ. एस. ए. देउसकर, सौ. ए. एस्. कुलकर्णी, श्री. व्ही. सी. देशपांडे, कु. आर्. व्ही. निंबाळकर, कु. एच्. ए. पटवर्धन, प्रा. आर्. एस्. पतके, प्रा. सौ. एस्. के. गावस्कर, प्रा. सौ. एस्. जी. नवाथे, प्रा. एस्. डी. जोगळेकर, श्री. बी. एस्. देशमुख श्री. एस्. जी. खुर्दे यांची नव्याने नेमणूक झाली. त्यांचे आम्ही मनःपूर्वक स्वागत करतो.

**निरोप व शुभेच्छा** डॉ. व्ही. जी. नांदेडकर, प्रा. सौ. व्ही. पी. गडकरी, प्रा. एस्. आर्. महाजन, प्रा. सौ. बी ए. रानडे, श्री. प्रजापती, श्री. एम्. जे. बेडेकर, श्री. ए. जी देशपांडे. श्री. जी. एस्. जगताप, कु. एन्. डी. गोखले, श्री. एस्. एस्. लाहोटी, श्री. व्ही. जे. यादव, श्रीमती जे. व्ही. गोडबोले. प्रा. जे. व्ही. बर्वे, श्री. लोकणवार, श्री. मधाळे, श्री. यु. व्ही. देशपांडे ह्या व्यक्ती इतरत्र गेल्या. त्यांना आम्ही भावी जीवनात शुभेच्छा व्यक्त करतो.

**कृतज्ञता :** नियतकालिक सिद्ध करणे ही अतिशय गुंतागुंतीची आणि अवघड गोष्ट आहे. त्यात अनेकांच्या सहकार्याची नितांत आवश्यकता असते. आमच्या प्राचार्यांनी केवळ संपादनाची जबाबदारी आमच्यावर टाकून न थांबता सातत्याने बहुमोल मार्गदर्शन केले, अंकाच्या संपादनात जातीने लक्ष घालून त्यातील उणिवा दूर केल्या. विशेष म्हणजे उपचाराचे ओझे न ठेवता आस्थेने मार्गदर्शन केलें. तसेच उपप्राचार्य डॉ. गाडगीळ यांचे प्रोत्साहन वारंवार मिळाले. म्हणून आमचे प्राचार्य व उपप्राचार्य यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे अत्यावश्यक वाटते.

**भूतपूर्व संपादक :** उपप्राचार्य डॉ. भीमराव कुलकर्णी ह्यांनी 'मॉडर्न'च्या वार्षिकांकाचे सुरुवातीपासून गेली पाच वर्षे कौशल्यपूर्ण संपादन केले. त्यांना 'वाट पुसतु पुसतु'च हा अंक सिद्ध झाला. छपाईचा कागद मिळविणे येथपासून ते मुखपृष्ठाची निवड करणे येथपर्यन्त अनेक कार्यांत त्यांचे महत्त्वपूर्ण साहाय्य लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता.

**सहकार्याबद्दल आभार :** सुलभ मुद्रणालयाचे संचालक श्री. बापुसाहेब देव यांनी अल्पमुदतीत हा अंक सुबक रीतीने छापला. श्री. के जोशी यांनीही उत्कृष्ट ठसे बनविले आणि आर्टपेपर छपाई केली. श्री. रवींद्र गंधे ( वनस्पतिशास्त्र विभाग ) यांनी मुखपृष्ठ रेखाटले. श्री. सतीश कदम या माजी विद्यार्थ्याने त्यावरील अक्षरलेखन केले. डॉ. परांजपे, प्रा. दातार, प्रा. संगोराम आणि श्री. चारुचंद्र भिडे ( विद्यार्थि-प्रतिनिधी ) ह्या समितिसदस्यांचे आणि इतर जवळजवळ सर्वच प्राध्यापकांचे अंक तयार करताना सहकार्य लाभले. कार्यालय अधिक्षक श्री. देशपांडे आणि ग्रंथपाल श्री. बापट यांनी वेळोवेळी महत्त्वपूर्ण तपशील तत्परतेने सादर केला. अन्य शिक्षकेतर सेवकांचे वेळोवेळी साहाय्य लाभले. राज्य शासनाने स्वस्त दरात कागद पुरविला.

या साऱ्यांचे आणि अंकाच्या मूर्तीकरणात प्रत्यक्षाप्रत्यक्ष मदत केलेल्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**—दत्तात्रय दिनकर पुंडे**

## क्रीडा–संघटना व्यवस्थापन समिती ( Gymkhana Managing Committee )



खुर्चीवर ( डावीकडून ) : कु. करंदीकर ( I.C.S.R. ). प्रा. आपटे ( कार्याध्यक्ष ), डॉ. गाडगीळ, प्राचार्य लिमये, डॉ. भीमराव कुलकर्णी
प्रा. गंभीर, श्री. रामपाल ( I. C. S. R. )

उभे १ ली ओळ ( डावीकडून ): प्रा. नातू, श्री. लागू, प्रा. गोसावी, प्रा. संगोराम, डॉ. ( सौ. ) वनारसे, प्रा. पुंडे, प्रा. पी. डी. कुलकर्णी
प्रा. एम. ए. कुलकर्णी श्री. शिंदे, प्रा. पाथरे

उभे २ री ( डावीकडून ) : सर्वश्रीं. पोळ, जोशी, सुब्रमण्यम्, घुबे, कु. भालेराव, कु. शहा, कु. भागवत, सर्वश्री भिडे, दंडे, गोळे, शर्मा.

उभे ३ री ओळ ( डावीकडून ) : सर्वश्री कदम ( सेवक ), शेटे, जाधव, कदम, गोडबोले, गांधी, ठकार, अहिरे, पवार ( सेवक ).

## आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल ( महिला ) विजयी संघ



# सिंहावलोकन : १९७० ते ७६

प्राचार्य मो. भा. लिमये

**स्मृती तयाच्या मधुर मधुरतम**

मॉडर्न महाविद्यालयाच्या स्थापनेला यंदाच्या वर्षाच्या सुरुवातीलाच पाच वर्षे पूर्ण झाली आणि आता सहावे वर्षही जवळजवळ संपतच आले आहे. या पाचसहा वर्षांच्या आमच्या महाविद्यालयाच्या वाटचालीकडे मी मागे वळून पाहतो तेव्हा साहजिकच महाविद्यालयाच्या प्रगतीचा जसा अभिमानास्पद वाटचालीचा देखावा डोळ्यासमोर उभा राहतो तसेच एका उत्कट व ध्येयवादी प्रयत्नाला आलेले यश पाहून कृतज्ञतेचा भावही मनात दाटून राहतो. महाविद्यालयाची ही पाचसहा वर्षे नाना तऱ्हेच्या असंख्य हालचालींनी भरलेली आहेत, विविधता व वैचित्र्य यांनी नटलेली आहेत आणि संपन्नतेने दाटलेली आहेत. हे लक्षात येऊन जसे मनाला बरे वाटते तसेच हा कालखंड किती भुर्रकन निघून गेला या कल्पनेने मन क्षणभर आश्चर्यचकितही होते.

**जातिभेदातीत, समान हक्कांच्या व्यापक जाणिवा**

वास्तविक मॉडर्न महाविद्यालयाची स्थापना म्हणजे प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या इतिहासातील एक ' कळस ' ठरावा असा टप्पा. १६ मे १९३४ रोजी काही ध्येयवादी शिक्षकांनी एकत्रित येऊन या प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. त्यावेळी पुण्यासारख्या विद्येचे माहेरघर मानल्या जाणाऱ्या या इतिहासप्रसिद्ध नगरीच्या भावी गरजांचे या शिक्षकांना जणू उपजत ज्ञानच असावे ! कारण मॉडर्न हायस्कूलच्या स्थापनेने या नगरीचे लक्ष सुरुवातीपासूनच या सोसायटीने वेधून घेतले. आणि अल्पावधीतच पुण्याच्या शैक्षणिक परंपरेमध्ये ' मॉडर्न ' या नावाला एक लौकिक प्राप्त करून दिला. मॉडर्न हायस्कूलच्या पाठोपाठ प्राथमिक विद्यामंदिर ( १९३६ ), सर ससून डेव्हिड मुलांचे वसतिगृह ( १९४० ), मुलींचे हायस्कूल ( १९४६ ), गणेशखिंड येथील मॉडर्न हायस्कूल ( १९६७ ) आणि शिशु विद्या मंदिर ( १९६८ ) अशा रीतीने सोसायटीचा हा शिक्षण-वड आपल्या भव्य पारंब्यांनी फुलत, विस्तारत गेला. सोसायटीने सुरुवातीपासूनच जातीभेदातीत समान हक्कांच्या

जाणिवेने आणि बहुजनसमाजाच्या गरजा लक्षात घेऊन अत्याधुनिक दृष्टिकोनातून शिक्षणाचा प्रसार करण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवले होते.

**कै. कानिटकर संस्थेचा आद्यशिल्पकार**

कैलासवासी शंकरराव कानिटकर यांच्यासारखा धडाडीचा, निस्पृह आणि आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण या कार्यासाठी वेचणारा एक आदर्श ध्येयवादी शिक्षक या शैक्षणिक कार्याची धुरा वाहण्यासाठी संस्थेला लाभला आणि त्यांनी घातलेल्या भक्कम पायावर या संस्थेची वैभवशाली जडणघडण साकार होत गेली. त्यांच्या निधनानंतर त्यांच्याच ध्येयवादाने संस्थेचा अनेक अंगाने शाखाविस्तार होत गेला आणि त्याचबरोबर संस्थेच्या आत्तापर्यंतच्या कार्याला अत्यंत उपयुक्त, अत्यावश्यक आणि वाढत्या पुणे शहराच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे असे महाविद्यालय स्थापण्याचे कार्य हाती घेण्याचे संस्थेच्या चालकांनी ठरविले.

**आव्हानपूर्ती**

संस्थेच्या आत्तापर्यन्तच्या लौकिकाला साजेसेच हे महाविद्यालय असावे ही संस्थेच्या कार्यकर्त्यांची इच्छा होती आणि त्याबाबतीत कसलीही तडजोड करावयाची नाही हा तर त्यांचा बाणा होता. म्हणून विद्यापीठाकडे संस्थेचे महाविद्यालय सुरू करण्यासंबंधी ज्यावेळी रीतसर अर्ज करण्यात आला, तेव्हा विद्यापीठाने महाविद्यालयासाठी स्वतंत्र इमारत उभी करूनच हे महाविद्यालय सुरू करावे अशी महत्त्वाची अट संस्थेला घातली. संस्थेने हे आव्हान स्वीकारले आणि सुमारे १५ लक्ष रुपयांची इमारत अगोदर उभी करून मगच महाविद्यालयाच्या वाटचालीला सुरुवात केली.

अर्थातच संस्थेच्या महाविद्यालयाचे स्वरूप काय असावे यासंबंधी संस्थेच्या धुरीणांमध्ये सुरुवातीला नाना तऱ्हेचे विचारप्रवाह होते. अध्यापक शिक्षण महाविद्यालयापासून या कार्याला सुरुवात करावी व नंतर कला व शास्त्र महाविद्यालय काढावे अशी कल्पना सुरवातीला प्रबळ होती. परंतु विचारविनिमयानंतर अध्यापक शिक्षण महाविद्यालयाची कल्पना मागे पडून



कै. शंकरराव कानिटकर



'मॉडर्न'ची पहिली 'ॲडमिशन'

कला, शास्त्र व वाणिज्य या तिन्ही शाखांनी युक्त असे महाविद्यालय जून १९७० पासून सुरू करण्याचा निर्णय कार्यकारिणीने घेतला व त्याप्रमाणे वेगाने कार्याला सुरुवातही झाली. ह्या कार्याला सुरुवात करण्यापूर्वी आज महाविद्यालय ज्या भूमीवर उभे आहे ही भूमी संस्थेला मिळवून देण्याच्या कामात त्यावेळचे महसूल मंत्री नामदार बाळासाहेब देसाई यांची तडफ व दूरदृष्टी संस्थेच्या उपयोगाला आली आणि म्हणूनच मॉडर्न हायस्कूलच्या शेजारची ही महत्त्वाची जागा महाविद्यालयाला मिळू शकली. ना. बाळासाहेब देसाई यांच्याबद्दलची कृतज्ञता या ठिकाणी व्यक्त केल्याखेरीज मला राहवत नाही.

**सुरुवात, कुतूहल व कौतुक**

१४ ऑगस्ट १९६९ रोजी सकाळी संस्थेचे अध्यक्ष श्री वसंतराव वैद्य व सौ. जयश्री वैद्य यांच्या शुभहस्ते महाविद्यालयाच्या इमारतीच्या जागेचे भूमिपूजन झाले. इमारतीच्या बांधकामाची जबाबदारी वास्तुशिल्पी श्री. आपटे यांच्याकडे सोपविण्यात आली व प्रत्यक्ष बांधकाम श्री. महाडकर कॉंट्रॅक्टर यांच्याकडे सोपविण्यात आले. संस्थेचे कार्यवाह श्री. वि. त्र्यं. ताटके व संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य प्राचार्य सुरू, डॉ. वि. ना. भावे. श्री अ. गो. मायदेव, डॉ. काळे व श्री. भाऊसाहेब लिमये या व्यक्तींनी इमारत पुरी होईपर्यन्त कसलीही उसंत घेतली नाही. उन्हापावसात, जातीने उभे राहून संस्थेची इमारत उभी होताना तिच्या बांधकामाच्या प्रत्येक टप्प्याकडे त्यांनी सातत्याने लक्ष घातले व ही सर्वांगपरिपूर्ण इमारत उभी केली. अशा तऱ्हेने १५ जून १९७० पासून 'मॉडर्न महाविद्यालय' ज्ञानेश्वर पादुकांनी पुनीत झालेल्या पथावर मोठ्या डौलाने उभे राहिले. पुण्याच्या कानाकोपऱ्यांतून तरुण विद्यार्थ्यांचा घोळका या रस्त्यावरून जातायेताना दिसू लागला आणि मॉडर्नच्या पुण्याईची जाण असलेले सुजाण पालक आपल्या पाल्यांना हाताशी धरून मोठ्या कौतुकाने व कुतुहलाने या वास्तूत प्रवेशू लागले.

**प्रयोगशाळांची शास्त्रशुद्ध उभारणी**

या महाविद्यालयाच्या उभारणीमध्ये संस्थेच्या कार्यकारी मंडळाने एक सूत्र डोळ्यांपुढे कायम ठेवले होते. ते म्हणजे हे महाविद्यालय उत्तम व दर्जेदार शिक्षण देणारे केन्द्र बनले पाहिजे आणि ते आजुबाजूच्या मोठमोठ्या महाविद्यालयांच्या तुलनेने कोठेही कमी पडता कामा नये. त्यामुळे शास्त्रशुद्ध पद्धतीने शास्त्र–प्रयोगशाळांची हवा, उजेड इत्यादी संबंधीची गरज लक्षात घेऊन झालेली बांधणी, तसेच अद्ययावत् प्रयोग–साधने, संपन्न ग्रंथालय, सुसज्ज फर्निचर इत्यादी गोष्टींकडे जातीने लक्ष दिले गेले. त्यासाठी भारतातीलच नव्हे तर परदेशातील प्रयोगशाळांच्या आराखड्यांचा अभ्यास केला गेला. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शिक्षण विषयक समितीची याबाबतची शिफारस लक्षात घेऊन त्याप्रमाणे प्रयोगशाळांची रचना व मांडणी केली गेली.

**पंधरा लक्ष रुपयांची तरतूद**

महाविद्यालयाची वास्तू बांधताना पुढील १० वर्षांतील प्रगती लक्षात घेऊन सुरुवातीलाच जवळ जवळ २५०० विद्यार्थ्यांची सोय करता येईल अशी इमारत उभारली गेली. हे सर्व होत असताना संस्थेचे सचिव श्री. ताटके व त्यांचे सहकारी यांनी सातत्याने लागणाऱ्या आर्थिक मदतीचा ओघ अखंड चालू ठेवला होता. कोठेही पैशाअभावी बांधकामात कुचराई व घातक ठरेल अशी काटकसर त्यांनी होऊ दिली नाही. १४ ऑगस्ट १९६९ ते डिसेंबर १९७० या काळात जवळ जवळ १२ ते १५ लक्ष रुपयांची सोय करणे ही साधी गोष्ट नाही. इमारतीच्या बांधकामाचे पैसे वेळच्या वेळी दिले गेले हेही उल्लेखनीय ठरावे. श्री. आपटे व श्री. महाडकर यांच्या अविश्रांत परिश्रमामुळे महाविद्यालयाची इमारत वेळेवर पूर्ण होऊ शकली.

**सार्वजनिक कार्याचा वस्तुपाठ**

१९७० साली महाविद्यालय सुरू झाले त्यावेळी श्री. ताटके यांनी वयाची सत्तरी गाठली होती. तरीही त्यांच्या अंगचे उत्साह, कर्तृत्व, धडाडी, चिकाटी, सहनशीलता इ. गुण टिकून होते. श्री. ताटके यांच्या बरोबर काम करणारी जवळपास त्यांच्याच वयाची किंवा वयाने थोडी मोठी अशी प्रि. सुरू, श्री. मायदेव, डॉ. भावे, डॉ. काळे, श्री. लिमये यां-सारख्या मंडळींचाही कामाचा आवाका, दूरदर्शीपणा, शिक्षणाविषयीचा निदिध्यास व विशाल दृष्टिकोन अत्यंत स्पृहणीय होता, आजही आहे. आजचे महाविद्यालय म्हणजे त्यांच्या अखंड परिश्रमाचे व ध्येयवादाचे साकार रूप होय. आम्हाला येथे हे नमूद केले पाहिजे की इमारतीचे बांधकाम, वस्तूंची खरेदी, प्राध्यापकांची नेमणूक इत्यादी बाबतीत अत्यंत उच्च प्रतीची निस्पृहता निरपेक्षता व निःपक्षपातीपणा या सर्व मंडळींनी ठेवला होता व त्याचप्रमाणे ते सातत्याने वागले आणि महाविद्यालयाच्या संबंधीच्या सर्व योजना त्यांनी यशस्वीपणे राबविल्या. मतभेद नव्हते असे नाही. परंतु महाविद्यालयाचे कार्य अधिक चांगल्या रीतीने व्हावे याबद्दलची तळमळ त्यामागे होती आणि या धोरणामुळेच नाणावलेला, तत्पर आणि शैक्षणिक दृष्टिकोन असलेला प्राध्यापक वर्ग या मंडळींना जमविता आला. सार्वजनिक संस्थांत विशेषतः शिक्षण संस्थात काम करताना कशाप्रकारे काम करावे याचा एक आदर्श वस्तुपाठच या मंडळींनी घालून दिलेला आहे. आणि आम्हांला हे सर्व अत्यंत जवळून पाहावयास मिळाले हे आमचे मोठे भाग्य होय.

**कै. डॉ. वि. ना. भावे**

संस्थेच्या कार्यकारी मंडळातील डॉ. वि. ना. भावे दुर्दैवाने आज आमच्यात नाहीत.



कै. डॉ. वि. ना. भावे

(दि. २७ मे १९७१ ला त्यांचे देहावसान झाले.) परंतु त्यांचा उत्साह, त्यांची धडपड, त्यांचा सल्ला, प्रत्येक गोष्टीचा बारकाईने व पुढील प्रगतीच्या दृष्टीने विचार करण्याची त्यांची

पद्धत हे सर्व आजही डोळ्यांपुढे उभे राहते. विशेष म्हणजे संस्थेचे कार्य करीत असताना डॉ. भावे अधिकाराच्या भाषेत कधीच बोलले नाहीत, अगर वागले नाहीत. त्यांची वागणुकीची पद्धत कायम प्रेमाची, विनंतीची व मित्रत्वाची असे. डॉ. भावे यांच्या स्मृतीला आम्ही अत्यंत आदराने अभिवादन करतो.

जी माणसे खरोखर मोठी असतात त्यांच्यामध्ये अशी ही प्रेमाची, परस्पर आदराची व मित्रत्वाची भावना सदैव दिसून येते. प्राचार्य सुरू, श्री. मायदेव, डॉ. काळे, श्री. भाऊसाहेब लिमये व श्री ताटके या सर्व मंडळींत आम्हांला हे गुण प्रकर्षाने आढळून आले. आणि या प्रेमळ, मित्रत्वाच्या वागणुकीमुळेच आम्हांला काम करताना नेहमी उत्साह वाटत गेला.

या महाविद्यालयात प्रथमवर्षीच पदवीपूर्व वर्ग, प्रथमवर्ष कला, शास्त्र व वाणिज्य असे वर्ग उघडले गेले.

या महाविद्यालयाचे उद्घाटनदेखील कोणत्याही समारंभाने न घडता अर्थपूर्ण अशा वेदघोष-पर प्रार्थनेनें आणि खड्ड व फळ्यानेच झाले.

दिनांक १५ जून १९७० ला सुरुवातीच्या ५०५ विद्यार्थ्यांसमोर प्राचार्यांच्या अभिभाषणाने या महाविद्यालयाच्या कार्यास सुरुवात झाली व दिनांक १६ जून १९७० पासून निरनिराळ्या वर्गांचे अध्यापनकार्य सुरू झाले.

## महाविद्यालयाची संख्यात्मक प्रगती

| | १९७०–७१ | ७१–७२ | ७२–७३ | ७३–७४ | ७४–७५ | ७५–७६ |
|---|---|---|---|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | ७०७ | ११२० | १४२१ | १८७९ | १९६३ | २२५८ |
| कला विभाग | १३३ | २०२ | २८८ | ४६१ | ५१७ | ६२१ |
| शास्त्र विभाग | २०४ | २९६ | ४२४ | ५२७ | ५२५ | ५२२ |
| वाणिज्य विभाग | ३७० | ६२२ | ७०९ | ८९१ | ९२१ | १११५ |
| विद्यार्थी ( Boys ) | ५७० | ९०१ | ११०४ | १४२५ | १४६४ | १७०० |
| विद्यार्थिनी ( Girls ) | १३७ | २१९ | ३१७ | ४५४ | ४९९ | ५८८ |
| आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गातील | १२२ | २४५ | ३२८ | ४०२ | ४४३ | ५५९ |
| वर्गीकृत जातीजमातींतील | ३४ | ५२ | ५३ | ८३ | ११७ | १४० |
| एकूण शिक्षक | २५ | ४० | ४७ | ६४ | ६६ | ६६ |
| प्राध्यापक | ८ | ८ | १२ | १४ | १४ | १५ |
| उप-प्राध्यापक | १ | ७ | ५ | ५ | ८ | ७ |
| व्याख्याते | १० | १५ | १६ | २६ | २४ | ३२ |
| प्रयोग निर्देशक | ६ | १० | १४ | १७ | १८ | १२ |
| फेलो ट्यूटर | — | — | — | २ | २ | — |
| कार्यालयीन व ग्रंथालय कर्मचारी | ६ | ७ | ९ | १२ | १३ | १५ |
| इतर सेवकवर्ग | १९ | २८ | २८ | ३५ | ३५ | ३७ |

## महाविद्यालयाचे ग्रंथालय

| | ७०–७१ | ७१–७२ | ७२–७३ | ७३–७४ | ७४–७५ | ७५–७६ |
|---|---|---|---|---|---|---|
| एकूण ग्रंथसंख्या | २४८० | ५१२० | ७९८७ | ९५९५ | ११२६८ | १२२५७ |
| कलाविभाग | ११४५ | २५१७ | ४५९८ | ५३९१ | ६३५७ | ६८८३ |
| शास्त्र विभाग | ७१९ | १२८९ | १७८२ | २३०० | २६२५ | २७५८ |
| वाणिज्य विभाग | ६१६ | १३१४ | १६०७ | १९०४ | २२८६ | २६१६ |
| संदर्भ ग्रंथ | १२० | १६२ | १८३ | २०५ | २२८ | २४२ |
| वृत्तपत्रे व नियतकालिके | ३५ | ७३ | ७५ | ७५ | ८२ | ८२ |
| देणगी रूपाने मिळालेले ग्रंथ | ३२३ | ४७५ | १५२१ | ३६९ | ९७ | ९२ |

## महाविद्यालयाचा आर्थिक व्यवहार

| | ७०–७१ | ७१–७२ | ७२–७३ | ७३–७४ | ७४–७५ | ७५–७६ |
|---|---|---|---|---|---|---|
| ट्यूशन फीचे उत्पन्न | २१५२२० | ३४१०२२ | ४४३५७५ | ५७२७७६ | ६३०६२५ | ६९८९०० |
| पगारावरील खर्च | १७५७६३ | ३५९४११ | ४६३२५९ | ५९२७३८ | ६४९१३८ | ७०४४०० |
| तूट : सरकारी अनुदान पद्धतीप्रमाणे | ३०८९७२ | ३०७१९४ | ३४८५९४ | २८८४२५ | २९८९७० | — |
| सरकारी अनुदान | ५००० | १९५३५५ | २०२७२५ | २२९०१५ | २५७४७४ | २४२३७५ |
| विद्यापीठ अनुदान मंडळाकडून मिळालेली मदत | — | २७१२५ | १०००० | ३७४५० | ४२२५० | ५२००० |
| प्रयोग शाळा, उपकरणे, साधनसामग्री, फर्निचर ह्यावरील खर्च | २२६९९२ | १२८७०९ | ११२६७० | ९६९४४ | २४४०७ | ४१००० |
| महाविद्यालयाच्या उत्पन्नातून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या व फी-सवलत | ४९८० | ७६१२ | १२६२६ | १५४०५ | १३८२७ | १६००० (अपेक्षित) |
| प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीकडून घेतलेले कर्ज | गेल्या ५ वर्षांत सोसायटीकडून कर्ज रूपाने घेतलेली व परत द्यावयाची रक्कम रु. ५८९७६१ आहे | | | | | |

# महाविद्यालयाची गुणात्मक प्रगती ( अ )

| विद्यापीठ परीक्षांचे निकाल | ७०–७१ | ७१–७२ | ७२–७३ | ७३–७४ | ७४–७५ |
|---|---|---|---|---|---|
| पदवीपूर्व कला | ५३·४ | ५५·८८ | ६२·९ | ७०·५ | ७२ |
| प्रथमवर्ष ,, | ४६·६ | ७८·२० | ७१·४ | ६८·७५ | ७४·३ |
| द्वितीय वर्ष ,, | * | * | * | * | * |
| तृतीय वर्ष ,, | — | — | ७६·९२ | ६६·६ | ५६·५ |
| पदवीपूर्व शास्त्र | ५५ | ४१·४ | ५७·४ | ४०·५ | ४१·२ |
| प्रथमवर्ष ,, | ५५ | ६६·६ | ४५·९ | ४७·६ | ६०·१ |
| द्वितीयवर्ष ,, | * | ८१·२५ | ७०·३ | ८८·८८ | ९५·८ |
| तृतीयवर्ष ,, | — | — | ८५·७ | ९६·२२ | ५९·३ |
| पदवीपूर्व वाणिज्य | ६२ | ७८ | ७२·३ | ५६·९ | ६९·४ |
| प्रथम ,, | ६६ | ७६·११ | ५५·७१ | ५४·१९ | ७३·०० |
| द्वितीय ,, | * | * | * | * | * |
| तृतीय ,, | | ८१·८१ | ७४·८ | ९१·८७ | ५९·३ |

* सर्व विद्यार्थ्यांना पुढील वर्गातील अभ्यासक्रमास परवानगी




विद्याशाखांनुसार महाविद्यालयाची विद्यार्थि-संख्या

# महाविद्यालयाची गुणात्मक प्रगती ( ब )

## वैशिष्ट्ये : ( १ ) शैक्षणिक

### गेल्या ५ वर्षांत विद्यापीठ परीक्षांत पहिल्या १० क्रमांकात चमकलेले विद्यार्थी

| वर्ष | विद्यार्थ्यांचे नाव | परीक्षा | विद्यापीठात प्राप्त झालेला क्रमांक |
|---|---|---|---|
| १९७१ | कु. प्रतिभा कान्हेरे | पदवीपूर्व वाणिज्य | ४ था |
| | श्री. शाम वाघ | ,, | ६ वा |
| | कु. हेमलता अभ्यंकर ( आता सौ. लेले ) | पदवीपूर्व कला | ४ था |
| १९७२ | कु. पद्मिनी जोगळेकर | पदवीपूर्व वाणिज्य | ८ वा |
| १९७३ | कु. ज्योती राऊत | पदवीपूर्व कला | १० वा |
| १९७४ | कु. पद्मजा पेंढारकर | ,, | ७ वा |
| | कु. नीलिमा गोडसे | पदवीपूर्व शास्त्र | ८ वा |
| | * सौ. हेमा लेले | तृतीय वर्ष कला मराठी विशेष विषय | १ ला |
| १९७५ | † कु. छाया जोगळेकर | तृतीय वर्ष वाणिज्य | २ रा |
| | श्री. पारसमल लुंकड | पदवीपूर्व वाणिज्य | ९ वा |

७२–७३ श्री. घनश्याम डाळवाले ह्यांनी तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत ॲडव्हान्स्ड कॉस्ट अकौंटिंग ह्या विषयात सर्वाधिक गुण मिळविले.

७३–७४ श्री. रवींद्र गुर्जर ह्यांनी तृतीय वर्ष वाणिज्य परिक्षेत ॲडव्हान्स्ड कॉस्ट अकौंटिंग ह्या विषयात सर्वाधिक गुण मिळविले.

---

* सौ. हेमा लेले ह्यांनी विद्यापीठाची मराठी विषयासाठी असलेली सर्व पारितोषिके पटकाविली.

† कु. छाया जोगळेकर ह्यांनी तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत ॲडव्हान्स्ड कॉस्ट अकौंटिंग ह्या विषयात विद्यापीठात सर्वाधिक गुण मिळविले.

## वैशिष्ट्ये : ( २ ) सांस्कृतिक व क्रीडाविषयक

गेल्या ५ वर्षात महाविद्यालयीन, आंतर महाविद्यालयीन, आंतर विद्यापीठीय, राज्य पातळीवर आणि राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये ह्या महाविद्यालयातील बरेच विद्यार्थी चमकले. त्यातील थोडी श्रेयनामावली :—

### १९७०–७१

विविध राज्य व आंतर विद्यापीठीय क्रीडा व इतर स्पर्धांत विशेष प्राविण्य;

दीपक गोडबोले ( सूर मारणे ), दिलीप मिटकर ( बास्केट बॉल ), उदय लागू ( जलतरण ), सतीश दोशी, ( गोळाफेक ) व्ही. आय. खर्डे ( ज्युडो ), संजय निघोजकर ( N. C. C. ), कु. हेमा अभ्यंकर ( युवक महोत्सव ).

### १९७१–७२

कु. भारती शहा ( बॉल बॅडमिंटन ), कु. मंगल पटवर्धन ( N. C. C. ).

### १९७२–७३

अभय प्रधान ( बास्केट बॉल ), श्रीरंग इनामदार ( खोखो ), कु, मंगला चाफेकर ( मैदानी शर्यती ), कु. भारती शहा व कु. संजीवनी साने ( बॉल बॅडमिंटन ), मोहन आयना ( गिर्यारोहण ), शिंदे व कु. सीमा वान्हळ ( N. C. C. ) कु. शैलजा तेलंग ( बास्केट बॉल ), कु. सुरेखा वाळवेकर ( हॅंडबॉल ).

## १९७३–७४

पडवळ ( वेट लिफ्टिंग ), शिवाजी निम्हण ब नंदकुमार कहाणे ( कुस्ती ), विक्रमादित्य शिंदे व कु. पद्मा घोडके ( N. S. S. ), सुदाम शिंदे ( व्हॉली बॉल ), कु. भारती शहा ( बॉल बॅडमिंटन ).

व्हॉलीबॉल व खो खो मध्ये अजिंक्यपद.

कु. उर्मिला रणदिवे व सौ हेमा लेले ( पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धा ).

मोहन आयना—१९, ९०० फूट गिर्यारोहण, राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांच्या हस्ते रौप्यपदक.

## १९७४–७५

व्हॉली बॉल अजिंक्यपद.

श्रीरंग इनामदार, अतुल जोशी व गिरीश दंडे ( खो खो ), कु. भारती शहा ( कर्णधार, बॉल बॅडमिंटन ), विकास पुरंदरे ( तबला–तालमणी ), शैलजा तेलंग व कु. सुवर्णा कुंभार ( कर्णधार ) ( बास्केट बॉल ), कु. यशोधरा भालेराव ( वक्तृत्व ).

श्री. अविनाश ठकरार ( महाविद्यालयातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी, दामोदर ढाल विजेता )




महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील ग्रंथ-संख्या

# महाविद्यालयात सुरू केलेले विषय

| वर्ष | वर्ग | विषय |
| --- | --- | --- |
| ७०–७१ | पदवीपूर्व व प्रथमवर्ष कला, शास्त्र व वाणिज्य | सर्व विषय |
| ७१–७२ | द्वितीय वर्ष कला | इंग्रजी, मराठी, हिंदी, संस्कृत, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, गणित, संख्याशास्त्र. |
| | द्वितीय वर्ष शास्त्र | रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतिशास्त्र, जीवशास्त्र, गणित. |
| | तृतीय वर्ष वाणिज्य | सर्व सक्तीचे विषय व ॲडव्हान्स्ड अकौंटिंग ॲंड ऑडिटिंग हा विशेष वैकल्पिक विषय. |
| ७२–७३ | तृतीय वर्ष कला | मराठी, अर्थशास्त्र हे दोन विशेष विषय. |
| | तृतीय वर्ष शास्त्र | रसायनशास्त्र विशेष विषय. |
| | तृतीय वर्ष वाणिज्य | ॲडव्हान्स्ड कॉस्ट अकौंटिंग हा विशेष वैकल्पिक विषय. |
| ७३–७४ | द्वितीय वर्ष कला | भूगोल. |
| | द्वितीय वर्ष शास्त्र | संख्याशास्त्र. |
| | तृतीय वर्ष कला | राज्यशास्त्र, मानसशास्त्र हे विशेष विषय. |
| | तृतीय वर्ष शास्त्र | भौतिकशास्त्र विशेष विषय. |
| | तृयीय वर्ष वाणिज्य | संख्याशास्त्र विशेष वैकल्पिक विषय. |
| ७५–७६ | तृतीय वर्ष कला | भूगोल विशेष विषय. |
| § ७६–७७ | तृतीय वर्ष कला | इतिहास, हिंदी, संख्याशास्त्र इंग्रजी हे विशेष विषय. |
| | तृतीय वर्ष शास्त्र | वनस्पतिशास्त्र व जीवशास्त्र हे विशेष विषय. |
| | एम्. कॉम. | वाणिज्य विभागात पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सुरुवात |

§ विद्यापीठाकडे परवानगीसाठी अर्ज केला आहे.




गरीब विद्यार्थि-निधीतून दिली गेलेली मदत

गेल्या पाच वर्षांच्या काळात आम्ही कशी कशी प्रगती केली हे वर दिलेल्या माहितीवरून समजून येईलच. तथापि त्या प्रगतीमागची आमची भूमिका काय होती, कोणत्या मार्गदर्शक तत्त्वांचा आम्ही अवलंब केला, याचे सिंहावलोकन आजही उद्बोधक ठरेल, या जाणिवेने प्रतिवर्षाच्या स्नेहसंमेलन प्रसंगी केलेल्या भाषणातील महत्त्वपूर्ण भाग येथे उद्धृत करण्यात येत आहे.

**महाविद्यालयाचा दृष्टिकोन**

**पहिले वार्षिक स्नेहसंमेलन ( १९७०-७१ दि. २५-१-१९७१ ).**

**अध्यक्ष श्री. वसंतरावजी वैद्य**

**प्रमुख पाहुणे : श्री. नामदेवराव मते, महापौर, पुणे.**

मॉडर्न महाविद्यालय ही नवीन शिक्षण संस्था स्थापताना तीन प्रमुख विचार डोळ्यांपुढे ठेवण्यात आले आहेत :

१. समाजास दर्जेदार शिक्षण मिळावे, शिक्षणाचा प्रसार योग्य तऱ्हेने व्हावा व शिक्षणाची संधी जास्तीत जास्त लोकांना उपलब्ध व्हावी.

२. अशा शिक्षणातून विद्याविकास, व्यक्तिविकास व सामूहिक विकास साध्य व्हावा.

३. शिक्षण गतिमान व प्रभावी करता यावे व शैक्षणिक विकासाची प्रेरणा प्राप्त व्हावी. ज्ञानाचा योग्य तऱ्हेने वापर करणे व त्याद्वारे समाजहित व राष्ट्रहित साधता यावे, अशी प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळावी.

अशा विचारांवर आधारलेले आधुनिक, दर्जेदार, अनुकरणीय व वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारे महाविद्यालय आपल्या कार्यास प्रवृत्त झाले आहे.

या महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा त्यांच्या गुणवत्तेकडे लक्ष देण्याची आणि गुणवत्तेबरोबरच त्यांच्यात जिव्हाळा व आत्मीयता निर्माण करण्याची दृष्टी आम्ही बाळगली आहे. चांगला विद्यार्थी निर्माण करणे म्हणजे केवळ हुशार विद्यार्थी तयार करावयाचा असे नसून बहुजन समाजाच्या सुप्त आकांक्षांना मूर्त स्वरूप देणारा अष्टपैलू विद्यार्थी तयार करणे हे आहे.

वेगवेगळ्या संस्थांतून आलेला प्राध्यापक-वर्ग आणि एका नव्या वातावरणात आलेले नवे विद्यार्थी यांच्यामध्ये अल्पावधीतच स्पृहणीय असा विश्वास व जिव्हाळा निर्माण झाला, या गोष्टीचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे.

शिस्त व स्वातंत्र्य, अभ्यास व खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम व श्रमशिबिरे, सामाजिक कर्तव्याची जाणीव व स्वावलंबनाने शिक्षण घेण्याची कुवत अशा विविध व परस्परपूरक अंगांनी विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती साधण्याचे या वर्षी प्रयत्न झाले व वाढत्या उत्साहाने ते पुढेही चालू राहतील.

ह्या पहिल्या वर्षात या महाविद्यालयाने काय साधले असा जर प्रश्न विचारला तर अध्ययन-अध्यापनाबरोबर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांत अशी खात्री निर्माण झाली आहे की, त्यांच्या खऱ्याखुऱ्या अडचणींचा सहानुभूतीने विचार केला जातो; त्यांच्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन व योग्य कौतुक केले जाते, आणि त्याचबरोबर त्यांच्यात असलेल्या उणिवांवर देखील लक्ष ठेविले जाते व योग्य ते मार्गदर्शन केले जाते, तसेच नियमबाह्य वर्तनाची कठोरपणे दखलही घेतली जाते. या बाबतीत एकूण विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीचा विचार केला तर आमचा प्रत्येक विद्यार्थी स्वभावतः शिस्तप्रिय व वक्तशीरपणाचे महत्त्व जाणणारा आहे. प्राध्यापकांनी निरलसपणे त्यांच्यासाठी

घेतलेल्या श्रमांची जाण ठेवणारा आहे, कृतज्ञ आहे. तो उत्साहाने काम करण्यास तयार आहे, उत्तम सहकार्य देणारा आहे व महाविद्यालयाच्या अडचणी समजून प्रसंगी त्यासाठी झीज सोसण्यास तयार आहे.

या दृष्टीने आपल्या समाजाने जर शैक्षणिक संस्थांच्या आर्थिक गरजांची योग्य तरतूद केली व संस्थांमध्ये स्वार्थ व राजकारण न आणता अनुभवी व उत्तम अशाच प्राध्यापकांची नेमणूक करण्याबाबत जागरूकता दाखविली तर शैक्षणिक क्षेत्रातील प्रमुख घटक असे आम्ही प्राध्यापक व विद्यार्थी त्याचे योग्य ते चीज करू.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मागे फार मोठी परंपरा आहे, श्रम आहेत, तपश्चर्या आहे, निःस्वार्थी शैक्षणिक धोरण आहे आणि त्यामागे अनेक व्यक्ती व संस्थांचा मदतीचा हात आहे, सहानुभूतीचा शब्द आहे, ' आगे बढो ' अशी आत्मविश्वासपूर्ण प्रेरणा आहे आणि या सर्वांच्या आधारावर खंबीरपणे वाटचाल करणारा चालकवर्गही आहे. या सर्व गोष्टींमुळेच पुढच्या वर्षीच हे महाविद्यालय कला व शास्त्र विभागात द्वितीय वर्षापर्यंत आणि वाणिज्य विभागात पदवीपर्यंत शिक्षण देणारे महाविद्यालय होणार आहे.

**प्रतिज्ञा करण्याचा कालखंड**

**दुसरे स्नेहसंमेलन ( १९७१–७२ : मंगळवार, २५–१–१९७२ )**

**अध्यक्ष– प्राचार्य न. गो. सुरू**

**प्रमुख पाहुणे– डॉ. बा. पां. आपटे, कुलगुरु, पुणे विद्यापीठ**

" चालू शैक्षणिक वर्षातील आजचा हा एक अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. दुसऱ्या वर्षात पदार्पण केलेल्या आपल्या महाविद्यालयातील यंदाच्या कामाचा, त्यागाचा, निष्ठेचा व नवीन उपक्रमांचा आढावा घेण्याचा व पुढील वर्षासाठी नवीन प्रकल्प, नवीन योजना, जास्ती काम, परीक्षांचे यंदापेक्षा अधिक उत्तम निकाल यांसाठी परिश्रम घेण्यासाठी दृढनिश्चय करण्याचा हा दिवस आहे. आश्वासन देण्याचा, संकल्प करण्याचा, निश्चय करण्याचा व नंतर स्वस्थ बसण्याचा काळ संपला आहे व प्रत्यक्षात संपला नसेल तर संपलाच पाहिजे. प्रत्यक्ष कार्य, निश्चय व कृती यांची सांगड घातलीच पाहिजे, हे आपल्या शूर जवानांनी प्रत्यक्ष कृतीने दर्शवून दिले आहे.

निवडक विद्यार्थ्यांनी विद्यापीठ परीक्षांत प्रथम क्रमांकाचे यश मिळवावे या प्रयत्नाबरोबरच या परीक्षांत आमच्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थी उत्तीर्ण व्हावे यासाठी आम्ही प्रयत्न केले व त्यात आम्हांस मोठेच यश मिळाले आहे.

कदाचित आमच्या विद्यार्थ्यांच्या कार्याची बाहेर जाहिरात झाली नसेल, परंतु त्यांनी जे केले ते स्वेच्छेने, स्वयंप्रेरणेने आणि उत्साहाने व आत्मीयतेने केले हे येथे अवश्य नमूद केले पाहिजे. महाविद्यालयातील आपले तास बुडवून, प्रॅक्टिकल्स चुकवून आमचे विद्यार्थी विजय-मोर्चांमध्ये सामील झाले नाहीत, हे आम्हांस अत्यंत अभिमानाने नमूद करावेसे वाटते.

कोणत्याही महाविद्यालयाचा केन्द्रबिंदू तेथील विद्यार्थि-वर्ग होय. महाविद्यालयाचे यश हे सर्वस्वी विद्यार्थ्यांचे यश; परंतु अपयशाला मात्र विद्यार्थ्यांना जबाबदार धरू नये असे आमचे

प्रामाणिक मत आहे. संस्था, प्राध्यापक व प्राचार्य यांच्यावर योग्य मार्गदर्शनाची जबाबदारी असते. ती त्यांनी जाणीवपूर्वक पार पाडल्यास त्याची भरपूर जाग विद्यार्थ्यांत असते व तो त्याची परतफेड करतो, असा आमचा व आमच्या सहकाऱ्यांचा अनुभव आहे.

गेल्या वर्षी आम्ही थोडे चाचपडत होतो. उत्साह होता, पण आवाक्याची कल्पना नव्हती. सहकार्य होते, परंतु विश्वास नव्हता. यंदा मात्र हे चित्र संपूर्णतः बदलले आहे.

आमची आमच्या कार्यावर दृढनिष्ठा आहे. अखेर या निष्ठेतून व विश्वासातूनच आव्हाने स्वीकारली जातात. जीवन यशस्वी होण्यासाठी समतोल व्यक्तिमत्त्व, स्पष्ट व प्रभावी विचारदर्शन व शिस्तबद्धता यांची जरुरी असते. परस्पर सहकार्याच्या प्रेरणेने आपण आपले जीवन सर्वांगसुंदर व यशस्वी करू या.

" The great are great only because you are on your knees. Let us arise ! "




महाविद्यालयाची वाढती विद्यार्थि-संख्या

## तिसरे स्नेहसंमेलन : ( १९७२–७३ : रविवार २१–१–१९७३ )

**अध्यक्ष– डॉ. ग. स. महाजनी, कुलगुरु, पुणे विद्यापीठ**

**प्रमुख पाहुणे – श्री. निळूभाऊ लिमये, महापौर पुणे.**

आज आपल्या देशावर व विशेषतः महाराष्ट्रावर दुष्काळाचे दाट सावट पडले आहे. अत्यंत बिकट काळातून आपण जात आहोत व ह्याहीपेक्षा बिकट प्रसंगातून आपल्याला जावे लागणार आहे. कटीण प्रसंगांतून जाताना हातपाय गाळून स्वस्थ बसण्याऐवजी आपले नित्य नैमित्तिक कार्यक्रम निष्ठेने व आत्मीयतेने पार पाडण्यात व त्यातूनच संकटावर मात करण्याचा, त्याची आच कमी करण्याचा प्रयत्न करण्यात पुरुषार्थ आहे. प्रत्यक्ष संकटापेक्षा संकटाच्या विचाराने माणूस कृतिशून्य होण्याचा व त्यातून त्याचे मनोधैर्य खचण्याचा धोका संभवतो.

त्यादृष्टीने प्रसंगाचे गांभीर्य ओळखून साधेपणाने आणि गरीब व दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांस ज्यातून मदत होईल अशा तऱ्हेचा कार्यक्रम आखण्याचे आणि त्याप्रमाणे स्नेहसंमेलन पार पाडण्याचे आम्ही ठरविले. आमच्या या सर्व कार्यक्रमातील मुख्य सूर मनोरंजनाबरोबरच मदत व बचत, प्रदर्शनातून शैक्षणिक बोध व त्याबरोबरच गरीब विद्यार्थ्यांसाठी द्रव्यसहाय्य हा आहे. या दृष्टीने आज महाविद्यालयातील निरनिराळ्या संघटनांद्वारे दिली जाणारी पारि-तोषिके देखील राष्ट्रीय बचत रोख्यांच्या रूपाने दिली जाणार आहेत.

आपले महाविद्यालय काळाबद्दलच्या रूढ असलेल्या सध्याच्या कल्पनांप्रमाणे फक्त तीन वर्षांचे आहे. परंतु शैक्षणिक संस्थांचे बाबतीत जास्त पावसाळे पाहिले म्हणजेच दर्जा प्राप्त होतो असे नाही. दर्जा हा संस्थापकांचा उदार दृष्टिकोन, आर्थिक भक्कमपणा, प्राध्यापकांची गुणवत्ता व अनुभव त्याची शैक्षणिक कार्यातील आस्था व विद्यार्थी वर्गात असलेली ज्ञानार्जनाची भूक, तळमळ व झेप यांवर अवलंबून असतो. त्या दृष्टिकोनातून या महाविद्यालयाचे वय हे रसरसलेल्या जवान, बेडर व शिस्तबद्ध तरुणाचे आहे आणि तो तरुण जसा सदैव नवनवीनतेच्या शोधात असतो त्याप्रमाणेच आमचे हे महाविद्यालय कोणत्याही परंपरा, रूढी यांच्या त्याच त्याच साच्यात अडकून न राहता नवीन परंपरा, नवीन क्षेत्रे यांच्या शोधात मोठ्या उमेदीने व उत्साहाने वाटचाल करीत आहे.

संस्थेच्या नियामक मंडळाने येथे संघटित केलेले आम्ही प्राध्यापक वयाने, उमेदीने, उत्साहाने तरुण आहोत. आमची आमच्या कार्यावर दृढनिष्ठा आहे. येणारी आव्हाने स्वीकारून शैक्षणिक क्षेत्रांत उपयुक्त काम करण्याची आमची जिद्द आहे; इच्छा आहे.

१९७०-७१ या पहिल्या वर्षी आमची एकमेकांशी व विद्यार्थ्यांशी ओळख झाली. दुसऱ्या वर्षी परिचय झाला व यंदा त्याचे परस्परस्नेहात रूपांतर झाले.

या स्नेहभावनेचा, परस्पर सहकार्याचा उपयोग आमच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नती-साठी होईल असा दृढ विश्वास आहे. आमचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर या दोन्ही क्षेत्रात उज्ज्वल नैपुण्य संपादन करून या वास्तूची उंची व महाविद्यालयाचे वैभव वाढवतील अशी आमची खात्री आहे.

जिद्द व आत्मविश्वास

## चौथे स्नेहसंमेलन : ( १९७३–७४ : रविवार, दिनांक २३–१२–१९७३ )

### प्रमुख पाहुणे–प्राचार्य शिवाजीराव भोसले

या शैक्षणिक वर्षातील आजचा दिवस हा आमच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. चवथ्या वर्षात पदार्पण केलेला हा महाविद्यालयरूपी वेल चांगला बहरला आहे, फोफावला आहे. मोठ्या जिद्दीने व आत्मविश्वासाने संस्थाचालकांनी लावलेल्या या रोपट्याचे त्यांच्या प्रदीर्घ प्रयत्नामुळे, चिकाटीमुळे, श्रमामुळे व आमच्या सहकारी प्राध्यापक व विद्यार्थी मित्रांच्या सहकार्यामुळे केवळ चार वर्षांच्या काळातच वटवृक्षांत रूपांतर झाले आहे. आज या आधारवडाच्या सावलीत २००० विद्यार्थी, ७० प्राध्यापक, २५ कार्यालयीन कर्मचारी व ४० सेवक वर्ग कार्य करीत आहेत. हा आधारवड इतक्या भक्कम पायावर उभा आहे आणि त्याच्या शाखा, उपशाखा इतक्या झपाट्याने वाढत आहेत की समाजाला व यापुढील कित्येक पिढ्यांना ज्ञानरूपी सावली देण्याचे महान कार्य हा ज्ञानवृक्ष करीत राहणार आहे. ‘ याचि देहीं याचि डोळां ’ एका रोपट्याचा होत असलेला वृक्ष पहाण्याचे भाग्य अपूर्व आहे. हा आनंद आगळा आहे. महाविद्यालये झाली व होतील, परंतु मोठ्या अभिमानाने सांगावे वाटते की इतक्या अल्पकाळात एवढी प्रगती क्वचितच दृष्टीला पडते. याचा गर्व नाही. मनी नम्र भाव आहे. सार्थ अभिमान मात्र जरूर आहे.

आम्ही फार मोठ्या प्रमाणात पालकांचा व विद्यार्थ्यांचाही विश्वास संपादन करू शकलो आहोत. व्यवस्थित व शिस्तबद्ध अभ्यासासाठी व्यक्तिगत मार्गदर्शनासाठी पालक व विद्यार्थी या महाविद्यालयाकडेच आकृष्ट होतात.

गेल्या वर्षी स्नेहसंमेलन प्रसंगी म्हटल्याप्रमाणे प्रथम वर्षी आमची परस्परांशी व विद्यार्थ्यांशी ओळख झाली, दुसऱ्या वर्षी परिचय झाला, तिसऱ्या वर्षी स्नेहसंबंध प्रस्थापित झाले व यंदा ऋणानुबंध निर्माण झाले आहेत. आणि या गोष्टीचे उत्तम उदाहरण म्हणजे आमच्या माजी विद्यार्थ्यांनी स्थापन केलेली ‘ माजी विद्यार्थी संघटना.’

विद्यार्थि–प्राध्यापक घनिष्ट संबंध व मार्गदर्शन योजना

## पाचवे स्नेहसंमेलन : ( १९७४–७५ : सोमवार, दिनांक २३–१२–१९७४ )

### प्रमुख पाहुणे, श्री. राहुलकुमार बजाज, अध्यक्ष, बजाज आटो,

गेल्या पाच वर्षात आम्ही जे जे करावयाचे ठरविले ते सर्व योग्य रीतीने तडीस नेले आहे आणि प्रत्येक वर्षी प्रगतीचे नवे नवे टप्पे आम्ही गाठले आहेत.

आमच्या कार्यप्रणालीतील काही ठळक वैशिष्ट्ये :—

प्रत्येक वर्गाला दोन प्राध्यापक मार्गदर्शक म्हणून नियुक्त करण्यात आले असून ते विद्यार्थ्यांना सर्वतोपरीने मार्गदर्शन करतात. चर्चा व चाचण्या या रूपात स्वाध्यायचे ( ट्युटोरि- अल्स ) तास घेण्यावर भर दिला आहे. या योजनेला विद्यार्थ्यांचा समाधानकारक प्रतिसादही मिळाला आहे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या सर्वांगिण प्रगतीची नोंद दरमहा केली जाते व विद्यार्थी

आणि पालक यांना ती माहिती वेळोवेळी पुरविली जाते. या तऱ्हेचे अद्ययावत् All round cumulative record असलेले हे एकमेव महाविद्यालय आहे, असे सध्या बोलले जात असल्याचे तुमच्याही कानावर आले असेलच.

होतकरू गरीब व अभ्यासू विद्यार्थ्याला सर्व तऱ्हेची मदत दिली जाते. अशी मदत देताना आम्हांला आर्थिक अडचण कधीही भासली नाही. या मदतीमध्ये कपडे, अंथरूण, पांघरूण, पुस्तके, फी, जेवण, गणवेश व निवास-व्यवस्था इत्यादींचा समावेश आहे. हा अहवाल मांडत असताना उस्मानाबादचा तीन दिवस उपाशी असलेल्या विद्यार्थी, मराठवाड्यातील फक्त एका शर्ट-पायजम्यानिशी आलेला आणि शास्त्र शाखेकडे प्रवेश मिळवू इच्छिणारा विद्यार्थी, ज्याच्या शिक्षणखर्चाकरिता आईला दुसऱ्यांच्या घरी स्वयंपाक करावा लागतो असा विद्यार्थी, रात्री रिक्षा चालवून दिवसा कॉलेजात येणारा विद्यार्थी, पडेल ते काम करून शिकण्याची जिद्द बाळगणारे आमचे इतर अनेक विद्यार्थी या सर्वांचे चेहरे माझ्या पुढे उभे राहतात. प्रेमात पडलेला विद्यार्थी, आत्महत्या करावयाला निघालेला विद्यार्थी, रुसलेला, रागावलेला विद्यार्थी असे अनेक तुमच्यापैकीच असलेले विद्यार्थी माझ्या डोळ्यापुढे येतात. बाहेरच्यांचा ' कॉलेज बंद करा ' असा मोर्चा आला असताना त्यांना आमच्या विद्यार्थ्यांनी दिलेले चोख उत्तर मला आज स्मरत आहे. मला सतत जाणवते ती आमच्या विद्यार्थ्यांची सचोटी, प्रामाणिकपणा. असे अनेक अनुभव आहेत. या १९०० च्या संख्येत मार्ग चुकलेले, त्रास देणारे बेजबाबदारपणे वागणारे जेमतेम दहा एक विद्यार्थी असतील पण ते देखील सुधारत आहेत. आमच्या विद्यार्थ्यांबद्दल आम्हांला अभिमान आहे, प्रेम आहे.

या महाविद्यालयात शिस्तीने आणि नियमितपणे तास होतात. अभ्यासक्रम व्यवस्थित केला जाईल याबद्दल सातत्याने प्रयत्न केले जातात. आमच्या विद्यार्थ्यांना आमच्या प्रयत्नांची जाण आहे. त्यामुळे शिस्तभंगाचे प्रकार क्वचितच घडतात, व ते तात्डतोब मिटतात.

माजी विद्यार्थ्यांची संघटना प्रथमपासून कार्य करीत आहे. द्वितीय वर्षाचे विद्यार्थी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रेमाचा निरोप देतात. महाविद्यालयाचा निरोप घेणारे आमचे विद्यार्थी आपल्या प्रेमाचे प्रतीक म्हणून विद्यार्थ्यांना उपयुक्त अशा घड्याळ, आरसा इत्यादी विविध वस्तू महाविद्यालयास स्वेच्छेने भेट म्हणून देतात.

शेवटच्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना आम्ही औद्योगिक संघटना व प्रकल्प यांना भेटी देण्यास उत्तेजन देतो, सहाय्य करतो. उद्योगधंद्यातील तज्ज्ञ आमच्याकडे येऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. शेवटच्या वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी अर्ज कसा करावा, मुलाखतीत कसे बोलावे या-संबंधीचे मार्गदर्शन करणारे आणि शास्त्रोक्त बौद्धिक चाचणीची कल्पना देणारे शिबिर चालविण्यात येते. या शिबिराचा फायदा अनेक विद्यार्थी घेतात व त्याचा त्यांना उपयोग होतो, असा आमचा अनुभव आहे.

आमच्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यासाठी आमच्या प्राध्यापक वर्गाने प्रत्येकी रु. १०० रकमेची ठेव ठेवून रु. ७००० जमविले आहेत व त्यातून पारितोषिके दिली जातात. सेवक-वर्गासाठीही प्राध्यापक वर्गाने रु. २५०० चा ' सेवक कल्याण निधी ' जमविला असून त्यातून सेवकवर्गाला अडीअडचणीत लहानमोठी रक्कम देता येते.

१९७२ पासून महाविद्यालयाच्या आवारात पडलेले कागद-कपटे एकत्रित करून विकण्याची व्यवस्था केलेली आहे. या विक्रीतून रु. १०५ (१९७२–७३), रु. १४५ (१९७३–७४) व रु. २४० (१९७४–७५) मिळाले आहेत. यातील निम्मी रक्कम विद्यार्थी सहाय्यक निधीमध्ये व निम्मी रक्कम सेवक वर्गाच्या कल्याण निधीमध्ये आम्ही जमा केली आहे.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीने गेल्या पाच वर्षांत या महाविद्यालयाच्या उभारणी-साठी व प्रगतीसाठी कर्ज व ठेव रूपाने वीस लाख रुपयांची गुंतवणूक केली आहे. त्यात इमारत १६ लक्ष, ग्रंथालय १ लक्ष, शास्त्रीय उपकरणे २ लक्ष व फर्निचर व कार्यालयीन उपकरणे १ लक्ष रुपये अशी ती गुंतवणूक आहे.

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून सर्व शैक्षणिक कार्यात कोठेही कमतरता पडू न देता सर्वार्थाने Progressive व Modern असे हे महाविद्यालय चालविल्यामुळे दरवर्षी तूटसुद्धा वाढते आहे व त्यामुळे नवीन प्रकल्प हाती घेणे शक्य होत नाही. कर्ज व ठेवी यांवरील व्याजापोटी संस्थेला दरवर्षी दीड लक्ष रुपयांची तरतूद करावी लागते. त्यामुळे महाविद्यालयाच्या पुढील प्रगतीसाठी यापुढे आर्थिक अडचण भासणार आहे.




महाविद्यालयाचा प्राध्यापक-वर्ग

आमच्या तातडीच्या गरजा खालीलप्रमाणे आहेत.

( १ ) महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी इमारत.

( २ ) एक सुसज्ज मध्यवर्ती सभागृह.

( ३ ) विद्यार्थि–विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृहे.

( ४ ) प्राचार्य व प्राध्यापक निवास-व्यवस्था.

( ५ ) खेळांसाठी सुसज्ज हॉल व पॅव्हेलियन.

या गरजांच्या पूर्तीकरिता जवळजवळ ६ ते ७ लक्ष रुपयांची आवश्यकता आहे.

नवीन येणाऱ्या १० + २ + ३ या शिक्षणक्रमामुळे महाविद्यालयातील विद्यार्थि-संख्या कमी होऊन आर्थिक बोजा वाढण्याचा संभव आहे.

आमची आजवरची कार्यप्रणाली लक्षात घ्या, कसाला लावून पहा. हे महाविद्यालय शिस्तबद्ध, व उत्तम व आदर्श नागरिकत्वाची जाण निर्माण करणार आहे किंवा नाही याच्या प्रत्यंतरासाठी कोणत्याही कसोट्या लावा. त्यात आम्ही यशस्वी ठरलो तर मात्र समाजातील सर्व थरांतील व्यक्तींकडे व विशेषत: उद्योगपतींकडे आर्थिक साहाय्याची आम्ही अपेक्षा केल्यास ते वावगे ठरणार नाही आणि अशी मदत ही शिक्षणासाठी, भावी पिढीसाठी, व उद्योगधंद्यासाठी लागणारे तंत्रज्ञ व व्यवस्थापक घडविण्यासाठी समाजाने केलेली उत्तम गुंतवणूकच ठरेल, यात शंका नाही.

१९७० ते १९७६ या काळात सर्वांगीण प्रगती साधून आमच्या महाविद्यालयाने पुण्यातील नामवंत व नावाजलेल्या महाविद्यालयांच्या मालिकेत आपले स्थान तर निश्चित केलेच, त्याचबरोबर विद्यार्थिवर्ग व पालक यांच्याशी जवळीक साधून महाविद्यालयाने एक प्रकारचे, मोकळेपणाचे, शिस्तीचे व परस्पर स्नेहभावाचे वातावरण प्रथमपासूनच निर्माण केले आहे. नवनवीन विद्यार्थ्योपयोगी व शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाचे उपक्रम व प्रयोग हे या महाविद्यालयाचे आगळे वैशिष्ट्य आहे.

या आढाव्याच्या निमित्ताने या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची व प्रयोगांची माहिती खाली देत आहे.

**१. विद्यार्थी निरनिराळे उपक्रम व प्रयोग**

या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या संबंधात खालील तत्त्वे प्रथम निश्चित केली गेली.

विद्यार्थ्याला प्रत्येक गोष्ट समजली पाहिजे. त्याला आवश्यक मार्गदर्शन मिळालेच पाहिजे.

विद्यार्थ्याला आपल्या शंका, अडीअडचणी, तक्रारी मांडण्यास पूर्ण वाव व स्वातंत्र्य दिले पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या प्रत्येक तक्रारीची दखल घेतली पाहिजे; अशा तक्रारी योग्य असतील तर त्यांचे तातडीने निराकरण झाले पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या एकूण अध्ययनकार्यात शिस्त, नियमितपणा व नियोजन यांवर भर दिला गेला पाहिजे.

विद्यार्थ्यासंबंधीच्या कोणत्याही कार्यक्रमाचे नियोजन करताना शैक्षणिक दृष्टिकोण ठेवणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांच्या गुणांचे कौतुक वेळच्या वेळी केले जावे पण त्याबरोबरच शिस्तभंगाची दखलही ताबडतोब घेतली जावी, ही तत्त्वे कार्यान्वित करण्याकरिता खालील गोष्टी केल्या जातात.

प्रवेश व विषय-निवड-मार्गदर्शन, व सोयी सवलतींसंबंधी मार्गदर्शक चर्चा, पुस्तके, फी व इतर आर्थिक अडचणींत मदतीची व्यवस्था, ' कमवा व शिका ' या योजनेखाली शक्य ते प्रोत्साहन व मदत, शिष्यवृत्त्या व मदत देताना शास्त्रीय कसोट्यांचा अवलंब, वर्ग-प्राध्यापक सल्लागार व मार्गदर्शक, प्रगतीची योग्य दखल व प्रगति-नोंद पुस्तकांत सर्व गोष्टींचा उल्लेख, हुशार तसेच अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन व अभ्यासाच्या खास सवलती इ. गोष्टी केल्या जातात.

विद्यार्थ्यांना औद्योगिक व इतर प्रकल्पांना भेट देण्याची, कलांचे शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येते.

द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळी मंडळे, त्यांची स्वतंत्र भित्तिपत्रके, तसेच चर्चा व परिसंवाद यांचे नियोजन केले गेले आहे.

द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना समारंभपूर्वक प्रेमाचा निरोप देण्याची व शुभेच्छा देण्याची पद्धत रूढ झाली आहे.

तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी वर्षाच्या अखेरीस ' व्यवसायमार्गदर्शन शिबिर ' आयोजित केले जाते. त्यात नोकरीकरिता अर्ज लिहिणे, मुलाखतीस उत्तरे देणे इ. संबंधी तज्ज्ञांच्या सहकार्याने शास्त्रोक्त ज्ञान दिले जाते.

आमची प्रथा : विद्वज्जन गौरव



बांगला-देश युद्धातील भारताच्या विजयोत्सव प्रसंगी महाविद्यालयात श्री. एस्. एम्. जोशी भाषण करतांना



तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा महाविद्यालयात सत्कार

शैक्षणिक प्रक्रियेतील दुसरा महत्त्वाचा घटक प्राध्यापक किंवा शिक्षक. यासंबंधी खालील तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत :

**२. प्राध्यापक**

१. प्रत्येक प्राध्यापकाला त्याच्या पात्रतेप्रमाणे भरपूर काम दिले जाईल व ते योग्य तऱ्हेने होते किंवा नाही यावर सातत्याने देखरेख राहील.

२. महाविद्यालयाच्या एकूण कामकाजामध्ये प्राध्यापकांचा प्रत्यक्ष सहभाग राहील. त्यांच्याकडे महत्त्वाचे व त्यांच्या आवडीचे वेगवेगळे विभाग सोपविले जातील. कार्यपद्धती ठरविल्यानंतर त्या प्राध्यापकांना कामकाजात संपूर्ण स्वातंत्र्य राहील.

३. कोणतीही नवीन योजना आखताना सर्व प्राध्यापकांशी चर्चा केली जाईल. त्यांचा दृष्टिकोण समजावून घेतला जाईल.

४. प्राध्यापकाला आपल्या विषयाचे अध्यापन व विभागाच्या दृष्टीने आपली पात्रता वाढविण्याकरिता शक्य ते सर्व साहाय्य दिले जाईल.

या मार्गदर्शक तत्त्वांच्या निश्चितीनंतर महाविद्यालयाचे जवळजवळ सर्व शैक्षणिक कामाचे संपूर्ण विकेंद्रीकरण केले गेले आहे. प्रत्येक विभाग-प्रमुखाकडे जबाबदारी देण्यात आली आहे व त्याच्या शिफारशीला महत्त्वाचे स्थान दिण्यात आले आहे.

आमची प्रथा : प्राध्यापक गौरव




डॉ. परांजपे यांचा कुलगुरु रँ. महाजनी यांच्या हस्ते सत्कार (डाव्या बाजूस प्राचार्य लिमये)

सर्व कामाचे नियोजन केले गेले आहे व प्रत्येक गोष्टीसाठी वेळापत्रक ( Calender ) तयार करण्यात आले आहे.

प्राध्यापक कल्याण निधीची उभारणी केली आहे.

प्राध्यापक शिष्यवृत्ती निधी जमविला आहे. त्यातून आमच्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेप्रमाणे बक्षिसे दिली जातात. सर्व प्राध्यापकांची प्रत्येक वर्षी एक तरी सहल आयोजित केली जाते. प्राध्यापकांच्या कुटुंबीयांसह अत्यंत मोकळ्या वातावरणात छोटे स्नेहसंमेलन घडवून आणले जाते.

प्राध्यापक अभ्यास मंडळाद्वारे प्रतिवर्षी आठ निबंधांचे वाचन व चर्चासत्रे घडवून आणली जातात. गेल्या ५ वर्षांत अशी ४० चर्चासत्रे पूर्ण झाली आहेत. आपल्या विषयात संशोधन करणाऱ्या प्राध्यापकांचा सत्कार करण्याची प्रथा महाविद्यालयात रूढ आहे. त्याचबरोबर विद्वत्तासंपन्न व्यक्तींचे सत्कार करून त्यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळविण्याची आमची धडपड चालू असते.

प्रत्येक विभागाच्या सभा व सर्व प्राध्यापकांच्या सभा याबाबत वेळापत्रक तयार करून त्याप्रमाणे दरवर्षी कार्यवाही होत आहे. प्रत्येक शैक्षणिक वर्षात प्रत्येक विभागाच्या निश्चितपणे ५ सभा होतात. त्यांतील एक प्राचार्यांच्या उपस्थितीत होते. प्राध्यापक हा शैक्षणिक परिसरातील कुटुंबीय आहे ही भावना रुजविण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला जातो. त्यामध्ये प्रत्येक प्राध्यापकाला त्याच्या जन्मदिवसाच्या दिवशी शुभेच्छा संदेश पाठविण्याची योजना, मंगलप्रसंगी भेट योजना, अडीअडचणीला पैशाची व मनुष्यबळाची मदत योजना इ. गोष्टी केल्या जातात. सर्वच्या सर्व प्राध्यावक बचत गटात सामील झाले आहेत. दरवर्षी सर्व प्राध्यापकांची वैद्यकीय तपासणीची व्यवस्था करून त्यांस वैद्यकीय मार्गदर्शन मिळवून देण्याची योजना यंदा कार्यान्वित केली जाणार आहे.

**३. महाविद्यालयीन व्यवस्थापन**

दैनंदिन कार्यपद्धती व शैक्षणिक कार्यवाहीमध्ये नियोजन, परस्पर संपर्क, कामाचे विकेंद्रीकरण, विचारविनिमय यांवर भर दिलेला आहे.

**४. कर्मचारी व सेवकवर्ग**

हा महाविद्यालयीन व्यवस्थापनातील महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या संबंधीच्या एकंदर कार्यपद्धतीत नियोजन, वरचेवर सभा, कल्याणकारी योजना, सहली, मंगल प्रसंगी भेट योजना, दिवाळी फंडातून उचल योजना इ. गोष्टी कार्यान्वित केल्या आहेत. स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताकदिन या राष्ट्रीय महत्त्वाच्या दिवशी एकत्रित चहापानाचे समारंभ प्रथमपासून आयोजित केले जात आहेत.

**५. माजी विद्यार्थी**

माजी विद्यार्थ्यांची संघटना १९७२ पासून स्थापन झाली असून त्या संघटनेमार्फत व्याख्यान-सत्र, स्नेहसंमेलन, आजी विद्यार्थ्यांना पुस्तक-भेट व शिष्यवृत्त्या, महाविद्यालयातून पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना नोकरी मिळविण्यासाठी मदत इ. उपक्रम नियमित चालू आहेत. २६ जानेवारी १९७६ रोजी आयोजित केलेल्या माजी विद्यार्थी संमेलनाला १२५ विद्यार्थी विद्यार्थिनी हजर होते.

**६. पालक**

पालकवर्गाला पाल्याच्या प्रगतीसंबंधीचे अहवाल वेळोवेळी पाठविले जातात. निकालपत्रे परीक्षा झाल्यापासून एका महिन्यात घरी पाठविण्याची पद्धत यशस्वीपणे काम करीत आहे.

यंदा २६–२–१९७६ रोजी पालकांच्या मेळावा भरवून महाविद्यालयाने नवीन पायंडा व उपक्रम केला आहे. त्याला पालकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. ज्या सहाशे पालकांना निमंत्रित केले होते त्यापैकी १६८ पालक उपस्थित होते.

## ७. कार्यपद्धतीचे मोजमाप व संशोधन

प्रत्येक उपक्रम साधक बाधक चर्चेनंतर निश्चित केला जातो. तसेच प्रत्येक उपक्रमानंतर त्यातील उणीवांची व चर्चा व त्यातील सुधारणा याबद्दल ऊहापोह होतो.

१९७४ साली या महाविद्यालयात चार वर्षे शिकलेली आमची पहिली तुकडी जेव्हा पदवी परीक्षेला बसण्यास पात्र झाली त्यावेळी त्या प्रत्येक विद्यार्थ्याला एक सविस्तर प्रश्नावली देऊन त्यातून विद्यार्थ्यांचे मत अजमाविण्याचा व त्यांच्या सूचना लक्षात घेऊन त्याप्रमाणे सुधारणा करण्याचा यशस्वी प्रयत्न या महाविद्यालयात केला गेला आहे.

गेल्या सहा वर्षात अशा अनेक योजना व उपक्रम आम्ही यशस्वीपणाने पार पाडले आहेत. दरवर्षी काही नवीन उपक्रम आखणे व जुन्या उपक्रमांत सुधारणा करणे हे आमचे धोरण आहे. नवीन उपक्रम अंगिकारताना पूर्वीच्या उपक्रमांकडे दुर्लक्ष करणे हा आमचा स्वभाव नाही. आम्ही जेव्हा एखादा उपक्रम हाती घेतो, तेव्हा त्याचा साधकबाधक विचार करतो, आमच्या आवाक्याचा विचार करतो व उपयुक्त उपक्रम सातत्याने चालविण्याचा निश्चय करून त्यासाठी आवश्यक यंत्रणा निर्माण करतो.

महाविद्यालयातील या विविध योजना व उपक्रम ज्यांच्यासाठी करावयाचे त्या सर्व संबंधितांशी आधीच मोकळेपणाने विचार विनिमय केलेला असल्यामुळे उपक्रम अयशस्वी होणे उपक्रमाला प्रतिसाद न मिळणे हे आम्हांला अजून माहिती नाही.

सभा, बैठकी, चर्चा, विचार विनिमय वगैरेच्या मंथनांतून एखादा उपक्रम हा एकाद्या व्यक्तीच्या अगर पदाधिकाऱ्याच्या मक्तेदारीचा भाग न ठरता तो सर्व महाविद्यालयाच्या नित्य नैमित्तिक कार्याचा भाग ठरतो. सर्वजण त्या योजनेत बांधले जातात व गुंतले जातात. त्यामुळे वायफळ टीका टिप्पणी अगर कुत्सित चर्चेला वाव मिळत नाही, वेळ मिळत नाही, श्रोता मिळत नाही.

उपक्रम पार पाडल्यानंतर कार्यपद्धतीचे मोजमाप अगर संशोधनाचे निमित्ताने एकत्र बैठकीत अत्यंत मोकळेपणाने उपयुक्त सूचना व टीका–टिप्पणी होते व त्यातून सुधारणा घडविण्याचा प्रयत्न केला जातो.

सूत्ररूपाने सांगावयाचे झाल्यास सध्या हक्कासंबंधीची जागरुकता सर्वत्रच आढळते परंतु या महाविद्यालयात जे महत्त्वाचे सूत्र अगर धोरण राबविले जाते ते म्हणजे विद्यार्थी, कर्मचारी, सेवकवर्ग व प्राध्यापक या प्रत्येक व्यक्तीला अगर गटाला त्यांच्या त्यांच्या कर्तव्याची आठवण सतत राहील व ते ते ती कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्रयत्न करतील व झटतील हे कटाक्षाने पाहिले जाते. आणि हे होत असताना प्रत्येक व्यक्तीच्या अस्मितेला व मानबिंदूला धक्का पोहोचणार नाही याची दक्षता घेतली जाते. ज्याप्रमाणे प्रत्येक शिक्षकाला योग्य तो मान व आदर मिळेल हे पाहिले जाते, त्याचप्रमाणे विद्यार्थी सेवकवर्ग व महाविद्यालयाचा रखवालदार यांच्या मानबिंदूची जपणूक केली जाते. प्रत्येकाने आपल्या कर्तव्यपूर्तीचा प्रयत्न केल्यावर संघर्ष कटुता राहूच शकत नाही आणि सर्व वातावरण निकोप राहण्यास मदत होते. असा आमचा अनुभव आहे.

आमचा अभिमान....




....आमचे महाविद्यालय

# विद्यापीठ परीक्षातील उज्ज्वल यश



छाया जोगळेकर
वाणिज्य पदवी परीक्षेत प्रथम श्रेणीतील अत्युच्च यश
आणि अॅडव्हान्स्ड कॉस्ट अकौंटिंग विषयांत गुणांचा उच्चांक



पारसमल लुंकड
पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत प्रथम श्रेणी आणि
विद्यापीठात नववा क्रमांक

## पदवीपूर्व कला (प्रथम श्रेणीचे मानकरी)



शालिनी राणे
महाविद्यालयात सर्वप्रथम



प्रभाकर रेणुसे



आनंदराव शिंदे

## पदवीपूर्व शास्त्र (प्रथम श्रेणीचे मानकरी)



विनयकुमार न्यायाधीश
महाविद्यालयात सर्वप्रथम



प्रसाद अंबीकर



मिलिंद आपटे



मिथिली सुब्रमनियन



रघुनाथ चिखले

## पदवीपूर्व शास्त्र (प्रथम श्रेणीचे मानकरी)



नीलिमा दहिफळे



विश्वास दाते



जितेंद्र गोखले



तेजप्रकाश काब्रा



संध्यादेवी कोल्हे



सुभाष अगरवाल



संजय पाठक



नीलिमा फडके



कल्याणी पुणतांबेकर



मेधा रेगे



शैलजा कोल्हे



नंदकिशोर कुलकर्णी



आनंद लंघे



श्रीनिवास नारविलकर

## पदवीपूर्व वाणिज्य (प्रथम श्रेणीचे मानकरी)


दिलीप गाडगीळ


सुधीर घोमण


अभय पोतदार


संजीव सहस्रबुद्धे


अलका शिरोळे


गिरीश ठाणेदार


वसुधा निबंधे


प्रकाश पाटणे


प्रतिभा जोगळेकर


शुभा शहा

## प्रथमवर्ष शास्त्र (प्रथम श्रेणीचे मानकरी)


कु. नीलिमा गोडसे
महाविद्यालयात
सर्वप्रथम (अे ग्रुप)


प्रमोद राणे
महाविद्यालयात
सर्वप्रथम (बी ग्रुप)


नेमिचंद बाफना


विश्वनाथ सावंत


सुचित्रा असलेकर

# प्रथम वर्ष शास्त्र ( प्रथम श्रेणीचे मानकरी )


रमेश कांबळे


प्रफुल्ल गद्रे


शकर चौगुले


राजेंद्र अरगडे


प्रकाश बनसोड


उर्मिला रणदिवे


जगदीश मोघे


संजय भोमे


वी. एस. जगताप


शिरीष लवाटे


दिलीप चौधरी


प्रकाश शिंगटे


सुहास सापटणेकर


मुकुंद कोंढवीकर


श्रीराम सराफ

## प्रथम वर्ष शास्त्र (प्रथम श्रेणीचे मानकरी)



प्रभाकर चौधरी



संजय पागे



प्रवीण देशपांडे



प्रदीप देशपांडे



उमाकांत कुलकर्णी



स्मिता लाटकर



श्रीकृष्ण सांडभोर



शालिनी कुलकर्णी
कला पदवीधर
महाविद्यालयात सर्वप्रथम



पद्मिनी जोगळेकर
वाणिज्य पदवीधर
प्रथम श्रेणी

## शास्त्र पदवीधर (प्रथम श्रेणीचे मानकरी)



श्रीराम ठकार
महाविद्यालयात भौतिक
शास्त्र विषयांत सर्वप्रथम



मीरा जाधव
महाविद्यालयात रसायन
शास्त्र विषयात सर्वप्रथम



सुरेश दोशी



दीपक गाडगीळ



सुहास घैसास

## शास्त्र पदवीधर (प्रथम श्रेणीचे मानकरी)


उषा देव


मंगला देशमुख


दुलिप विनयकुमार


शिवाजी चिखले


चंद्रकांत कदम


प्रकाश खोले


नीलिमा कोठारी


माणिक कुलकर्णी


विनिता मराठे


अशोक पाटील


जयश्री सांगले


अविनाश शिंदेकर


कुंजन ठाकूर


मोहन किणीकर


अरविंद नाईक

**शास्त्र पदवीधर प्रथम श्रेणी**



हेमंत क्षीरसागर

**उज्जैन येथील राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात सहभाग**



लता कांबळे



संजीवनी रांजेकर

## क्रीडा नैपुण्य



अशोक कांबळे
पदवीपूर्व शास्त्र
हाफस्टेप जंप
प्रथम क्रमांक



प्रदीप पंडित
पदवीपूर्व शास्त्र
कर्णधार, महाराष्ट्र
कबड्डी (कुमार गट)



ज्ञानेश्वर ढमाले
कुस्ती (५२ किलो
वजनाचे आत)
प्रथम क्रमांक



अनिल पांढरे
वेस्टर्न इंडिया चॅंपियन
आंतर महाविद्यालय
विद्यापीठ व राष्ट्रीय खेळाडू







'कॉम' आणि 'सायन्स न्यूज' या हस्तलिखितांची
दारुबंदी विशेषांकांची मुखपृष्ठे

**अभिनंदन**



राजेंद्र व्होरा यांना
पीएच. डी. पदवी प्राप्त

## आंतर महाविद्यालयीन खोखो ( पुरूष ) उपविजेता संघ



खुर्चीवर ( डावीकडून ) : श्री रामपाल, ( I. C. S. R. ) श्री दंडे, प्रा. कुलकर्णी, प्रा. आपटे ( कार्याध्यक्ष )
श्री कोल्हटकर ( क्रीडा शिक्षक ) श्री लागू,
उभे १ ली ओळ ( डावीकडून ) : सर्वश्री अरगडे, इनामदार, पुराणिक, देशपांडे, ओगले, गाडगीळ, परांजपे, जोशी
उभे २ री ओळ ( डावीकडून ) : सर्वश्री दळवी ( सेवक ), लिमये, जोगळेकर, रायरीकर, बोरकर, गावडे ( सेवक )

## आंतर महाविद्यालयीन बॉल बॅडमिंटन ( महिला ) उपविजेता संघ



खुर्चीवर ( डावीकडून ) : कु. बोरावके, कु. करंदीकर, ( I. C. S. R. ) प्रा. आपटे ( कार्याध्यक्ष )
श्री लागू, प्रा. गोसावी
उभे ( डावीकडून ) : श्री बडद ( सेवक ), कु. मेहेंदळे, कु. भट, श्री पोळ, कु. शहा, श्री पवार ( सेवक )

 ।। चतुस्त्रिंशत् — कविता ।।

## सूर

मला भोगू दे प्राक्तन माझे
आणि वेचू दे व्यथा जिव्हारी
दुबळ्या पंखी आभाळ निराखित
मला जाऊ दे गगनादारी ॥ १ ॥
लक्ष तेवत्या हृदयामधुनी
धुंद सुखाच्या पिवळ्या ज्योती
उत्तरारात्री चंद्र गोजिरा
पुसट स्मृतींचे तारे हाती ॥ २ ॥
आळवून शब्दी गीत सरू दे
उरू दे पायी ऊन्ह परतीचे
आणि भाळूदे स्वप्न सावळे
जुळू दे ओठी सूर उद्याचे
जुळू दे ओठी सूर उद्याचे ॥ ३ ॥

**कु. वासन्ती इनामदार**
पदवीपूर्व कला

## आठवण...

कधी कुणावर कविता केलीस तर,
दोन ओळींमधल्या स्वल्पविरामात तरी
माझीही आठवण अडखळू दे.

कधी भैरवी गायिलीस तर,
तानपुऱ्यावरच्या बोटांमध्ये तरी
माझीही आठवण थबकू दे.

कधी कुणाची आठवण काढलीस तर,
दोन क्षणांमधल्या निर्वात पोकळीत तरी
माझाही चेहरा आठवू दे.

**प्रमोद भुजबळ**
पदवीपूर्व कला

## स्वप्नांच्या सीमा

स्वप्नांचं साम्राज्य
सांधावं म्हणतो
पण ते सांधलंच जात नाहीये
रंगांची स्वप्नं
डोलतायत, धावतायत वाऱ्याच्या वेगानं
माझं मन त्यांचा पाठलाग करतय
रंगतय त्या रंगानं
खूप दिसतंय निसर्गाचं उमलतं सौंदर्य
सागराच्या उदरातून इकडंच सरसावतोय सूर्य
सोनेरी किरणानं सर्वच हसतायत
दिशेला मागे टाकत नजर सारखी
भिरभिरतीय
ती कोणाला तरी शोधतीय,
जीवनाच्या वाटेवरच्या वास्तवात
तर तिला
नुसता स्वप्नांचा सांगाडासुद्धा सापडायचा नाही.

**जयंत ढेकणे**
पदवीपूर्व कला

## पथिक

जीवनाच्या अंधःकारातून
मी चालतोय अडखळत ठेचाळत
अंधुकशी पाऊलवाट मध्येच
हरवून जाते.
मी विचाराच्या तंद्रीत गुंग होतो
काही दिसत नाही, सुचत नाही
मार्ग संपल्याचा भास होतो.
मागे भूतकाळाचा भयाण अंधःकार
पुढे भविष्याचा, काळा कुट्ट पडदा
मनाचे भूत मलाच भेडसावते
घुबडाचा चीत्कार ऐकून काळीज फाटते
घोंघावणारा वारा अंगाशी झोंबतो
उगीचच प्रेताच्या स्पर्शाची जाणीव होते
दूर क्षितिजावर लुकलुकणारा एक तारा दिसतो
मार्ग सापडला रस्ता मिळाला म्हणून
मी चालू लागतो.
तसाच अडखळत ठेचाळत
रक्तबंबाळ होऊन
परंतु उजेड भविष्याचा, अजून
सापडत नाही.

**कु. आशा निकाळजे**
प्रथम वर्ष कला

## 'फिरुनी एकदा ये !'

तू आलीस !
माझ्या जीवनात, प्रीतीच्या पावलानं
हळूच डोकावून लपंडावाचा खेळ-खेळून
हसवलंस मला
गमावलेल्या हास्याचं
मोल मला समजावून
जगण्याचे मर्म मनावर भेदवून
आशेच्या किरणानं दिपवून
मायेच्या ओलाव्यानं
सुंदर शिल्पासारखं घडवलंस
या मनाच्या निराकाराला.
आणि आता लपलीस
मी लाख शोधलं,
पण मला गवसणार नाहीस
पण ' संध्ये '

या पुण्यनगरीतील मायेची ज्योत
तुला सतत साद घालील,
'फिरुनी एकदा ये !'

**कु. ज्योती कुलकर्णी**
द्वितीय वर्ष कला

## किनारा

आयुष्याची नौका वहात आहे
तिला नाही सुकाणू
तिला माहीत नाहीत अथाङ्ग सागराच्या कक्षा
माहीत आहे फक्त वहायचं
लाट नेईल तिकडे.
तिच्यावर नाही कुणाचं अस्तित्व
ना त्याची तिला खंत
वाऱ्या-वादळात वहात आहे ती
किनाऱ्याचा घेत शोध.
एक ना एक दिवस
किनारा तिला भेटेल
आणि मग ती नौका
अस्तित्व स्वीकारील ?

**विद्या गुजर**
प्रथम वर्ष वाणिज्य

## प्राजक्त

त्या तिथे निळ्या निळ्या आकाशाच्या पलिकडे
उभा तो अदृश्य प्राजक्त
करतो आहे वर्षावावर वर्षाव
सुंदर, नाजुक, कोमल फुलांचाच
पाठवून देऊन वाऱ्यावादळात
भरकटत ठेवून
हसतो मिस्किलपणे
कुणाला देतो काटेरीबनच बन
तर देतो कुणाला मऊशार गुलाबी पाकळ्याच पाकळ्या
येते एखादी अनामिक वावटळ
होते वाताहात गुलाब पाकळ्यांची
अन् होते काटेरीबनाची गुलाब पाकळी

**भानुमती ठोके**
द्वितीय वर्ष कला

## आठवण

तू दिसताच । होते मला
तिची आठवण
तुझ्यासारखेच । आहे तिचे
सुहासिक मौन

तुझ्यासारखे । तिचे हसू
मला हसविणारे
तुझ्यासारखेच । तिचे रुसू
मला दुखविणारे

तूच आठवण होऊन
मजपाशी येतेस
आनंदाचे फूल
मनात फुलवतेस

**बाळासाहेब नागमोडे**
प्रथम वर्ष वाणिज्य

## जखम

मी निःशब्द शब्दांत गुंफतोय
तुझी नि माझी कहाणी
पण थरथरत्या पापणीखालून डोकावतंय,
नयनांतलं पाणी.
वेडं मन धावतं,
तोडून मोडून बंध
डोळ्यांच्या कमळांत हरवतो,
होऊन मी धुंद.
पण...पण शेजारी कुणीच नसतं.
चावत असतो अंगाला बोचरा वारा.
त्या झुळुकीनं गवत डोलत असतं,
नि तुझ्या आठवणीत मन हेलावतं; नुसतंच !
किती जपू उरातली जखम ?
फुंकर मारायची शक्ती आलीय संपत.

**यशवंत पेंडसे**
तृतीय वर्ष वाणिज्य

## अशा वेळी...

मुक्या मनात
शब्दांचा अबोल नाद.
रित्या हृदयात
निमाल्या भावनांची साद.
सरत्या रात्री सुळकन्
पडते गळून स्वप्नसाखळी
जणु कमरेची मेखला
नर्तकीच्या पायतळी.
अशा वेळी वाटतं
एक दवबिंदु व्हावं
पहाटचं धुकं सरताच
ओसरून जावं

**सौ. वृषाली गांगुर्डे**
तृतीय वर्ष कला

## कोंभ मनास फुटले...!

सागराच्या काठावरी
झेपा घेऊन घेऊन
जळ थकुनिया गेले—
नीरवता आसमंती
स्तब्ध झाले तरुवर
गीत वाऱ्याचे थांबले—
पश्चिमेच्या घरातून
गेला निघून सूर्यही
उदासून सांज ढळे—
अनामिक शल्य काही
सले अंतरात माझ्या
गीत ओठांत विरले—
क्षणभंगुरता सारी
आकळुनि जगाची
मन जगास विटले—
औदासिन्यामुळे मग
मोडुनिया खचुनिया
नीर नयनी साकळे—
लागे 'उद्याची' चाहूल
केली जादू कोणी तरी
निराशा ती दूर पळे—
मिळुनिया संजीवनी
तुझ्या अमृतस्पर्शाने
कोंभ मनास फुटले !!

**अविनाश प्रभुणे**
द्वितीय वर्ष कला

## ' निसटते क्षण '

म्हणे
अपयश ही यशाची पायरी होय,
मिळालेल्या नोकरीची किंमत कळायला
बेकारी अनुभवावी लागते,
प्रेमाच्या साफल्याचा आनंद अनुभवण्यासाठी
इन्तजार, आरजूचा मजा चाखावा लागतो;

परंतु
अपयशाच्या पायऱ्याच जर फार असल्या,
बेकारीचा काळ ही नको इतका असला,
आणि इंतजाराचा अंतही येईनासा झाला,

तर मात्र
यशाची धुंदी चढत नाही.
नोकरी करीयर बनत नाही.
प्रेमाचा गुलकंद जमत नाही.

कारण
या सर्वांना योग्य असणारे क्षण
कधीच निसटून गेलेले असतात !

अशोक शिन्देकर
तृतीय वर्ष वाणिज्य

## तुझिया चरणी... !

सुकलेल्या ओठी । घाली जलथेंब
नाही तृषा मज । अमृताची ।। १ ।।

नको देवपण । नको मोक्ष-मुक्ति
अखंड दे भक्ति । मानव्याची ।। २ ।।

तुझिया भेटीचा । नाही मनीं हेतू
स्फुरोनी राहे तू । अंतरात ।। ३ ।।

केवळ न मागे । सुखाचेच दान
कंटकी निधान । गुलाबाचे ।। ४ ।।

भावनेने ओल्या । पाझरू दे मन
आणि अवधान । कर्तव्याचे ।। ५ ।।

मागू काय आता । याहून मी दुजे
उजळू दे तेजे । कवित्वाच्या ।। ६ ।।

टेकिले मस्तक । तुझिया चरणी
ओलावे पापणी । आसवांत... ! ।। ७ ।।

प्रमोद कळमकर
द्वितीय वर्ष कला

## जीवनाचे ऋतुचक्र

नुकताच कुठं वेलीवर वसंत बहरला होता
तारुण्याच्या उमेदीत वर्षाऋतू सरला होता
वसंताच्या बहरानं वेली फुलत होती
आनंदानं नाचत होती, गात होती, हसत होती.

पण, अचानक शरदाचं आगमन झालं
आणि वेलीच्या वसंताचं निर्माल्य झालं
भ्रमर तिच्या फुलातला मध काढीत राहिला
आणि अखंड तिला रडवत राहिला,
रडवतच राहिला

असंच आहे मानवाचंही जीवन
ऋतुचक्रासारखंच फिरतंय त्याचंही तन-मन ।।

कु. विद्या गायकवाड
पदवीपूर्व वाणिज्य

## पसायदान

आता विश्वात्मके देवे ।
येणे मत्प्रयत्ने तोषात्रे ।
तोषोनिया मज द्यावे
पसायदान हे ॥

जे फळांची गोडी सांडो
तया मज मुखी पडो
आता ठसठसा रडो
शत्रू माझे ॥

दुर्जनांना तिरमिरी येवो
विश्व सकळ स्वार्थियांना अर्धपोटी पाहो
जो जे वांछील तो ते लाहो
' वाणि 'जात ॥

वर्षत सकळ चंगळी
जनता न करो चळवळी
रिझर्वेशन करुनि सकळी
भेटतु तिकिटा ॥

चंद्रमे जे अलांछन
मागासवर्गीय जे अर्थहीन
ते सर्वाही सदा हरिजन
बी. सी. होतु ॥

किंबहुना सर्वसुखी
पूर्ण होऊनि ' बी. ए. एलएल. बी.'
न भजो ' एम्प्लॉयमेन्ट एक्स्चेंजी '
अखंडित ॥

**प्रकाश पाटणे**
प्रथम वर्ष वाणिज्य.

## पहिले पाकीट

पहिली माझी सिगारेट
माझा संकोच पहिला
घरी ओढता चोरुनी
ठसक्याने घात केला ॥

दुसरी माझी सिगारेट
दुजा नेमही लटका
अरे पेटविता काडी
लागे बोटाला चटका ॥

तिसरी माझी सिगारेट
घेतली ही पेटवून
येता प्रोफेसर सामोरी
दिली हळूच फेकून ॥

चौथी माझी सिगारेट
बघताना भोवताली
गेली निसटूनी बेटी
चुरूनिया पायाखाली

पाचवी माझी सिगारेट
आला वारा घोंगावून
पेटविता पेटविता
गेल्या काड्याच विझून ॥

सहावी माझी सिगारेट
कुणी फुकट्या भेटला
" काढा राव सिगारेट "
धूर सोडीत अन् गेला ॥

सातवी माझी सिगारेट
मज आठवे वेळोवेळा
कोरा सदरा जळता
जीव झाला माझा गोळा ॥

आठवी माझी सिगारेट
विसरलो सर्व काही

सोडी नाकातून धूर
गोड झिणझिणी येई ॥
नववी माझी सिगारेट
नवी नवलाई घडे
घेता दमावरी दम
धूर मस्तकाला भिडे ॥
दहावी माझी सिगारेट
आता पाकीट संपले
चोज जीवाचे पुरले
फक्त व्यसन उरले ॥

**एस्. एन्. धोरे**
पदवीपूर्व वाणिज्य

## तीन कविता

### १

स्वर्ग शोधिला स्वरात तूझ्या
अश्रूत भिजवुनी घोर वंचना
फुलल्या जाईत लपविली
माझी अस्फुट गाढ वेदना
विझून गेल्या चांदण्यात
अर्थ शोधिला जीवनाचा
शापितेला उःशाप मिळाला
गंधवेड्या स्वप्नांचा.

### २

निर्माल्याचे दान स्वीकारताना
ओघळलेल्या दोन थेंबांत
स्वप्नांच्या पाकळ्या गळून पडल्या....
स्वीकारलं दान हुंगताना
गंध चंदनी
चकवून गेला....

### ३

ओवाळला असता
जीवही माझा
कुणी तसं भेटलं असतं !
डोळ्यांची नीरांजने
पेटविली असती
देव तसा जर मिळाला असता !
आला असता
मोहर शब्दांना
सुख तसं मिळालं असतं !
वेदनेलाही पालवी
फुटली असती
दुःखाने जर गोंजारले असते

**कु. नयना कारखानीस**
तृतीय वर्ष साहित्य

## कोलंबस-मार्ग

त्या तिथे दूरवर
स्वप्नांच्या गावातून
चंदनी बनातून
चांदण्या रातीतून
ती एक वाट जाते
सुखाची वाट.

सुखाची वाट जाते
नागमोडी वळणांनी
यशाच्या शेतातून
स्वरांचे झरे वहात
गीतांच्या बागेतून.

या वाटेचे एक टोक
तृप्तीचे गाव आहे
म्हणे तिथे जीवनाचे
संतोष एक नाव आहे.
ही वाट कशी जाते
कुणी मला सांगेल का
कारण या वाटेवर
फारसा पायरव
झाला नाही म्हणतात....

**कु. ज्योती कुलकर्णी**
द्वितीय वर्ष साहित्य

## एक अहिराणी गीत

काळ्या घोड्याची कानडवाई
तिचा मालक चा ले लवलाई
ऐने तेथून घोडा दमशिवीला
गेला सुताराच्या आळेला
सुतार रे भाऊ तू सुतार रे दादा तू
चवरंग दे मा लवलाई
म्हणगर कनेर कानबाई ॥ १ ॥

काळ्या घोड्याची कानडवाई
तिचा मालक चा ले लवलाई
ऐने तेथून घोडा दमशिवीला
गेला वाणियाच्या आळेला
वाणिया रे भाऊ तू वाणिया रे दादा तू
नारळ दे मा लवलाई
म्हणगर कनेर कानबाई ॥ २ ॥

काळ्या घोड्याची कानडवाई
तिचा मालक चा ले लवलाई
ऐने तेथून घोडा दमशिवीला
गेला सोनाराच्या आळेला
सोनार रे भाऊ तू सोनार रे दादा त
बिजवर दे मा लवलाई
म्हणगर कनेर कानबाई ॥ ३ ॥

काळ्या घोड्याची कानडबाई
तिचा मालक चा ले लवलाई

**कु. नीलिमा बेरी**
प्रथम वर्ष वाणिज्य

## एक एहसास

इस शाम का दीदार
हररोज़ की तरह।
ये उठते हुए धुएँ
और जलते दीपक
हर रोज़ की तरह।
ना कोई तबदील
ना कोई फर्क
जैसे सदियों से
यह रवायत है
हर रोज की तरह।
कुछ खुशियोंके अवसर
या कहीं जमणी न पल
यूँ तो निभाने की रविश है।
जो हम-आप महसूस करें
हर रोज़ की तरह।
कितनी लम्बी बस्ती है
इस जिंदगी की—
जिसे उम्रका एहसास नहीं।

जिस का एक एहसास
इस शामकी तरह
हर रोजकी तरह ।

—अनिल
द्वितीय वर्ष कला

## मकसद–ए–हकीकत

[ हर दिलमें एक अनजान खौफ का बसर होता है, वह है जीनके सवालात और मौत के खयालात। ऐसी कशमकश में हर एक इन्सान हर एक को अपनी जिंदगी की कीमती कीमत से तौलता है। इसीका नाम है मकसद ! ]

वक्त की अजीम का नारा हर लबमें होता है
मकसदे नूर का तारा हर शबमें होता है
मज़ा जीनेका सारा हर मतलबमें होता है।
जब दिलमें छा जाता है अंधेरा–
तब शम्माकी ज़रूरत होती है।
जब महफिलमें कोई है प्यारा–
तब जीनेकी चाहत होती है।
अपनी कमीका एहसास हो जाता है–
तो हर तडप आरजू बनती है।
जीवनमें पासका सहारा खो जाता है–
तो हर तरफ जुस्तजू होती है।
अपनी मंजिलको पाने–
राहगुजर चलते रहते हैं।
अंधेरेको मिटाने—
वह चिराग जलाते रहते हैं ॥ १ ॥

प्यासेको सदा प्यारे झील होते हैं।
तूफाँमें सहारे साहिल होते हैं।
दर्द को अंधियारे काबिल होते हैं।
मौतसे डरा हुआ—
कभी मातमकी चाहत करता नहीं।
उजालेका दीवाना–
अंधेरोंसे मोहब्बत करता नहीं।
मैंने नहीं देखे कभी परवाने—
जो शौकसे अंधेरोंमें मचलते रहते हैं।
अपने दिलका अंधेरा मिटाने—
वे, मासूम शम्मा-ए-आगमें पिघलते हैं।
कुदरत का राज़ फितरत को समझाने—
यहाँ मौसम बदलते रहते हैं।
अपने सीनेमें भरा ग़म कम करने–
आँसू हर निकलते रहते हैं।

—अनिल
द्वितीय वर्ष कला

## करे 'सलाम' तो हो हर काम

दाम करे काम तो बीवी करे सलाम
लेकिन करो सलाम, तो होवे हर काम ॥ ध्रु ॥
पति पत्नीसे चाहता है, जीवनभरका साथ
पर पत्नी न करती है, प्यारभरी इक बात
पद छूकर पत्नीके कीजिए उसे 'सलाम'
पत्नी हर घडी लेने लगेगी पतिका ही नाम ॥
इसलिए... ॥ ध्रु ॥

२...

प्यार करना चाहते हैं जो भी महावीर
सोचमें रहते हैं निशानपर कैसे मारूँ तीर
' सलाम ' करके श्वशुरको देख लेना परिणाम
बेटीको सौंपकर, लेते रहेंगे रामनाम ॥

इसलिए.... ॥ ध्रु ॥

नौकर हमेशा चाहता है तनख्वाहमें वृद्धि
मालिक सम्भाले रहता है ' पैसा ' और ' गद्दी '
' सलाम ' करो सलाम ! मालिकको करो सलाम !
खुश होकर कर देगा, सारी जायदाद तुम्हारे नाम ॥

इसलिए.... ॥ ध्रु ॥

विक्रेताओंकी चाह रहती है बिक जाय सारा माल
खरीदार कह देते हैं ' भाई घरमें नहीं आटा-दाल '
' सलाम ' करके खरीदारको कह देना माल का दाम
माल खरीदकर पूछेंगे वे आपका भी दाम ॥

इसलिए.... ॥ ध्रु ॥

हरएक चाहता है अपने जीवनमें मृत्युसे छुटकारा
पर डाला गलेमें भगवानने मृत्युका फंदा प्यारा
' सलाम ' करके हाथोंसे, मुखसे ले लो राम-नाम
भगवान भी भूल जाएगा, कि
इसका करना है काम तमाम ॥

इसलिए.... ॥ ध्रु ॥

**प्रकाश पाटणे**
प्रथम वर्ष वणिज्य

## १. मुस्कराते खँडहर

मदिरालयमें प्यालोंके साथ छलकते हैं कितने जाम।
ढहे शिल्पपर शोक मनाकर
तू मत बन जाना बेनाम ॥
वह बीत गया समय मस्तीका,
खिले हुए प्यारे मधुबनका।
माँगा था सुनहरा सपना सुंदर,
किस्मतने तो दिये रोते खँडहर ॥ १ ॥
पर, छोड दे वह निराशा,
जा भूल, उन जलते लाल अंगारोंको।
हृदयमें पल्लवित आशा,
सजाएगी फिरसे भूले-बिखरे सपनोंको ॥ २ ॥
दर्दीली आहें निकल जाएंगी,
झरते पत्ते हरे होंगे।
जीवनके प्यारे खँडहर,
फिर नया शामियाना सजाएँगे ॥ ३ ॥
चाहे उजड जाए प्यारका आशियाना,
पर, तू न कभी सिर्फ आँसू बहाना।
रोड़े अटकानेपर भी बहती जाती है जमना,
तू भी खडा कर एक नया आशियाना ॥ ४ ॥
देख, अँधेरा नभ हुआ प्रकाशित,
सुन, पंछियोंका न्यारा जीवन-संगीत।
धरतीके कलशमें छिड़का स्वर्ण-किरणोंका अमृत,
तेरे भी हृदयकलशमें छिड़के सृजनका नवामृत, ॥ ५ ॥
वायुके साथ निब्टकर भी,
दीपक जलता रहता है।
दुनियामें छाया हुआ अँधेरा,
प्रकाशको दूर करता रहता है ॥ ६ ॥

वायु की टोकरें खाकर भी,
फूल खिलता ही रहता है।
मिट्टीसे बनी जिंदगीको भी,
स्वर्णमय बनाना चाहता है ॥ ७ ॥

नीले नीले नभमंडलमें,
पतंग विहरता रहता है।
आँचल ओढ़े सपनोंका
दीपककी ओर झपटता है ॥ ८ ॥

देख, प्यारे, उस परवानेको भी,
कितना प्यार है, उस रोशनीसे।
अँधेरोंमें घिरे तुम्हें, फिर,
क्या अधिकार है, स्वयंको मनुज कहलानेमें ॥९॥

प्रकाश और छायासे सीखो,
जीवनकी यह परिवर्तनशीलता।
पूनमके चाँदसे सीखो,
जीवनकी क्या है सफलता ॥ १० ॥

कलकी लहरें भूल जा,
जा भूल, कलके सितारे।
पूरबके नभमें देख,
है कितने बादल सुनहरे ॥ ११ ॥

हे प्यारे, मुसाफिर, देख, भोर हुई,
गुजर गया है किस्मतका अँधेरा।
तेरे ही इन हाथोंमें छिपा अब तो,
तेरे जीवनका सबेरा ॥ १२ ॥

## २. शबनम

कुछ लोग जीते हैं, मरने के लिए।
कुछ लोग मरते हैं, जीनेके लिए ॥

यह ज़िंदगी है,
चाहूँ तो लहराता शोला भी बना दूँ।
चाहूँ तो चमकती शबनम भी बना दूँ ॥
रजनी गाती हँसती आई, रजनी गाती चली गयी।
याद रखी पीछे उसने, शबनमके प्यारे मोतियोंकी ॥
देखो, इन पंखुडियोंपर प्यारे, प्यारे ये मोती।
जगमगाते हैं जैसे हर मोती, हर सूरज ॥
मनको मोहित करनेवाली यह प्यारी शबनम।
शोलों को भी बाँधती है, प्यारसे सनम !
शबनम बनना बेहतरीन है भाई,
शोले की फिर, क्या मज़ाल।
शोला शबनमको नहीं भड़का सकता,
पर, शबनम, शोलेको बुझाय ॥
इसीलिए, जी चाहत है कि, न तारा बनूँ
न बनूँ एक शोला।
पर, बन जाऊँ एक शबनम,
शोले को बुझाने के लिए ॥
झोंका आया, वाटिकाकी आँचलिका लहरायी।
एक, एक शबनम फिसलकर धरतीसे मिल गयी ॥
जिस मिट्टीसे आया था वह, उसी मिट्टी में चली गयी।
क्षण-दो-क्षणकी ज़िंदगीको भी, स्वर्णमय वह बना गयी
प्यार की निर्मल धारा ही है, जीवनका सच्चा गीत।
शबनम बननेमेंही है, जीवन की सच्ची जीत ॥
अनिश्चित ज़िंदगीमें भी, प्यार गंध-सा बिखेरते जाओ।
भर जायगी जब घटिकाएँ,
तब परमात्मा के पास आओ ॥

**राजेंद्र महाजन**
पदवीपूर्व वाणिज्य

## आधी बात

खुश हैं बहुत 'अशोक' आज,
आप के काम कुछ तो आ सका,
दर्द सिर्फ इस बात का जिगर में लिये बैठा हूँ कि,
आगे कुछ न लिख सका....

**अशोक हंबीर**
पदवीपूर्व कला

## हाल मेरा...!

साथी संकेतोंसे हाल मेरा बतला देना
साथी घर जाके हाल मेरा बतला देना
यदि हाल मेरी माता पूछे
तो एक मुरझा-सा फूल दिखा देना
फिर भी यदि ना माने तो
दो आँसू बहा देना
साथी संकेतोंसे हाल मेरा बतला देना ॥ १ ॥
यदि हाल मेरी पत्नी पूछे
तो जलता दीपक बुझा देना
फिर भी यदि ना माने तो
सिंदूर माँग का पोंछ देना
साथी संकेतों से हाल मेरा बतला देना ॥ २ ॥

**पी. एस. देशमुख**
प्रथम वर्ष वाणिज्य

## प्यार

उन्होंने आँख उठाके जो देखा।
दिल्में प्यार सा छा गया।
यह दिल उनकी जुल्फों में जो अटका
तो फिर तड़पता रह गया
इसी तड़पनको मैंने प्यार मान लिया ॥ १ ॥
उनकी वह शोख निगाहें।
दिलके तार झनझना देती हैं।
उनकी वह चलनेकी अदाएँ
बस बेकरार कर देती हैं।
इसी बेकरारीको मैंने प्यार मान लिया ॥ २ ॥
लेकिन प्यारमें न था मिलन
न थे वादे न शिकवे
यह तो एक सपना था !
जो टूट गया तो हम तडपते रह गये अकेले।
इसी तडपनको मैंने प्यार कुबूल किया !

**पी. एस. देशमुख**
प्रथम वर्ष वाणिज्य

## ढल न जाएँ पैर तेरे

प्यार की शान क्या पूछना यार
होता है दिल उससे बीमार
संभलके रहना इससे प्यारे
ढल जाएँ कहीं पैर तेरे
जिंदगीका है यह सारा खेल
कर ले यारसे अपना मेल
प्यार है एक दिलकी माँग
नहीं है, वह तनकी आग
प्यारको जरा गौर से देखना
मिल जायगा तुम्हें जिंदगीका सपना
नहीं है आज सच्चा प्यार
क्यों कि चाहते हैं सिर्फ यार
संभलके रहना इससे प्यारे
ढल न जाएँ कहीं पैर तेरे

**प्रमोद भुजबळ**
पदवीपूर्व कला

## ग़ज़ल

ग़म ही मेरे जीनेका सहारा है।
जिसने हर वक्त मुझे पुकारा है।
खुशीकी कोई बात नहीं मेरे पास।
हर वक्त मुझे गमने दिया सहारा है।
दिलसे हर चिनगारी शोला बनके उठती है।
आग लगी तो आँसूको हमने पुकारा है।
मेरी कश्ती डूब गयी है मगर,
फिर भी 'साहिल'ने मुझे दिया सहारा है।

**श्याम अहिरकर 'साहिल'**
प्रथम वर्ष कला

## गद्दार

न जाने कौनसा ख़ौफ़
छा जाता है रूहपर मेरे
कि अचानक रुक जाते हैं दिलो-दिमाग
कुछ यूँ छाता है सन्नाटा
जैसे वक्त भी जीवित न हो
कोई कहता है जैसे
रोटीकी उलझनमें ईमान बेच गयी तू
बहुतसे इल्ज़ाम आते हैं
मैं एक पिंजडेमें मजबूर !
हाँ, हाँ मैं गद्दार हूँ
मैंने गद्दारी की है
रूह बेच देने की
दिलो-दिमाग नीलाम कर दिए हैं मैंने,
मुझे अचानक महसूस होता है
मेरे इर्द-गिर्द ऐसे गद्दार बहुत हैं
तो—
मेरा वक्त जीवित हो उठता है
और मैं बेरूह बनकर फिरसे जीने लगती हूँ !

**कु. ज्योती कुलकर्णी**
द्वितीय वर्ष साहित्य

## ज्योति

आँसुओंका सागर है,
नयनोंकी ज्योति है
मन की सीपमें
तेरे यादोंके मोती हैं ॥ १ ॥

ज्योति तो जलती है
नाम तुम्हारा ही लेकर
खुद भी तो गलती है
यादोंमें घुलघुलकर ॥ २ ॥

जीवन एक सागर है
सागर यूँ ही लहराता
लेकिन एक बात निश्चय है कि
यादोंके मोती कहीं न खो जायँगे ॥ ३ ॥

**कु. ज्योती शिंपी**
पदवीपूर्व शास्त्र

## Love

Day before yesterday
I heard about love.
Yesterday,
I tried to love.
Today,
I have passed that stage of love,
And now,
I hate just the name of love.

— **Ashok V. Hambir**
( P. D. Arts 'A' )

## My Pretty Bud

There you are' my pretty bud,
Purely made of fesh and blood
Lord made no folly
And created a beauty
Your nature so charming
And ways so cute
Oh ! I am mad, so joyfully mad !
A bud like you I never had.

— **Ravindra Gaikwad**
T. Y. B. com. 'A'

## Oh ! No !!

There Was once
A Godamn louse
He approached a chic
Dressed in sari and blouse
He mustered his nerves
And eyed her curves
He went ahead
And giggled a bit
Alas ! her slap
Was a direct hit
Toast to his patience
He called her a rose
It was then that he got
His second dose
And the poor soul walked away
.... With a bloody nose

— **Ravindra Gaikwad**
T. Y. B. com. 'A'


हार्दिक शुभेच्छा !

★ माहूर ड्रेसेस ★

१३९१, शुक्रवार पेठ (नवा)
बाजीराव रोड, पुणे-३०

★ युनायटेड होजिअरी ★ कल्याणी ड्रेसेस

~ ह्यांचे अधिकृत विक्रेते ~

तसेच सर्व प्रकारचे तयार कपडे योग्य दरात मिळतील.

# रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले!'

**अंजली प्रधान**
प्रथम वर्ष वाणिज्य

भारताला स्वातंत्र्य मिळाले ते कोणत्याही प्रकारचा त्याग न करता अशी काहींची समजूत आहे. किंबहुना त्यागाविना मिळालेले स्वातंत्र्य हे ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीला काहीही कष्ट न करता एखाद्याची संपत्ती आपोआप मिळावी त्यासारखेच आहे, अशी काहींची समजूत आहे. विनाकष्ट मिळालेला पैसा ज्याप्रमाणे व्यक्ती वाटेल तशी उधळते त्याचप्रमाणे विनाकष्ट मिळालेले स्वातंत्र्य भारतीय लोक वाटेल तसे हाताळत आहेत असे काहींचे मत आहे. या विचारांमध्ये सत्य आहे, पण ते अर्धसत्य आहे. इतर राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जी युद्धे खेळावी लागली ती भारताला न लागल्यामुळे असे मत होण्याची शक्यता आहे.

भारतीय स्वातंत्र्याचा विचार करीत असताना १८५७ च्या स्वातंत्र्यसमराचा विचार टाळता येतच नाही. काहींनी त्याला शिपायांचे बंड म्हटलेले असेल, काहींच्या दृष्टीने नानासाहेब, बहादुरशहा यांसारखी माणसे स्वार्थाच्या पोटी या बंडामध्ये सामील झाली असेही असेल; पण या स्वातंत्र्ययुद्धाचा खोलवर अभ्यास केल्यानंतर तात्या टोपे, मंगल पांडे, रंगोबापूजी, झाशीची राणी या लोकांनी जो असीम त्याग केला, हजारो ज्ञात आणि अज्ञात लोकांनी जे आपले देह समर्पित केले, त्यांच्या त्यागाची दखल न घेता हे स्वातंत्र्य आम्हांला विनाकष्ट मिळाले असे म्हणणे म्हणजे त्या त्यागाची क्रूर चेष्टा करण्यासारखे आहे.

१८५७ च्या स्वातंत्र्य-समरानंतर अनेक क्रांतिकारकांनी, देशभक्तांनी, या देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले देह झिजविले आहेत. चाफेकर बंधूंचा त्याग हा काय त्यांच्या स्वार्थासाठी होता? फाशी जाणार म्हणून चेहऱ्यावर भीतीची अस्पष्ट रेषाही न उठता मातृभूमीचे गीत गात फाशीच्या स्थलापर्यंत चालत जाणारे आणि स्वहस्ताने फाशी लावून घेणारे भगतसिंग. राजगुरू, चंद्रशेखर आझाद, चाफेकरबंधू यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान केले ते जमेस धरताच येणार नाही काय? देशातल्या देशभक्तांनी अनेक तुरुंगांमध्ये, तसेच अंदमानच्या अंधार कोठडीमध्ये जे अनन्वित हाल भोगले ते काय स्वतःच्या स्वार्थासाठी? स्वातंत्र्यवीर सावरकर आणि त्यांचे बंधू बाबा सावरकर यांनी अंदमानच्या कोठडीमध्ये भोगलेला बारीबाबा नामक जेलरचा छळ, बंगालच्या बोसची अंदमानच्या कोठडीतील आत्महत्या, मदनलाल धिंग्राने हसत-हसत मृत्यूला कवटाळण्याची पद्धत इ. गोष्टी काय दर्शवितात? स्वातंत्र्य हे अशा लोकांच्या त्यागातूनच जन्माला आलेले आहे.

अनेक देशभक्तांनी महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली जो असहकाराचा लढा देऊन प्रबल सत्तेशी झुंज दिली त्यामध्ये काय कमी त्याग होता? दांडी यात्रेपासून अनेक ज्ञात आणि अज्ञात स्वयंसेवकांनी शिपायांच्या काठ्या, बुटांच्या टाचा आणि घोड्यांच्या टापा सहन केल्या त्या कशासाठी? भारताला मिळालेले स्वातंत्र्य हे त्यागाविना आहे असे म्हणणाऱ्या लोकांनी कधी जालियनवाला बाग हत्याकांडाचा वृतान्त वाचलाच नाही काय? काल-परवापर्यंत म्हणजे १९४२ च्या चलेजावच्या चळवळीपर्यंत जे अनेक लोक भूमिगत झाले, ज्यांनी वंदेमातरम् म्हणत आणि तिरंगी झेंडा हातात धरत पोलिसांच्या गोळ्या छातीवर झेलल्या त्यांचा त्याग, तसेच अनेक तरुणांनी सुखाची अनेक प्रलोभने असतानाही केवळ देशाच्या स्वातंत्र्यासाठी अज्ञातवास पत्करला, तसेच ब्रिटिश सत्ता आणि त्यांचे एतद्देशीय हस्तक यांचा छळ सहन केला तो कशासाठी? असे असूनही आपला देश अहिंसेमुळे स्वतंत्र झाला या बोलण्यात काय अर्थ आहे? भारताचे स्वातंत्र्य हे अनेक ज्ञात आणि अज्ञात व्यक्तींच्या त्यागाचे फळ आहे हे विसरून कसे चालेल?

स्वातंत्र्यपूर्व कालात जन्माला आलेली पिढी त्यागमय जीवन जगणारी ठरली. स्वातंत्र्यानंतर जन्माला आलेल्या हल्लीच्या तरुण पिढीला त्या जीवनपद्धतीचा वारसा चालवायचा आहे. आजही स्वातंत्र्यपूर्व कालातील देशभक्तांच्या त्यागाची जाणीव करून देणाऱ्या सावरकर आणि भगतसिंगासारख्या तरुणांची आवश्यकता आहे. आजच्या तरुण पिढीची ध्येये कदाचित भिन्न असतील पण त्या ध्येयपूर्तीसाठी लागणारा त्याग हा अत्यंत आवश्यक आहे.

# नोज मेकस् युवर पोझ !'

uा

**उल्हास देशपांडे**
तृतीय वर्ष वाणिज्य

तर नाक हा तसा एक उपयुक्त अवयव. कारण की आपला चिरंतन, अमर असा आत्मा ज्या हृदय (अंतः-करण ?) नामक पेटीत आहे तिथपर्यंत पोचलेल्या श्वास-नलिकेचे (नाकनलिकेचे) नाक हेच पहिलेवहिले जंक्शन आहे. जंक्शन असल्यामुळे ते इंपॉर्टंटही आहे. मग आठवते ते एकदम संस्कृत सुभाषित किंवा वाक्य म्हणा—'सर्वेषु अङ्गेषु शीर्षं प्रधानम् ! (सर्व अवयवांत डोके श्रेष्ठ आहे.) आणि नाक हे डोक्याच्या (म्हणजेच चेहेरेपट्टीच्या) 'मेन सेक्शन' मध्ये मोडत असल्याने (?) तेही श्रेष्ठ मानण्याच्या अनिवार्य मोह होतो आहे.

आता 'नाकासमोरच जाण्यापेक्षा' जरा आजूबाजूला पाहिले असता या दुर्लक्षित बहुरंगी व बहुढंगी अशा अवयवाचे महत्त्व पटते. चटकन् डोळ्यांसमोर येते ती आपल्या लाडक्या 'छकुल्याला' खेळविणारी सत्य-युगातली माता ! ती आपल्या लाडक्याला म्हणत असते, (एकटी असताना)... 'नाक तुझं चपटं, सोलापुरी मापटं !' एकटी असताना याचे कारण असे की, 'दुस-ऱ्याचं ते कार्टं, आपला तो बाळासाहेब !'

मग आपल्या आईच्या जिभेकडे ('मदरटंग'चे मराठी) पाहिले असता त्यामध्ये तर नाकाबद्दल अथांग साहित्य सापडते आणि त्यामध्ये या अवयवाचा वापर केला असता अधिक 'टेस्ट' येते असे दिसते. आता हेच पाहा ना—नाकदुऱ्या काढणे—टिंगल करणे. आपण नुसते टिंगल करतो असे म्हणू पण ते होईल मिळमिळीत ! याच-प्रमाणे आणखी एक शब्दप्रयोग—'नाकाला मिरच्या झोंबणे—राग उफाळून येणे'. उदाहरणादाखल वेऊ सासू व सुनेचे भांडण—'तुझ्या माहेरचे नाव काढले की कसा राग उफाळतो ?' माझी खात्री आहे की तुम्हांला ते मिळ-मिळीत, कमजोर वाटते आहे. आणि म्हणून ते जोरदार वाटण्यासाठी असे :—"माहेरचे नाव काढताक्षणीच कशा नाकाला मिरच्या झोंबल्या ?" पाहा कसे ठसकेदार वाटते वाक्य !

त्याचप्रमाणे 'नाक घासणे किंवा घासविणे'. (घासाव-यास लावणे). आता यात पहिल्याचा अर्थ म्हणजे आपण एखादी गोष्ट करवून घेण्यासाठी अपमान विसरून याचना करणे आणि दुसऱ्याचा अर्थ दुसऱ्याला शरण आणविणे. आता इथे अर्थाअर्थी नाकाचे नाक खुपसायचे काय कारण ? पण तसे झाले नाही तर वाक्याचा सगळा 'चार्म' च जाईल.

आणि एका नाकाच्याच वाक्प्रचारासाठी तर मला शाळेतील प्रसंग (ब्रम्हांड) आठवतो. प्रसंग असा होता की, प्रथम मी काही तरी विधान केले होते व त्याच्या पुष्ट्यर्थ जोरदार असे उदाहरण तावातावाने दिले होते. पण दुर्दैवेकरून ते खोटे पडले. आणि त्याच वेळी जाहीर चौकशीच्या थाटात सरांनी मला विचारले होते, "मघाशी नाकाने कांदे सोलणारा तूच का ?" आता मला 'ही' जादू तेव्हा येत नव्हती, आता येत नाही व पुढेही येईल की नाही कोणास ठाऊक !

आता या लग्नाच्या मोसमात आपण जरी फिरलात तरी आपल्याला दिसेल,वर स्वतःबद्दल लिहिताना नाकाचा उल्लेख करीत नाही. तो लिहितो, "वर शिकलेला, अमेरिकेत L. C. P. S. करणारा, फॉरिन रिटर्न्ड, वगैरे वगैरे". आणि हाच वर वधूच्या अपेक्षेसाठी काय लिहितो, "वधू सुंदर असावी, गोरी असावी आणि चाफेकळी-सारखे नाक असावे" आणि त्यावरून वाटले की नाकाचे पण प्रकार असावेत—सरळ नाक, बसके नाक, चपटे नाक, पोपट नाक, गरुड नाक, तरतरीत नाक...

यात बसके नाक, चपटे नाक, उभे नाक, अपरे नाक यांना तसे महत्त्व दिसत नाही. कारण की भावजय आपल्या नणंदेच्या मुलाकडे पाहून म्हणते, "तुझ्या नाकावर म्हशीने पाय दिला वाटते ?" असे नाक असलेल्यांनी फक्त दीर्घ श्वासच घ्यावा की काय असे वाटते. कारण की अशा नाकाकडे पाहून नाके मुरडली जातात. तरी पण या नाकाचे महत्त्व (?) असे की कधी कधी म्हणतात, "त्येच्या तोंडाला नाकच न्हाई..."

उरलेले जे प्रकार—सरळ नाक, पोपट नाक, गरुड नाक तरतरीत नाक या प्रकारांना वरच्या प्रकारांपेक्षा फार चांगले दिवस आहेत असे वाटते. कारण या ठिकाणी हे

नाक फार महत्त्वाचा ' रोल ' करीत असते. कारण जेव्हा तरतरीत नाकाचा माणूस असे वर्णन असते तेव्हा नाक आपले नेहमीचेच कार्य ( ! ) करीत असते. पण ते एकदम लोकांच्या आवडीस पात्र होते. मला तर ते कायम ' सुम्म ' मध्येच बसलेले दिसते. कारण डोळे मिचकाविता येतात, दात काढता येतात, कान हलविता येतात. पण नाक ... ! ते या विश्वाच्या निर्मितीपासून ' सुम्मच ' बसून आले आहे. पण त्याच्यावरूनच धडपड्या, तरतरीत अशी विशेषणे आली आहेत. पोपटनाक, गरुडनाकवाली माणसे लबाड असतात असा एक अपसमज आहे. वास्तविक नाक तेच. थोडेसे टोकदार वगैरे. पण ते अक्षेपास पात्र होते. म्हणतात ना ' साप सोडून भुई धोपटावी ' त्यातलाच प्रकार. किंवा फार तर ' चोर सोडून ' संन्याशा ' ला बदडणे. '

आणि असेच एकदा निसर्गरम्य अशा खंडाळ्याच्या घाटातून प्रवास करीत असताना लोक एकमेकांना हातवारे करून खिडकीबाहेर दाखवीत होते. लोकही माना बाहेर काढकाढून बघत होते. साहजिकच सायकॉलॉजिकल इफेक्ट प्रमाणे माझी मान बाहेर गेली आणि तोंडातून शब्द बाहेर पडले, " काय, विशेष काय आहे ! " तर ' आवाजाच्या दुनिये'कडून उत्तर आले, " हेच ते प्रसिद्ध ड्युकस् नोज ! ' ( ड्यूकचे नाकाड ! ) पाहिले तर नाकासारखी दिसणारी मोठी कपारी व त्यातून पाणी गळत होते ! याचा योग्य तो अर्थ लावून मान परत जागेवर जाऊन बसली.

ह्याच निसर्गरम्य खंडाळ्याला गेलेली ट्रीप व त्यातील जोक आठवला. असेच सगळेजण गप्पा मारीत बसलो असताना सहज म्हटले, " काल काही डोळ्याला डोळा लागला नाही " तर तो ट्रिपचा परिणाम असा तर्क न करता समोरचा दोस्त ' रम 'ची बाटली फोडल्यासारखा ठासकन हसत म्हणाला, (' शोले ' इंप्रेशन्ड ) " अरी ओ सांबा, झोपताना चष्मा काढून ठेवलास तरी नाक मध्ये होते ! "

त्याच दोस्तांनी पुढल्या स्टेशनवर सिगरेटी, चिरुट शिलगाविले व सिगारेटवाले यांनी नाकातून धूर काढून दाखविले. तेव्हा त्यांच्या या ' नोज आर्ट 'बद्दल शाबासकी देऊन वर असेही म्हणावेसे वाटले की, दुर्लक्षित भागातून फेरफटका मारताना नाकातले केस जळत असताना आमचाही असाच धूर निघत असे.

ह्या नव्या आकृतिबंधाच्या काळात कोठल्याही एका ' सबजेक्ट 'मध्ये ' टु नोज दि नोज ? ' हा लेख ( lesson ) देऊन पुढील वाक्प्रचार ॲड करावेसे वाटतात : नाक ओढणे, नाक दाबणे.

आणि शेवटी एक सांगायचे विसरलेच. तमाम गॉगल्सवाल्यांचा आणि उपनयनवाल्यांचा ( की जे उपनयन ' लेणे वार्धक्याचे ' म्हणून पूर्वी प्रसिद्ध होते व जे आता कधीही लागते ! ) नाक हा आणि हाच खरा आधारस्तंभ आहे.

आणि अगदी शेवटी—ही देखील गोष्ट सांगायला हवीय—सौंदर्यसम्राज्ञी क्लिओपात्राचे नाक खूपच आकर्षक दिसत असे असे म्हणतात. ते नाक जर थोडे लांब किंवा अपरे असते तर—तर ती इतिहासप्रसिद्ध युद्धे झालीच नसती !

एवंगुणविशिष्ट नाकाचे हे विवेचन वाचून ' नाकापुढे सूत धरण्याची ' पाळी येऊ नये म्हणजे मिळविले !


*Try Once our delicious*—
Fresh Fruit Juice & Milk shake
and visit always

**Trupti Fruit Juice House**

- ★ **Jumbo Icecream**
- ★ **Cold Drinks**
- ★ **Fresh Fruit Juice**
- ★ **Milk shake**

also accept parties &
marriage's order

*Contact* –
1225 / 2 opp. Syndicate Bank,
Fergusson College Road,
Near Roopali Hotel,
Shivaji Nagar, Poona - 4.
**Prop. Sudhakar D. Patil,** B. Com.

# शोध

**अविनाश धर्माधिकारी**
प्रथम वर्ष वाणिज्य

मी असाच चाललोय...चालणार आहे...पायाला भिंगरी लावल्यागत...केव्हापासून ? आठवत नाही.

अंगावर म्हणायला फक्त कफनी आहे. आत्म्याच्या वस्त्राला आणखी एक वस्त्र चढवावं लागतं हे केवढं आश्चर्य !...पण या कफनीचा मूळ रंग ओळखणं हे परब्रह्माचं कोडं सोडविण्याइतकं कठीण झालं आहे. तिला लावलेल्या ठिगळांची संख्या 'अनंत' आहे. डोक्याचं फडकं म्हणजे फेटा...एक बहुविध उपयोगी फडकं...कधी अंथरुण...कधी पांघरुण...वाटेत कोणी काही दिलं...खळगी भरण्यासाठी...तर ते घ्यायची पिशवी. या सगळ्या अन्यायाचा सूड घेण्यासाठीच की काय दिवसा तो डोक्यावर चढून बसतो. माझ्या अंगावरच्या वस्त्रांची सहनशक्ती संपुष्टात येत चाललेली आहे... आणि माझी वाढत चालली आहे.

या गोष्टी सांगतात की...जमाना लोटला मला चाललाय सुरुवात करून...आज या गावाहून त्या गावाला...एका टप्प्यावरून दुसऱ्या टप्प्यावर. दिशा मी कधी पाहात नाही...मागे वळून पाहायचा प्रयत्नही केला नाही...करावासा वाटला नाही.

पण कुठल्या दिशेने वाटचाल केलीस ?...

असंच...दिशाहीन भटकणं...दरदर...म्हणजे...

म्हणजे माझी वाटचाल दिशाहीन ? हेतुहीन ?

मनात वादळ उठतं...मी अस्वस्थ होतो...बेचैन होतो...उत्तर सापडत नाही. गुंता...धागा कधी न सापडणारा...वाटतं...वाटतं परत फिरावं इथून... परत ? वेड्या ! परतायचे सगळे मार्ग तू तुझ्या हातानं बंद केलेस...'तिळा ! दार उघड' हा मंत्र अपुरा आहे...आता उघडायचंच असेल तर पुढचं दार उघड. मागचं नाही...

पण कसं ? कसं ?...असाच...पुढे...दिशाहीन भ्रमंतीसाठी...जी शून्याकडे घेऊन जाते...मी तडफडतो... तळमळतो. स्वतःवर चिडतो... माझ्या आयुष्यावर चिडतो...एवढ्यात हाक येते 'बाबाजी'...मी वर बघतो... त्याच्या हातात ताट आहे.

भगवी कफनी नावाचं फडकं...फेटा नावाची चिंधी... धुळीनं माखलेला, उन्हानं रापलेला चेहरा...त्यातून स्पष्ट दिसणारा बेफिकीरपणा...वेड्यावाकड्या वाढलेल्या दाढीमिशा...पिंजारलेले ते केस...पण बांधेसूद शरीर... यावरून मी साधू आहे अशी त्याची समजूत झाली असावी.

मी हसतो. प्रयत्न करतो ... मन हसूच देत नाही. नुसतेच ओठ तिरकस हलतात. सगळा अस्वस्थपणा उसळी मारून येतो... मी त्याला परत जायला सांगतो...

आलेलं ताट स्वीकारायला मन तयार असावं लागतं. तो आश्चर्यमुग्ध होतो. थोडा वेळ थांबून निघून जातो.

मनातल्या वादळाचा जोर वाढलाय. तुफान उठलय. हिमालयातल्या झंझावाताहून भीषण ... वाळवंटातल्या वादळाहून भयंकर. मन तळापासून ढवळून निघतंय...काही तरी हरवल्याची जाणीव... काय ? ते कळत नाही.

अस्वस्थ होऊन मी उठतो. इकडे तिकडे बघतो. नजरेच्या टप्प्यात कोणीही नाही. दूरवर पसरलेलं माळरान. माळरान एकटं...मीही एकटाच. रणरणतं उन... चारदोन खुरटी खुरटी झाडं—क्षितिजावर गगनाला भिडायचा प्रयत्न करणाऱ्या डोंगराची रेघ. माझा मी उभा आहे. भग्न, भकास ... मनात भयंकर अस्वस्थता. ती चेहऱ्यावर उतरलेली ... तडफड दाखवणारी रेषान् रेषा मोजून घ्यावी. कपाळावर आठ्यांचं जाळं...गाल आक्रसलेले. दातओठ एकमेकांशी शत्रुत्व करणारे. नजर मात्र आकाशाकडे ... आकाशातल्या प्रखर तळपणाऱ्या सूर्याकडे.

आणि मग ...

मग मनाच्या कुठल्यातरी खोल गाभाऱ्यातून धीरगंभीर आवाज येतो— "परमेश्वराचा शोध घे... वेड्या, तुझी वाटचाल एक दिशाहीन नाही."

"पण...परमेश्वराचा शोध ?...अशा भ्रमन्तीने ?"

"त्याने जीवनातली अनुभूती मिळते ... परमेश्वर आकाशात नाही ... दगडात नाही. प्रत्यक्ष साक्षात्कारातच आहे."

दिलासा देणारा ... मनाला शांत करणारा आवाज.

मला कळउ नाही. पण तो माझाच आवाज आहे.

युद्ध चालूच रहातं... आशेचे आणि निराशेचे... जाणीव ही तुफानामधे जळणाऱ्या मिणमिणत्या पणती सारखी असते. निराशेचे वादळ ही पणती उद्ध्वस्त करायचा प्रयत्न करते. युद्ध चालू...पण पणती कर्मयोग्या-सारखी जळते आहे. नव्हे आपला प्रकाश वाढवते आहे.

अखेर वादळ संपलं. हारलं. पणतीच्या प्रकाशात मनाचा गाभारा फुलून गेला आहे...प्रकाशलेला आहे. फक्त पणतीचा प्रकाश पुरणारं मन छोटं नाही...पणती मोठी आहे.

आणि मन म्हणजे काय ते कळत नसून मला जाणवतं की मन शांत झालंय...

मी उठतो...पुन्हा चालू लागतो. वातावरण तेच... रणरणतं ऊन...नजरेच्या टप्प्यात कोणीही नाही...चार दोन खुरटी खुरटी झाडं... क्षितिजावर डोंगराची रेषा... पण आता मी एकटा नाही...

आणि मग...

फार दिवसांनी माझ्या शरीरातला अवयवन् अवयव ओरडायला लागतो... " आम्हालासुद्धा स्वच्छ कर "

आंघोळ करणाऱ्यासाठी विहीर असतेच.

गावाबाहेरची दुर्लक्षित विहीर...पडकी, पाणी तळाशी गेलेली. मला समजतं ' ही विहीर महारांची '. पण मला त्याच्याशी काय कर्तव्य...

सुमारे अर्ध्या तासाने मी स्वच्छ होऊन बाहेर येतो. मी तोच असतो ... तासापूर्वीचा ... पण प्रसन्न वाटत असतं. समाधान वाटत असतं. मंदिर स्वच्छ करणाऱ्या पुजाऱ्याला जसं वाटतं तसं.

" शरीर म्हणजे यज्ञाची वेदी आहे. ती स्वच्छ ठेवा " याचा अर्थ आता कळतो... या साक्षात्कारातून.

विहिरीतली खळबळ शांत झाली आहे. माझं प्रतिबिंब त्यात स्वच्छ दिसतं आहे.

किती बदललो आहे ? एके काळी सुखाच्या साम्राज्यात लोळणारा मी आपल्या पायाशी दारिद्र्यात चालत आलो. परमेश्वराचा शोध घेण्यासाठी. खरं तर परमेश्वराचा शोध म्हणजे काय ते माझे मला माहीत नाही. पण तरी केल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप वाटत नाही.

काय मिळणार होतं त्या श्रीमंतीत मला ?...पैशांची श्रीमंती ती...कुठल्या तरी खानदानी, उच्चभ्रू कुळातला मी...कुठल्या ते आठवत नाही—गोत्र मात्र आठवतं. 'दधिची'.—आईनं माझ्या लहानपणी मला राम, कृष्ण, ऋषी यांच्या गोष्टी सांगून चूक केली.

कुंतीची गोष्ट सांगितली. तिला परमेश्वर प्रसन्न झाला. तिनं ' मला दारिद्र्य दे, दुःख दे ' असा वर मागितला आणि ती तपश्चर्या तिने केली म्हणून तिला एकाहून एक पराक्रमी पुत्र झाले.

त्या मुंगुसाची गोष्ट सांगितली. एक दरिद्री ब्राह्मण कुटुंब. जेवायला बसायच्या वेळेला ते तिथं गेले. त्या कुटुंबानं आपल्या तोंडचा घास आनंदानं देऊन त्याचं आतिथ्य केलं. त्या दरिद्री ब्राह्मणाच्या दानाचं पावित्र्य एवढं महान होतं की त्या मुंगुसाचं अर्धं अंग सोनेरी झालं. उरलेलं सारं अंग सोनेरी करण्यासाठी तो पुण्यशील धर्मं रानात केलेल्या यज्ञात जाऊन लोळला...पण छे ! त्या राखेत ब्राह्मणाच्या निष्काम दानाइतकं तेज नव्हतं.

ध्रुवबाळाची गोष्ट सांगितली.

या गोष्टी ऐकून श्रीमंतीत लोळणाऱ्या मला दारिद्र्या-बद्दल ओढ वाटायला लागली. वाटलं...आपणही परमेश्वर पाहायला हवा...

आणि एक दिवस भाबड्या मनानं मी आईला विचारलं,

" आई, मला दिसेल का ग देव ? "

" हो, पण त्यासाठी तपश्चर्या करावी लागते."

" म्हणजे काय ? "

" ध्रुवबाळासारखी."

ध्रुवबाळासारखी ? म्हणजे घरातून निघून जाऊन ? परमेश्वराच्या शोधासाठी दारिद्र्यात राहीन ... परमे-श्वराला माझ्या भेटीला यावंच लागेल...परमेश्वर दयाळू असतो. त्यानंच नाही का एका दरिद्री कुटुंबाचं दारिद्र्य जावं म्हणून द्रौपदीच्या थाळीसारखं मडकं त्या कुटुंबाला दिलं... त्यानंच तुकारामांना सदेह वैकुंठाला नेलं...

आणि त्याच रात्री त्या खानदानी उच्चभ्रू कुलातला एकुलता एक कुलदीपक आपल्या पायांनी घराबाहेर पडला. स्वतःच्या हातांनी घराचा दरवाजा बंद करून... परमे-श्वराच्या शोधासाठी...

.........

" आणि किती झाला शोध ? परमेश्वराचा ? "

विहीर पुन्हा खळबळू लागते.

मी विहिरीत डोकावून पहातो... एक माणूस आंघोळ करतो आहे. तोच मगाचा... मला जेवण आणणारा...

म्हणजे ?

म्हणजे तो माणूस महार होता ?... बरं झालं. मगाशी त्याच्या हातचं जेवण घेतलं नाही ते...

छे ! छे ! मी कोण ?...भटक्या...कुल विसरलेला... फक्त गोत्र माहीत असलेला...मला काय त्याचे ?...आणि तो महार नाहीच... फक्त माणूस आहे...

माणसा-माणसात फरक करून चालेल ? यज्ञाच्या दोन वेदीत कधी उच्चनीचता असते ?... सूर्याची कधी तुलना करतात ?... माणसांमध्ये फरक करणारी जनावरं आहेत.

हे कबूल आहे... पण भूक लागली आहे... जेवण हवं आहे... त्या 'माणसा'च्या हातून ?...

आंघोळ करून तो बाहेर आला... माझ्यासाठी जेवण आणणारा... माझ्याकडे तो आश्चर्यानं पाहायला लागला.

त्याचं मन मला स्वच्छ दिसत होतं... आणि त्याच्या पेक्षा माझं मन...

नितळ स्वच्छ...धुळीचा कणही नाही...तळ साफ आहे... निळ्याशार आकाशासारखं... आकाशात परमेश्वर असतो.

मी त्याच्याकडे पहात राहिलो.

माणूस ?...माणूस !...

मी पळत पळत गेलो...त्याला मिठी मारली.

महार आणि मी ?

छे ! माणूस आणि मी.

माणूस आणि माणूस...

दूरवर पसरलेले माळरान...रणरणतं ऊन...चार दोन खुरटी झाडं...क्षितिजावर गगनाला भिडायचा प्रयत्न करणारी डोंगराची रेषा...

मी त्याला साथीला घेऊन चालायला लागतो त्या क्षितिजाकडे...क्षितिजाच्याही पलीकडे जाण्यासाठी. मला माझा परमेश्वर सापडलाय.


## Learn The Banking Habit
*With*
# Bank Of Maharashtra

**Head Office : 1177, Budhwar Peth, Poona-2**

♠ ♠ ♠

YOUR BANK
WITH THE PERSONAL TOUCH
AT YOUR SERVICE FOR YEARS TO COME

♠ ♠ ♠

*CONTACT FOR :*
**WORLD WIDE TRANSACTIONS**

**V. M. Bhide**
Chairman & Managing Director

# फक्त एक मिनिटात !

**सुधीर पावळे**
द्वितीय वर्ष वाणिज्य

साधारण मानवाच्या हृदयात १ मिनिटाला ७२ ठोके पडतात. याच एका मिनिटात उष्ण कटिबंधात सापडणारी एक खास प्रकारची वनस्पती ५ मिलिमीटर वाढते. त्या वनस्पतीची वाढ आपण स्वतःच्या डोळ्यांनी बघू देखील शकतो. समजा, ती वाढ बघताना आपला श्वास अडखळला नाही तर याच एका मिनिटात आपण आपल्या फुफ्फुसात १४ ते १८ वेळा शुद्ध हवा भराल. घोड्याची गती मानवापेक्षा जास्त असली तरी पण या बाबतीत मात्र मानवाची गती जास्त आहे. कारण एका मिनिटात घोडा साधारणतः फक्त १ ते २ वेळाच श्वास घेतो. परंतु गायी, कोंबड्या, कबुतर व उंदीर श्वास घेण्याच्या बाबतीत मानवापेक्षा अधिक समर्थ आहेत. ते एकाच मिनिटात अनुक्रमे २०, ५०, ६०, आणि १३० वेळा श्वास घेतात. याच एका मिनिटात आणखी पुष्कळसे काही घडू शकते. उदाहरणार्थ या एका मिनिटात एखादा पियानोवादक आपल्या बोटांनी सुरतबकड्यांवर ३५०० वेळा आघात करील, तर याच एका मिनिटात एखादा दक्ष स्टेनोग्राफर ३०० शब्द लिहून काढील. त्यात ०·४ पेक्षा जास्त चुका आढळणार नाहीत. १९७४ मधील जागतिक टंकलेखन प्रतियोगितेतील विजयपद पटकावणारी एक जर्मन महिला होती. या अचाट स्त्रीने एकाच मिनिटात ५८२ अक्षरे टंकलिखित करून जागतिक विक्रम केला.

१९५२ मध्ये 'युनायटेड स्टेट्स' नावाच्या अमेरिकेच्या जहाजाने प्रत्येक मिनिटाला ०.७ मैल या वेगाने अटलांटिक महासागर पार केला. जगातील सर्वात वेगवान रेल्वेगाडी टोकियो ते टोकाईडो या मार्गावर धावते. ही रेल्वे गाडी १ मिनिटाला १·६७ मैल अशी सुसाट धावते, (म्हणजे वेग तासास १०० मैल). 'पोर्हो' नावाची जगात सर्वात वेगाने पळणारी मोटारकार आहे. तिचा वेग मिनिटाला ३.३ मैल असा आहे. म्हणजेच तासाला २०० मैल इतका भयंकर. 'स्पिरिट ऑफ अमेरिका' नावाच्या जेटशक्तीयुक्त मोटारीने १९६५ मध्ये एका मिनिटात १०.२३ मैल एवढे अंतर कापले होते. तिचा तासाचा वेग ६१० मैल असा होतो. जेट विमानांच्या वेगाला तर तोडच नाही. अमेरिकेच्या एका जेट विमानाने एका मिनिटात ३४.५ मैल असा विक्रम प्रस्थापित केला आहे. म्हणजेच एका तासात २००० मैल एवढे अंतर कापले जाईल. आणि सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे माणूस उभ्या उभ्याच एका मिनिटात १७ मैलाचा फेरा मारतो. हे त्याला माहितही नसते. कारण पृथ्वीच्या स्वतःभोवती फिरण्याच्या प्रक्रियेमुळे भूमध्य रेषेवरील प्रत्येक बिंदू याच वेगाने धावत असतो. पृथ्वी सूर्याभोवती फिरताना एका मिनिटात १०८ मैल एवढे अंतर कापते. तर याच एका मिनिटात प्रकाशकिरण १,१०,००,००० मैलांचे अंतर कापतात.

याच एका मिनिटात जगातले लोक खाद्यपदार्थ वा पेयाच्या रूपाने १५० टन मटन, ११० टन मासे, १३० टन साखर, १४ टन लोणी व ८ टन मार्गारिन फस्त करतात. याशिवाय 'पिने-पिलानेकी बात' आहेच. कारण याच एका मिनिटात ते १९०० गॅलन दूध व १३६ गॅलन मद्यही घशाखाली ओततात. या खाण्या-पिण्याच्या, बोलण्या-चालण्याच्या धकाधकीत याच एका मिनिटात २०० मुलं पृथ्वीवर जन्माला येतात आणि १०० म्हाताऱ्यांची बदली स्वर्गात (नरकातही !) होते.

# आमच्या पिढीची उपेक्षा आमच्या पिढीची अपेक्षा

**भारती पोतनीस**
प्रथम वर्ष वाणिज्य

अगणित आशा-आकांक्षा उराशी बाळगून मानव जन्माला येतो. मनात असलेली प्रत्येक इच्छा फक्त आभासात्मक न राहता सत्यात उतरावी यासाठी तो असंख्य प्रयत्न करीत राहतो. व त्या जर पूर्ण झाल्या नाहीत तर तो चिडतो, संतप्त होतो. आमच्यासुद्धा अशा अनेक आशा-आकांक्षा आहेत. अशा अनेक भाव-भावनांची आम्हास भूक आहे. पण ती पूर्णत्वास येत नसल्याने आमची पिढी संतप्त आहे.

आपल्या राष्ट्रात सध्या सामाजिक, राजकीय तसेच शैक्षणिक पातळीवर ज्या घडामोडी चालल्या आहेत त्या सर्व घटनांच्या मुळाशी आमच्या पिढीला धरले जाते. आमच्या पिढीबद्दल आज सगळीकडे असंतोषाचे उद्‌गार निघत आहेत. कुठल्याही अनुचित घटनेचा आरोप आमच्यावर लादून आमचा पालकवर्ग आम्हास दूषण देत आहे. पण आम्हीसुद्धा विचारवंत आहोत, प्रज्ञावंत आहोत. आमच्या चुका आम्ही समजू शकतो.

तरुण हा सळसळत्या, उसळत्या रक्ताचा असतो. त्याची जिद्द, त्याच्या आशा-आकांक्षा त्याला स्वस्थ बसू देत नसतात. गरुडझेप घेण्याची त्याची मनीषा असते. परंतु त्याला आमचा समाज अडवू पाहत आहे. परिणामी आमची पिढी बिथरते आहे व अडलेल्या विचारांना व कोंडलेल्या मनाला वेगळेच वळण लागून समाज-रचनाच बिघडत चालली आहे.

आम्ही माणसे तीच आहोत ज्यांच्यामधून शिवाजी-संभाजीसारखे शूर वीर पुढे आले. याच माणसांतून टिळक, सावरकर, गांधींसारखे एकेक क्रांतिवीर घडले. तीच माती, तीच जमीन, तेच राष्ट्र. आमचीच पिढी अशी का ? उत्तर एकच आहे.

आज भ्रष्टाचार हा शिष्टाचार झाला आहे. आमचे राष्ट्र अतिशय संपन्न असूनसुद्धा आम्हास ज्या आर्थिक परिस्थितीतून जावे लागते आहे त्याबद्दल आम्हा तरुणांना अतिशय खंत वाटते आहे. गरिबांच्या तोंडात अन्नाचा घास जात नाही व काळाबाजार करून सोकावलेले श्रीमंत मात्र समाजात प्रतिष्ठितपणे वावरताना दिसतात. त्यांच्या शब्दाला असणारा मान पाहून आम्ही अपमानित होत आहोत. तशातच प्रचंड भाव-वाढ झालेली. असंख्य बेकार पडलेले व कष्ट करूनही मिळालेल्या पैशात आम्हास आमच्या गरजा भागविता येत नाहीत. दोन वेळचे अन्नही मिळत नाही.

त्यातच घरचे पालकसुद्धा आम्हास सहानुभूतीची वागणूक देत नाहीत. ते आधीच सभोवतालच्या परिस्थितीने हतबल झालेले व प्रपंचाच्या ओढाताणीत थकलेले. तसेच त्यांनी आमच्याबद्दल उच्च आकांक्षा बाळगलेल्या असतात. आपला मुलगा मोठा होईल, खूप शिकून समाजात प्रतिष्ठा मिळवील, आपल्याला मान देईल असे त्याचे स्वप्न असते. परंतु तसे काहीच न घडल्यामुळे त्यांचा अपेक्षाभंग होतो व ते मुलावर चिडतात. त्यांच्या त्या वागणुकीमुळे आम्ही घरापासून, नातलगांपासून दूर दूर जातो. इथेच आमची प्रेमाची भूक मारली जाते. संतापलेले मन वाईट मार्गाला लागते. धार्मिक तसेच नैतिक भावना, श्रद्धा, वात्सल्य गळून पडतात व हिंसक प्रवृत्तीला दिशा मिळते.

अशा वेळेस आम्हांस वाटते की निदान विद्येच्या दालनात तरी आम्हांस आमचा गमावलेला आनंद प्राप्त होईल. त्या ज्ञानमंदिरात तरी आम्ही आमच्यातील वैताग विसरून जाऊ. पण इथेही आमचा अपेक्षाभंग होतो. तळमळीने शिकवण्याची ओढ असणारे प्राध्यापक फार दुर्मिळ! ते स्वतःच्याच सांसारिक विवंचनेत ग्रस्त झालेले असतात. त्यामुळे ते मुलांना ज्ञानाबद्दल ओढ लावू शकत नाहीत. परिणामी पेपरांचे घोळ, निकालांचे घोळ, परीक्षांचे घोळ अशा अनेक आपत्तींत विद्यार्थी व प्राध्यापक सापडतात. त्यामुळे गुरुजनांबद्दल वाटणारा आदर व त्यांच्यावरील

श्रद्धा दूरावत चालली आहे. त्यातूनच ज्ञान, शिक्षण यांबरचा विश्वास उडू लागला आहे. ज्यांना कमी गुण आहेत अगर जे नापास आहेत अशांना वशिल्यामुळे नोकरी लागते, गुणी विद्यार्थी मात्र भरडले जातात व पदवीधर बेकार पडतात.

तसेच राजकीय क्षेत्रातही निःस्वार्थी, निर्मोही देशप्रेमी कमी संख्येनेच आढळतात. त्यांच्या वागणुकीमुळे त्यांच्याबद्दल तिरस्कार उत्पन्न होऊन कुठलाच मार्ग न सापडल्यामुळे आमच्या प्रवृत्तीला हिंसात्मक वळण लागते व जाळपोळी, हाणामारी इत्यादी कृत्ये घडतात.

परंतु असे असतानासुद्धा आमचा देश आज ज्या संघर्षातून चालला आहे ते थांबविण्यासाठी त्याला आमचीच मदत लागेल. कारण शेवटी हा युवक वर्गच ते करू शकेल. पूर्वजांनी जोपासलेल्या सांस्कृतिक मूल्यांचा आम्हाला अजूनही विसर पडलेला नाही. म्हणूनच काही विधायक कार्ये अजूनही आमच्या हातून होत आहेत. हाक मारलेल्यांना ओ देण्याची आमच्यात अजूनही तत्परता आहे. बिहारच्या मदतीसाठी हा युवक वर्गच खपला आहे. १५ ऑगस्ट, २६ जानेवारीला हजारोंच्या संख्येने रक्तदान तोच करतो आहे. अनेक सामाजिक कार्ये त्याच्या हातून घडत आहेत. तसेच नवे नवे धाडसी उपक्रम तो हाती घेतो आहे. पण त्याला हवे आहे प्रेम, त्याला हवा आहे न्याय, त्याला हवी आहे समान वागणूक, त्याला भूक आहे सहानुभूतीची. तो कष्ट करेल, श्रमाची भाकरी मिळवेल, पण त्यानंतर पाठीवरून मायेने हात फिरवणारे मायेचे माणूस त्याला पाहिजे. त्याला आधार हवा फक्त याच गोष्टींचा. कुठलीही चांगली गोष्ट केली की निर्भेळपणे शाबासकी मिळावी, त्याच्या चुका त्याला समजावून सांगितल्या जाव्यात, या गोष्टींचीच त्याला भूक आहे. व हे प्रेम त्याला मिळाले, ही माया त्याला मिळाली तर ही पिढी एकत्र जमेल, व एक प्रचंड सामर्थ्य आपल्या राष्ट्राच्या संरक्षणासाठी उभे राहील. फक्त यासाठी समाज बदलायला हवा, आमचा पालक बदलायला हवा.


If you are thinking of

**COMPRESSED AIR**

you would naturally think of

**KIRLOSKAR PNEUMATIC**

*manufacturers of a wide range of*

Air Compressors & Pneumatic Tools

*Also leading manufacturers in the field of*

Air Conditioning & Refrigeration and Transmission

**KIRLOSKAR PNEUMATIC CO., LTD.**
Hadapsar Industrial Estate, Poona - 411 013.

# मी हुंडा बोलतोय....

**रमेश शेलार**
प्रथम वर्ष कला

म्हणे ज्वलंत प्रश्न आहे ! खुळचट आहात !...अहो, मला बदलणे शक्य आहे का ?... गेली हजारो वर्षे या देहाला हुंडा असे म्हणतात...... काही तरी कल्पना काढतात !... अंगात नाही करणी अन मला म्हणा तरणी !... काय म्हणता तुम्हांला मान्य नाही ?... अहो, माझ्या शिवाय पानच हालणार नाही... आणि हो, माझ्या लोभाच्या पिशाच्चाने तुम्हांला दंश केला... पण उतारा नाही !... कोण ? मुली... छे ! त्या तर बावळट...फक्त तोंडात वाफ... काय इंजिनिअर... मग काय मला बोलावणे... विद्वान, पैसेवाला... मग मलाच आमंत्रण... म्हणे ही पद्धत बदला !... कोणी डेअरिंगच करत नाही... आणि हो, तशा सुगृहणी जन्मायच्यात... काय, तसा प्रयत्न झाला ? अरेरे ! ते आदर्शवादी युग गेलेय आता ... नि माझ्यासाठी रडा ... फक्त अश्रू ढाळा... का ? तर तुम्ही भ्याड !... फक्त सभा, भाषणे गाजवा !... पण पळसाला पाने तीनच !... नव्या नवरीचे नऊच दिवस पण माझ्याशिवाय नाही. त्या दोघांत स्पर्धा... म्हणे माझ्याच लेकीला तोच पाहिजे... मग परत माझे पाय धरा... आता तर काय विद्यार्थीवर्ग म्हणे त्याला विरोध करणार ! मला तर हसायलाच येते... आणि त्यांचे पालक स्वतःच्या लग्नात हुंडा दिला–घेतला म्हणून वसूल करतात... ते... ते... वेडे प्रेमवीर... माता-पित्यास वंदन करतात ! ... ते तरी करणार काय ? त्या... त्या... आई-बापांचे वीर अभिमन्यू !... पण कर्तव्यशून्य... हुंड्याच्या चक्र-व्यूहात चक्क फसलेले ! नाक नाही धड अन् तपकीर ओढ...कशाला ? कशाला ? तो वेडा कारकून... म्हणे मुलीच्या हुंड्यापायी विष प्याला... सुटला बिचारा ! आणि ही प्रेमिका... पवित्र प्रेमाची बरसात करणारी पण चक्क माझ्या गैरहजेरीने म्हणे तिच्या प्रेमिकाचे प्रेमच आटले !... दिला... काय ?... दुसरे काय ? विहिरीत जीव... सांगा ? मला कोण नष्ट करणार ? आणि ह्या मॉडर्न युगात... चैन, आराम, नोकरी... घर... गाडी मिळणार... फक्त डिग्री घ्या !... मुलींच्या आई-बापास लुबाडा... रक्त आटवा... कठोर व्हा ! याशिवाय तुमची लायकी काय ? एक गाढव ... माझ्यावर चाल केली... म्हणे मी तुला नष्ट करणार... पण... पण... दैव देते आणि कर्म नेते... रडला, रागावला, बेफाम, बेभान, धुंद बनला... आणि मुलीच्या गळ्यावर कुऱ्हाड ठेवली !... हॅं... हॅं ... हॅं... स्वतःच्या पोटच्या गोळ्यालाच नष्ट केले... बिचारा गरीबीने गांजला होता, चिडला होता...... पण मी अजून पाय रोवून उभा आहे...... आत्मविश्वासाने !......... येथील सर्व मेनका निष्प्रभ आहेत. हं...आता काय म्हणता ?... अहो, यासाठी कोणी झटणारा नाही !...कल्पना फक्त स्टेजवर सुंदर...पण स्वतःच्या दारी आलेल्या अतिथीला ते विन्मुख पाठवीत नाहीत...मीच असतो ना ! आणि तो पाहा काण्या डोळ्याने पाहाणारा ढोंगी समाज...तो तर... माझ्या...होय...माझ्याच महारोगाने पिडलेला...त्या... नजरेत माझेच लपलेले पाप...ते दात, ते पण माझी चव घेण्यास आसुसलेले...आणि हेच ते हात...मला स्पर्श करणारे...भावनाहीन... विखारी... प्रथम...हा... हा ते नष्ट करा...मग माझ्याकडे पाहा...मी...मी फक्त कारण आहे ! कावळा बसायला आणि फांदी मोडायला... जुनाट, गलिच्छ परंपरा, रक्त पिणारी...आणि त्याचा आदर करणारी ही जनता...मला नावे का ठेवता ?... हा तुमच्यातला दुर्गुण काढा...खोटेपणा, दांभिकतेचा आव... इतरत्र तेच लग्नात !... म्हणे तरुणांनी नव्याचा स्वीकार केला...केला पण तो कपड्यांचा, बाह्यांगाचा...पण त्यांची

मनं एक डबकं !...डास पोषावणारे...नामर्द आहेत. आणि परत जुन्यांच्या लोभांकडे वळणारे...मग मी काय करणार ? मला का तुम्ही रागावता ? माझा लोभ धरणारे ...होय तेच महाभाग...गटारातले किडे आहेत...वळ-वळ करणारे...आणि मग त्यांना साखरेच्या पाकात टाकले तरी वळवळ करणारच...यालाच जातिवंत पिल्लू म्हण-तात !... मग माझ्यावर मोर्चे का काढता ? शिवाय जे गलिच्छ थोबाड माझी स्टेजवर विटंबना करते तेच घरी प्रेमलाप करते, फक्त माझा...होय माझाच ! ही चाल अवश्य बंद करा...पण तो दृष्टिकोन एक घोषणा !... पण स्वतःच्या अंगावर आले की मगच पाठिंबा देतात... आणि तोपर्यंत...गंमत पाहातात...मुलांच्या लग्नात पैसा ओढतात...आणि " कन्या हुंड्याविना सासुरी जाय " ही इच्छा... मग हुंड्यासह धाकटी गेली ... म्हणून हुंड्यासह मधल्याची सून...ती दारी माझे मापटे लाथाडून येते... दोषी कोण ? खरंच मी नाही !...हा समाज... आणि ते पालक...हेच ते ज्यांच्यात कर्तव्याचा अभाव आहे... मग... माझ्यासाठी... खूप मरणार... आणि असंख्य सुखावणार...आणि मी सतत हसणार...कारण तुम्ही नामर्द, नेभळट आहात...हँ...हँ...हँ !


गाफिल राहू नका !
उद्याची काळजी
आजच घ्या !
बँक ऑफ बरोडात
खातें उघडा व बचत करा

तुमच्या प्रगतीचा सोपान
बँक ऑफ बरोडा

भारतात सर्वत्र आणि इंग्लंड, पूर्व आफ्रिका, मॉरिशस,
फिजी बेटे आणि गियाना या परदेशांतही
६२५ वर शाखांचे जाळे


...४

# माय डिअर बॅरी

कु. उर्मिला रणदिवे
द्वितीय वर्ष शास्त्र

या जगात कॉलेजियन्सच्या अफलातून डोक्यात कोणत्या कल्पना येतील याचा काही नेमच नाही. तर सांगायची गोष्ट म्हणजे ' बन्या ' ऊर्फ ' शुक्लेन्दु रामनाथ सारोळे ' हा एक कॉलेज स्टूडंट १९६८ सालच्या रम्य प्रभाती अमृततुल्य चहा घेत ' शंकर विलास ' मध्ये बसला होता. वर्तमानपत्र वाचत वाचत स्वारी आरामात चहाचे घोट घेत होती. तोच त्याचे लक्ष वर्तमानपत्रातील एका छोट्याशा बातमीकडे गेले. कोणीतरी बॅरी गोल्डवॉटर नावाचा माणूस अमेरिकन सिनेटवर उभा राहिला होता. या बन्याच्या अफलातून डोक्यात असे आले की आपण बॅरी गोल्डवॉटरला पत्र लिहायचे. झाले ! घरी येताच स्वारीने पत्रास सुरुवात केली.

' My dear barry '

' Wish you best of luck,...' इ. इ. खाली आरामात सही वगैरे ठोकली. स्वतःचा पत्ताही सोबत पाठवला अन् कॉलेजमध्ये जाताना व्यवस्थित तिकिटे वगैरे लावून ते पत्र पोस्टाच्या आ वासलेल्या पेटीत टाकले.

हा ' बन्या ' म्हणजे तेव्हाचा Engineering College मधला अत्यंत हुशार, मेरिट-लिस्ट मधला स्टूडंट. तसं पहायला गेलं तर बन्याच्या घरची परिस्थिती बेताचीच; पण स्कॉलरशिपवर सगळे शिक्षण होत असल्याचे आईबापांना कसलीच काळजी नव्हती. पोरगं इंजिनीयर झालं काय अन् फिटर झालं काय, त्यांना कसलीच आस्था नव्हती. एक जीनची पॅंट अन् दोन जाडेभरडे शर्ट यावर स्वारी दिवस काढत होती. बन्याला कशाचीच खंत नव्हती. नेहमीच तो ' हम खुश तो जमाना खुश ' अशा थाटात राही.

तर बन्याने पत्र पोस्टात टाकल्यापासून थोड्याच दिवसात बन्याला पत्र आले. तसे अमेरिकन म्हणजे काय भलतेच सिन्सिअर ! बॅरी गोल्डवॉटरच्या सेक्रेटरीने ' आभारी आहोत ' या आशयाचे पाठवलेले ते पत्र पाहातच बन्याला अगदी हुरूप आला. पुढे सिनेटची इलेक्शन वगैरे पार पडली अन् काय आश्चर्य, बॅरी चक्क निवडून आला. लगेच बन्याने पत्र लिहिले,

My dear Barry !

Heartiest congratulations !....! लगोलग बॅरीचेही उलट टपाली पत्र आले. 'Thank you Mr. S. R. Sarole .. ' चे. खाली चक्क बॅरीची सही होती. ( अर्थात न वाचता येण्याजोगी ! )

मग मात्र बन्याला ह्या पत्रापत्रीचा नादच लागून गेला. तो बॅरीला मनाला येईल ती गोष्ट कळवीत असे, ' आमच्या कॉलेजच्या इलेक्शन्स झाल्या. मी उभा राहिलो, पण पडलो ' ' इथली हवा सध्या फार चांगली आहे. मी सकाळी उठून टेकडीवर फिरायला जातो.' 'आमच्याकडच्या गणेशोत्सवाच्या कार्यक्रमात राज कपूर आला होता' इ. इ. आणि बॅरीही बन्याला तत्परतेने उत्तरे पाठवीत असे.

होता होता बन्याची फायनल परीक्षा झाली. रिझल्ट लागला. बन्या B. E. ला अख्ख्या युनिव्हर्सिटीत फर्स्ट आला. आपलं हे किडमिडं, पोरगं पहिलं आलं म्हणून आईबापांना कौतुक वाटलं. आता हा कुठे तरी नोकरी करील अन् आपण चार घास सुखानं खाऊ, या विचारांनी त्यांना हर्षवायू व्हायची पाळी आली. पण बन्या तिरक्या डोक्याचा ! त्यानं जाहीर करून टाकलं की आपण नोकरीबिकरीच्या फंदात बिलकुल पडणार नाही. ते आपल्याला जमणार नाही. मित्र त्याला म्हणू लागले, ' अरे वेड्या ! मनात आणशील तर हजार बाराशे कमवशील, मजेत राहशील.' तर बन्या म्हणतो कसा, ' आत्ता काय थोडा मजेत राहतोय ? आरामातच आहे मी.' झालं ! काहीच उद्योग नव्हता म्हणून बन्याने व त्याच्या दुसऱ्या एका तिसऱ्यांदा फेल झालेल्या मित्राने कॅफे बेस्ट लकमध्ये सिगरेटी फुंकत बसण्याचा उद्योग चालू केला. दरम्यान

गोल्डवॉटर प्रकरण चालूच होतं. गंमत म्हणून बन्यानं एक्स वाय झेड ऑइल एन्जिन्स लिमिटेड नावाची लेटर पॅडस छापून घेतली व त्यावर बॅरीला पत्र लिहिण्यास सुरुवात केली.

" My dear Barry मी व माझ्या मित्राने XYZ ...Ltd, अशी कंपनी काढली असून हळूहळू आमचा जम बसतो आहे. " वगैरे वगैरे. बन्या फर्स्ट आल्याने खूष झालेला बॅरी आणखीनच आनंदला. मग बन्याने बॅरीला पत्रं पाठवायचा सपाटाच लावला व त्याची अशी समजूत करून दिली की, एकूण "सारोळे यांची कंपनी ही भारतातील एक अत्यंत महत्त्वाची व अग्रेसर कंपनी आहे. ". मग बन्याने हळूच खडा टाकला,

" My dear Barry आपण आमच्या या कीर्तिवान कंपनीचे ऑनररी डायरेक्टर झालात तर आमच्यावर मोठे उपकार होतील." इ. थोड्याच दिवसांत अमेरिकन सिनेटमधील प्रमुख पुढारी बॅरी गोल्ड वॉटर बन्याच्या त्या ' रेडिमेड ' कंपनीचा ऑनररी डायरेक्टर झाला.

मध्यंतरी बन्याने अमेरिकेतील ' Sassachusete Institute of Technology' या जगद्विख्यात संस्थेत M. S. करण्यासाठी अर्ज केला होता. त्याचे बन्याला उत्तर आले की " तुम्ही आमच्याकडील B. E. केल्याशिवाय तुम्हांला M. S. साठी परवानगी मिळणार नाही." बन्या वैतागला. पण तोच त्याच्या डोक्यात एक आयडिया आली. त्याने कंपनीचे लेटर पॅड घेऊन सुरवात केली, ' My dear barry... ' व सर्व वृत्तान्त बॅरीला कळवला. तसेच कंपनीचे ऑनरी डायरेक्टर या नात्याने आपण या गोष्टीत लक्ष घालावे अशी विनंती केली. बरोबर पंधरा दिवसांनी बन्याच्या नावे एक भेंडोळे आले. अमेरिकेतील त्या जगद्विख्यात संस्थेनी त्याची माफी मागितली होती आणि त्याला M. S. करण्यास परवानगी मिळाली होती. सोबत बॅरी गोल्डवाटरच्या त्या संस्थेला आलेल्या पत्राची नक्कल आणि फर्स्ट टर्मच्या हॉस्टेल-चार्जे व फीच्या पावत्या पण होत्या.

मग कांय, बन्या नुसता हवेत तरंगत होता. तो ते भेंडोळे घेऊन अमेरिकन एम्बसीत गेला. तिथे असलेली रिसेप्शनिस्ट फोन ऑपरेट करीत होती. तिथे सुरवातीला या फाटक्या दिसणाऱ्या माणसाकडे लक्षच दिले नाही. बन्याने खिशातून बॅरीच्या त्या पत्राची नक्कल काढली अन् तिच्यापुढे ठेवली. तशी ती तिच्या खुर्चीत चार फूट उडाली. जे काम करायला लोकांना पंधरा वीस दिवस रखडावे लागते ते बन्याचे काम दोन दिवसांत झाले.

" आता व्हिसा बिसा सगळेच तयार आहे. पण साले पैसे कुणाकडे आहेत ? " बन्या वैतागून स्वतःशीच बोलला. बन्याने रात्रभर विचार केला. बन्या दुसऱ्या दिवशी सकाळी उठला. डिग्रीचं भेंडोळं आणि बॅरीच्या पत्राची नक्कल घेऊन तडक महाराष्ट्रीय बँकेच्या कस्टोडियनच्या केबीनमध्ये जाऊन उभा राहिला. तो चार वाजता जेव्हा बँकेतून बाहेर पडला तेव्हा त्याच्या नावे रु. १०,००० ( रुपये दहा हजार मात्र ) कर्ज मंजूर झाले होते.

मग बन्या व्यवस्थितपणे अमेरिकेत गेला. उत्तम रीतीने M S झाला; आणि सध्या तो अमेरिकेत एका प्रसिद्ध कंपनीत Chief Engineer म्हणून गाजतो आहे; मानमरातब मिळवतो आहे. स्वारी खोऱ्याने पैसा मिळवते आहे; अगदी मजेत आहे.

Phone : 41959
Gram : SHAGON

*Contact*

**Shagon Enterprising Corporation**

*For*

☆ **Galaxy Synthetic Enamel paint**
☆ **Oricem Cement paint**
☆ **Deoraj Brushes**
☆ **Decolite / Delite Dry Distemper**

*And*

**all other painting material**

Saraswati Mandir building
Bajirao Road, Natu Baug, Poona 30

# शिष्यवृत्या : मागासवर्गीयांच्या

चारुचंद्र भिडे
तृतीय वर्ष वाणिज्य

' जातीय शिष्यवृत्त्या आणि शैक्षणिक सवलती ' हा तसा जुनाच पण महत्त्वाचा विषय. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणात आर्थिक सवलती मिळतात. त्यांच्या बाबतीत उच्च शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या गुणवत्तेची अट शिथिल केली जाते. किंवा मागासवर्गीयांसाठी सरकारी नोकरीत प्रवेशासाठी आणि पदोन्नतीसाठी विशिष्ट प्रमाण कायम केले जाते. हे पाहिले की मागासवर्गाखेरीजच्या सर्व लोकांची तोंडे पिवळी पडतात. त्यांच्या पोटाचे तर दुखून दुखून वाटोळे होते.

एखाद्या ' गंप्याला ' एफ्. वाय्. बी. एस्सी. ला सत्तर टक्के गुण पडून देखील त्याला ' मेडिकल ' ला प्रवेश मिळत नाही. पण त्याच्या वर्गातल्या ' कांबळे ' ला पंचेचाळीस-पन्नास टक्के पडूनही तो मेडिकल लाइनला जातो. तेव्हा या गंप्याच्यासकट त्याच्या आप्तांचा तिळपापड होतो. गंपू-पुढे बी. एस्सी. होतो. चांगल्या गुणांनी. आणि ठिक-ठिकाणी अर्ज करतो. त्याला कळतं की आपल्या बरोबर-च्या ' गायकवाड 'ला चाळीस टक्के पडून देखील बँकेत प्रायॉरिटी बेसिसवर नोकरी मिळाली. आणि मग गंपूनाना प्रचंड वैतागतात. " पहा पहा—कसे माजलेत. आम्ही बॅकवर्ड नाही ना ! मग आम्हाला नाहीच मिळायच्या नोकऱ्या ! " वगैरे वगैरे.

या ' गंपोजी ' सारख्यांचं एकच म्हणणं असतं की, " मेरिट पाहा. यांना शिक्षण फुकट मिळतंय तर मिळू दे. पण दोघांना एकच मास्तर शिकवणार, दोघांनी एकच पेपर लिहायचा, तर मग दोघांची केवळ गुणवत्ता पाहून ' मेडि-कल 'ला प्रवेश द्या; किंवा सरकारी नोकरीत प्रवेश द्या. त्यांच्या जातीचा विचार कशाला ? " गंप्याचं म्हणणं अत्यंत तर्कशुद्ध आणि योग्य आहे असं प्रथमदर्शनी वाटतं. पण यावर विचार केल्यास त्यात चूक कुठे आहे ते समजून येईल.

गंप्याच्या म्हणण्याप्रमाणे गुणवत्तेवरून निवड करायची म्हणजे दोघांची तुलना करायची. आणि अशी तुलना करा म्हणणं हे एकाला घोड्यावर बसवायचं, दुसऱ्याला पळत जायला सांगायचं आणि त्यांची शर्यत घेऊन त्यात पहिला येणाऱ्याला बक्षिस द्यायचं, अशासारखं होणार. मागास-वर्गीय नसलेल्यांच्या घरी पहिलीपासून मुलावर ' शैक्षणिक संस्कार ' होत असतात. पहिलीपासून पाढे, पाचवीपासून स्पेलिंग, आणि सातवीपासून गृहपाठ या गोष्टींकडे लक्ष पुरविले जाते. अकरावीला किंवा त्यापूर्वीपासूनही शिकवणी लावली जाते. रोज आई, बाबा ' अभ्यास काय म्हणतोय ?' वगैरे विचारतात. म्हणजेच अशा मुलाला परीक्षेत मिळ-णाऱ्या गुणांची निम्मी तयारी घरीच करवून घेतलेली असते. मागासवर्गीयांच्या घरी काय असतं ? आई—वडील गटार सफाई, रस्ते सफाई, चांभारकाम यात गुंतलेले. पैसा बेताचाच. शैक्षणिक संस्कार शून्य. जादा क्लास अजिबात नाही. अर्थात अशा विद्यार्थ्याने मिळविलेले यश पूर्णतः त्याचे स्वतःचेच असते. याउलट गंप्यासारख्यांचे निम्मे यश घरचे व निम्मे स्वतःचे असते.

यासाठी गुणवत्तेची बंधने सैल केली जातात. आणि पळणाऱ्याला ' घोडा ' देण्याप्रमाणेच मागासवर्गीयांना नोक-रीत ठराविक टक्केवारी, मोफत शिक्षण यासारख्या सवलती दिल्या जातात. त्या द्यायलाच पाहिजेत. जोपर्यंत समान परिस्थिती निर्माण होत नाही तोपर्यंत समान संधीचे तत्त्व कसे अमलात आणणार ?

# मी व्यायामाला जातो

विजय जाधव
पदवीपूर्व शास्त्र

" आई ग, आज संध्याकाळी चांगलं मसाला दूध करून ठेव बरं का! आज मी व्यायामाला जाणार आहे. वेलदोडे दुधात टाकायला विसरू नको बरं का!" असे आईला सांगूनच मी कॉलेजला आलो होतो.

त्या दिवशी दिवसभर माझे अभ्यासात लक्ष नव्हते. शेवटचा ' पिरियड ' संपला न संपला तोच मी कॉलेजच्या ' जिम 'कडे धाव घेतली. जिमच्या दारात पोहोचताच एकवार सभोवार पाहिले. कोणी वर्गातील मित्र, [ विशेषतः मैत्रिण ] आपल्याकडे पाहताहेत का हे पाहू लागलो. पण दुर्दैवाने मी ' जिम 'मध्ये जातो हे इतरांना सांगण्यासाठी आजूबाजूला कोणी मित्रच दिसत नव्हता. अखेरीस पुन्हा एकदा सभोवार पाहून, ( फुगत नसलेली ) छाती फुगवून मी ' जिम 'मध्ये प्रवेश करता झालो.

आत प्रवेश करताच पहिलवान लोक माना वळवून माझ्याकडे पाहू लागले. कोणी तरी उद्गारले, " अरे, पहिलवान आले!" " च्यायला!" मी उद्गारलो, सगळीकडे मी ' काडी-पहिलवान ' ह्या नावाने ' फेमस ' असताना इथे येताच पहिलवान झालो की काय? खरेच माझी तब्येत सुधारली की काय? ह्या संभ्रमात मी होतो न होतो तोच दुसरा वाग्बाण आला, " हे महाशय काय डोंबलाचा व्यायाम करणार?" आणि माझा संभ्रम ' बरशेन गॅसवर ' ठेवलेल्या लोण्यासारखा वितळून गेला. जाऊ द्या. ' टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही ' ह्या म्हणीनुसार सुरवातीला थोडे टक्के-टोणपे खाल्ल्याशिवाय ' पहिलवानपण ' येणार नाही असा रास्त विचार करून मी तिकडे दुर्लक्ष केले आणि व्यायामाला शुभारंभ कोठून करावा याचा विचार करू लागलो. अखेरीस नित्याप्रमाणे प्रथम जोर-बैठकांनी सुरवात करावी ह्या विचाराने मी जोर काढण्यासाठी पुढे सरसावलो.

एकवार श्रीबजरंगबली हनुमानाच्या पिळदार मूर्तीकडे पाहून मी जोर काढण्यास सुरुवात केली. ए ऽ क, दोऽन, ती ऽऽऽ न, चा ऽऽऽर, पा ऽऽऽऽऽच! कसे तरी पाच जोर झाले. पण सहावा जोर काही मारता येईना. तरी देखील मनाचा हिय्या करून मी सहावा जोर काढू लागलो. या वेळी, कॉलेज बुडवून मॅटिनीला पाहिलेल्या ' इम्तिहान ' मधील सूर मला ऐकू येऊ लागले— ' रुक जाना नहीं ऽऽ, तू कहीं हारके... ' आणि मी सहावा जोरसुद्धा पूर्ण केला. ह्या वेळी, म्हणजे जोर काढून सरळ होताना माझे अंग इतके थरथरत होते की, त्या वेळी, हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रख्यात कॅबेरे–डान्सर ' हेलन ' हिने पाहिले असते तर तिने देखील लाजेने मान खाली घातली. असती. [ कारण दुसरे साम्य म्हणजे, अंडरवेअर वगळता मी संपूर्णपणे उघडा होतो. ] झाले! आमचे ' सहा ' जोर पूर्ण झाले. [ माझ्याबरोबरच जोर काढण्यास सुरुवात केलेल्या शेजारील पहिलवान मुलाचे ' शंभर ' जोर पूर्ण झाले होते. ] चला, आज सहा तर उद्या साठ काढू असा सोयिस्कर विचार करून मी आवरते घेतले आणि बैठका मारण्यास सुरुवात केली.

दहा बैठका तर अगदी सहजपणे काढून झाल्या. अरे! वीससुद्धा झाल्या. मनात मनोरे रचू लागलो. उद्या मी शंभर बैठका काढीन, परवा दोनशे, नंतर तीनशे, नंतर हजार. मग मी ' बॉडी–बिल्डर ' होईन. कॉलेजतर्फे ' बॉडी शो ' मध्ये भाग घेईन. पहिला येईन मग सर्वजण...

' अयाई गं ऽऽऽ! ' मांडीतून जोरदार कळ आली आणि पंचविसावी बैठक ही बैठकच ठरली आणि मी खालीच बसलो.

आता ' वेट-लिफ्टिंग ' करावे असा विचार करून मी ' कर्लींग ' करण्यासाठी सरसावलो. पहिलाच दिवस आहे तेव्हा कमीच वजने लावावीत असा विचार करून, दोन्ही बाजूंना पाच-पाच पौंडांचे वजन लावून मी ' बार ' उचलला. पण अफसोस! माझा उजवा हात डाव्यापेक्षा शक्तिशाली होता की काय कोण जाणे! उजवा हात डाव्यापेक्षा जास्त वर गेला आणि डाव्या बाजूकडील पाच पौंडांच्या वजनाने

धरणीमातेकडे धाव घेतली. साहजिकच डावा हात शत्रुपक्षाला पित्तूर झाला हे पाहून उजव्या हाताने सुद्धा शरणागती पत्करली आणि उजवीकडील 'वेट'ने शेजारीच उभ्या असलेल्या आडदांड मुलाच्या पायावर झेप घेतली. आणि तो मुलगा (मुलगा कुठला? चांगला मिशा फुटलेला राक्षसच म्हणा ना!) वसकन ओरडला (अगदी राक्षसा-सारखाच), 'का रे ए XXX, व्यायाम नीट करता येत नाही तर मग XXXला 'जिम'मध्ये येतोस का?' मी जरा रागानंच त्याच्याकडं पाहू लागलो तर म्हणतो कसा, 'असा बघतोस काय टकाऱ्यासारखा!' अस्सा राग आला. वाटले खाऊ का गिळू ह्याला! पण त्याच्या पीळदार शरीर-यष्टीकडे पाहून मी मुकाट्याने राग गिळला.

नंतर मी दोन्ही हातांनी धरून 'बार' वरती उचल-ण्याचा व्यायाम करू लागलो. पण क्रियेऐवजी प्रतिक्रियाच घडून आली. व्हाटाय मीन?—बार वरती 'लिफ्ट' होण्याऐवजी मीच खालती बसलो. जाऊ द्या,—हे आपल्या-सारख्या 'येऱ्यागबाळ्याचे काम नोहे' असा विचार करून मी 'बेंच-प्रेस' (म्हणजे बेंचवर पाठीवर झोपून बार खाली-वर करणे) चालू असलेल्या जागी आलो.

तेथे माझाच एक 'बॉडी-बिल्डर' (?) बंधू दोन्ही बाजूंना अडीच पौंडांचे 'वेट' लावून बेंच-प्रेस करीत होता. एखाद्या मेलेल्या वाघाकडे पाहावे तसे मी अडीच पौंडाच्या वेटकडे नि बारकडे पाहात होतो. आणि माझी पाळी आली. मी बेंच प्रेस करण्यासाठी सरसावलो. प्रथम बेंचवर पाठीवर झोपलो. बार छातीवर घेतला आणि तो वरती नेण्याची शिकस्त करू लागलो. पण छे! बार काही वर जाईना. यमराज आपल्या वाहनासह माझ्या छाती-वर बसलेत की काय असा मला क्षणभर भास झाला आणि मी ओरडलो "अप!" एका पैलवान पार्टनरने डाव्या हाताने बार उचलून घेतला. एव्हाना सारी मंडळी तेथे जमा झाली होती. त्यांच्याबरोबर टक्के-टोणपेही आलेच. मी उठून केविलवाण्या नजरेने छोट्याशा अडीच पौंडाच्या वेटकडे पाहू लागलो. थोड्याच वेळापूर्वी मृतवत वाघाप्रमाणे वाटणारी ती वजने जिवंत वाघ होऊन माझ्याकडे बघून गुरगुरताहेत असा मला भास झाला. झाले! ह्याही आघाडीवरून मला पळ काढावा लागला आणि आता एकदा शेवटचा 'ट्राय' करावा ह्या उद्देशाने मी 'करेल' (गोष्टीतल्या जादूच्या सोट्या-सारखा सोटा) फिरविण्यासाठी हातात घेतले आणि तो फिरविण्यात सुरुवात केली. पण हाय रे दुर्दैवा! त्या जादूच्या सोट्याने अलगद मागे जाण्याऐवजी माझ्या डोक्याचा वेध घेतला आणि माझ्या डोक्यावर उपग्रह निर्माण झाला. आय् मीन, डोक्यावर भलेमोठे टेंगूळ आले. झाले! संपले!!

मी मुकाट्याने कपडे घातले. मारुतीरायाला [इतर पहिलवान लोक करताहेत हे पाहून] साष्टांग दंडवत घातले. [हो. कारण तेवढाच एक माझ्या आवाक्यातला व्यायाम होता.] आणि जिमच्या बाहेर पडलो. बाहेर पडताच आतून मला मोठा हास्याचा लोट बाहेर पडला. [पहिलवानांचीच हास्यगर्जना ती!] मी मागे वळूनही न पाहता घराकडे धाव घेतली.

दुसऱ्या दिवशी प्रॅक्टिकलच्या शिक्षकांना मित्राकडून माझी चिठ्ठी पोहोचली होती.

"आज माझे अंग भयंकर ठणकत असल्यामुळे आणि सांधे दुखत असल्यामुळे मी प्रॅक्टिकलसाठी उपस्थित राहू शकत नाही. तरी कृपया याची नोंद घ्यावी."


हार्दिक शुभेच्छा!

आमच्या नव्यानेच सुरू झालेल्या

# 'हॉटेल स्मिता'ला

—: अवश्य भेट द्या :—

**प्रसन्न वातावरण, शुद्ध पदार्थ व कमी दर**

**हेच आमचे वैशिष्ट्य**

लक्ष्मी रोड, गोखले हॉलजवळ,

पुणे

# कौंतेया ! राधेया !! मृत्युंजया !!!

कु. नयना कारखानीस
तृतीय वर्ष कला

सूर्याच्या रथाचा वेग मंदावलेला असतो. त्याच्या किरणांतील दीप्ती कमी झालेली असते पण तेजस्विता तशीच असते पूर्वीसारखी. तेव्हा सूर्यपुत्रा तुझी आठवण येते. त्या तेजस्वितेचा वारसा सांगणारे तुझे जीवन आठवते. तुझ्या जीवनातील पराक्रमाचा प्रत्येक प्रसंग, प्रत्येक क्षण ह्या किरणांइतकेच तेजस्वी होते.

तू सूर्यपुत्र असून सूतपुत्र म्हणून जगलास. कुंतीपुत्र असून राधापुत्र म्हणून तुझ्या आयुष्याला अर्थ आला. राजेशाही कुरु कुलात जन्म होऊनसुद्धा सारथ्याचे जिणे तुझ्या नशिबी आले. मृत्यूंजया ! हे तुझे दुर्दैव नाही. ती तुझ्या नशिबाची आवर्तने आहेत. त्या आवर्तनातून फिरताना सुद्धा दिसणारी तुझी तेजस्विता ह्यातच तुझ्या आयुष्याचा विजय आहे.

तुझे आयुष्य म्हणजे लक्तरे नव्हती. तर एका तेजस्वी गाथेची ती विखुरलेली वैभवशाली स्मरणचिन्हे होती. गगनाला गवसणी घालण्याइतके तुझ्या पराक्रमाचे सामर्थ्य होते. तुझी वीरता, तुझा पराक्रम ह्यांचा इतिहास म्हणजेच तुझे जीवन !

तू 'दाता' आहेस. साक्षात् देवाधिराज देवाचा 'दाता' आहेस. इंद्र तुझा याचक आहे. दातृत्वाची ही भव्यता, मंगलता तू निर्माण केलीस. तुझे दातृत्व न भूतो न भविष्यति आहे. तुझ्या दातृत्वामागे तुझे त्यागी मन आहे. देवाने तुझे याचकत्व पत्करले ह्याखेरीज आयुष्यात दुसरा विजयाचा क्षण तरी कोणता ? स्वर्गाचा सम्राट तुझ्या दाराशी याचक होऊन आला हाच तुझ्या आयुष्यातील सर्वश्रेष्ठ विजय !

तुझ्या जीवनाचे नाते गंगामाईशी आहे. तिची पवित्रता तुझ्या आयुष्याला लाभली. तुझे नाते सूर्याशी ! त्याची तेजस्विता हा तुझा वारसा ! म्हणूनच हे राधेया ! तू मोठा आहेस, महान आहेस. तुझे जीवनही भव्य आहे.

तू दाता आहेस. वीर पुरुष आहेस. पराक्रमी योद्धा आहेस. यापेक्षाही तू मानव म्हणून मोठा आहेस. पराक्रमी पौरुषत्व व श्रेष्ठ दातृत्व यापलीकडे असणारे तुझे मन मोठे आहे. तुझे बंधुप्रेम, तुझे मित्रप्रेम, तुझी वचनावरील निष्ठा आणि निष्ठेसाठी त्याग हे सारेच भव्य आहे. अद्वितीय आहे. अंगदेशाच्या राजेपदापेक्षा तुझी दुर्योधनावरील उत्कट भक्ती महत्त्वाची आहे.

तुझ्या आयुष्याला एक जरीची नाजुक किनार आहे. तुझ्या बलशाली पराक्रमी आयुष्यात प्रीतीचा हळवा झंकार आहे. तुझ्या आयुष्याला जी गंधितता आली, जो सुवास आला तो 'वृषाली'- मुळेच ना ?

कौंतेया ! सत्ये विदारक असण्यापेक्षा तुला ती ज्या वेळी समजली ते प्रसंग अधिक विदारक होते. तुझ्या अपमानाचे प्रसंगही असह्य होते. भीषण सत्ये कळली म्हणूनच तुला दुर्दैवाची शिकार व्हावे लागले. भारतवर्षाच्या सार्वभौम सम्राटपदाची वस्त्रे घेण्याऐवजी घोड्याचे वेग धरावे लागले. त्या वेळीही तू स्वतःशी जपलेल्या निष्ठा अभंग राखल्यास. ही अभंगता तुझ्या आयुष्यातील जमेची बाजू नाही का ?

आयुष्य अनाकलनीय आहे, गूढ आहे. कदंब वृक्षाप्रमाणे धुंद करणारी ती कादंबरी नाही, हळुवार गीत नाही. ते एक नाटक असते. त्याचा शेवट कधीच कुणाला कळत नाही. शेवट झाल्यावर कळतं की ती शोकांतिका आहे की सुखांतिका आहे ते. आणि ह्या गूढ अनाकलनीय आयुष्यामुळेच तू जीवनाच्या रणांगणावर हरलास. नाही ! नाही ! समरांगणावर उठताना तू स्वतः हरला नाहीस. तुझे दुर्दैव फक्त अपयशाचे धनी झाले. तुझी पाठ जमिनीला टेकली नाही. यशाची माळ ऐनवेळी दुसऱ्याच्या गळ्यात पडली.

हे मृत्युंजया ! स्वर्गाची दारे ठोठावताना सुद्धा तू एक विजयी वीर होतात. तुझे आयुष्य ही विजयाची गाथा आहे. तो धुंद विजय तू स्वर्गाच्या वाटेवरही अनुभवलास. म्हणूनच तू 'मृत्युंजय' आहेस. कौंतेय, राधेय ह्यापेक्षाही तू मृत्युंजय म्हणूनच अधिक श्रेष्ठ आहेस.

हे सूर्यपुत्रा ! तुझ्या आयुष्याचा शेवट सुद्धा तुझ्या जीवनाइतकाच तेजस्वी आहे. आणि म्हणूनच सूर्याकडे पाहिले की त्याच्या ह्या मृत्युंजय वारसाची आठवण येते. आणि त्याच्या किरणा किरणावर लिहिलेली तुझी जीवनगाथा वाचण्याचा पुन्हा पुन्हा मोह होतो.

# धर्म नव्हे हा अधर्मच !

**मंगला जाधव,** बी. ए.
माजी विद्यार्थिनी

प्रचलित परिस्थितीत मानवाने विज्ञानात भरघोस प्रगती केलेली आहे. तथापी वैज्ञानिक प्रगतीच्या बरोबरच मानसिक प्रगतीचे पाऊल बरोबर पडत नसल्याचे दृश्य आपण आज पाहतो. याचे मूळ कारण धर्मात सापडते. वस्तुतः धर्म म्हणजे मानवी समाजाच्या धारणेसाठी केलेले नियम. धर्म हा मानवी जीवनाला वळण लावणारा अंकुश आहे. औदार्याचे व माणसाला माणूस म्हणून वागविण्याचे, समाजाचा तोल सांभाळण्याचे कार्य धर्म करतो. अशी धर्माची व्यापक व्याख्या आहे. तथापी जगातील विविध धर्मांनी समाजाच्या सर्वांगीण संवर्धनापेक्षा विध्वंसच अधिक केलेला दिसतो. माझा धर्म इतर धर्मापेक्षा श्रेष्ठ आहे हा अभिमान मानवाच्या ठिकाणी दृढमूल झाल्यामुळे तो इतरांना तुच्छ लेखू लागला आणि या विषम वर्तणुकीतूनच संघर्ष निर्माण झाले. अशा धार्मिक संघर्षांमुळे मानवी इतिहासात लक्षावधी मानवांची जीवितहानी झाली. आणि अब्जावधी रुपयांची मालमत्ता अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडली.

अंतःकरणशुद्धीपेक्षा बाह्य आचरणाला अधिक महत्त्व दिल्यामुळे आचाराचे अवडंबर माजले. त्यातून अंधःश्रद्धा निर्माण झाली आणि बुद्धिप्रामाण्यापेक्षा व्यक्तिप्रामाण्याला अधिक महत्त्व मिळाले. व्यक्तिविषयक अंधःश्रद्धेमुळे स्वतंत्र विचाराची प्रगती कुंठित झाली व अशा कुंठित झालेल्या मानवाच्या-मातीतून सनातनी कट्टर वृत्तीचा प्रादुर्भाव झाला. पूर्वपरंपरेपासून आजपर्यंत धर्माचा सर्वच मानवजातीच्या मनावर एक जबरदस्त पगडा बसला आहे. याचे पूर्णतः उच्चाटन करण्यास समाजसुधारकही हतबल ठरले आहेत. धर्मामुळे समाज स्थिर होऊ शकतो. परंतु आम्ही भारतीयांनी धर्माच्या नावाखाली अधर्माचेच पालन सुरू केले आहे. हा अधर्म आजच आला असे नाही तर ऋषिमुनींच्या कालापासून तो पालन केला जात आहे. ज्या श्वेतकेतूने आजची विवाहसंस्था निर्माण केली तिची पार्श्वभूमी ही अधर्माचे पालन करणाऱ्यांचीच होती. अधर्मानेच श्वेतकेतूची आई पळवली गेली आणि त्याच्या वडिलांनी—उद्दालकाने— ते उघड्या डोळ्यांनी पाहिले. आणि शेकडो वर्षे लोटल्यानंतरही दुसऱ्यांच्या बायकांची पळवापळवी आपण आजही उघड्या डोळ्यांनीच पाहतो. त्यांच्या घरांना लागलेल्या आगीचा दाह आपल्या हृदयाला जाणवत नाही आणि म्हणूनच सद्यःपरिस्थितीत आपण अधर्माचे काटेकोर पालन करीत आहोत.

धर्माच्या नावाखाली आजपर्यंत जगात अनेक पंथ, जाती, उपजाती निर्माण झाल्या आणि यांच्या परस्पर संघर्षाने मानवी इतिहासाचा मोठा भाग व्यापला आहे. एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीस केवळ जन्मावरून तुच्छ लेखणे, एका समाजाने दुसऱ्या समाजाचा स्थानपरत्वे द्वेष करणे किंबहुना एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर कुरघोडी करणे हे सर्व अधर्मी प्रकार आजही आपणास पाहावयास मिळतात. आम्ही भारतीयांनी अनेक अंधःश्रद्धा, गैरसमजुती, स्वतःचा स्वार्थ साधून दुसऱ्याचा समूळ नाश करण्याची दुष्ट प्रवृत्ती आणि अनेक अनिष्ट रूढींचे पालन अशा कितीतरी प्रवृत्ती धर्माच्या गोंडस नावाखाली एकत्रित केल्या आहेत. यामुळेच दिवसेंदिवस आपली अधोगती होत आहे, नीतिमत्ता ढासळत आहे. आपल्या मनःशांतीचा आपणच नाश करत आहोत. एखाद्या राष्ट्राने मनःशांती गमावली तर त्याचे किती भीषण परिणाम होतात हे आज आपल्याला अमेरिकेसारख्या संपन्न राष्ट्रात पाहावयास मिळतात.

महात्मा फुल्यांनी हरिजनांसाठी पहिली पाणपोई दिली, त्यांना पाण्याचा मुक्त वापर करण्याची परवानगी दिली. म्हणून नंतरच्या काळातही याचा अवलंब केला गेला असे

तुम्हांला वाटते का ? असे असते तर 'एक गाव, एक पाणवठा' ही योजनाच राबवावी लागली नसती. तुम्ही आमची आणि आम्ही तुमची घरे जाळतो, व्यवसाय बंद करतो. इतकेच नव्हे तर देशोधडीला लावतो ते अंधः-श्रद्धेने बरबटलेल्या जातीय द्वेषाच्या अधर्मांच्या नावाखालीच ! आपली पापवासना किती बलवत्तर ! हरामाच्या पैशावर पोसण्याची सवय लागलेल्या या अधर्म्यांना अनेक कोवळ्या जीवांची आहुती लागते. नरभक्षकच तुम्ही ! याची ज्वलंत उदाहरणे म्हणजे मानवतचे, नाशिकचे ते कुप्रसिद्ध लोक. धर्माच्या नावाखाली नरबळी दिले आणि पातिव्रत्याच्या पुण्यासाठी सती जाण्याची पाळी या अधर्मानेच घालून दिली होती. गैरसमजुती आणि अनिष्ट रूढींमुळे होणारी तुमची अधोगती तुम्हांला दिसत नाही. अजूनही केशवपन करून स्वर्गात जाण्याची अभिलाषा तुम्ही धरता ! अहो, चंद्रावर जाणाऱ्या माणसांसाठी निव्वळ होमहवन करणारे तुम्हीच अधर्मी ना ? शांतीसाठी काशीक्षेत्री जाऊन शेकड्यांनी भोजन करणारे आणि खाणारे तुम्हीच ना ? देवतांना प्रसन्न करून घेण्यासाठी देवदासींना अर्पण करून, त्यांना व्यभिचारी जीवन जगण्याची पाळी यावी हे अधर्मी कृत्य नव्हे काय ?

धर्म ही समाजप्रबोधनाची नांदी आहे. धर्म मानवी जीवनाच्या कल्याणासाठी राबविला पाहिजे आणि त्याकरिता हा अधर्माचा शेंदूर खरवडून टाकला पाहिजे. तरच सर्वसमावेशक धर्म होईल.

रोजच्या दैनंदिन व्यवहारातही अशी अनेक अधर्माची कृत्ये आपल्या हातून नकळतही होत असतील. त्याचा जरा विचार व्हावा आणि धर्माचे पालन करता आले नाही तरी निदान अधर्माचे पालन तरी होऊ नये.


*WITH BEST COMPLIMENTS FROM*

★ *Poona Chemical Laboratory* ★

MANUFACTURERS OF FINE CHEMICALS

&

SUPPLIERS OF LABORATORY REQUISITES

207/3, Mangalwar Peth,
Wellesly Road,
Poona 411011 ● Phone : 27761


...५

# बंधन

**सुधीर भावे**
पदवीपूर्व वाणिज्य

" तुला शंभरदा सांगितलं असताना पुन्हा तू तिथं जातोस ना ! पुन्हा एकदा जा तर त्याच्या घरी म्हणजे पाहतो ! " दादा मारकुट्या बैलाप्रमाणं आपल्या चष्म्या-तून पाहात गुरगुरले.

" पण दादा, तिथं गेलं म्हणजे काय होतं ? " भीत भीत पण धिटाईनं वसंताने प्रश्न केलाच.

" ते तुला आताच समजणार नाही. अजून तू लहान आहेस. ते आज मामलेदार झाले म्हणून त्यांची काय जात त्यांना सुटली आहे ? ते जातीनं महार, आपण ब्राह्मण; त्यांना आपण शिवायचंदेखील नसतं ! " दादांनी आपला पोशाख उतरवीत उत्तर दिलं आणि कारकुनी संपवून नुकतेच आलेले दादा थोडासा चहा घेऊन ताजेतवाने होण्यासाठी स्वयंपाकघराकडं निघून गेले.

वसंत तोंडापुढे पुस्तक धरून सोप्यातल्या झोपाळ्यावर बसला; पण पुस्तकात त्याचं लक्ष नव्हतं. त्याची मनस्थिती द्विधा झाली होती. विचारांचं वादळ त्याच्या मनात घोंघावत होतं. दादांचे शब्द त्याच्या मनी थैमान घालत होते. पिंगा घालत होते. त्याला त्या वेळी गणूचं घर आठवले. त्याच्या घरची शिस्त, त्याच्या घरातील स्वछता सारं कसं व्यवस्थित, नीट-नेटकं होतं. त्याचं घर, त्याचे ते प्रेमळ अण्णा, एक ना दोन, साऱ्या आठवणी त्याच्या डोळ्यांसमोरून जात होत्या. त्याचं इवलसं मन वेडावलं होतं, पुन्हा पुन्हा दादांच्या प्रश्नांची उत्तरं शोधण्यात त्याला परावृत्त करत होतं, डिवचत होतं.

इतक्यात गणूनं रस्त्यावरनंच त्याला हाक मारली. ' व-सं-त ! ' वसंतानं त्याला हातानीच जाण्यास सांगितलं आणि तो पुस्तक वाचण्याचं सोंग करू लागला; ते वाचता वाचता गणूच्या पाठमोऱ्या आकृतीकडं खिन्न, उदास मनानं वेड्यासारखा बघत राहिला. गणू त्याला दिसत होता पण तोंडून त्याला येण्याचं अथवा थांब म्हणून सांगण्याचं धैर्यच त्याला उरलं नव्हतं. जातीची तटबंदी दादांनी उभी केली होती. दोन निष्पाप बालकांच्या निर्हेतुक प्रेमाला, भाबड्या प्रेमाला दादांनी नापसंती का दर्शविली ?

गणूच्या घरी येणं-जाणं आई-दादांना खपत नाही हे पाहून वसंत गणूकडं चोरून जाऊ लागला. आईनं विचार-लंच तर बेमालूम खोटंही बोलू लागला. गणूला मात्र त्यानं आपल्या घरी येण्याची सक्त मनाई केली होती. पण एके दिवशी हे नाटक मात्र उघडकीला आलंच.

त्या दिवशी तो गणूच्या घरातून बाहेर पडायला आणि नेमके दादा तिकडून घराकडे यायला एकच गाठ पडली. दादांनी वसंतचा कान पकडला. वसंतचा गोरा चेहरा लाल लाल टॉमेटोसारखा झाला. त्याच्या कानाला भयंकर रग लागली होती. दादांचा राग पावलागणिक चढत होता. घरी आल्यावर त्यांनी रुद्रावतार धारण केला आणि त्यांच्या रागाच्या ज्वालामुखीचा स्फोट होऊन हातातल्या काठीने ते त्याला झोडपू लागले.

"कारट्या, चोरून जातोस होय ? हे घे ह्याचं प्रायश्चित्त" दादांनी झोडपीत उद्गार काढले.

" आई ऽ आई ऽऽ ग " वसंत ओरडला.

" आता कशाला आईला बोलावतोस ? तिलाही तू फसवलं आहेस ! " दादांनी सपासप काठ्या ओढीत आपली बाजू सावरून धरली.

" आई, आई ऽऽ ग ! "

" जाशील तिथं पुन्हा ? "

" नाही नाही ऽ आई ग आई ऽ "

इतक्यात आईनं आतून येऊन वसंतला दादांच्या तावडीतून सोडवून घेत विचारले—

" झालं काय एवढं पोराला झोडपायला ? "

" काय झालं रे वसंत ? " आईने त्याला जवळ घेत

लडिवाळपणे विचारलं. "मी किनई गणूच्या घरी गेलो होतो. त्यानंच मला बोलावलं. आजपासून जाणार नाही मी. तिथं आजच गेलो होतो. त्यांची बदली झाली म्हणून." वसंतनं रडत रडत उत्तर दिलं.

त्या दिवशी वसंत नीट जेवला नाही. दादांच्या मारानं त्याचं सर्वांग ठणकत होतं. त्याचा चेहरा फिक्का पडला होता. रात्री अंथरुणात पडून तो कण्हत होता. आईनं त्याच्या अंगाला हात लावून पहिला आणि अंग कढत लागताच तिनं दादांना उठविलं. दादा आणि आई बसंताच्या उशाशी बसले. वसंत बडबडत होता—

"तुमची बदली झाली? वाईट वाटलं! गणू तू, तुझी आई, तुझे अण्णा किती प्रेमळ आहात! नाही तर आमचे दादा! ते मला तुझ्या घरी येऊ देत नाहीत. आम्ही ब्राह्मण आणि तुम्ही महार!"

आई आणि दादा एकमेकांकडं आश्चर्याने पाहात होते. आईने वसंताच्या कपाळावर पाण्याची पट्टी ठेवली आणि वसंताला गाढ झोप लागली.

दुसऱ्या दिवशी गणू चातकाप्रमाणे वसंतची वाट पाहात होता. सगळ्या सामानाची आवराआवर झाली. ट्रकमध्ये सर्व सामान भरलं. ट्रक हलण्याची वेळ आली तरी वसंतचा पत्ता नव्हता. गणूनं अनेकदा वसंतच्या घराकडे आशाळभूत नजरेने पाहिले. पण दर वेळी निराशाच पदरी पडली. वसंतच्या घरी जावं असे अनेकदा त्याच्या मनात विचार आले, पण—!

'वाटेल ते झालं तरी तू आमच्या घरी येऊ नकोस!' हे वसंतचं वाक्य त्याला आठवलं.

ट्रक हालला. आता मात्र गणूचा धीर सुटला आणि त्याच्या डोळ्याला पाणी आलं.

वसंत आजारी स्थितीत गादीवर पडून होता. मोटारीचा पों-पों आवाज ऐकून त्याच्या पोटात कालवाकालव झाली. तोंडावर चादर ओढून घेत असताना त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या.


*For your all requirements of Scientific Equipment please contact*

**Silvia Scientific Corporation**

**Head office :** Shreenivas Alibag

**Branch :** Machalikhadak Aurangabad.

**Poona agents :**

(1) V. R. Upadhye Harisadan
95/1 Prabhat Road, Poona 4

(2) Mrs. Anjali Bapat
1542 Sadashiv peth, Poona 30



Phone : P. P. 56004

**Lalchand Jamnadas**

★

**Whole-Sale Hosiery & Towels Dealers**

★

*Distributors For*

VIP, COZY, H. H. M., NETFLEX AND NITEX HOSIERY

Super Market, Near Vasant Talkies, Poona 411 002

# आंतरजातीय विवाह

सुरेश साळी
पदवीपूर्व शास्त्र
पदवीपूर्व वाणिज्य

धोंडो केशव कर्वे यांसारखे समाज सुधारक भारतीय समाजाच्या उन्नतीसाठी जातिभेद नष्ट केले पाहिजेत असे प्रतिपादन करीत आले आहेत. समाजोन्नतीसाठी एकता आवश्यक आहे. आणि ही एकात्मता केवळ जातिभेद नष्ट केल्याने येणार आहे. स्वजातीचा वरचढपणा दाखविण्याची प्रवृत्ती जोपासणे आणि दुसऱ्या जातीबद्दल तेढ तिरस्कार दाखविणे यामुळे मानवामानवा मधे तंटे निर्माण होऊन एकात्मतेला तडा जातो आणि आत्मीयता नष्ट झाल्यामुळे समाजोन्नती होऊ शकत नाही. आज समाज सुधारकांच्या प्रयत्नांचा परिणाम दिसून येतो. आंतरजातीय विवाहाविषयीचा विरोध काही लोकांमध्ये मावळला गेला आहे. परंतु जुन्या बुरसटलेल्या धर्मकल्पनांना आणि गैरसमजुतीला धरून बसलेल्या लोकांना मात्र आंतरजातीय विवाह मान्य नाही.

जाती–जातींमध्ये अशा रोटी-बेटी व्यवहाराला पूर्वी बंदी घातली गेली होती आणि अजूनही कित्येक ठिकाणी आढळते. जुन्या धर्मकल्पनांनुसार स्वजातीय, विवाहच केला पाहिजे अशी त्यावेळी सामाजिक बंधने घातली गेली होती या चुकीच्या समजुतींवर आघात करण्यास योग्य आणि प्रभावी असे शस्त्र, म्हणजे आंतरजातीय विवाह. दोन भिन्न जाती विवाहामुळे एकत्र आल्याने या जुन्या धर्मकल्पना किंवा गैरसमजुती यांना तडा जाऊ शकेल. विवाहोत्तर काळ सुखाचा जाईलच असे ठाम मत कोणत्याही शास्त्रात नाही. त्याचप्रमाणे आंतरजातीय विवाहामुळे त्या कुटुंबात वैचारिक समन्वय साधला जाणार नाही किंवा संकटे, अडचणी, दुःख निर्माण होईलच असेही नाही. दोन भिन्न जातींचे कुटुंब सुद्धा सुखी असू शकते याची पुष्कळशी उदाहरणे आपल्याला दिसून येतात. गरीब मध्यम वर्गापासून श्रीमंतांपर्यंत अनेक कुटुंबात आंतरजातीय विवाह झालेले आहेत. आणि ती कुटुंबे सुखी झालेली आहेत. यांमध्ये विवाहानंतर होणाऱ्या मुलांच्या भविष्य काळाविषयी चिंता दिसून येत नाही. विवाहपूर्व काळात आलेली सामा जिक, धार्मिक किंवा कौटुंबिक संकटे आणि आर्थिक परिस्थिती यांच्याशी त्या दोघांनीही सामना दिलेला असतो. त्यामुळे परस्परांमध्ये स्नेहभावना, प्रेम, आपुलकी अधिकच दृढ होऊन विवाहोत्तर काळ अधिकच सुखाचा जातो. असेही म्हणता येईल.

या उलट काही वेळेस असे दिसून येते की काही मंडळी कोणा व्यक्तीचे दडपण, आर्थिक परिस्थिती यासाठी किंवा स्वजातीचा वरचढपणा मिरवण्यासाठी आंतरजातीय विवाह करतात, आणि सुधारक म्हणून प्रौढी मिरवतात. अशा वेळेस असे विवाह किंवा असे संसार कितपत यशस्वी आणि सुखी होतात याविषयी शंकाच आहे. सामाजिक उन्नती किंवा एकात्मता अशा विवाहाने साधेल असे मला तरी वाटत नाही.

आंतरजातीय विवाहावर समाजामधे काही आक्षेप घेतले जातात ते असे की, असे संसार सुखाचे होत नाहीत, संतती निकृष्ट प्रतीची होते, संकर हा भयावह आहे असे शास्त्रात सांगितले आहे. असे संसार सुखाचे होत नाहीत. या पहिल्या आक्षेपास मला असे सांगावयाचे आहे की जर हे विवाह वर सांगितल्याप्रमाणे स्वार्थभावनेने न होता तर स्नेहांकित दृष्टीने, प्रेमभाव नेने, आस्थेने झाले बर ते

विवाह किंवा ते संसार नक्की यशस्वी व सुखाचे होतील. अशा पतिपत्नींचे त्यांच्या मुलां विषयी किंवा मुलींविषयी भविष्य काळातील जीवन आणि विवाह असे प्रश्न तुरळकपणे आढळतात. किंवा नसतात असे म्हटले तरी चालले, कारण त्यांच्या आईवडलांप्रमाणे त्यांचे देखील विचार सुधारक पद्धतीचे असतील. शहरांमध्ये आणि काही सुधारलेल्या खेड्यांमध्येही असे आंतरजातीय विवाह झालेले दिसून येतात. अशा विवाहात भांडणामध्ये परस्पर जातीचा उल्लेख करून किंवा एक दुसऱ्यास कमी लेखून तंटे निर्माण झाल्याचे क्वचितच आढळेल.

दुसरा असा आक्षेप घेतला जातो की आंतरजातीय विवाहामुळे संतती निकृष्ट प्रकारची निर्माण होते. हा आक्षेप मात्र हास्यास्पद आहे कुठल्याही शास्त्रात याला आधार नाही. मानवी रक्ताचे मुळातच चार गट आहेत. त्यामध्ये आणखी दर वेळेस नवे गट उदयास येत नसतात, शिवाय रक्ताच्या गटाचा संतती उत्कृष्ट निकृष्ट असण्याशी संबंध नसतो. उलट शास्त्र असे सांगते की परस्पर विरुद्ध धर्म असणारे देह एकत्र अले की अधिक उत्कृष्ट संतती जन्म पावते. म्हणजे शास्त्र आंतरजातीय विवाहास पाठिंबाच देत आहे.

शेवटचा महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, ही जी जातीयता आहे ती मुळातच लायकीनुसार किंवा त्यांच्या पिढीजात धंद्यावरून निर्माण झालेली आहे. हा मुद्दा कितपत पटावा ? निष्कारण स्वतःजातीच्या प्रौढीच्या टिमक्या वाजवून हा महार, हा ब्राह्मण, हा मुसलमान असे भेद केले जात आहेत. फक्त ब्राह्मण लोकच जास्त हुषार आणि महार-मांग हे मंद बुद्धीचे असे मात्र नाही. मला सांगा, की डॉ. आंबेडकर हे ब्राह्मण होते का ? डॉ. झाकीर हुसेन कोण होते ? मी नुकतेच एक कुटुंब पाहिले आहे. त्याचा नामोल्लेख करणे ठीक नसले तरी एक सांगावेसे वाटते की मुलगा हा महार असून तो ऑर्किटेक्ट आहे आणि त्याची पत्नी ब्राह्मण असून ती बी. ए. आहे. त्या मुलास बुद्धी असल्याशिवाय तो आर्कीटेक्ट झाला नाही. लोकांमध्ये किंवा समाजात आंतर-जातीय विवाहाविषयक सद्भावना जागृत होऊन या नव्या विवाहास प्रेरणा मिळेल अशी इच्छा प्रकट करण्यास हरकत नाही.


**विश्व ऑइल डेपो**

तेल व निवडक किराणा
योग्य भावात मिळेल.

घरपोच माल पोचविला जाईल.

★

१३९१, शुक्रवार पेठ, बाजीराव रोड,
नातूबाग, पुणे ३०.



**ASHOK KUMAR MURLIDHAR**

♠ ♠ ♠

**Wholesale Hosiery & Towel Merchants**

♠ ♠ ♠

New 888, Budhwar Peth,
POONA 2
Phone : 25262

# मुलाखत : एका मनस्वी नाट्य-तपस्व्याची

मुकुंद संगोराम
प्रथम वर्ष वाणिज्य

या मुलाखतीचे नायक आहेत अण्णा अर्थात भालचंद्र पेंढारकर. या वर्षीच्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणूनच केवळ या मुलाखतीचे महत्त्व नाही, ही मुलाखत महाराष्ट्रात घट्ट पाय रोवून राहिलेल्या पारंपारिक रंगभूमीच्या सूत्र-धाराची मुलाखत की ज्याच्या मुखातून, व्यक्तित्वातून व कर्तृत्वातून रंगभूमीचा जिताजागता इतिहासच बोलत आहे. म्हणून या मुलाखतीचे काही आगळे आणि वेगळे महत्त्व.

ही मुलाखत अक्षरशः बालगंधर्व रंगमंदिराच्या मेक्-अप रूम मधे झाली, साडेसहाला म्हणजे साडेसहाला ते आले 'ललित कलादर्श'च्या वक्तशीरपणाचे प्रत्यंतर मला येथेही मिळाले. मी वेळ न घालवता माझ्या कामास सुरुवात केली. मी पहिला प्रश्न विचारला—

"नाट्य परिषदेकडे प्रथितयश कलावंतांचा ओढा कमी का?" ते म्हणाले,

...नाट्य परिषद म्हणजे काय ते आधी सांगतो. नाट्य व्यवसायातील विविध पातळीवर कार्य करणाऱ्या लोकांना एकमेकांच्या सोयी पाहाता याव्यात, अडचणी दूर करता याव्यात, काही विधायक योजना आखता याव्यात यासाठी आपणहून निर्माण झालेली नाट्य-व्यावसायिकांची एक संस्था म्हणजे नाट्य परिषद. याच संस्थेतर्फे दर वर्षी संमेलन भरवले जाते... "नाटक हा रोजचा व्यवसाय आहे, तेव्हा साहित्य संमेलनाप्रमाणे शे-दोनशे कलाकार नाट्य संमेलनाला उपस्थित राहणं मोठं कठीण काम आहे. प्रयो-गांच्या तारखा, ठिकाणं, वेळा हे सर्व सांभाळून परत संमेलनाला उपस्थित राहणं बहुतेकांना शक्य नसतं. संमेलनाचं फळ काय ! तर संमेलनात फक्त चर्चा होत असते आणि ती आवश्यकही आहे. आता मराठी नाट्य परिषद काय काम करते असं म्हणाल तर परिषदेचं कार्य फार भव्य आणि दिव्य प्रमाणावर चाललेलं नाही हे खरं. तरी परिषद नाट्यासंबंधी तात्त्विक भूमिकेवरून ॲकॅडॅमिक स्वरूपाचं कार्य करीत असते. तसेच पुरस्कारापासून औषधोपचारा-पर्यंत साहाय्य मिळवून देण्याच्या दृष्टीने पडद्यामागचे आव-श्यक कार्य करीत असते. नटांच्या उर्वरित आयुष्यासाठी एक फंड उभा केला जातो आहे. सेवानिवृत्त नटांच्या बाबत मात्र उदासीनताच दिसून येते. परिषदेनं स्वतः अशा नटांच्या बाबतीत विशेष काही केलेलं नाही. परिषद मदत जरूर करते. मात्र कोणत्या नटाला मदत पाहिजे हे कुणीतरी परिषदेच्या लक्षात आणून दिलं पाहिजे."

नाट्य परिषद काय करते याच बरोबर ती परिषद काय करू शकत नाही हेही अण्णांनी स्पष्टपणे सांगितलेले पाहून आपली मुलाखत योग्य दिशेनं चालली आहे याची मला खात्री झाली.

बॅक स्टेज आर्टिस्ट ( रंगमंच कर्मचारी ) बद्दल अण्णांना फार प्रेम. अध्यक्ष झाल्या झाल्या त्यांनी त्यांच्या प्रश्नाकडे सर्वांचे लक्ष वेधून घेतले आणि त्यानुसार रंगमंच कर्म-चाऱ्यांची एक संघटना स्थापली गेली. त्या संघटनेची घटना बनविण्याचे काम चालू आहे. त्याचप्रमाणे परिषदेने निर्माता संघही स्थापला आहे.... अनेक गोष्टी अण्णांशी सुरू असलेल्या गप्पातून कळून आल्या.

"नाटकं बसविण्याच्या काळात नटाच्या मान-धनाचं..."

माझा प्रश्न अर्धवटच राहिला.

—"अहो, त्या काळात त्याला दुसरं नाटक असतंच की ! आणि समजा नसलं तर त्याला सर्व खर्च देण्यात येतो आणि हा खर्च निर्मितीच्या खर्चात मुळातच धरलेला असतो. आज माझ्या पाहण्यात तरी कुठेही पगारी आर्टिस्ट नाही."

'ललितकलादर्श' ची शिस्तही दंतकथेत शोभण्याइतकी कडक आहे, त्याबद्दल अण्णांकडून जाणून घेण्याची उत्सुकता होती. त्याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले, "नाटकाची तालीम कमीत कमी सहा तास चालतेच आणि अशा तालमी साधारणपणे १॥ ते ३ महिने चालतात आणि शेवटी एखादे थिएटर बुक करून 'स्टेज रिअर्सल'चे पाच सहा प्रयोग केले जातात. म्हणजे प्रेक्षकांविना थिएटर-मध्ये नाटक केले जाते. त्याचा कलाकारांना निश्चितच फायदा होतो

– नाटके उशिरा सुरू का होतात !"

—" खरं म्हणजे नाटक उशिरा सुरू होण्याचं काहीही कारण नसतं, पण साडेनऊला नाटक म्हणजे नटसंच नऊला उपस्थित होतो, मग नाटक उशिरा सुरू होणार नाहीतर काय? ती एक वृत्तीच असते. त्याला कोण काय करणार? अहो आमच्या गौरीशंकर नाटकाचे लागोपाठ तीन प्रयोग होते. पहिला प्रयोग पाच तास चालला तो रात्री आठ वाजून दहा मिनिटांनी संपला आणि लागलीच मी पुढील प्रयोगाची बेल वाजवली. सर्व नटांना बाहेर जाऊ न देता पुढील प्रयोगात वीस मिनीटे 'कट' केली आणि ताबडतोब साडे-आठला प्रयोग सुरू केला तो चारतास चाळीस मिनीटं चालला. तिसरा प्रयोग मात्र फक्त साडेचार तास चालला."

मी हळूच संगीतरंगभूमीकडे वळलो. प्रश्न होता, "जुनी पारंपारिक संगीत रंगभूमी आणि आजची नवी संगीत रंगभूमी यांचे निश्चित नाते कोणते!"

ते थोडेसे हसले, म्हणाले, "अहो मुकुंदराज! आज संगीत रंगभूमी आहेच कुठे? फार तर तीन-चार नाटकं संगीत नाटकाच्या बॅनरखाली वावरताहेत. त्याला काय संगीत रंगभूमी म्हणायचं? लोकांना नेहमी काहीतरी नवीन लागत असतं आणि मग ती कडू गोळी गोड केल्याशिवाय त्यांना पचत नाही. संगीत नाटकांसाठी अनुकूल पार्श्वभूमी तयार व्हावी लागते. उदाहरणंच पाह्यचं झालं तर आमचं 'दुरितांचे तिमिर जाओ' हे काय संगीत नाटक आहे? 'आई तुझी आठवण येते' हे एक भावनागीत आहे त्याला नाट्यगीत म्हणणं खरोखर चुकीचं आहे, नाटकात संगीत असावं की नसावं हा जुना वाद आहे, पण नट हा पेटी तबलेवाल्यांच्या चेहऱ्या-वरील रिस्पॉन्सवर आपला अभिनय करतो, त्यांना विंगेत ठेवून कसं चालेल? आपण व्याख्यान नाही का पाहून ऐकत. डोळे मिटून व्याख्यान ऐकणं ही कल्पनाही न केलेली बरी"

"सेन्सॉर बोर्डाची आवश्यकता..."

त्यांनी माझा प्रश्न संपण्यापूर्वीच उचलला.

"काय गरज! आपल्याकडचे प्रेक्षक इतके सुबुद्ध आहेत की वेगळा सेन्सॉरबोर्ड काढण्याची गरजच काय! बरे बोर्ड काढले तरी त्यात दर्दी लोक किती? बोर्ड संहिता वाचून नाटकावर बंदी घालते हे कितपत बरोबर आहे. खरोखर जो नाटककार रंगभूमी डोळ्यासमोर ठेवून म्हणचेज सर्व घटना प्रत्यक्ष रंगमंचावर घडत आहेत असं समजून नाटक लिहितो तोच श्रेष्ठ नाटककार होऊ शकतो. अहो, ऑबसीनिटीबाबतचे (अश्लीलता वगैरेचे) कायदे हे 'केलेले' आहेत. आजच्या नाटकांना नीती आहे की नाही ते प्रेक्षक पाहील. तोच नाटकाचे बरेवाईट ठरवील.

'...पण नाटकाचा प्रयोग चालणं हे नटावरच अवलंबून असत नाही.'

'हा, जो नट बेजबाबदारपणे नाटक 'मांडतो,' ज्याच्या नकलाही पाठ नसतात त्याचं नाटक कसं चालणार...

मग प्रॉम्प्टींग असावं की नसावं...?'



श्री. भालचंद्र पेंढारकर व मुकुंद संगोराम

'अर्थातच नसावं. आम्ही तर नाटकाच्या आधी चार दिवस नाटकाचं पुस्तक बाजूला ठेवून देतो. अर्थात शेवटी नट हाही एक माणूस असतो हे लक्षात घेतले पाहिजे. एक प्रसंग सांगतो. दुरिताचे तिमिर जाओ'चा प्रयोग ऐन रंगात आला होता. मामा पेंडसे 'पंतां'चं काम करत होते आणि मी 'दिगू'ची भूमिका करत होतो. स्टेजवर माझी एन्ट्री होती, मामांना माझं नावच आठवेना, ते नुसते पहात राह्यले मागून सर्वजण 'दिगू दिगू' म्हणून ओरडत होते पण त्यांना काहीच उमजेना आणि हे पाहून माझंही चित्त विचलित झालं. मीही 'पंत' हे नाव विसरलो, क्षणभर

डोळ्यापुढं अंधारी आली, लिंकच तुटली आणि परत आम्ही एकमेकांना सावरून घेतलं. दुसरी अशीच एक घटना सांगतो, बालगंधर्व सिंधूची भूमिका करत होते, एक वाक्य होतं ... अप्पा विचारात गढून गेले आणि क्षणभरातच त्यांनी ते वाक्य सांगितलं... हां— तर ते वाक्य होते ' ती कुणाची बहीण नसते, मुलगी नसते, तर बायको असते '... क्षणभर बालगंधर्वांना उमजेचना, स्टेजवर नटवर्य लोंढे होते, त्यांनी कसंतरी करून निभावून नेलं, पण या बाबतचा अनुभव मात्र असा की लोक असं काही घडलं की चुकचुकतात, सहानुभूतीनं चुकचुकतात. पण तुम्हांला सांगतो, मी आयुष्यात प्रेक्षागृहातून ' आवा ऽऽ ज ' हा आवाज ऐकला नाही. त्या काळच्या लोकांचे आवाज असे खणखणीत की ...आणि ते आपल्या काळात हरवून गेले.

" प्रायोगिकतेबद्दलची आपली मतं काय आहेत ? " माझा आपला साधा प्रश्न.

—"आजकाल प्रायोगिकतेचाही धंदा होऊन बसलाय. मीही प्रायोगिक नाटकं पहातो, ती फारच उत्तम असतात. मला आवडतातही पण मला त्या लोकांचं एक पटत नाही की एखादं नाटक चांगलं वठलं की ते व्यावसायिकांपेक्षा मोठे होतात अन् जर ते पडलं तर मात्र ' आम्ही प्रायोगिकच आहोत' असं म्हणून गप्प बसतात, अहो, मी प्रथम पुण्याच्या पी. डी. ए.तच होतो. पण आजकालचे प्रायोगिक कलाकार आम्ही कुणीतरी वेगळे आहोत या भावनेनं वागतात मग आम्हा व्यावसायिकांनाही आमचं वेगळेपण सिद्ध करायला लागतं. पण काय आहे की प्रायोगिकतेचाही एक साचा होऊन राह्यलाय. नेहमी प्रयोग करणाऱ्याला आपण काय करतोय याची जाणीव हवी. आजकालची प्रायोगिक नाटकं मला वाटतं एकांकिकेवर आधारित असतात असं दिसून येतं, त्यांचा विस्तार ओढून ताणून आणलेला वाटतो. "

खूप वेळ गप्पा चाललेल्या होत्या गप्पांत अनेक नवे मुद्दे मिळाले, प्रश्नांचा उलगडा झाला. मुलाखतीचे औपचारिक स्वरूप नाहीसं झालं होतं. अप्पांचा राजस स्वभाव मनात भरला. एवढा मोठा माणूस. पण एका ज्युनिअर नवयुवकाबरोबर अगदी दिलखुलासपणे मोठेपणाची कृत्रिम भिंत उभी न करता तास सव्वातास गप्पा मारू शकतो हे आम्हां नवयुवकांना स्फूर्ती देणारेच आहे नाही का ?


Always shop under this sign

Fair-price shop

get RAMON BONUS STAMPS FREE

The permanent Bonus for wise shoppers.

# निसर्ग : एक कलावंत

नितिन कडोलकर
पदवीपूर्व शास्त्र

ज्याच्या भावनांच्या तारा सौंदर्याने क्षणार्धात छेडल्या जातात, रम्य अशा निनादाने ज्याच्या हृदयातील झंकार जसेच्या तसे या अवनीवर साकार होतात, मुग्ध मधुर भावनांची रंगावली जो आपल्या हृदयातून जशीच्या तशीच प्रत्यक्षात निर्मितो, तोच खरा कलावंत. सौंदर्याने वेडापिसा होणारा, साऱ्या अमृताची अधिक गोडी आपल्याला भाव-मधुर कृतीच्या रूपाने अनुभवाला देणारा, तोच खरा कलावंत. कलेच्या आराधनेसाठी त्याला खडतर तपश्चर्या करावी लागते. त्या तपश्चर्येला प्रत्यक्ष अनुभूतीच्या साक्षात्काराला फळ येते आणि मग नवससायासाने झालेलं गोंडस बाळ दाखविताना वत्सल मातेला जसा स्वर्गप्राप्तीचा तसा आनंद या कलाकारांना होतो. पण या कविराज निसर्गाने निर्माण केलेले हे रम्य काव्य, त्या काव्याची दिव्यता, भव्यता, अमरत्व, पाहिल्यावर कोण आश्चर्यचकित होणार नाही? कोणाचे मस्तक नम्र होणार नाही? या श्रेष्ठ कलावंतांनी रागदारीत आळविलेले स्वर. माणसाला मुग्ध करतात, मन आश्चर्याने दंग होते. सगळीकडे रम्यतेची बरसात. सौंदर्याने व विविध रसांनी नटलेली ही अवनी अनेक रंगांनी सजलेले हे भव्य आकाश पाहिल्यावर खरोखरीच वाटते की निसर्ग हा किती श्रेष्ठ कलावंत! त्याच्या कलेला उपमा नाही, शब्दांचे अलंकार त्याच्या अनुपम सौंदर्याचे वर्णन करायला खरोखरीच थिटे पडतात.

आपल्या कृतीत जो निरनिराळे रंग भरतो, मन मानेल तसे साऱ्यांना सजवितो. कधी कधी हळूवार मनाने, तर कधी अगदी बेदरकारपणे. उषादेवीचे वैभवपूर्ण आगमन म्हणजे एक नितांत रम्य स्वप्नच! साऱ्या गगनमंडळात सोनेरी खळखळणारा दर्या जणू फेसाळत असतो. रविराज आपल्या आगमनाची वर्दी देत येतात. सारी सृष्टी आनंदाने डोलू लागते, बोलू लागते. हर्षाने सारा आसमंत धुंद होतो. निसर्ग साऱ्यात जीवनोत्साह भरतो. रविराजाचे स्वागत करण्यास साऱ्या कळ्या हसतात. अवचित उमलतात. आपला सौरभ लुटत विलीन होतात. सगळीकडे किती विविधता आहे पहा! अनेक रंगांची नयनरम्य फुले. त्यांच्या गोडव्यात सौंदर्यात भर घालणारी फुलपाखरे इकडून तिकडे बागडतात. फळाफुलात झाडापानात, सर्वत्र विविधता व वैचित्र. कुठेच तोचतोचपणा आढळणार नाही. याचे कितीही दाखले दिले तरी थोडेच. गांभिर्याची व अनंततेची साक्ष देणारा सागर, नाचणारे, खळाळून हसणारे, बाल्य भासणारे निर्झर, जीवनदायी नदी, हिमालयाचे हिमधवल कडे, उत्तुंग गगनाला भिडणारी गिरिशिखरे या कलावंताच्या मताची समृद्धता व भव्यता पटवितात. त्या श्रेष्ठ कलावंताने पृथ्वीवरील प्रत्येक क्षणाला नाविन्याने नटविले आहे, सजविले आहे. डोंगरकड्यावरून फेसाळत कोसळणारे धबधबे मन मोहवितात. तृप्त करतात आणि आपण या जाणत्या कलावंतापुढे नतमस्तक होतो.

जीवनात विविधता व वैचित्र्य हवे म्हणून त्याने ऋतूंचा झूला केला आहे, वसंत ऋतूत आपले सारे कौशल्य पणाला लावले आहे. जिकडे तिकडे हिरव्यागार गवताची मऊ गादी पसरवतो. वृक्षांना बिलगलेल्या वेलीवर फळे फुले नाचत असतात. वृक्षराज पान अन् पान पावसात भिजून निथळल्याने सुस्नात दिसतात. सगळीकडे आनंदाचे कारंजे थुईथुई नाचत ठेवण्याचे सामर्थ्य या कलावंतात आहे.

श्रावण म्हणजे हिरव्या रंगाचे मुक्त प्रदर्शन. आषाढात जोरजोराने पाऊस कोसळू लागला की जे जे अंकुराचे गोंडस रूप लेवून वर येते. कोवळ्या अंकुरांनी तो साऱ्या

...६

पृथ्वीला नटवितो. उघड्या दगडांवरही शेवाळाची मखमल पसरवितो. पावसाळ्यात हिरव्या रंगाची वस्त्रे लेवून सारे चराचर उभे ठाकतो आणि मग खरोखरीच नजरेचे पारणे फिटते. जीवनाचा कितीही आस्वाद घेतला तरी तृप्ती वाटत नाही आणि म्हणूनच वाटते ज्यांना या जगाचा कंटाळा येतो त्यांनी या अमर कलावंताच्या कलाकृतीचा आस्वादच घेतला नाही. कारण सर्वत्र नाविन्याचा लखलखाट आहे. जग उत्पन्न होऊन इतकी वर्षे झाली पण रोज सकाळी नाविन्यच जन्माला येते. या निसर्गाच्या काव्यात अवीट गोडी आहे. गगनावर चमकणाऱ्या तारका लुकलुकतात, हसतात, विधात्याने बनविलेले हे मुलायम जरतारी वस्त्र कोणी पांघरले आहे का ?

या थोर कलावंताचा हा नभःपट पाहिला की त्याच्या पार्श्वभूमीवरील रंगसंगती देखील किती बदलते. कधी शांत निळा रंग, तर कधी त्यात श्यामलतेची झाक अधिक सकाळच्या रमणीय वेळी मांगल्याचा रंग उधळलेला तर सायंकाळच्या कातरवेळी त्यात सोनेरी कलाबूताची पखरण. या साऱ्यांचा निर्माता निसर्ग हा थोर कलावंत नाही का ?


**समर्थ गृहोपयोगी विद्युत उपकरणेच वापरा**

**एक वर्षाच्या लेखी हमीसह मिळतात**



" समर्थ " वॉटर हीटर

सुडौल बांधा

वापरण्यास सुलभ

दीर्घकाल टिकाऊ




" समर्थ " गिझर



समर्थ स्वयं जल शीतक

~ संपर्क व शोरूम ~

**हकमचंद ईश्वरदास**

४८८ बुधवार चौक, पुणे ४११००२



समर्थ सॉसपॅन किटली

ग्रॅम : समर्थ फोन : ५०२८०

# सौंदर्यवेडा ऑर्थर

कु. नीलिमा वागळे
द्वितीय वर्ष वाणिज्य

ही एक कहाणी आहे.

आटपाट नगराची ?

छे ! ही कहाणी आहे महाबळेश्वरची. महाबळेश्वराच्या जित्याजागत्या जंगलांची, डोंगरांची, त्यांच्या अजस्त्र सुळक्यांची, तिथल्या सृष्टिसौंदर्याची. ही कहाणी आहे एका सौंदर्यवेड्या राजाची अन् त्याच्या सौंदर्यवेडाची.

हा पहा तो उंचच उंच सुळका. ह्या इथंच हे डोंगर, ही झाडी, हे ढग, ही निशब्द शांतता मनाला भुलवते. गवताची जुडी खोल दरीत भिरकावून दिली तरी ऊर्ध्व दिशा गाठते ते ही इथचं.

तो राजा...

जंगलाजंगलातून हिंडताना त्याला तो सुळका दिसला होता. सृष्टीच्या त्या लोभस सौंदर्याने तो वेडा झाला होता.

त्या सुळक्यावर उभं राहून तो या निःशब्द सौंदर्याचा आस्वाद घेत होता. दरीत गवत फेकत होता. ते परत वर कसं येतं हें पहात होता.

ती खोल दरी, पलीकडचे डोंगर, हिरवीगार झाडं, निळं आकाश, मधूनच तरंगत जाणारे ढग. सारं कसं लोभसवाणं हवं हवसं वाटणारं. स्वतःपाशी असेल नसेल ते निसर्गानं इथं मुक्तपणे उधळून दिलेलं.

त्या सौंदर्यवेड्या राजाला या सौंदर्यानं भुरळ घातली. मोहून गेलेला राजा रोज रोज तिथं जात राहिला.

अन्...

एक दिवस एका अचाट आणि अफाट कल्पनेने त्याला झपाटलं. ती कल्पना त्याला स्वस्थ बसू देईना. आपण हवेत तरंगतोय...हवा आपल्या सगळ्या शरीराला गुदगुल्या करतेय...मऊ पीस होऊन आपण आकाशात गरगरतोय.

अखेर, मनाची तयारी करून त्यानं त्या दरीत उडी घेतली. गवतासारखं वर तरंगत येण्यासाठी. सौंदर्यसागरात पोहत रहाण्यासाठी.

पण...आकाशात तरंगणं नाही...मऊ पीस नाही... केवळ एक खोल खोल नेणारा प्रवास...एक आर्त किंकाळी त्या निस्तब्धतेचा भंग करणारी...

पुन्हा सारं शांत शांत.

त्या सौंदर्यात स्वतःला झोकून देऊन, राजा त्यात सामावून गेला. निळ्या अनंतात मिसळून गेला.

त्या दिवसापासून तिथलं सौंदर्य एका कहाणीचं रूप पांघरून बसलंय. जवळपासच्या जंगलात राहणाऱ्या लोकांच्या तोंडून अजूनही ही कहाणी ऐकायला मिळते.

ही कहाणी आहे महाबळेश्वरची.

तिथल्या वेड लावणाऱ्या सृष्टिसौंदर्याची.

सौंदर्यवेड्या ऑर्थर राजाची.

अन् ऑर्थरसीट नावाच्या त्या सुळक्याची.

: *Best Compliments From* :

**UMAKANT RAGHUNATH GORADE**

★ ★ ★ ★ ★

**Timber Merchant**

**Plot No. 1, New Timber Merchant**
POONA 411 002

♠ ♠ ♠

Phone No. 24595

### भारतीय आर्य स्त्रीच्या मांगल्यपूर्ण जीवनाचे प्रतीक

# श्रीमती नाथीबाई ठाकरसी

**डॉ. हेमंत इनामदार**

[ मॉडर्न महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिसंघटनेतर्फे पुणे विद्यापीठ पुरस्कृत ' स्त्री-उत्कर्ष-वर्ष-व्याख्यानमालेत पुण्याच्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. हेमंत इनामदार यांनी दिलेल्या महत्त्वाच्या व्याख्यानाचे प्रतिरूप ]



' श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ ' हे केवळ महिलांच्या उच्च शिक्षणासाठी असलेले भारतातील एकमेव विद्यापीठ आहे. कै. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी इ. स. १९१६ मध्ये या विद्यापीठाची स्थापना केली आणि कै. सर विठ्ठलदास दामोदर ठाकरसी यांनी त्या काळात त्या विद्यापीठास पंधरा लाख रुपयांची उदार देणगी दिली. केवळ चार विद्यार्थिनींसह साठ वर्षांपूर्वी या विद्यापीठाचा हिंगण्यास शुभारंभ झाला. आज मुंबईस चर्चगेट विभागातील महर्षी कर्वे मार्गावर विद्यापीठाच्या कार्यालयाची भव्य वास्तू उभी आहे. त्याच आवारात विद्यापीठाची पाच घटक महाविद्यालये असून पुण्यास महर्षी कर्वे मार्गावर तीन घटक महाविद्यालये आहेत. याशिवाय मुंबईतील उपनगरे, सांगली, बडोदा, भावनगर, वधवान इत्यादी अनेक ठिकाणी महिला विद्यापीठाची पंधराहून अधिक संलग्न महाविद्यालये आहेत. आर्ट्स्, एज्युकेशन, होमसायन्स, नर्सिंग व लायब्ररी या पाच ज्ञानशाखांतील पदवीशिक्षण व पदव्युत्तर शिक्षण देण्याची सोय विद्यापीठाने केली आहे.

' श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी ' ही मंगल नाममुद्रा या विद्यापीठास लाभली आहे. त्या दृष्टीने या पुण्यश्लोक साध्वीचे जीवनचरित्र आणि कार्यकर्तृत्व यांची माहिती करून घेणे उद्‌बोधक ठरेल. श्रीमती नाथीबाईंचे माहेरचे जीवनवृत्त, सासरी गेल्यानंतर त्यांनी व्यतीत केलेला आयुष्यक्रम, त्यांच्या जीवितातील महत्त्वाचे घटनाप्रसंग, त्यांचे धर्मजीवन आणि त्यांचा सामाजिक दृष्टिकोन यांचा परिचय येथे करून दिला आहे. मातुःश्री नाथीबाईंच्या पावन व्यक्तित्वाचे हे मंगल दर्शन वाचकांना आवडेल अशी आशा आहे.

**कौटुंबिक जीवन :**

स्त्रीच्या कुटुंबजीवनाचे दोन टप्पे दिसून येतात. तिच्या

लग्नाआधीचा, माहेरचा जीवनक्रम हा पहिला टप्पा नि लग्नानंतर सासरी तिने व्यतीत केलेले आयुष्य हा दुसरा टप्पा. या दृष्टीने नाथीबाईंच्या जीवनातील ही दोन वर्षे पाहण्यासारखी आहेत.

नाथीबाईंचे माहेर हे गुजरातेतील जामनगरजवळच्या नैऋत्य दिशेस पाऊणशे किलोमीटर अंतरावर असलेल्या 'खंभालिया' या छोट्याशा गावी होते. त्यांचे वडील धरमसी रतनसी हे तिथल्या भाटिया जमातीतले एक सत्प्रवृत्त गृहस्थ होते. ही भाटिया मंडळी वल्लभाचार्यांच्या संप्रदायातली असून त्यांना 'वैष्णव' म्हणतात. ती कृष्णाची उपासना करतात, आणि 'रणछोडजी' व 'श्रीनाथजी' या दोन रूपांतील श्रीकृष्णाचा अवतार मानतात. भाटिया लोक शुद्ध शाकाहारी असून वृत्तीने ते धर्मशील भक्तिपरायण असतात. तसेच सामाजिक चालीरीतींच्या बाबतीत ते सर्वजण अतिशय कडक व पुराणमताभिमानी असतात.

अशा धर्मशील कुटुंबात इ. स. १८४९ मध्ये नाथीबाईंचा जन्म झाला. त्यामुळे लहानपणी त्यांच्यावर ईश्वरनिष्ठेचे आणि धर्मपरायणतेचे उत्कट संस्कार झाले. भाटिया लोक मूलतः व्यापारी वृत्तीचे असतात.सावकारी,दुकानदारी, व्यापार–उद्योग हे सारे काही त्यांच्या जणू रक्तातच असते. त्यामुळे हिशेबीपणा व व्यवहारज्ञान हे गुणविशेष नाथीबाईंच्या ठिकाणी लहानपणापासून जोपासले गेले.

खंभालिया येथे धरमसींची आर्थिक स्थिती बेताचीच होती. त्यामुळे नाथीबाईंना शालेय शिक्षण मात्र पुरेसे मिळू शकले नाही. धरमसीनी एकूण परिस्थितीचा अंदाज घेतला नि इतर अनेक भाटिया मंडळींप्रमाणे ते देखील स्वतःचे नशीब काढण्यासाठी मुंबईस आले. तिथे त्यांनी उद्योगव्यवसायाच्या क्षेत्रात आपले बऱ्यापैकी बस्तान कसे बसवले, त्याची कथा ऐकण्यासारखी आहे. मुंबईस त्यांनी एका व्यापाऱ्याकडे छोटीशी नोकरी स्वीकारली. त्यांची सचोटी नि कार्यनिष्ठा पाहून शेजारचे एक दुकानदार हेमराज प्रेमजी यांनी त्यांना आपले भागीदार करून घेतले. मुंबईपासून कलकत्त्यापर्यंत धरमसींनी आपल्या या पेढीची प्रतिष्ठा वाढविली. हेमराज प्रेमजी हे स्वतः निरपत्य होते. धरमसींवर त्यांचे पुत्रवत् प्रेम होते. त्यांनी आपल्या मृत्यूपूर्वी स्वतःजवळचे दहा हजार रुपये धरमसींना बक्षीस म्हणून दिले. पण ही रक्कम धरमसींनी सार्वजनिक कामासाठी व लोकहितासाठी खर्च केली. अशा या उदारमनस्क पिताजींकडून नाथीबाईंनी कार्यकुशलता, प्रामाणिकपणा, उद्योगप्रियता आणि परोपकारी वृत्ती या गुणांचा वारसा घेतला.

तत्कालीन रीतिरिवाजाप्रमाणे नाथीबाईंचे लग्न त्यांच्या बालपणीच झाले. १८६० साली शेठ दामोदर ठाकरसी यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या, तेव्हा दामोदरांचे वय तेरा वर्षांचे होते व नाथीबाई अकरा वर्षांच्या होत्या. शेठ दामोदर ठाकरसींचे मुंबईतील घर हे एकत्र कुटुंबपद्धतीचे मोठे घर होते. शेठ दामोदर आणि त्यांचे दोघे बंधू शेठ गोविंदजी व शेठ नारायणदास हे उद्योगधंद्यात व वस्त्रनिर्मिती उद्योगाच्या व्यवसायात जसे अग्रेसर होते, तसेच अनेक सार्वजनिक कामात त्यांचा पुढाकार असे. माहेरचे उत्तम संस्कार व स्वतःचे कणखर व्यक्तित्व यांच्या आधारावर नाथीबाईंनी या संयुक्त कुटुंबाचा गाडा समर्थपणे चालवला. श्रीमती नाथीबाईंचे सासरे ठाकरसी मुळजी यांचे एकत्र कुटुंब बरेच मोठे होते. आपल्या सासूबाईंच्या निधनानंतर नाथीबाईंनाच या कुटुंबाची सारी जबाबदारी पेलावी लागली. ही जबाबदारी अवघड होती; पण माहेरी आपल्या मातापित्यांकडून मिळालेल्या संस्कारांच्या आणि सद्‌गुणांच्या बळावर नाथीबाईंनी अनेक अडचणींतून मार्ग काढला. ही वाटचाल करताना आलेल्या अनुभवांतून त्यांचे व्यक्तित्व विकसित झाले आणि त्यांना दूरदृष्टी लाभली. आपल्या यजमानांनाही नाथीबाईंनी व्यवसायांत चांगले साहाय्य केले. शेठ दामोदरांच्या व्यावसायिक यशामध्ये नाथीबाईंचा बराच मोठा वाटा आहे.

नाथीबाईंचे सुपुत्र विठ्ठलदास यांचा जन्म १८७३ मध्ये झाला. त्यानंतर २–३ वर्षांनी, म्हणजे १८७६ च्या सुमारास एक दुर्घटना घडली. धरमसींच्या आईचे, म्हणजे नाथीबाईंच्या आजीचे पहिले वर्षश्राद्ध जामनगरला व्हायचे होते. त्यासाठी नाथीबाईंचा एकुलता एक धाकटा भाऊ व त्यांचे आईवडील मुंबईहून जामनगरला गेले. तिथे ते तिघेही अकस्मात कॉलऱ्याच्या साथीत सापडले. आदल्या दिवशी त्यांचे वडील कॉलऱ्यामुळे दगावले, नि दुसऱ्या दिवशी प्रथम त्यांची आई नि तासाभराने लगेच त्यांचा भाऊ त्या साथीला बळी पडले. चोवीस तासांच्या अवधीत नाथीबाईंच्या माहेरची तिन्ही माणसे देवाघरी गेली. त्यांना त्यामुळे बसलेला धक्का फारच मोठा होता; पण त्यातूनही मनाने त्या सावरल्या. धरमसींच्या घराण्यातल्या त्या एकुलत्या एक वारस म्हणून ठरल्या, व वडिलांची चाळीस

हजारांची शिल्लक रक्कम त्यांना मिळाली. ही रक्कम हाती येताच नाथीबाईंनी लोककार्यासाठी त्या सर्व पैशांचा विनियोग करायचे ठरविले. खंभालिया या आपल्या जन्मग्रामी शेठ धरमसींची स्मृती म्हणून 'धरमवाडा' ही वास्तू त्यांनी उभी केली. त्यासाठी शेठ दामोदरदास हे तीनचार वर्षांच्या लहानग्या विठ्ठलदासास घेऊन खंभालियास जाऊन दोनतीन वर्षे राहिले; व त्यांनी धरमवाड्याचे बांधकाम जातीने लक्ष घालून पुरे केले. अतिथीगृह, ग्रंथालय व मुक्तद्वार भोजनालय अशा सोई त्यांनी तिथे करून ठेवल्या. नाथीबाईंना माहेरचा वारसा म्हणून मिळालेल्या रकमेत जरूर ती भर घालून शेठ दामोदरांनी धरमवाडा नाथीबाईंच्या इच्छेनुसार पुरा केला.

खंभालियाच्या या वास्तव्यात या दांपत्यास १८७७ मधे दुसरे पुत्ररत्न झाले. तेच विठ्ठलदासांचे धाकटे बंधू माधवजी हे होत. यानंतरची नाथीबाईंच्या आयुष्यातील १०–१२ वर्षे अतिशय आनंदात गेली. पण १८९० च्या सुमारास नाथीबाईंचे सासरे ठाकरसी मूळजी हे कालवश झाले, व त्यानंतर तीन वर्षांनी, म्हणजे १८९३ मध्ये त्यांचे यजमान शेठ दामोदर हेही दिवंगत झाले. मृत्युसमयी दामोदरांचे वय ४६ वर्षांचे होते नि नाथीबाई या तेव्हा ४४ वर्षांच्या होत्या. शेठ दामोदरांच्या अंत्ययात्रेस विविध जातीधर्मांचे पाच हजार लोक उपस्थित होते.

यजमानांच्या आकस्मिक निधनाने नाथीबाईंचे मन उदास झाले. मनाला विरंगुळा वाटावा म्हणून पुढच्याच वर्षी, म्हणजे इ. स. १८९४ मध्ये आपले चिरंजीव सर विठ्ठलदास व अन्य आप्तजन यांच्यासह त्या उत्तरेच्या तीर्थयात्रेस गेल्या. गोकुळ-वृंदावन करून सर्वजण मथुरेस गेले. नोव्हेंबर महिन्याचा तो पहिला पंधरवडा होता. यमद्वितीयेस, म्हणजे कार्तिक शुद्ध द्वितीयेच्या दिवशी त्यांनी यमुनेच्या विश्रामघाटावर कार्तिकी स्नान केले. तिथून दिल्ली, आग्रा, लाहोर व जयपूर असा प्रवास करून ते सर्वजण मुंबईस परत आले.

दुसऱ्या वर्षी म्हणजे १८८५ साली सर विठ्ठलदासांनी आपल्या मातेस दुसरी तीर्थयात्रा घडवली. प्रथम महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र श्रीपंढरपूर इथे ते गेले. तिथून गुजराथेतील सिलपूर, राजपुतान्याची राजधानी अजमेर, पुढे पुष्कराज, प्रभासपट्टण, सोमनाथ महादेव अशी लांबलांबची क्षेत्रस्थाने त्यांनी पाहिली.

१८९६–९७ मध्ये मुंबईत व महाराष्ट्रात प्लेगने कहर केला. तेव्हा दोन्ही मुलगे व थोरल्या सूनबाई यांना घेऊन नाथीबाई नर्मदातीरी चांदोद या गावी जाऊन राहिल्या. [गायकवाड सरकार व मांडव दरदार यांच्या संयुक्त अधिपत्याखाली हे चांदोद तेव्हा होते.] तिथे लीलाबाई या आजारी पडल्या. अनेक उपचार करूनही काही उपयोग झाला नाही. १८९९ मध्ये त्या मृत्युमुखी पडल्या त्याच वर्षी सर विठ्ठलदासांचा प्रेमकुंवरबाईंशी दुसरा विवाह साजरा झाला.

इथून पुढे ८-१० वर्षांचा काळ हा नाथीबाईंच्या जीवनातला स्वास्थ्याचा काळ होता. धर्मकृत्य नि समाजसेवा करीत करीत मोठ्या सुखासमाधानाने त्यांनी हा काल व्यतीत केला. मात्र १९०९ च्या आरंभी त्यांची तब्येत थोडी बिघडली. या वेळी त्या साठीच्या घरात होत्या. मुंबईच्या हवेत त्यांच्या प्रकृतीला आराम पडेना, म्हणून सर विठ्ठलदासांनी पाचगणीस थंड हवेच्या ठिकाणी त्यांना ठेवले. पण तिथेही आजार आटोक्यात येईना. वाईस विठ्ठलदासांनी पिताजींच्या स्मरणार्थ 'दामोदर आश्रम' बांधला होता. तिथे त्यांनी जुलै १९०९ मध्ये नाथीबाईंना हलवले. त्याच महिन्यात या 'दामोदर आश्रमा-' मध्येच नाथीबाईंचे देहावसान झाले.

यानंतर म्हणजे २७ जुलै रोजी मुंबईला लेडी लक्ष्मीबाई नारायण चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली नाथीबाईंच्या दुखवट्याची मोठी शोकसभा भरविण्यात आली. गुजराती हिंदू स्त्री–मंडळाच्या अध्यक्ष जमनाबाई सक्कई यांनी या प्रसंगी नाथीबाईंच्या गुणवर्णनपर हृदयस्पर्शी भाषण केले. नाथीबाईंच्या मृत्यूनंतर हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यातून सर विठ्ठलदासांना अक्षरशः हजारो सांत्वनपर पत्रे आली. त्यांचे आश्रित, मित्रगण, आप्तजन, राजेरजवाडे या सर्वांनी पत्रे धाडली. मुंबईत अनेक पेढ्या एक दिवस बंद ठेवण्यात आल्या होत्या.

सर विठ्ठलदास व शेठ माधवजी या दोन्ही सुपुत्रांनी नाथीबाईंचे श्राद्ध द्वारका या पुण्यक्षेत्री जाऊन केले. द्वारकेस या मुलांचे पुतणे पुरुषोत्तम विश्राम मावजी यांचा 'सिंधु–सदन' या नावाचा एक भव्य बंगला आहे. तिथे त्यांनी मोठे ब्राह्मण–भोजन घातले. द्वारका नि ओखामंडळ इथल्या मुलामुलींना पुस्तके व कपडे वाटले; व देवस्थानांना देणग्या

दिल्या.

आपल्या मातेच्या दानशूर वृत्तीचा प्रभाव सर विठ्ठलदासांच्या मनावर बराच होता. त्यांनी नाथीबाईंच्या स्मरणार्थ महर्षी कर्वे यांच्या भारतीय महिला विद्यापीठास पंधरा लाख रुपयांची देणगी दिली. मुंबईच्या 'वनिता-विश्राम' या शिक्षण संस्थेस एक लाख रुपये दिले नि पुण्याच्या 'सेवासदन' संस्थेस पासष्ट हजार रुपयांची देणगी दिली.

## धर्मजीवन :

नाथीबाई ठाकरसी या स्वभावाने अत्यंत धर्मपरायण होत्या. मुलांबरोबर त्यांनी दोनदा तीर्थयात्रा केल्याच, पण दैनंदिन जीवनक्रमातही त्यांनी आपली धर्मनिष्ठा जागृत ठेवली. लवकर उठून त्या प्रातःस्नान उरकत असत. नंतर प्रार्थना, कुलदैवताची पूजा नि धर्मपर वाङ्मयाचे वाचन चाले. सकाळी ९ ते ११ या वेळात 'दामोदर भवना'त येणारे साधुसंत नि भक्तजन यांना भेटावे, त्यांच्याशी धर्मचर्चा करावी व जरुरीप्रमाणे त्यांना दानधर्म करावा, असा त्यांचा क्रम असे. दुपारचे भोजन उरकल्यावर त्या थोडी विश्रांती घेत. नंतर घरी आलेल्या विद्वान पंडितांचे धर्मपर विचार ऐकावेत, जिज्ञासेने त्यांना काही प्रश्न विचारावेत व त्यांनी दिलेली उत्तरे ऐकून संतोष पावावे, असा नाथीबाईंचा परिपाठ असे.

संध्याकाळी ५ ते ७ या वेळात नाथीबाई या मुंबईतील काळबादेवी रोडवरील 'नर-नारायण मंदिरा'त थांबत असत. तिथे जमलेल्या अन्य भक्तजनांबरोबर त्या मोठ्या भक्तिभावाने रामकृष्णाची भजनेही म्हणत असत. श्रीमद्भगवद्गीतेच्या हजारो प्रती त्यांनी छापून घेतल्या आणि भाविकांना त्या फुकट वाटल्या. समग्र गीता त्यांना तोंडपाठ होती. संस्कृत विद्येबद्दल त्यांना फार आदर वाटे. म्हणूनच संस्कृत पाठशाळा, वेदशाळा नि ब्रह्मचर्याश्रम यांना त्यांनी आपल्या तीर्थयात्रेच्या वेळी भेटी दिल्या, आणि त्यांना भरघोस आर्थिक साहाय्य केले.

## सामाजिक दृष्टिकोन

नाथीबाई या अतिशय धर्मश्रद्ध असल्या तरी त्यांचा सामाजिक दृष्टिकोण प्रगत व उदार होता. प्रत्यक्ष भेटून व पत्रव्यवहार करून आपल्या भाटिया जमातीच्या महिलांबरोबरच समाजातल्या अन्य विविध थरांतल्या लहानमोठ्या स्त्रियांशीही त्यांनी स्नेहसंबंध निर्माण केले होते. वधवाड येथील डॉवेजर राणीसाहेब, सौ. रमाबाई माधवराव रानने प्रभृती अनेकजणींशी त्यांचे मित्रत्वाचे नाते होते. समाजसुधारणेवर त्यांचा दृढ विश्वास होता. लोकभ्रम नि अंधश्रद्धा यांचा त्यांना तिटकारा होता. सामाजिक चालीरीतींविषयीची त्यांची मते अतिशय प्रगत होती. विधवांनी काळे कपडेच परिधान केले पाहिजेत, किंवा घरातले माणूस देवाघरी गेल्यावर तेरा दिवस मृताला उद्देशून ऊर बडवून रडले पाहिजे, असल्या खुळ्या समजुतींवर त्या कडाडून टीका करीत; व अशा निरर्थक चालीरीती बंद झाल्या पाहिजेत, असे आग्रहाने सांगत असत.

## सर विठ्ठलदासांची मातृभक्ती :

पतिवियोगासारख्या घोर आपत्तीला न डगमगता नाथीबाईंनी आपल्या दोन्ही मुलांच्या प्रगतीकडे अहोरात्र लक्ष पुरविले. मुले शहाणी व्हावीत म्हणून त्यांना शिकविण्यासाठी मोठ्या पगाराचे युरोपिअन शिक्षक त्यांनी नेमले. सर विठ्ठलदासांना आपल्या या आदर्श मातेविषयी अपार आदर वाटत असे. रोज सकाळी उठल्यावर व रात्री निजण्यापूर्वी आपल्या माता-पित्यांना ते नियमितपणे वंदन करीत असत. एका रात्री सरसाहेबांना कामावरून घरी येण्यास उशीर झाला व गडबडीत ते तसेच झोपी गेले. रात्री एक वाजता ते खडबडून जागे झाले. आपण आज माता-पित्यांना वंदन केले नाही हे त्यांच्या ध्यानी आले, ते अस्वस्थ झाले. शेवटी ते तशा मध्यरात्री उठून खाली गेले व जन्मदात्यांना वंदन करून परत येऊन झोपले.

आपली सारी प्रगती मातृकृपेमुळेच झाली, अशी सर विठ्ठलदासांची श्रद्धा होती; म्हणूनच महर्षी कर्वे यांच्या अखिल भारतवर्षीय महिला विद्यापीठास त्यांनी मातेच्या नावाने पंधरा लाखांची भरघोस देणगी दिली. त्यानंतर त्या विद्यापीठास "श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ" ही नाममुद्रा लाभली. त्यामुळे सर विठ्ठलदासांच्या मातृप्रेमाच्या महन्मंगल स्तोत्राची जणू सांगताच झाली. 'मातृदेवो भव!', हे वचन साकार झाले नि श्रीमती नाथीबाई ठाकरसी यांचे हे भव्य स्मारक 'एस्. एन्. डी.टी. महिला विद्यापीठा'च्या रूपाने उभे राहिले.





PRATIBHA 7518MAR

# वैभवाचा संकेत

अध्ययनामागे उद्दिष्टे ही असतातच.
जिज्ञासा हा त्याचा मूलाधार. परिश्रम आणि सातत्य ही कार्यप्रणालि ..प्रगतिसाठी अतिशय उपयुक्त ठरणारी...
जीवन समृद्ध होऊ शकते ते केवळ याच मार्गाने...
अपेक्षापूर्ति होत राहिल्यामुळे!

किर्लोस्कर उत्पादनेदेखील त्यांच्यापासून केल्या जाणाऱ्या अपेक्षा सर्वार्थाने पूर्ण करतात. अविरत कठोर परिश्रम आणि दीर्घकालीन संशोधन यांचे सुमधुर फळ म्हणजे विविध, विश्वासपात्र किर्लोस्कर उत्पादने... शेती आणि औद्योगिक विकास या दोन्ही आघाड्यांवर अनमोल कामगिरी बजावणारी...

याच दृष्टिकोनातून विचार केला तर तुमच्याकडूनसुद्धा आम्ही पुष्कळ गोष्टी शिकतो, सर्वांगिण उन्नतिसाठी आम्ही अंगिकारलेल्या व्रताचा आणि त्यासाठी आरंभिलेल्या तपश्चर्येचा तो एक महत्वाचा भाग आहे असेच आम्ही मानतो.

Kirloskar®

**किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड**

१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर पथ,
खडकी, पुणे-४११००३

® Registered User — Kirloskar Oil Engines Ltd. Poona-411 003.

# हिरे हरपले.... !

दिलीप इनामदार
पदवीपूर्व शास्त्र

१९७५. उल्कापाताचे वर्ष. या वर्षात संगीत गगनातील एक एक तारे अकस्मात निखळून पडले आणि अलंकारिक अर्थाने नव्हे, तर खरोखरीच्या अर्थाने संगीत क्षेत्रात एक पोकळी निर्माण झाली. 'मदनमोहन' संगीत देणारे मदनमोहन, स्वरांना शब्दांच्याही पलीकडे घेऊन जाणारे सचिनदा, स्वरांच्या बनात वसंताची बहार उडवून देणारे वसंत देसाई, आणि अभिजात भारतीय संगीताची लय ज्यांनी चार पिढ्या संभाळली ते लयीची जान असणारे अहमदजान थिरकवाँ, असे एकामागून एक मातब्बर मोहरे आम्हा सर्व रसिकांना चटका लावून गेले आहेत. आता त्यांच्या आठवणी ध्वनिमुद्रिकांतून पुनःपुनः आळविणे हेच आता आपल्या हाती राहिले आहे.

## मदनमोहन

मदनमोहन यांच्या बाबतीत बोलायचं झाल्यास महफिल संपायच्या आधीच 'यह सितार सूनी हो गयी'. त्यांच्या मृत्यूची वार्ता ऐकली आणि वेळोवेळी ऐकलेल्या त्यांच्या रेकॉर्डस् कानात गुणगुणू लागल्या. 'वो भूली दास्ताँ लो फिर याद आगयी', 'फिर वही शाम फिर वही गम वही तन्हाई है', 'नयना बरसे रिमझिम रिमझिम' या आणि अशा अनेक गीतांत स्वर आणि शब्दांचे जे एक अतूट नातं जमलेलं आहे त्याला तोड नाही. तलतच्या भिजलेल्या आवाजातलं ते गाणं ऐकलं की कारुण्यानं थबथबलेली संध्याकाळ तुमच्या आजूबाजूला उभी राहील, एक अनोळखी हुरहुर तुम्हांला वेढून टाकील. मला वाटतं मदनमोहनच्या संगीताची ताकद या करुणरम्यतेत होती. त्यांचे दुसरे वैशिष्टय म्हणजे त्यांनी गायक कलाकारांच्या



मदनमोहन

आवाजाची जात ओळखून त्यांचा अगदी बरोबर उपयोग करून घेतला. 'बैया ना धरो बलमा' ही लतानं म्हटलेली 'तबकडी' ऐकून पाहावी. लताच्या आवाजाचा असा सुंदर उपयोग मदनमोहनजींनीच करावा. सुरांची अचूक जाण असलेल्या या संगीतकाराने एकाहून एक सरस सुंदर आणि शेवटपर्यंत मनात रेंगाळत राहणाऱ्या किती तरी चाली रसिकांना दिल्या. त्यांची एक 'चाल' चुकली— स्वतःच्या जीवनाची चाल ! कुठल्या तरी क्षणिक दुःखाला विसरण्यासाठी त्यांना मदिरेच्या आहारी जावे लागले आणि येथेच त्यांची सम चुकली, ताल बिघडला, आणि तोल गेला...!! त्याच गर्तेत ते खोल बुडूनं गेले.. !

## सचिनदेव बर्मन

मदनमोहननंतर सचिनदा. गेल्या तीनही पिढ्यांत आमचा सचिनदा खडकासारखा स्थिर होता. या काळात सिनेसंगीत— रसिकांवर त्यानं जणू भुरळ घातली होती. उसळतं आणि सदोदित तारुण्यानं मुसमुसलेलं संगीत देणारा सचिनदा अजूनही तसेच संगीत देत होता. खरोखर तो चिरतरुण होता, जीवनातही अन् संगीतातही !

त्रिपुराच्या राजघराण्यात जन्मलेला हा राजपुत्र शिक्षणा-



सचिनदा

पेक्षा संगीतातच जास्त रमला, त्याच दुनियेत हरवून गेला. बर्मनदाच्या संगीताचा गाभा लोकसंगीताचा होता. पण म्हणून कुठल्याही प्रसंगाला लोकसंगीतच असा प्रकार त्यांनी केला नाही. पार्श्वसंगीताच्या क्षेत्रातही त्यानं बरीच मोठी कामगिरी केलीय. कुठलाही प्रसंग सुरीला बनवून टाकण्याचं सामर्थ्य त्याच्याकडे होतं. उदाहरणच द्यायचं झालं तर 'सुजाता'चं टायटल म्युझिक आज अनेकजण आपल्या ओठांवर शीळ बनवून रेंगाळवताहेत. लोकांना सचिनदाचं बॅकग्राऊंड म्युझिकसुद्धा पाठ व्हायचं. एकवेळ पिक्चर पडेल पण बर्मनदाची गाणी मात्र अजरामर होऊन राहणार. हीच तर त्याची करामत !

त्याचं 'ओरे माझी, ओरे माझी, मेरे साजन है उस पार' ऐकलं की खरोखर आपण एका शांत आणि धीर-गंभीर सागरतीरी उभे आहोत आणि सूर्योदय होतो आहे असा प्रत्यय येतो. 'वहाँ कौन है तेरा' मधली त्याची आर्तता कोणी तरी विसरू शकेल काय ? त्याने ऑर्केस्ट्राच्या गोंधळाला आपल्या संगीताचा बळी कधीच दिला नाही. उपजत कलागुण, कलाप्रेम आणि या दोन्हीच्या जोडीला अपार परिश्रम यांनीच त्याच्या श्रमाचं चीज केलं. लोकसंगीत, वडिलांकडून सतारीचे धडे आणि कुण्या उस्तादाकडून शास्त्रीय संगीताचं शिक्षण एवढ्यावर त्याचा संगीताचा पिंड पोसला गेला होता. पाश्चिमात्य धुनांवरही त्यानं केलेली गीतं तेवढीच लोकप्रिय झालीयत (एक लडकी भिगी भागीसी) याचं कारण एकच. जे जे चांगलं दिसेन ते ते घेणं, पचवणं आणि आत्मसात करून ते लोकांपुढं मांडणं. नुसती 'कॉपी' त्याच्या संगीतात आढळणार नाही.

त्याला कुणाशीच तडजोड करावी लागली नाही. 'पब्लिक डिमांड'ला तो बळी पडला नाही. तर पब्लिकला त्याच्या संगीताशी जुळवून घ्यावं लागलं. यातच त्याच्या संगीताच्या यशाचं रहस्य दडलेलं आहे. 'है अपना दिल तो आवारा' 'आजा पंछी अकेला है' 'जलते है जिसके लिए' 'खोया खोया चाँद', 'आज फिर जीने की तमन्ना है'... किती... कितीतरी गीतं गर्दी करताहेत ! फक्त त्याचा सुरावर जगायचं. खरोखर एस्. डी. गेला आणि,

'इक सुंदर सपना बीत गया।'

## वसंत देसाई

भर मैफिलीत तार तुटावी अन् सर्व मैफलीच्या रंगाचा बेरंग होऊन जावा, तसं काहीसं वसंतराव देसाईंच्या बाबत झालं. खरोखर चाळीस वर्षे सिनेसंगीत-क्षेत्रात वसंत फुलवीत ठेवणारे वसंत देसाई आपल्यात नाहीत हे मनाला पटवून घ्यायला अजूनही बराच काळ लागतो.

वसंतरावांच्या रचनांचं वैशिष्ट्य म्हणजे भारतीय संगीताचा कलात्मक वापर, त्यांना लाभलेली अभिजात संगीताची झालर, व सुरांचा कसदारपणा. या सर्वांमुळे त्यांच्या संगीताला एक वेगळंच व्यक्तित्व प्राप्त झालं आहे. त्यांची भूपाळी अमर तितकीच शहनाईची गुँजही अमर ! 'झनक झनक...'मधील एकेक 'मास्टर पीसेस'याची आठवण करून देतात. त्यानंतर 'दो आँखे बारह हाथ' 'गूँज उठी शहनाई' आणि आत्ता 'गुड्डी'. एवढं असलं तरी त्यांना व्यावसायिक यश लाभलं नाही हे दुर्दैव आहे; आपलं रसिकांचं अन् भारतीय सिने-संगीत व्यवसायाचं.

आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, त्यांचं हिंदी चित्रपटांतलं संगीत आणि मराठी चित्रपटांतील संगीत यात वेगळं



वसंत देसाई

व्यक्तित्व दिसून येते. यातच त्यांचं मर्म आहे. हिंदी गीतांतल्या हिंदीशी त्यांचं नातं झटकन् जुळलं होतं आणि इकडे मराठी संगीतातही अस्सल 'मऱ्हाटी' धाटणीची गीतं त्यांनी स्वरबद्ध केली. त्यामुळेच 'सैय्या झुटोका बडा सरताज निकला' 'नैनसे नैन नाही मिलाओ' 'तेरे सूर और मेरे गीत' आणि 'बोलरे पपीहरा' यांसारखी अगदी शुद्ध हिंदी धाटणीच्या रचना त्यांना जमल्या, त्याचबरोबर 'आई म्हणोनी कोणी', 'एक आस-मज एक विसावा', 'हेच ते हेच ते हेच ते चरण अनंताचे' यांसारखी अस्सल मऱ्हाटी थाटाची गीतेही ते देऊ शकले.

मराठी आणि हिंदी चित्रपटांच्या दृष्टीने एक चांगला योगायोग घडून आला तो म्हणजे वसंत देसाईना आरंभा-पासूनच चित्रमहर्षी व्ही. शांताराम यांच्या संगतीचा लाभ झाला. मी स्वतः धर्मात्मा चित्रपटामध्ये 'लई थोर उपकार ? आम्हांवर नाथा तुम्ही केले' म्हणताना त्यांना पाहिले आहे.

त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे दोन हजार मुलांना एकत्र घेऊन त्यांच्याकडून समूहगीत गाऊन घेणे. हे काम किती अवघड आहे हे प्रत्यक्ष त्यात पडल्याशिवाय कळणार नाही. (वर्गात तीस मुलांचे 'वंदे मातरम्' नीट होत नाही !) वसंतरावांनी संगीताला शैक्षणिक मूल्य प्राप्त करून दिले.

वसंत देसाईची गीते अजून कितीतरी वर्षे सिनेमातून, रेडिओतून ऐकायला मिळावीत. टी. व्ही. वर त्यांना पाहा-वयाला मिळावे असे वाटत राहणारच ! सारखे मनात येते मृत्यूला त्यांना इतक्या लवकर 'लिफ्ट' देण्याची काय गरज होती ? असल्या रसराज व्यक्तित्वाला असले अपघाती मरण यावे ! आपल्या अमीर खां साहेबांचे असेच झाले. काळपुरुषाने वापरलेल्या या पद्धतीचाही राग आल्या-शिवाय राहात नाही. पण 'तेथे कोणाचे चालेना !'

## अहमदजान थिरकवाँ

लयसम्राट थिरकवाँ हे काही आमच्या पीढीतले नव्हेत पण आमचे भाग्य थोर म्हणूनच परवा परवापर्यंत त्यांचे दर्शन आम्हांला घडू शकत होते. ९२ व्या वर्षी सवाई गंधर्व पुण्यतिथीमध्ये त्यांचे तबला वादन प्रत्यक्ष ऐकले—




अहमदजान थिरकवाँ

मूर्ती स्थिर, फक्त बोटेच तबल्यावर नर्तन करीत असलेली. तबला सुरू होण्याआधीची त्यांची थापही 'एक्स्ट्रॉ स्पेशलच'. त्यांची चाटही जलतरंगाचे माधुर्य घेऊनच प्रकट व्हायची. त्यांचा डग्गा अक्षरशः बोलत असे. नंतर टी. व्ही. वर कितीतरी वेळा हे तबलावादन जवळून निरखण्याचे भाग्य लाभलं आणि मग मिळेल तिथून त्यांच्याबद्दल माहिती घेतल्याशिवाय राहवेना.

महाराष्ट्रातल्या नाट्येतिहासातील बालगंधर्व युगात थिरकवाँनी उभ्या महाराष्ट्राला आपल्या तबला वादनाने मोहित करून टाकले होते. स्वतंत्र तबलावादनाचे कार्यक्रम लोकप्रिय जे झाले ते थिरकवाँ यांच्यामुळेच.

थिरकवाँ हे मुनीरखाँचे शिष्य. त्यांच्या तबलावादनाचे वैशिष्ट्य म्हणजे तबल्यातील निरनिराळे बाज ( दिल्ली, आजराडा, पूरब वगैरे ) ते तेवढ्याच सबलतेने वाजवीत. अशी व्यक्ती विरळाच ! स्वभावानं स्वाभिमानी. वागण्यात लाचारीचा अंशही नाही. थिरकवाँ म्हणजे एक लयकार व्यक्तित्व ! चतुरलाल, प्रेमवल्लभ, गुलामहुसेन हे त्यांचे जुने शिष्य. पुण्यातील लालजी गोखले त्यांचेच शिष्य होत.

प्रत्येकाला जग सोडावेच लागते, पण कर्तृत्ववान माणसे सदैव हवीहवीशीच वाटत असतात. थिरकवाँ ९७ व्या वर्षी गेले हे आश्चर्यकारक नाही, परंतु यासम दुसरा होणे नाही याचे दुःख त्याहून अधिक तीव्र आहे. आणि हे दुःख इतर तीनही संगीतकारांच्या बाबतही असेच जाणवत राहणार नाही का ?


# SHAIL SCIENTIFIC

## Instruments Co.,

Venu Apartments, Block No. 6, Ground floor,
B. J. Deorukhakar Rd., Kesar Baug, Naigaum, Dadar, BOMBAY-400 014.

♠ ♠ ♠

*Suppliers of :*

**(1) Imported Instruments. (3) Chemicals Imp. Indian.**
**(2) Indeginous Instruments. (4) Glass Wares.**

**to**

COLLEGES & INDUSTRIES

# दलित समाज : एक परिसंवाद

**दिनांक २९ जानेवारी १९७६ रोजी मॉडर्न महाविद्यालयातील 'मॉडर्न मित्र मंडळा' चे उद्‌घाटन कुलगुरु प्रा. देवदत्त दाभोळकर यांच्या शुभहस्ते झाले. या प्रसंगी 'दलित समाज' या विषयावर एक परिसंवाद आयोजित करण्यात आला. परिसंवादात सात दलित विद्यार्थ्यांनी आपले निबंध वाचले. त्या निबंधांत मांडले गेलेले विचार संक्षिप्त रूपात संकलन करून येथे देत आहोत.**

## मराठी साहित्यातील दलित जीवनाचे चित्रण

मराठी साहित्यातील दलित जीवनाचे चित्रण पहावयाचे असेल तर आपल्याला संत वाङ्मयापासून सुरवात करावी लागेल. संतांनी दलितांच्याविषयी कनवाळूपणा दाखविलेला आढळतो संत परंपरेत कनिष्ठ जातीचे संतही होते. चोखामेळा, सावता माळी, सेना न्हावी इत्यादींनी विषमतेबद्दल काव्यरचना केली आहे.

आधुनिक काळात गांधीवादाच्या परिणामामुळे अस्पृश्योद्धाराचा विचार आला. गांधीजींच्या शिकवणीमुळे प्रभावित झालेले जे लेखक होते. त्यांनी अस्पृश्यांवर लिहिले आहे. ललित साहित्याच्या दृष्टीने पाहता श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या 'शामसुंदर' या कादंबरीचा उल्लेख प्रथम करावा लागेल. त्यानंतर दलितांच्या जीवनाचे चित्रण असलेल्या कलाकृती बऱ्याच प्रमाणावर आल्या. त्यातील ठळक उदाहरणे म्हणजे ना. सी. फडके यांची 'माझा धर्म', ग. त्र्यं. माडखोलकरांची 'चंदनवाडी', वि. स. खांडेकरांची 'दोन मने' अशा कादंबऱ्या किंवा गोखल्यांचे 'महाराचे पोर' हे नाटक. रेव्हरंड टिळक यांची 'ब्राह्मण व महार' ही या सारख्या कवितांचा समावेशही दलित जीवनाचे चित्रण करणाऱ्या आधुनिक साहित्यात केला पाहिजे. अगदी परवा परवा जयवंत दळवी यांची 'चक्र' आणि मधु मंगेश कर्णिक यांची 'माहीमची खाडी' या कादंबऱ्या आल्या. झोपडपट्टीत राहणाऱ्या उपेक्षितांचे जीवन यात चितारलेले आहे.

या सर्व साहित्यात दलितांचे चित्रण जे झालेले आहे ते केवळ सहानुभूतीच्या दृष्टिकोणातूनच. या कृतींमध्ये वास्तवतेचा अभाव दिसून येतो. कलात्मकतेच्या किंवा वाङ्मयीन मूल्यांच्या दृष्टीने या कलाकृती कितीही यशस्वी वाटल्या तरी जीवन-दर्शन घडविण्याच्या दृष्टीने त्या फसव्याच आहेत. मात्र श्री. म. माटे हे 'उपेक्षितांचे अंतरंग' या त्यांच्या पुस्तकात व विभावरी शिरूरकर त्यांच्या 'बळी' या कादंबरीत दलितांचे जीवनदर्शन घडविण्यात यशस्वी झालेले साहित्यिक आहेत असे म्हणावे लागते.

या उलट दलितांमधून जे लेखक पुढे आले आहेत त्यांच्यात शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे या सारख्यांचा प्रामुख्याने उल्लेख होतो. दलितसाहित्याने जेव्हा जोर धरला तेव्हापासून बाबूराव बागूल, नारायण सुर्वे नामदेव ढसाळ इत्यादी लेखक व कवी दलितांचे वास्तव चित्रण करण्यात फारच यशस्वी झालेले आहेत. कदाचित यातील काही लेखक तंत्रदृष्ट्या व कलात्मक दृष्ट्या तितकेसे यशस्वी झालेले नसतीलही परंतु वास्तवतेच्या दृष्टीने पाहता त्यांच्या साहित्यात जिवंतपणा व अस्सलपणा आढळतो.

**गंगाधर गायकवाड**
पदवीपूर्व कला

## दलित स्त्री

१९७५ साल हे आंतरराष्ट्रीय महिलावर्ष म्हणून साजरे करण्यात आले. या वर्षात स्त्रीमुक्तीच्या बऱ्याच गप्पा मारण्यात आल्या. परंतु या सर्वांच्या समोरील स्त्री उच्चवर्णीय शहरी स्त्री होती. या आंदोलनात भाग घेणाऱ्या स्त्रिया उच्चवर्णीय होत्या. त्यामुळे बहुधा आंतरराष्ट्रीय महिला वर्षात त्यांनी दलित स्त्रियांचा विचार केला नसावा.

दलित जातीची समस्या अलीकडच्या काळात मांडण्यात आली आहे. मुक्तीचे प्रयत्नही सुरू झाले आहेत. परंतु ज्यांनी हे प्रयत्न केले त्यांच्यातील उच्चवर्णीयांनी किंवा दलित नेत्यांनी दलित स्त्रियांच्या मुक्तीचा प्रश्न केव्हांच विचारात घेतलेला नाही. दलित स्त्री ही दलित पुरुषांपेक्षाही दलित आहे. एकूण आठ कोटी दलित जनता आहे त्यातील निम्मी लोकसंख्या निश्चितच स्त्रियांची असणार. म्हणून त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

या स्त्रीच्या समस्येत मुख्य समस्या आहे शिक्षणाची. शिक्षणात दलित स्त्री फारच मागासलेली आहे. आर्थिक दृष्ट्या विचार करता असे दिसून येते की तिला आर्थिक स्वातंत्र्य मिळत नाही. अशिक्षित कामगार स्त्रियांची अवस्था तर अतिशय केविलवाणी असते. टीचभर पोटासाठी काबाडकष्ट करून दुसऱ्याच्या शेतावर राबणारी दलित स्त्री जेव्हा डोळ्यासमोर उभी राहते तेव्हा असा प्रश्न उभा राहतो की आजपर्यंत तिच्या रोजगारीचा कुणी विचार केला आहे काय? खेड्यांतील शेतमजूर असलेल्या, गरिबीत पिडलेल्या, कष्ट व हालअपेष्टा सोसणाऱ्या दलित स्त्रीला काडीमोड, सोडचिठ्ठी अशा सारख्या क्रूर सामाजिक प्रसंगांनाही तोंड द्यावे लागते. त्याचप्रमाणे उच्चवर्णीयांकडून होणाऱ्या अत्याचारांनाही तोंड द्यावे लागते. खेड्यामध्ये राहणारे उच्चवर्णीय लोक या दुष्ट कृत्यात पुढे आहेत असे नेहमी येणाऱ्या बातम्या सांगतात. स्त्रीला स्त्री म्हणून हवी असलेली सुरक्षितता दलित स्त्रीला मिळत नाही. याशिवाय बऱ्याच दलित स्त्रियांची आणखीही दलित स्थिती तेव्हा होते जेव्हा त्यांच्याकडील एकमेव भांडवलाचा त्यांना पोटासाठी उपयोग करावा लागतो.

**लता कांबळे**
द्वितीय वर्ष कला

## सत्यशोधक चळवळ व दलित

सत्यशोधक चळवळीचा प्रारंभ महात्मा ज्योतिबा फुले यांनी १८५२ मध्ये केला. सामाजिक समतेचा महान विचार अत्यंत उग्रपणे महाराष्ट्रीय समाजात मांडला. दलित जातीकरिता अनमोल कामगिरी ज्योतिबांनी केली. अस्पृश्यतेचा कलंक धुऊन काढून सर्व हिंदू समाजामध्ये सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. १८५२ मध्ये अस्पृश्यांच्या मुलांसाठी पुण्यात शाळा काढली. १८६८ साली आपल्या घरातील पाण्याचा हौद त्यांनी अस्पृश्य बांधवांसाठी खुला केला. १८५२ ते १८९० या काळात सत्यशोधक चळवळीमध्ये महात्मा फुले यांची प्रेरणा धगधगत होती.

महात्मा फुलेंच्या नंतर छत्रपती शाहू महाराजांनी ज्योतिबांच्या विचाराची ज्योत पुढे नेली. त्यांनी १९११ मध्ये कोल्हापूर येथे सत्यशोधक समाज स्थापन केला. त्यांनी अस्पृश्यांना आपल्या दरबारी नोकऱ्या दिल्या; सार्वजनिक पाठवड्यावर त्यांना पाणी भरण्यास परवानगी दिली. पुढे अस्पृश्य बांधवांपैकी एकास एक हॉटेल काढून दिले. बाबासाहेब आंबेडकरांना मदत केली. १९२० पर्यंत सत्यशोधक चळवळ टिकून राहिली. परंतु १९२० नंतर ज्योतिबा फुल्यांची मानवी समतेची भूमिका नष्ट होऊ लागली. समता हे विशाल साध्य बाजूला पडले. सत्ताप्राप्ती हे साधन साध्य झाले. मराठा जातीचा पुढाकार या चळवळीत होता. त्यांना त्याचा पुढे योग्य तो फायदा मिळाला. परंतु अस्पृश्यांच्याकडे दुर्लक्ष झाले. या 'ब्राह्मणेतर' चळवळीला फुल्यांचे क्रांतिकारक विचार पेलले नाहीत.

आजही आपण पाहात आहोत की ज्यांच्या पूर्वजांनी ही सत्यशोधक चळवळ केली त्यांचे आजचे वारसदार दलितांवर अत्याचार करीत आहेत. आज महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांत दलित जातीच्या लोकांवर, स्त्रियांमुलांच्यावर जे अत्याचार होत असल्याच्या बातम्या आपण वाचतो त्यामागे सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीचे वारसदार आहेत. नव्हे, उच्चवर्णीय ब्राह्मणेतर आहेत हे वेगळे सांगण्याची गरज असू नये.

**ज्ञानोबा भोंडे**
तृतीय वर्ष कला

## दलित : खेड्यातील आणि शहरातील

उच्चवर्णीयांनी अलिकडे एक नवीनच पवित्रा घेतलेला दिसतो. ते म्हणतात अस्पृश्यता ही गोष्ट लाजिरवाणी आहे खरी. पण कुठं आहे अस्पृश्यता ? कोण पाळतं जातपात ? अस्पृश्यांचा प्रश्न राहिला आहेच कुठं ? शिक्षण, शहरीकरण, रेल्वे व सामाजिक संस्थांचे कार्य ह्यामुळे अस्पृश्यता नष्ट पावत चालली आहे. परंतु हा एक भ्रम आहे किंवा मुद्दाम घेतलेला पवित्रा आहे, असंच म्हणावं लागेल. कारण हे शहरी, मध्यमवर्गीय, पांढरपेशे लोक आपली दृष्टी शहराबाहेर पोहचू देत नाहीत.

शहर व खेडे यात फार अंतर आहे, फरक आहे. शहरातील लोक एकत्र येतात, मिसळतात परंतु त्यांच्या मनातली जातीयतेची भावना अजून गेलेली नाही. शहरातील लोक मुखवटे खूप छान धारण करतात. परंतु प्रत्यक्षात वागतात मात्र वेगळे. आम्ही अस्पृश्यता पाळत नाही असे वरून दाखवितात. याउलट खेड्यातील लोक मुखवटे धारण न करता सरळ सरळ अस्पृश्यता मानतात. तेथे दलितांची घरे गावाबाहेर पूर्व व उत्तर दिशेला असतात. दलितांच्या घरांच्या बाजूलाच स्मशानभूमी असते. सार्वजनिक समारंभात त्यांना काहीही मान नसतो. त्यांना वेगळेज बसवितात. जेवणाच्या पंगतीत त्यांना स्थान नसते. म्हाराच्या हातचे अन्न यांना चालत नाही पण दारू मात्र चालते. खेड्यात अजूनही दलितांना मंदिरप्रवेश दिला जात नाही. मात्र बेवारशी कुत्रं आत जाऊन पणतीमधील तेल पिऊन थांबत नाही तर त्या देवावर तंगडी वर करायला घाबरत नाही. अशा कुत्र्याला तिथे प्रवेश दिला जातो पण दलितांना मात्र नकार. ही नीचपणाची गोष्ट आहे. त्यामुळेच दलितांच्या मनात देवाविषयी द्वेष निर्माण होत आहे.

म्हणून प्रत्यक्ष खेड्यात जाऊन काय परिस्थिती आहे हे उघड्या डोळ्यांनी बघायला पाहिजे. तेथे कार्य करायला पाहिजे. शहरीकरण अथवा औद्योगिकरण या गोष्टी तुटपुंज्या आहेत. माणसाच्या मनात क्रांती व्हायला हवी आहे. मनं एकत्र आली तर निश्चितच अस्पृश्यता जाईल. मानवतेला लागलेला हा कलंक धुतला जाईल.

**रवींद्र खरात**
पदवीपूर्व वाणिज्य

## दलित समस्येतील दलितांची जबाबदारी

आज भारतीय समाजात मागासवर्गीयांच्यावर उच्च, वर्णीय अत्याचार करीत आहेत. त्यांना आर्थिक, शैक्षणिक-सांस्कृतिक अशा कोणत्याच प्रगारच्या विकासास वाव मिळत नाही. या सर्व गोष्टींचा विचार करून असे वाटते की, मागास जातींनीच आपण आपली उन्नती करून घेण्यासाठी पुढे आले पाहिजे. त्यात परत हा पुढे चालला, त्याला खाली ओढा हा प्रकार होता कामा नये. दुसऱ्याचे पाय मागे ओढण्याची प्रवृत्ती काढून टाकली नाही तर कोणाचीच उन्नती होणार नाही. या उन्नतीसाठी जर आपणास उच्चवर्णीयांची जरूर लागली तर अवश्य घ्यावी. ते आपणास मदत करतीलच. शिवाय काही गोष्टी जवळिकीनी सांगतील. दलितांनीच उच्चवर्णीयांच्यात मिसळले पाहिजे. आपल्या घरच्या कार्यक्रमात उच्चजातीच्या समाजातील लोकांनी सहभागी व्हावे असे वाटत असेल तर मागासपणाच्या रूढी सोडून दिल्या पाहिजेत.

पण मुख्य गोष्ट अशी आहे की, दलितांनाच दलितांचे नेमके प्रश्न कोणते आहेत हे नीट समजलेले नाही. त्यांचे स्वतःचे प्रश्न त्यांनी प्रथम समजावून घेतले पाहिजेत. आंबेडकरांच्या नंतर जे दलित नेते पुढे आले त्यांनी नेतृत्वपद नीट सांभाळले नाही; त्यामुळे दलितांच्या समस्या तशाच राहून गेल्या. त्या आजतागायत सुटल्या नाहीत.

दलित जातींसाठी स्थापन झालेल्या रिपब्लिकन पक्षाने तर महाराष्ट्रातील दलित जाती-जमातींचा विश्वासघातच केला आहे अशी या पक्षावर खरपूस टीका करून दलित पँथरने आपले पाय रोवले; पण क्रांतिकारक दृष्टिकोन घेऊन निर्माण झालेली पँथर ही संघटना पाहता पाहता फुटली आणि त्या संघटनेने आपले उग्र स्वरूपही बदलले आहे. दलित नेत्यांनी सत्ताधारी पक्षाशी संधान जोडून आपला स्वतःचा फायदा करून घेतला. शहरातील दलित नेते माणुसकी विसरले आहेत. आपल्या खेड्यातील बांधवांची त्यांना कधी आठवण होत नाही. जर सुशिक्षित शहरी दलितांना कोणी त्यांची आठवण करून दिली तर त्यांच्याबद्दल तिरस्कार व्यक्त करतात.

या सर्वांचा विचार करून असे वाटते की दलितांच्या समस्येची जबाबदारी दलितांनाच नीटपणे उचलायची

आहे. दलितांनी स्वतः पुढाकार घेऊन आत्मपरीक्षण करून आपली उन्नती करून घेणे आवश्यक आहे.

**कु. माणिक येडुरे**
द्वितीय वर्ष कला

## दलित विद्यार्थी व समाज

अनेक वेदनांनी होरपळून निघालेल्या दलित कुटुंबात जन्माला येणाऱ्या बालकाचे भवितव्य काय असते? हे बालक पिढ्यान् पिढ्या दलितांवर होणाऱ्या संस्कारात वाढलेलं असतं आणि हेच बालक जेव्हा अनेक वेदना सहन करून शिक्षण घेऊ लागतं तेव्हा समाज त्याच्याकडे एका विशिष्ट दृष्टिकोनातून पाहू लागतो. तो दृष्टिकोन, ती नजर फार विषारी असते. प्रत्येक क्षेत्रात आपण दलित कुटुंबात जन्माला आलेलो आहोत याची जाणीव ती नजर करून देत असते. केवळ त्याच्या कपाळावर समाजाने मारलेला जातीचा शिक्का प्रत्येक वेळी त्याला असह्य वेदना सहन करायला लावतो.

ज्या कुटुंबात चार हजार वर्षांपासून पुस्तक जाऊ शकलें नाही, ज्या कुटुंबाला ज्ञानेश्वरीचे अध्याय कसे म्हणावेत हे माहित नव्हते, त्या कुटुंबातील विद्यार्थ्याने आधुनिक सुसंस्कृत परिस्थितीशी कसे मिळते-जुळते घ्यावे? टीचभर पोटासाठी दररोज दारोदार फिरून कामाची मागणी करणाऱ्या कुटुंबात वाढणाऱ्या विद्यार्थ्याने शिक्षण क्षेत्रात येणाऱ्या अडचणींवर कशी मात करावी? यासाठी सरकारनं दिलेल्या मदतीच्या साह्याने तो जर आपली विद्यार्थीदशा पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असेल तर समाज, उच्चवर्गीय विद्यार्थी कुटिल शब्द वापरून त्याची मानहानी करतातच, पण त्याचबरोबर ही मदत बंद व्हावी अशी मागणीही करतात. या लोकांनी जाणूनबुजून स्वतःच्या पोकळ मोठेपणाला आधार देण्यासाठी दलितांना समाजापासून वंचित ठेवले. दलित तुच्छ आहेत, मागासलेले आहेत, म्हणून आम्ही श्रेष्ठ आहोत हा त्यांचा फसवा हास्यास्पद असा युक्तिवाद आहे. एखाद्याला तुच्छ मानून कोणताही माणूस किंवा समाज श्रेष्ठ ठरू शकत नाही आणि ठरणारही नाही.

हा उच्चवर्णीय समाज दलितांना सरकारतर्फे मिळणारी मदत थांबवण्याची मागणी तर करतोच पण सरकारने दलितांसाठी किती आणि कोणकोणत्या योजना आखल्या आहेत याची साधी माहितीही या दलित समाजातील लोकांना मिळू देत नाही. त्यामुळे कित्येक सवलतींचा फायदा हे दलित विद्यार्थी माहितीअभावी घेऊ शकत नाहीत. जी गोष्ट शिक्षणक्षेत्रात तीच गोष्ट नोकरीच्या बाबतीत आहे. सरकारने दलितांसाठी राखीव ठेवलेल्या जागांपैकी सर्व जागा दलितांना दिल्या जात नाहीत.

असे जर प्रत्येक वेळी, प्रत्येक ठिकाणी घडत राहिले तर हा दलित समाज मागेच राहील आणि याचा दोष तो या समाजरचनेला देत राहील. प्रसंगी तो ही समाज—रचना नष्ट करण्याचा प्रयत्न करील आणि नेहमीप्रमाणे त्याला विरोध करतील या समाजाचे ठेकेदार. शेवटी जी गोष्ट भारतीय घटनेला नको आहे तीच होण्याची शक्यता आहे आणि ती म्हणजे संघर्ष! आणि हा संघर्ष सुरू झाला तर तो केवळ समाजाच्याच नव्हे तर या देशाच्या नाशाला कारणीभूत होईल. म्हणून मी दलितांचा द्वेष करणारांना एवढेच सांगीन की, हजारो वर्षे उच्चवर्णियांकडून पायदळी तुडवला गेलेला हा समाज या नवमतवादी युगातही, माणुसकीची बीजे उगवीत आहे व माणुसकी टिकवण्याचा प्रयत्न करीत आहे. समाजाकडून गळचेपी झालेल्या या दलित समाजातील माणसामाणसांच्या अंतःकरणात माणुसकी अजूनही आहे. आणि हेच मानवतेचे प्रतीक आहे. त्याची समज, उच्चवर्णीयांनी घ्यावी, वेळेची क्षमता जाणावी, मानवी माणुसकी जिवंत ठेवावी. अन्यथा माणुसकीचे बंध तोडून हा दलित समाज आपले हक्क मिळवू शकेल. अजूनही वेळ आहे. सवर्णांनीच हे भेदाभेद नष्ट करण्यास पुढे आले पाहिजे. तरच 'समता'-वादी' भारताचा सामाजिक उत्कर्ष होईल.

**आनंद शिंदे**
द्वितीय वर्ष शास्त्र

## मातंग समाज

दलित जातीबद्दल नेहमी जो विचार होतो त्यामध्ये मातंगांचा विचार विशेष करून होत नाही. आपल्या महाराष्ट्रात मातंग समाज बऱ्याच मोठ्या संख्येत आहे. या समाजाचा मुख्य धंदा केरसुण्या व दोरखंड बनविणे हा आहे. केरसुण्या व दोरखंड शेतकऱ्यांना वर्षभर पुरवावयाचे व नंतर शेतकरी त्यांना आपल्या उत्पादनातील जो वाटा देईल तो घ्यायचा, असा एकूण प्रकार. या बलुतेदारी पद्धतीमध्ये अल्प मिळकतीवर मातंगांना उदरनिर्वाह करणे जड जात असे. कालांतराने नायलॉनच्या उत्पादनामुळे, निरनिराळ्या यांत्रिकीकरणामुळे, शेतकऱ्यांनी आपल्या विहिरीवर पाणी उपसण्यासाठी इंजिने बसविल्यामुळे मातंगांना पूर्वी जो अल्पस्वल्प दोरखंडाचा व्यापार करता येत असे तसाही आता करता येत नाही. शेतकरीसुद्धा बलुते देईनासे झाले आहेत. त्यामुळे या समाजावर दारुण संकट कोसळले आहे.

आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे या समाजातील मुलांना शिक्षण घेता आलेले नाही. त्यामुळेच सुशिक्षितांचे प्रमाण या समाजात फारच कमी आहे. त्यामुळे सरकारने दिलेल्या सवलतींचा फायदा या समाजातील लोकांना घेता आलेला नाही. म्हणून मातंग मागे पडले आहेत. हा समाज मुख्यतः खेड्यामधून विखुरला असल्यामुळे त्यांच्यात संघटना निर्माण होऊ शकली नाही. संघटना नसल्यामुळे मातंगांना राजकीय महत्त्व प्राप्त झालेले नाही.

मागासलेल्या इतर जातींतील लोक शासनाने दिलेल्या सवलतींचा जास्तीत जास्त फायदा घेत आहेत. महार समाज पुढे गेला आहे. त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला. त्यांच्यात थोडी का होईना संघटना निर्माण झाली. शिक्षणाचे प्रमाण वाढले. याउलट मातंग पूर्वी होते तसेच राहिले. हिंदू धर्माचा पगडा या समाजावर आहे. त्यांनी त्यामुळे बौद्ध धर्मही स्वीकारलेला नाही. एकूण काय, तर मातंग समाज आर्थिक दृष्ट्या व शैक्षणिक दृष्ट्या अत्यंत मागासलेला राहिला आहे. नवीन धोरणाने जे जमीन वाटप होणार आहे त्यातील बरीच जमीन या समाजाला मिळाली तर बराच फायदा होण्यासारखा आहे. त्याचप्रमाणे संघटनेचे महत्त्वही या समाजाने ओळखले पाहिजे.

**प्रकाश परदेशी**
तृतीय वर्ष कला


*Compliments :*

**Hollywood Studio**

**Poona 411004**

Studio : 57575 Colour Lab. 56565

**Shah Malukchand Daulatram**

**548, Raviwar Peth,
Poona 411 002**

*Manufactuıers of*

Winner banians Lavanya brassiers


८...

# आन्तिगॉन : काही विचार

कु. उज्वला पारसनीस
द्वितीय वर्ष कला

ग्रीक नाटकांची परंपरा फार जुनी. सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वीची. ग्रीक नाटककार सोफोक्लीस हा एक महान् करुण नाटककार. 'राजा ईडिपस', 'ईडिपस इन कोलोन' आणि 'आन्तिगॉन' ही सोफोक्लीसची नाटकत्रयी सुप्रसिद्ध आहे.

'ईडिपस इन कोलोन' या नाटकात 'ईडिपसने स्वतःला थीबिसमधून हद्दपार करून घेतल्यानंतर त्याच्या मृत्यूपर्यंतचे कथानक आहे. त्याला सोसाव्या लागलेल्या दारुण हालअपेष्टा, तशाही अवस्थेत क्रेऑनने त्याचा आणि त्याच्या मुलींचा, विशेषतः आन्तिगॉनचा छळ करण्याचा केलेला प्रयत्न आणि ईडिपसचा अत्यंत रोमांचकारी उज्ज्वल अंत यासंबंधीचे कथानक या दुसऱ्या नाटकात आहे. आन्तिगॉन ही ईडिपसची सर्वात धाकटी मुलगी. त्या लहान वयातही ती ईडिपसबरोबर त्याच्या हद्दपारीच्या काळात हिंडत होती, भिकाऱ्याचे वैराण जीवन कंठीत होती, आंधळ्या पित्याची सेवा करीत होती. तिचे पितृप्रेम, हाल सोसण्याचे सामर्थ्य आणि क्रेऑबद्दल तिच्या मनात उद्‌भवलेला अतीव तिरस्कार या दृष्टीने ते नाटक थोडेसे ध्यानात ठेवण्यासारखे आहे. राजाच्या मृत्यूनंतर आन्तिगॉन थीबिस येथे परत आली आणि क्रेऑजवळ राजवाड्यात राहू लागली.

एतिओक्लीस आणि पॉलिनिसीस ह्या ईडिपसच्या दोन मुलांपैकी एतिओक्लीसला राजपद मिळते. पण नंतर युद्ध होऊन दोघेही एकमेकांकडून ठार होतात. राजपद क्रेऑला मिळते. युद्ध संपल्यानंतर दुसऱ्या दिवशीची हकीगत आन्तिगॉनमध्ये चित्रित केलेली आहे. क्रेऑ हुकूम काढतो की एतिओक्लीसचे अंत्यसंस्कार वीरोचित सन्मानाने विधिपूर्वक होतील पण पॉलीनिसीसचे प्रेत दफन न करता उघडे नागडे पशुपक्ष्यांना भक्षणासाठी टाकून दिले जाईल. या क्षणापासून आन्तिगॉन नाटकाची सुरुवात होते.

आन्तिगॉन—बालपण आणि तारुण्याच्या सीमारेषेवर उभी असलेली जगावेगळी मुलगी. ती लहान असली तरी तिच्या वयापेक्षा जास्त विचार करते. जीवनाचे कोणालाच न उलगडणारे कोडे ती आयुष्याचे मोल देऊन सोडवू पहाते. मृत्यू येवढेच उत्तर ती या कोड्याला देते आणि तिच्यापुरता तो प्रश्न संपतोही.

आन्तिगॉनला वयात येऊ लागणाऱ्या इतर मुलींप्रमाणे नटण्यामुरडण्याची आवड नाही. त्यांच्यासारखी मुलांशी मैत्री करणे तिला जमत नाही. इतरांच्या खोट्या, कृत्रिम, ढोंगी वागण्याचा तिला तिरस्कार वाटतो आणि खोटी बंधनेही तिला नको आहेत. या बंधनांचा विचार करताना आपण राजघराण्यात जन्माला आलो याची तिला खंत आहे. सामान्यांप्रमाणे तिला वागता येत नाही. लहानपणापासून ती विचार करत आहे की मला जर माझ्या मनाप्रमाणे वागता येत नसेल तर मग माझ्या जीवनाला अर्थ तरी काय आहे ? हळूहळू कळती झाल्यावर तिला जगातल्या वाईटाचा अनुभव यायला लागला आहे. तिला वाटत आहे की हा स्वार्थ, हा कलह, ही दावेदारी मला काही नको. लहानपणचं निष्पाप, निःस्वार्थी जगच मला हवय. तसं जीवन मला मिळणार नाही ? या माणसांना प्रेमसुद्धा निःस्वार्थी करता येणार नाही ?" असंख्य प्रश्न तिच्या मनात घोंगावत आहेत.

अशाच प्रश्नांच्या जाळ्यात ती अडकली असताना तिच्या दोघा भावांत युद्ध झाले दोघंही मारले गेले आणि राजेपद तिच्या मामाच्या गळ्यात येऊन पडले. क्रेऑ तसे

पाहिले तर हुकूमशाही वृत्तीचा नव्हे. तो रसिक आहे, त्याचा पिंड कलाकाराचा आहे. राजेपदाची जबाबदारी, ती बंधने, कर्तव्ये या जोखडात अडकण्याची त्याची इच्छाही नाही. आताही कामाने थकून गेल्यावर तो विचार करतो तेव्हा त्याला हा डोक्यावरचा भार फेकून द्यावासा वाटतो. पण कर्तव्याची त्याला जाणीव आहे. टापटीप, स्वच्छता, आरोग्य, शिस्त यांचा तो भोक्ता आहे पण वेळच अशी आली की त्याला राजा व्हावे लागले. सुरवातीसच राजेपद नाकारणे त्याला शक्य होते. पण ते नाकारले त्याला भेकडपणाचे वाटले. बंडामुळे राजपद प्राप्त झालेल्या माणसाप्रमाणे त्याला हुकुमशाहीवृत्तीने वागावे लागले. बंड मोडण्यासाठी मुंग्या माराव्यात तशी माणसे मारावी लागली. दहशत बसविण्यासाठी अनेक गोष्टी कराव्या लागल्या. तसे पाहिले तर आन्तिगॉनचे भाऊ एतिओक्लीस आणि पॉलिनिसीस हे दोघेही नादान होते. पण क्रेऑंला ज्या गोष्टी कराव्या लागल्या त्यातीलच एक गोष्ट म्हणजे या दोघांपैकी एकाची बाजू घ्यावी लागणे. दोघाही राजकुमारांना वाईट ठरविणाऱ्या या नव्या राजाबद्दल प्रजेला शंका येऊ नये म्हणूनच त्याने एतिओक्लीसची बाजू घेतली त्याला हुतात्मा बनविले आणि धाकट्या पॉलिनिसीसला देशद्रोही बंडखोर ठरविले. राज्यात एक कडक जाहिरनामा काढला, "पॉलिनिसीनच्या देहाला मूठमाती देण्याचा नुसता प्रयत्नही जो कोणी करेल त्याला देहान्त शासन देण्यात येईल." क्रेऑं मूळचा इतका क्रूर नाही. ही त्याची कर्तव्यनिष्ठुरता आहे. पण या सगळ्या गोष्टी त्याला मनाविरुद्ध करणं भाग आहे. आन्तिगॉन आणि क्रेऑंतला संघर्ष येथेच पेटतो.

आंतिगॉन म्हणते, "आपलं आयुष्य गहाण टाकून स्वतःला नको असलेल्या गोष्टी करण्यापेक्षा मृत्यू पत्करणे श्रेयस्कर." स्वतःचा भाऊ कसाही असला तरी त्याचा देह गिधाडे कुत्र्यांनी खावा हे तिला मान्य नाही आणि म्हणूनच ही विलक्षण मुलगी आपल्या भावाला मूठमाती द्यायला निघते. क्रेऑंची या मागची भूमिकाच वेगळी आहे. त्याला बंड मोडून राज्यातली अंदाधुंदी संपवून शिस्त प्रस्थापित करायची आहे. हे काम करण्यासाठी वाईटपणा घ्यावाच लागणार. राज्य टिकविण्यासाठी हे कोणीतरी करणे भागच आहे. जेव्हा भावाला मूठमाती देताना आन्तिगॉन पकडली जाते तेव्हा तिला क्रेऑंसमोर उभे करतात. क्रेऑंला वाटते जो पर्यंत हे पहाऱ्यावरच्या सैनिकांनाच माहीत आहे, तो पर्यंतच आन्तिगॉनाला वाचविणे शक्य आहे.

पण त्याला वाटते आहे तितकी आन्तिगॉन वयाने लहान असली तरी विचाराने नाही. तिच्या स्वातंत्र्याच्या कल्पनाच वेगळ्या आहेत. इतरांना ज्या गोष्टीत सुख वाटते ते खरे सुख नाही, हे तिचे ठाम मत आहे. तिच्या भूमिकेपासून ती रेसभरही ढळायला तयार नाही. क्रेऑं तिची समजूत घालतो. आन्तिगॉन ऐकत नाही. तिचे भाऊ किती नालायक होते याचे वर्णन करून क्रेऑं तिच्या कानात विष ओतण्याचा प्रयत्न करतो आणि शेवटी या छोट्या मुलीशी वाद घालून तो थकतो, हताश होतो. क्रेऑंतला हुकूमशहा येथे डिवचला जातो. आन्तिगॉनला मृत्युदंडाची शिक्षा मिळते. आन्तिगॉन आणि क्रेऑंला आपापली कर्तव्ये केल्याचे समाधान !

आन्तिगॉनची मोठी बहीण इज्मेन तिच्या विरुद्ध—प्रकृतिची आहे. नटणे मुरडणे, मुलांशी मैत्री करणे या गोष्टीतच ती रमते. कृत्रिम, दांभिक वागणे तिला सहज जमते म्हणून आन्तिगॉनला इज्मेनच्या भगिनीप्रेमाची शंका आहे. बहिणीबद्दल तिच्या मनात तिरस्कार आहे. तिला लहानपणापासून मोठे करणाऱ्या दाईबद्दल तिला प्रेम आहे. आन्तिगॉनला तिच्या कुत्रीबद्दल विलक्षण माया आहे कारण ही कुत्री शानदार निःस्वार्थी प्रेम करणारी आहे. तिच्या नियोजित पतीवर राजा क्रेऑंच्या मुलावर तिचे जिवापाड प्रेम आहे. एमॉंचेही तिच्यावर प्रेम आहे पण त्याचे वागणे थोडेसे आन्तिगॉनच्या प्रकृतीला न शोभणारे आहे म्हणूनच त्याच्या प्रेमाबद्दल आन्तिगॉनच्या मनात थोडासा किन्तू आहे. मरण्याचा निश्चय झाल्यावर ती त्याच्याकडून अखेरतः तिच्यावरचे त्याचे एकनिष्ठ प्रेम वदवून घेते पण आता तिला त्याला तोडणे भागच असते. कुठल्याच पाशात तिला गुंतायचे नाही. मृत्यूशिवाय तिला समोर कोणीच दिसत नाही. आन्तिगॉनवरचे निःस्वार्थी प्रेम एमॉं तिच्या मृत्यूनंतर आत्महत्या करून सिद्ध करतो.

ज्यो अनुईच्या नाटकातील सगळीच पात्रे चिरंजीव आहेत. प्रत्येकाच्या स्वातंत्र्याच्या, कर्तव्याच्या, सुखाच्या कल्पना वेगळ्या आहेत. त्यातले सैनिकसुद्धा निर्विकार, हुकुमाने बांधलेल्या सरकारी अधिकाऱ्यांप्रमाणेच आहेत.

प्रत्येक भूमिकेला स्वतःचे असे व्यक्तिमत्त्व आहे. १९४४ साली अनुईनी ही ग्रीक पुराणातली कथा नाटकात रूपांतरित केली. दुसऱ्या महायुद्धाचा काळ होता. जर्मन लोकांची फ्रान्समध्ये प्रत्येक गोष्टीवर सेन्सॉरशिप होती. अशातच हे नाटक रंगभूमीवर आले आणि विलक्षण लोकप्रिय झाले. फ्रेंच जनतेला बंडखोर आन्तिगॉनमध्ये क्रांतीचा भास दिसला. तरीही या नाटकाला सेन्सॉरशिपचा



'अँटिगनी' मध्ये

डॉ. लागू (क्रेऑं) व दीपा श्रीराम (अँटिगनी)

तडाखा बसला नाही. कारण क्रेऑंने आन्तिगॉनला मृत्युदंड ठोठावला म्हणजे जर्मनस्चा विजय झाला असे जर्मन्सनी मानले आणि आन्तिगॉनने स्वतःचे म्हणणे खरे केले म्हणून तिचा विजय झाला असे फ्रेंचांनी मानले.

मराठीत या नाटकाची तीन चार भाषांतरे झाली. दोन रंगभूमीवर आली. प्रथम पुण्याच्या प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक ॲसोसिएशनने शान्ता वैद्य यांचे भाषांतर रंगभूमीवर आणले. नंतर डॉ. श्रीराम लागूंनी स्वतः भाषांतर करून स्वतःच्या 'रूपवेध' संस्थेद्वारे रंगभूमीवर आणले. लागूंच्या प्रयोगानंतर 'महाराष्ट्र टाईम्स' मधील लेखांनी या नाटकाविषयी कुतूहल वाढविले. अरुण साधूंना अनुईनी यात आन्तिगॉनला अवास्तव महत्त्व दिले आहे असे वाटले. आन्तिगॉनला एमाँच्या मदतीने किंवा क्रेऑंच्या विरोधकांच्या सहाय्याने पॉलिनिसीसला मूठमाती देता आली नसती का ? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत. एमाँच्या प्रेमाबद्दल आन्तिगॉनची शंका मृत्यूपूर्वी काही वेळ फिटते. कारस्थाने करून बंड उभारण्याइतकी ती मोठी नाही हे साधूंना नाट्याकृती पाहून स्पष्ट झाले नसावे. शिवाय मुळात नाटकाच्या संहितेत जे नाही त्याबाबत समीक्षकाने प्रश्न उपस्थित करणे उचित नसते. पण साधूंनी मात्र असे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. अर्थातच अशा प्रश्नांना समर्पक उत्तरेही शोधता येत नसतात. कारण त्यांना एकापेक्षा अनेक उत्तरे संभवतात. दुसरा लेख माणिक कानडे यांनी लिहिला आहे. मूळची सोफोक्लीसची शोकान्तिका आणि ज्यो अनुईच्या एकूण सगळ्याच नाट्यकृतींचा, त्यांच्या लेखन शैलीचा त्यांनी विचार केला आहे. फक्त भाषांतराचा त्यांनी विचार केलेला नाही. त्यामुळे साधूंसारखे त्यांचे गैरसमज नाहीत. त्यांचा अभ्यास पूर्ण लेख आणि साधूंचा केवळ नाट्यकृती बघून लिहिलेला लेख यांची तुलना होऊ शकत नाही.

सौ. शान्ता वैद्य यांनी मूळ फ्रेंच नाटकावरून भाषांतर केले असल्यामुळे पात्रांची नावे फ्रेंच आहेत. लागूंचे भाषांतर इंग्रजी भाषांतरावरून आहे. इंग्रजी भाषांतरात पात्रांची नावे ग्रीक आहेत. ती तशीच लागूंच्या भाषांतरात आहेत. शान्ताबाईंचे संस्कृत, मराठी, फ्रेंच या भाषांवरील समान प्रभुत्व आणि लेखनकलागुण यांमुळे त्यांचे भाषांतर परिणामकारक वठले आहे. डॉ. लागू मुळातले ललित लेखक नव्हेत. या नाट्यकृतीने त्यांना मोह पाडला म्हणून त्यांनी ती भाषांतरीत केली आहे. पण शान्ता वैद्यांच्या संवादात जी चमक आहे ती लागूंच्या भाषांतरात आढळत नाही. लागूंचे ॲन्टिगनी काही चांगल्या संवादांना मुकले आहे. त्यामुळे आन्तिगॉन आणि क्रेऑंतला संघर्ष टोकाला पोहोचत नाही. आन्तिगॉन तिच्या दाईला सुरकुतलेले सफरचंद म्हणते. अशासारखे संवाद आपल्या परिचयातले

वाटत नाही. पण त्यातून लक्षात असे येते की नाटक विदेशी आहे. त्याच वेळेला "आव अगदी सतीसावित्रीचा आणला होता" हे वाक्यही नाटकात येते आणि मग ह्या सतीसावित्रीच्या स्वदेशी कलमाचे काय करायचे असा प्रश्न पडतो. अशी विसंगती वैद्यांच्या आन्तिगॉनमध्ये आढळत नाही. वैद्यांनी दाई, एमॉ, इज्मेन आणि सैनिकांच्या व्यक्तिरेखा चांगल्या फुलवल्या आहेत; त्यांचे व्यक्तिमत्त्व साकार करताना सूक्ष्म बारकावे रेखाटले आहेत. लागूंच्या ॲन्टिगनीत ह्या गोष्टी दिसत नाहीत. खरे तर आन्तिगॉन हा 'युनिव्हर्सल प्ले' असल्यामुळे त्याला प्रादेशिकतेच्या कक्षा पडत नाहीत. त्यामुळे आन्तिगॉनची भूमिका उभारणारी सशक्त भाषा आणि ती भूमिका समर्थपणे पेलणारे अभिनेते असले म्हणजे 'आन्तिगॉन' उभे करायला अवघड नाही.

आपल्याला 'आन्तिगॉन' का आवडले हे सांगताना शान्ता वैद्य म्हणतात "आन्तिगॉनने निर्माण केलेला प्रश्न सनातन आहे. जन्माला आलेल्या मानवाला आपल्या जीवनासंबंधी निर्णय घ्यावा लागतो. एकदा होकार किंवा नकार दिला की त्याच दिशेने त्याचा प्रवास चालू राहतो. होकार किंवा नकार कशाला द्यायचा याबाबत विचारी माणसाला निवड करण्याची संधी असते. आपले ईप्सित साध्य करण्यासाठी हे लोक वाटेल ती किंमत देतात अशा वेळी त्यांना रूढ न्यायाची चाड रहात नाही. मानवी जीवनसुद्धा ते कःपदार्थ मानतात. सामाजिक न्याय, नैतिक मूल्ये मानवी जीवनाची महत्ता या आणि अशा गोष्टींना होकार देणाऱ्या व्यक्ती संख्येने थोड्या असतात त्यांच्या जीवनाची आन्तिगॉनसारखी परवड होते. मग एखादे सानेगुरुजी जीवनाची अशी इतिश्री करतात. सगळेच जीवनाची अशी किंमत देतात असे नव्हे पण जगूनही ते होकाराची किंमत मोजत असतात."

शान्ता वैद्य यांच्या या नाटकाला असलेल्या प्रस्तावनेतल्या विचारतच आन्तिगॉनच्या खऱ्या शोकांतिकेचे मर्म गवसते म्हणूनच त्यांचा विचार मला पटतो. या शोकांतिकेचे वैशिष्ट्य म्हणजे तिच्यातील आशयाचा प्रत्यय कालदेशपरिस्थिती यांशिवाय रसिकांना येत असतो. असा प्रत्यय देण्याचे सामर्थ्य शांताबाईंच्या भाषांतरात तुलनेने अधिक आहे हे जाणवते.

सोफोक्लीसच्या नाट्यकृतीतील जो आशय ज्या अनुईनी आपल्या नाट्यकृतीत उभा केला आहे तो त्यांच्या नाटकातील पात्रांच्या वेदनेतून पूर्णपणे आविष्कृत होतो. या सगळ्यांचा एकत्रित परिणाम म्हणूनच की काय 'आन्तिगॉन' चिरंजीव आहे. आन्तिगॉनची वेदना अश्वत्थाम्याच्या वेदनेप्रमाणे चिरंजीव बनली आहे.

**संदर्भ :—**


१) पी. डी. ए. कृत 'आन्तिगॉन'च्या प्रयोगाचे हस्तलिखित.

२) 'ॲन्टीगनी' : भाषांतरकार डॉ. श्रीराम लागू 'माणूस' दिवाळी अंक १९७५.

३) 'ॲन्टीगनी' : अरुण साधू, 'महाराष्ट्र टाईम्स', दिनांक ७ डिसेंबर १९७५.

४) 'ॲन्टीगनी' : एक खंडित शोकात्मिका, माणिक कानडे, 'महाराष्ट्र टाईम्स', दिनांक २८ डिसेंबर, ७५.



*With Compliments From :*

**MODERN BAKERY**

*Famous For*

**Delicious Bakery Products**

Branches all over Poona
Factory 458, Nana Peth,
Poona T. N. 24204

# चित्र मीही रेखियले....

**सौ. हेमा लेले,** बी. ए.
माजी विद्यार्थिनी

**[ कु. इनामदार यांच्या कादंबऱ्यांचा रसग्रहणात्मक परिचय करून देणारा मॉडर्न महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी सौ. हेमा लेले यांनी लिहिलेला हा लेख. ]**

हसरा चेहरा, हळुवार मन, स्वप्नांमधून भिरभिरणारी बावरी आस...पण या सर्वांना एक शाप...प्राक्तनाचा! बेभान मनाला शरीराच्या अपंगत्वाचा शाप...

" ...गत जन्मीतून परावर्तित झालेले काही प्राक्तनाचे धागे कोळिष्टकासारखे पुनः पुनः तिच्या आयुष्यभिंतींचा आश्रय घेत होते...!!" वासंती इनामदार यांच्या ' किनारा रित्या सागराचा ' या कादंबरीतील नायिकेला घेरून टाकणारं हे वाक्य जितकं त्यांच्या भावनांशी जुळतं-मिळतं आहे, तितकंच त्यांच्या कादंबऱ्यांमधून समोर येणाऱ्या अनेक व्यक्तिरेखांनाही व्यापणारं आहे.

अतिशय संवेदनाशील मनाला साथ देऊ न शकणारं शरीर घेऊन त्यांच्या कादंबरीतील ' प्रेमला ' समोर येते... वेड्या अनामिकेला शहाणं करून सोडणाऱ्या मोहनलाच अखेर वेड लागतं. आंधळी मुलगी पोटी आल्याने उत्तरा एका शापित स्त्रीचं आयुष्य जगत राहते. प्रेमाचा मोहर गळून पडल्याने हताश झालेली योगिनी थोडी फुलते, तर पुनः कोलमडते... ही सर्व पात्रं पाहिली की समोर येतो तो फार निराश करणारा अनुभव...माणसाचं पराधीनत्व लेखिकेला फार प्रकर्षानं जाणवलेलं आहे...त्या विषयीचा तिचा अनुभव, तिची वेदना, तिची निराशा फार प्रामाणिक आहे...जीवनातील नियतीच्या क्रूर खेळांनी धगधगून जळून जाणारी, हताश होणारी माणसं तिला उभी करायची आहेत आणि ' पंख लाभले आभाळाला ', ' सावलीतील ऊन्हं ' 'ती एक फुलणारी' व 'किनारा रित्या सागराचा' या तिच्या चार कादंबऱ्यातून ही माणसं आपल्याला भेटत राहतात... कथानक वेगळं असलं तरी सूत्र एकच—

पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा !

या त्यांच्या विचारसरणीस तोलून धरणाऱ्या या कादंबऱ्या असल्याने 'पंख लाभले आभाळाला' या एकाच कादंबरीत फक्त शेवट काहीसा सुखकर आहे. तरीही प्राप्त परिस्थितीशी तडजोडच आहे. ही माणसं नियतीपुढे, प्राक्तनापुढे कोलमडून पडली आहेत.

' किनारा रित्या सागराचा ' मधील नायिका उत्तरा ही बाळबोध वळणाची मुलगी ! आईवडिलांनीसुद्धा जिला जरा आधुनिक बनण्याचे धडे द्यावेत इतकी अगदी ' दासबोधी मुलगी '. ही लग्नाच्या बाजारात अनेकांकडून ' कमी प्रतीची ' ठरविली जाते व अखेर बहिणीच्या सल्ल्याप्रमाणे बहिरंगात फेरफार करून ' बधुब्राई ' च्या कार्यक्रमात पास होते ! लग्न झाल्यावर नवऱ्याच्या व इतरांच्याही पुरोगामी (?) स्वभावामुळे तिच्या आवडीनिवडींची गळचेपी होत राहते आणि लग्नानंतर वाट्याला आलेलं हे सुख (?) ती रोज रडून साजरं करीत बसते. पण तिच्या हालचालीतून बाळजीवांची चाहूल लागताच नवरा हळुवार बनतो.

आंधळ्या म्हाताऱ्याला पाहून ' त्याला डोळे द्या हो ' म्हणून रडणारी, आंधळ्या जोडप्यांच्या अंधारी संसाराचे चित्र मनात आणून कासावीस होणारी उत्तरा अखेर ' आंधळ्या नियतीच्या ' भोवऱ्यात सापडते आणि तिची मुलगी अर्पिता दृष्टिहीन बनते. उत्तरा या धक्क्याने विदीर्ण होते.

या उलट व्यक्तिमत्त्व आहे ते तिच्या बहिणीचं ! मेदिनी ही तिची सख्खी बहीण पण दोघींच्या विचारांत, वागण्यात दोन ध्रुवांचं अंतर ! अत्यंत बेबंद जीवन जगण्याचा अट्टहास असलेली आणि तसंच ते जगणारी मेदिनी लेखिकेनं उभी केली आहे. आई, वडील, लग्न, उपभोग, सुख, दुःख, वात्सल्य या सर्व भावनांचे हिशेब तिनं ठाम बनविलेले आहेत. शुद्ध व्यवहारी दृष्टीनं ती




अभिनंदन



कु. वासंती इनामदार

## आजची विद्यार्थिनी : आजची व उद्याची कवयित्री व कादंबरीकर्त्री

मॉडर्न महाविद्यालयाच्या पदवीपूर्व साहित्य वर्गात शिकत असलेली कु. वासंती इनामदार म्हणजे परमेश्वराने शारदेचा देव्हारा ' जिच्या अंतःकरणात वसविला आहे अशी प्रतिभाशाली कवयित्री व कादंबरीकर्त्री.

वयाच्या सोळाव्या वर्षी तिने पहिली कादंबरी लिहिली आणि गेल्या तीन-चार वर्षांत ओळीने चार कादंबऱ्या लिहून आजच मराठी साहित्याच्या दालनात तिनें स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. तिच्या या चारही कादंबऱ्यांतून पौगंडावस्थेतील व तारुण्यावस्थेतील कुमारिकांच्या मनाचे मनोज्ञ दर्शन घडविले आहे.

तिच्या हजारांवर कविता मराठीतल्या मान्यवर नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. तिच्या **' माझी बडबड-गाणी '** या बालगीत—संग्रहास यंदा महाराष्ट्र शासनानें उत्कृष्ट वाङ्मयाचे प्रथम पारितोषिक देऊन तिचा गौरव केला आहे. तिचे मनःपूर्वक व हार्दिक अभिनंदन !

कु. वासंती इनामदार ही महाविद्यालयाचा अभिमानाचा विषय आहे.

तिच्या आगामी यशोमालिकेकडे मॉडर्न महाविद्यालय कौतुकाने पाहात आहे.

सगळ्या गोष्टीकडे पाहते. प्रबोधचे व्यवहारी व सरळ सरळ विषयासक्त असं प्रेम ती त्याच स्वरूपात स्वीकारते. त्याला उदात्ततेचे डोस वगैरे पाजण्याचा प्रयत्नही करीत नाही. पळून जाऊन लग्न करते. आंधळी मुलगी आणि त्यामुळे होणारी वेदना उत्तरा निमूटपणे गिळत राहते. पूर्वीच वारलेल्या तिच्या आजोबांची नानीचे नाव 'प्राक्तना' ठेवण्याची इच्छा धुडकावून लावली गेलेली असते, तीच अशी अतृप्ततेच्या भीषण स्वरूपांत आपल्या-भोवती फिरत आहे असे समजून उत्तरा अखेर खरोखरच 'प्राक्तनाचा बळी' ठरते! ती फार दुबळी आहे. नियतीने हतबल करण्यापूर्वीही ती अगदीच 'मुळुमुळू' आहे. आपल्या आवडीनिवडींचे, साध्या राहणीचे कडाडून समर्थन ती कधीच करीत नाही. मनात ढासळून रडत बसते, पण चवताळत नाही. अशी बाई नियतीच्या आघाताने कोलमडणारच आणि नेहमीप्रमाणंच मनाची समजूत घालून रडत बसणार! उत्तरेचं व्यक्तिमत्त्वच दुबळे-पणाला जवळ करणारं आहे. त्या उलट मेदिनी... नियती वगैरे कल्पना तिला शिवणाऱ्याच नाहीत. इतकंच नव्हे तर आपल्या विकृत मुलाला मारण्यापर्यंत तिच्या मनाची तयारी आहे...इतकी विलक्षण मेदिनी...पण लेखिकेनं तिचं व्यक्तित्व खुरटवलं आहे. आंधळ्या मुलीला वेदनेत तडफडवण्यापेक्षा आणि आपणही त्यात कुढत बसण्यापेक्षा तिला मारून टाक असा सल्ला देणाऱ्या मेदिनीचं ते विकृत मूल मात्र आपोआप आपल्या मरणानं दोन महिन्यांतच मरतं! तिच्या आयुष्यातील कसोटीचा क्षण—तिची काहीशी भावनिक गुंतवणूक...या सर्व शक्य गोष्टी सुंठी-वाचून खोकला गेल्यासारख्या योगायोगाचा आधार घेऊन लेखिकेनं निसटू दिल्या आहेत. त्यामुळं असा विलक्षण क्षण तिच्या आयुष्यात येतच नाही...त्यामुळंच एका संघर्ष-बिंदूवर पोहचते न पोहचते तोच कथानक योगायोगाच्या तावडीत सापडून कृत्रिम बनतं आणि शेवट ठरवल्या-सारखा घडतो!

'ती एक फुलणारी' मधील मोहनचं व्यक्तिमत्त्व मात्र कांहीसं वेगळं आहे. 'अनामिका' नावाची जगाच्या दृष्टीने वेडी ठरलेली मुलगी ही या कादंबरीचा केंद्रबिंदू... मोहन हा तिच्या भाववेड्या विश्वातील तिचा प्रियकर... पण वेड्या मुलीशी लग्न करण्याचे तो नाकारतो. अनामिकेचं लग्न तिला न आवडणाऱ्या माणसाशी होतं व धसका घेऊन ती 'ठार वेडी' बनते. तिला इस्पितळात दाखल करावी लागते. मग मात्र हे कळल्यावर आपल्यावर निस्सीम आणि प्रामाणिक प्रेम करणाऱ्या या वेडीवर मोहनचं प्रेम बसतं. तो तिला आधार देतो. बरं करतो. तिच्याशी लग्नही करतो. तिच्या कलाने वागतो.

अनामिका ही एक अत्यंत फुलवेडी मुलगी असते. तिच्या जगात फुलांचं स्थान अनन्यसाधारण असतं. फुलं पाहून— मग ती कोणाच्याही ओंजळीत का असेनात— ती आपोआप ओढली जाते. अशाच एका कावेबाज माणसा-मागे केवळ फुलांच्या वेडाने ती ओढली जाते. विस्कटून घरी परत येते...मोहनचं मन उसळतं...आपली बायको केवळ वेडी नाही तर वेश्या आहे असे त्याला वाटते... तरीही तो तिला सावरत राहतो...तो अनामिकेसारख्याच निरागस असणाऱ्या 'त्या येणाऱ्याची' वाट बघत असतो. मातृत्वाचं लेण लेवून फुललेली अनामिका पाहून एका तृप्तीच्या भारावलेल्या क्षणी तो दुपट्यातील बाळाला पाहतो आणि तिच्या पहिल्या नवऱ्याचीच ती वळवळणारी प्रतिकृती पाहून तो बेभान होतो...एवढं सोसलेलं सारं उफाळतं आणि तो वेडा होतो!...मोहनच्या व्यक्तित्वात हा जो सारा वेगळेपणा आहे आणि शेवटी त्याची झालेली जी शोकांतिका आहे, ती मनाला अस्वस्थ करणारी आहे. लेखिकेच्या चारही कादंबऱ्यांमध्ये मला आवडलेले हे 'मोहनचं' व्यक्तिमत्त्व आहे.

एका वेड्या मुलीचं भावविश्व समजावून घेणारा मोहन, तिच्याशी लग्न केल्यावर तिच्याशी अत्यंत समतोल मनानं व समजूतदारपणानं वागणारा मोहन, दुसरा पुरुष थोडीशी लालूच दाखवून आपल्या बायकोला सहज भोगू शकतो या विचारानं भयंकर अस्वस्थ झालेला मोहन, वात्सल्याच्या भावनेने भारावणारा मोहन आणि अखेर मनावर झालेल्या आघातांनी फाटून गेलेला मोहन हे सर्वच त्याच्या व्यक्तित्वाशी सुसंगतपणे मांडलं गेलं आहे, वास्तव आहे, तरीही आगळं आहे.

वेड्या मुलीशी लग्न करण्याची इच्छा असणारा तो येथपासून ते स्वतःच आघातानं दुभंगून जाणारा तो येथपर्यन्तच्या मोहनच्या व्यक्तित्वाचा विकास सुंदर साधला आहे. इतर पात्रांवर दिसते तशी लेखिकेच्या विचारांची अतिरिक्त छाया त्यावर नाही.

अनामिकेचे—एका वेडीचे भावविश्व आणि तिच्या दृष्टीनं

असणारा त्यातील सुसंगतपणा आणि त्याबरोबरच जगरहाटीपासूनची त्याची विसंगती हे लेखिकेने आपल्या शैलीने साधले आहे. 'ती एक फुलणारी' ही एक वेगळ्या प्रकृतीची कादंबरी वाटते ती या दोन व्यक्तित्त्वांमुळेच...

अनामिकेचे ' तिच्या मनाचा कौल ' घेऊन चाललेले स्वतंत्र आयुष्य जगरहाटीपेक्षा फार वेगळे आहे. अधिक हळवं आहे. हे सर्व व्यक्त करणारी लेखिकेची शैली लक्षणीय आहे.

" फुलत्या फुलातले उमलतेपण लेवून ती त्याच्याबरोबर चालत होती. त्याच्या संगतीने तिच्या खुळ्या मनाचे आकाशपुष्प पूर्णार्थाने उमलले होते. त्याचा गंध त्यालाही जाणवत होता. "

श्वासांचा भाता, पावसाळी ढगांचा कल्लोळ, डोळ्यांच्या छत्र्या अशा शब्दांच्या आधारांनी अनामिकेच्या तारुण्यसुलभ भावनांचा जो स्फोट वर्णन केला आहे तो खरोखरच एक चांगला प्रयत्न म्हटला पाहिजे.

चित्र मीही रेखियले स्वप्नजीवन सानुले
साथ मज देशील का रे वेचण्या ताराफुले

या विलक्षण ध्यासाने वेडी झालेली अनामिका आणि तिला साथ देऊ पाहणारा मोहन ही दोन व्यक्तिमत्त्वे लेखिकेबद्दल आशा उत्पन्न करणारी आहेत. शैलीतील काही नेहमी येणारे शब्द, ( समास–क्षणगंध, स्पर्श बोलले, अर्थगळत्या...इ...शब्द...) यात थोडा अनुकरणाचा भाग स्पष्ट जाणवणारा आहे...तरीही जाणवलेले योग्य प्रकारे व्यक्त करण्याची धडपड स्तुत्य आहे.

'सावलीतील उन्हं ' आणि 'पंख लाभले आभाळाला' या कथा चाकोरीबद्ध–प्रेमाच्या त्रिकोणार–अडकलेल्या आहेत. मात्र ' किनारा...' आणि 'ती एक फुलणारी' या दोन कादंबऱ्यांतून रेखाटलेली चित्रे ही लेखिकेचा पुढचा आशादायक प्रवास सुचवितात असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.


मॉडर्न कॉलेजला आमच्या शुभेच्छा !

**साठे गादी कारखाना**

४१८ नारायण पेठ, पुणे ३०

♠ ♠ ♠

शाखा : कोल्हापूर, बडोदा, रत्नागिरी

♠ ♠ ♠

कुस्ती व ज्यूडो गाद्यांचे स्पेशालिस्ट

नवा फोन : ४३५५६

*With Best Compliments From :*

**INDIA SUPPLIERS**

★

**Wholesale Hosiery Merchants**

☆
☆☆

Opp. Gujrat Lodge
POONA 411 002

# काळविटाची शिंगे

प्रा. नरेंद्र दुधाळे

काळविटाच्या शिंगांचा उपयोग काय असेल ? जरी त्या शिंगाच्या ऐटीची ओळख सर्वांना पुरातन काळापासून असली तरी ह्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर कुणीच देऊ शकले नाही. प्राणिशास्त्रामधील संशोधकांची ह्या बाबतीत विचित्र परिस्थितीच झालेली आपल्याला आढळून येईल. ह्या विषयावर जास्त संशोधन हल्लीच झालेले दिसते. डॉ. स्टोनहाऊस ह्यांनी काळविटाची शिंगे ही उष्णतेचे प्रक्षेपण करणारी असल्याचे प्रयोगाद्वारे सिद्ध केले आहे. डॉ. हेनशॉ ह्यांनी शिंगाचा मूळ उपयोग हा Social adptation साठी होतो असे सांगितले आहे.

एका ठराविक कालावधीत आणि विशिष्ट पद्धतीने दरवर्षी काळविटाची जुनी शिंगे जाऊन नवीन येतात. जुनी शिंगे गेल्यानंतर ताबडतोब नवीन शिंगाची वाढ होण्यास सुरुवात होते. प्रत्येक दिवशी साधारण १·५ सें. मि. प्रमाणे ४ ते ५ महिन्यांमध्ये शिंगांची संपूर्ण वाढ होते. आणि ह्या प्रकारात कुठलाही खंड कधीही म्हणजे त्या काळविटाचे जीवितमान असेपर्यंत पडत नाही. ज्या कातडीमध्ये हजारो रक्तवाहिन्यांचे जाळे आहे अशा कातडीने ती शिंगे सुरुवातीला आच्छादलेली असतात. ही कातडी थोडीशी लव असलेली असते व त्यामुळे मखमली कापडाप्रमाणे स्पर्श असतो. जवळजवळ शिंगाच्या संपूर्ण वाढीच्या वेळेस त्या शिंगांच्या सुरुवातीच्या जागेवर कायम स्वरूपाचे असे हाडाचे एक प्रकारचे गोल कडे तयार होते. आणि ह्या गोल कड्याच्या ठिकाणी एक खाच तयार होते व त्यामुळे शिंगामधील रक्त प्रवाह अडला जातो. पूर्वीच्या कातडीमध्ये एक जो जिवंतपणा असतो तो ह्यानंतर संपून जाऊन शिंगावर एक प्रकारचे खरबरीत आवरण तयार होते. शिंगे आता ताकदवान बनून त्या काळविटाचे कुठल्याही प्रकारे संरक्षण करायला तयार होतात. ह्या शिंगांची साधारणपणे उन्हाळ्यामध्ये वाढ पूर्ण होते.

डॉ. हेनशॉंचा अभ्यास मुख्यत्वेकरून 'रँजीफर' काळविटाच्या शिंगावर आहे. त्यांच्या शिंगांची वाढ लागोपाठ तीन वर्षांमध्ये कशी झाली हे त्यांनी त्यांच्या संशोधनात पाहिले. ह्याच जातीच्या काळविटामध्ये रेनडियर आणि कॅरिबो ह्या दोन प्रकारच्या काळविटांचा समावेश होतो. काळविटामध्ये फक्त नरांना शिंगे असतात. पण वर उल्लेखिलेल्या दोनच अशा जाती आहेत की ज्यांमध्ये लहान पिल्ले व माद्यांना देखिल शिंगे येऊ शकतात. वास्तविक पाहता लहान पिल्ले जन्मल्यानंतर एक वर्षाने साधारणपणे शिंगांची वाढ होण्यास सुरुवात होते. डॉ. हेनशॉंच्या अभ्यासावरून त्यांनी एक निष्कर्ष काढला आहे आणि तो असा की जगाच्या उबदार प्रदेशात राहणाऱ्या काळविटांची शिंगे सगळ्यांत मोठी असतात. तरी देखील अशा प्रदेशात राहणाऱ्या काळविटांइतकीच मोठी व आकर्षक शिंगे रेनडियर व कॅरिबो जातीच्या काळविटांमध्ये आढळून येतील. परंतु एक गोष्ट मात्र खरी की वर उल्लेखलेल्या दोन जाती वगळल्यास कुठल्याही दुसऱ्या जातीच्या मादीला शिंगे असल्याची नोंद नाही; मग ती उबदार प्रदेशातली असो वा थंड. पण ह्या शिवाय दुसरी एक विचित्र गोष्ट ती अशी की साधारण equator च्या जवळपास रहाणाऱ्या काळविटांमध्ये मादीप्रमाणे नरांच्या शिंगाची वाढ बिलकूल दिसत नाही.

काही अमेरिकन विज्ञानविषयक नियतकालिकांमध्ये ह्या बाबतीत विरुद्ध मत मांडलेले आहे. काही संशोधकांच्या माहितीनुसार थंड प्रदेशात उष्णतेचे वहन शरीरातून होऊ नये म्हणून वर उल्लेखलेल्या जातीच्या पिल्लांमध्ये जन्मल्याबरोबर ताबडतोब शिंगाची वाढ होण्यास सुरुवात होते.

काही जरी असले तरी एक गोष्ट मात्र खरी की शिंग हे काळविटाचे भूषणच आहे. त्यांच्यामुळे त्या काळविटाला एक प्रकारचे 'व्यक्तित्व' येते. शिवाय त्यांचा दुसरा उपयोग म्हणजे आत्मसंरक्षण. त्यांच्या कळपामधले आपला हक्क बजावण्याचे शिंग हे त्यांचे एक साधन ठरते. शिवाय जितकी शिंगे आकर्षक तितकी ती नराला 'वर'दायी ठरतात. कारण त्यामुळे जास्त माद्या त्याच्याकडे आकृष्ट

होतात. पण जरी ही शिंगे त्याला वरदायी ठरत असली तरी काही बाबतीत ती तितकीच धोकादायक देखील ठरू शकतात. काळीवटाच्या मागे वाघ किंवा शिकारी लागला असेल व जीव वाचवायला तो जर घनदाट अरण्यातून पळत असेल तर हीच वरदायी शिंगे कुठल्याही झाडाच्या फांदीमध्ये अडकून त्या काळविटाच्या जिवाला धोका पोहचविणारी शाप ठरतात. तरीही शिंग ही काळविटाची ऐट आणि सौंदर्याचा ठेवा आहे.


**Skyline Photo**

**Satish Khaladkar**

Industrial Photography
Model & Fashion Photography
Function Photography
Commercial Bromides, Etc.

Samarth Prasad,
1251 Shukrawar Peth
Subhash Nagar Lane No. 5,
Poona 411 002. Phone : 41923

Branch :
263 Budhwar Peth

Phone :
54826

**M/s SINGH LIGHT HOUSE**

★

*Stockists :*

Henley Cables, Poona Cables, Khosla Solder Wires and Backelite Accessories, Bosma Switch-gear and G. E., Philips & Sylvania Lamp Dealers

MOTI CHOWK POONA CITY

*Best Compliments From :*

**M/s VEEDEET ENTERPRISES**

115 Shaniwar Peth,
Nene Ghat, Poona 30
Mfg : of Sheet Metal Fabrication

★

**VEENEET PROCESS**

115 Shaniwar Peth,
Nene Ghat, Poona 30
Commercial Photography,
Designers

*With best compliments from :*

**Hotel Vaishali**

**&**

**Roopali**

F. C. Road, POONA 411 004

# आर्यभट ' : आमची अस्मिता

**प्रा. चंद्रकांत कुलकर्णी**

१९ एप्रिल १९७५ ! रशियन भूमीवरून या दिवशी जो अग्निबाण झेपावला तो शिरी धारण केलेल्या भारतीय उपग्रहाला अंतराळात सोडण्यासाठी ! भारताचा पहिला उपग्रह " आर्यभट " या दिवशी अंतराळात भ्रमण करू लागला. २५ वर्षे सरासरी वय असलेल्या ज्या भारतीय तंत्रज्ञांनी या ' आर्यभटा 'च्या जन्मासाठी प्रयत्न केले, ते तो अपूर्व सोहळा पाहून धन्य झाले असतील. त्यांना आनंदाच्या उर्मी दाटून आल्या असतील. छाती फुगून गेली असेल त्यांची ! कदाचित मनोमन म्हणाले असतील " हे, महान ज्योतिर्विदा ! आर्यभटा ! आज खरे आम्ही तुझे वारसपुत्र ठरलो. तुझ्या नावाचा उपग्रह आता आम्ही अंतराळी सोडला. "

या ' आर्यभट ' उपग्रहाचे जन्मस्थळ म्हणजे ' पिन्या ' ह्या बंगलोरच्या उपनगराजवळील उद्योगभूमी होय. तेथील एकसारख्या दिसणाऱ्या शेडस् बाहेरून पाहिल्या तर तुम्हांला कल्पनासुद्धा यायची नाही की त्या ठिकाणी एवढे बहुमोल काम चाललेले असेल. ज्यांचे सरासरी वय अवघे २५ वर्षेच आहे असे सुमारे ७० तंत्रज्ञ या ठिकाणी आर्यभटाच्या उभारणीसाठी झटत होते, खपत होते.

हा भारतीय बनावटीचा उपग्रह रशियन भूमीवरून सोडला गेला. एका देशाने तयार केलेला उपग्रह दुसऱ्या देशाने सोडण्याचादेखील हा पहिलाच प्रयोग होता.

पृथ्वीपासून ६०० कि. मी. अंतरावर हा उपग्रह पृथ्वीभोवती दिवसाला १६ फेऱ्या पूर्ण करीत फिरत होता. त्याचे वेध भारत आणि रशियातून घेतले जात होते. आंध्र प्रदेशात मद्रासच्या उत्तरेस १०० कि. मी. अंतरावर पूर्व-किनाऱ्यावर " श्रीहरिकोटा ' हे बेट आहे. तेथून या उप-ग्रहाचे वेध घेतले जात होते.

क्ष-किरणांच्या शोधाच्या जन्मापासूनच " क्ष-किरण " हे स्वतःच एक कुतूहलाचा विषय होऊन बसले आहेत. क्ष-किरणावर आधारित असलेल्या खगोलशास्त्राचा अभ्यास करणे, हा आर्यभटाच्या तीन प्रमुख उद्देशांपैकी एक उद्देश होता. आयनोस्फिअरचा– ज्याला " रेडिओ मिटर " म्हणतात त्याचा-अभ्यास या उपग्रहाला करावयाचा होता. सूर्याबद्दल अधिक शास्त्रीय संशोधन आर्यभटाला करावयाचे होते.

काही लोक म्हणतात की आपल्याकडे कित्येक लोक दारूण दारिद्र्यात असताना ही चैन आपल्याला परवडते का ? पण हे आपले प्रयोग आहेत. यातून आपल्याला आपले रोजचे जीवन सुधारायचे आहे. जीवनमान वाढवायचे आहे. अन्न-पाण्यासारख्या आवश्यक गरजांवर संशोधन करायचे आहे. हे सारे पहिल्या पाऊली कसे साधणार ? या प्रश्नाचे, अंतरीक्ष मंडळाचे अध्यक्ष डॉ. सतीश धवन यांनी दिलेले उत्तर अतिशय बोलके आहे. ते म्हणाले **" आपण अंतराळात जातो, तेच मुळी जमिनीवर परत येण्यासाठी. "**

आम्ही आमचा पहिला उपग्रह तयार केला, त्याला ज्याचे नाव दिले तो एक थोर भारतीय ज्योतिःशास्त्री होता. आर्यभट नावाचे दोन ज्योतिःशास्त्री होऊन गेले. त्यांपैकी हा पहिला आर्यभट होय. त्याचा जन्म इ. स. ४७६ मध्ये झाला. यावर्षी त्याची १५०० वी जयंती आहे. आर्यभटाचे वसतिस्थान कुसुमपूर होते. कुसुमपूर म्हणजे हल्लीचे पाटणा असावे. परंतु आर्यभटाचा ' आर्यसिद्धांत ' दक्षिणेत जास्त रूढ आहे. त्यामुळे हे कुसुमपूर दक्षिणेत असावे असे कित्येकांचे म्हणणे आहे.

आर्यभटाचा **' आर्यभटीय '** नावाचा प्रसिद्ध ग्रंथ आहे. जे प्राचीन भारतीय ज्योतिष ग्रंथ उपलब्ध आहेत त्यांत ' आर्यभटीय ' हा सर्वांत प्राचीन ग्रंथ होय. आर्य-भटीयास ' आर्यसिद्धान्त ' देखील म्हणतात. या ग्रंथाची रचना वैज्ञानिक पद्धतीची आहे. भाषा सोपी आहे. त्याचे एकूण चार भाग आहेत. प्रत्येक भागास पाद असे म्हणतात. ग्रंथाची एकूण श्लोकसंख्या १२१ आहे.

यापैकी पहिल्या भागाचे नाव **गीतिकापाद**. आर्यभटाने अक्षरांच्या आधाराने संख्या लिहिण्याची सोपी पद्धत स्वतः.च तयार केली होती. ती या पहिल्या भागात त्याने वर्णन केलेली आहे. दुसऱ्या भागात अंकगणित, बीजगणित व रेखागणित यांचे काही नियम आणि काही सूत्रे विशद केलेली आहेत. या दुसऱ्या भागास **गणितपाद** असे नाव

दिले आहे. तिसऱ्या भागाचे नाव **कालक्रियापाद** असून यात कालगणनेची माहिती दिलेली आहे. ग्रहांच्या मध्यम व स्पष्ट गतीचे वर्णन या भागात आहे. चौथ्या भागात खगोलवर्णन आहे. यास **गोलपाद** असे नाव दिलेले आहे. यामध्ये ग्रहांची सूर्यापासूनची अंतरे दिलेली आहेत. ग्रहणे वर्तविण्याच्या रीती सांगितलेल्या आहेत. अशी आहे या ग्रंथाची रूपरेखा.

यांचा आणि दुसरा श्री. डब्ल्यू. इ. क्लार्क यांचा. आर्य-सिद्धांतावर सूर्ययज्वन् नावाच्या ज्योतिषाने टीका केलेली आहे. या टीकेसहित इ. स. १८७५ मध्ये डॉ. केन यांनी आर्यसिद्धांत हॉलंड देशात लेडेन येथे छापून प्रसिद्ध केला.

कोणत्याही ज्योतिष ग्रंथाची योग्यता ही त्यातील माहिती प्रत्यक्ष पडताळून पाहिल्यावरच ठरते. आर्यभट हा जगातील पहिला शास्त्रज्ञ की ज्याने पृथ्वीला दैनंदिन गती



अवकाशात झेप घेणारा ' आर्यभट

इसवी सनाच्या १६ ते १७ व्या शतकापर्यंत 'आर्य-भटीय' या ग्रंथाचे दक्षिणेत अध्ययन होत होते. आर्य-सिद्धांताच्या आधाराने तयार केले जाणारे पंचांग आजही दक्षिणेतील वैष्णव पंथात ' मान्य ' आहे. आर्यभटीय या ग्रंथाचे दोन इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध आहेत. एक श्री. सेनगुप्त

असते असे सांगितले. **आजचे वर्ष आपण जेवढ्या कालावधीस मानतो त्याची आणि आर्यभटाच्या वर्षाची तुलना केली तर फक्त ३ मिनिटे आणि १९$\frac{3}{4}$ सेकंद एवढाच फरक पडतो.** " π " ह्या अक्षराने आपण वर्तुळाचा परीघ आणि व्यास यांचे गुणोत्तर दाखवतो.

हे गुणोत्तर एक अपरिमेय संख्या आहे. यांची किंमत आर्यभटाने ३·१४१६ एवढी दिलेली आहे आणि तीसुद्धा तो अंदाजे किंमत आहे असे म्हणतो. आज पाच दशांश स्थळापर्यंत ' $\pi$ 'ची अंदाजे किंमत ३·१४१५९ एवढी आपण घेतो. आर्यभटाने दिलेली ग्रहांची अंतरेसुद्धा अशीच अचूक आहेत. **ही गोष्ट १५०० वर्षांपूर्वीची आहे हे लक्षात घ्या. त्या वेळी आर्यभट २३ वर्षांचा होता.**

त्या या थोर ' आर्यभट ' या शास्त्रज्ञाच्या १५०० व्या जयंतीचे हे वर्ष. कित्येकांच्या मनात आले असेल की एवढाच एक ज्योतिषी, गणिती आमच्याकडे होऊन गेला का ? की आमचा या क्षेत्रांतील वारसा यापेक्षाही मोठा आहे ? जेव्हा आम्ही अजंठा-वेरूळ पाहातो, तेव्हा आपला शिल्पशास्त्राचा वारसा पाहून आपलं मन केवढं भरून येतं. वाङ्मयक्षेत्राच्या प्राचीनत्वाच्या बाबतीत तर आमची बरोबरी कोणीच करू शकणार नाही. कालिदासाचे ' शाकुंतल ', भर्तृहरीचे ' नीतिशतक' भगवान श्रीकृष्णाची ' श्रीमदभगवद्‌गीता ' याच देशात निर्माण झाली संस्कृतातील दर्जेदार ग्रंथांची नामावली किती म्हणून द्यावी ! भगवान महावीर गौतमबुद्ध, आद्य शंकराचार्य असे धर्मवेत्ते आमच्या येथे झाले. ह्या थोरांनी शाश्वत स्वरूपाची काही मूल्ये आमच्या मनात इतकी खोलवर रुजवलेली आहेत की हजारो वर्षे लोटून गेली तरीही त्या तत्त्वांचे बोल आमच्या अंतःकरणातून अद्यापही कायम स्वरूपात स्थिर आहेत, अधिकाधिक दृढ होत आहेत. योगविद्येचा आमचा वारसा मोठा आहे ही गोष्ट तर दुसरेच लोक आम्हांला ओरडून सांगत आहेत; आणि मग आम्ही म्हणतो आहोतं की खरेच हा वारसा आमचा आहे, तो मोठा आहे.

हे आमच्या नशिबातच असेल कदाचित. अजिंठ्याचे दर्शनही आम्हांला पाश्चात्यांनीच घडविले, आमच्या मराठीचे व्याकरण परकियांनी लिहिले. याबाबतीत मला एक नुकताच घडलेला प्रसंग आठवतो. जगातील पहिले हृदयारोपण करणारे प्रसिद्ध शल्य-विशारद डॉ. खिश्चन बर्नार्ड भारतदौऱ्यात एका प्रसंगी म्हणाले " एकाचे अवयव दुसऱ्याला बसविण्याच्या शस्त्रक्रियांच्या बाबतीत आमचे कौतुक काय करता ? अशा शस्त्रक्रिया प्राचीन भारतात झालेल्या आहेत. गणपती हे कशाचे द्योतक आहे ? " अजूनही आमचा अभिमान जागा झालेला नाही, आमच्या बळाचा आत्मविश्वास अजूनही आमच्यात निर्माण झालेला नाही. परकीय वस्त्रांना आम्ही अजूनही सरसच मानतो असे का व्हावे ? ज्या भारताची तलम वस्त्रे जगाच्या बाजाराच्या कोपऱ्या कोपऱ्यात खपत होती त्या विशाल भारताच्या भाळी ही अधोगती कुण्या दैवाने लिहिली !



गणपती : एक शस्त्रक्रियाच

ह्या साऱ्या विचारांच्या कोलाहलात कित्येकदा असा प्रश्न चमकून जातो की, आमच्या पूर्वजांनी आधुनिक वैज्ञानिक गणित क्षेत्रात काही प्रगती केली होती का ? या प्रश्नाचे उत्तर आम्हांला मोठे भूषणावह आहे, अभिमानास्पद आहे. लागोपाठ होणाऱ्या आक्रमणांनी आणि परकीयांच्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष हस्तक्षेपांनी दबू पाहणाऱ्या आमच्या अस्मितेला पुन्हा प्रचंड प्रेरणा देऊन उमलून यायला लावणारे आहे.

प्राचीन भारत हा गणितामध्ये अन्य राष्ट्रांच्या तुलनेने फारच पुढे होता. दशांकी संख्या पद्धती-जी आज सर्व जगामध्ये वापरली जाते आहे ती-भारतामध्ये इ. स. पूर्व २००० च्या आसपास निर्माण झाली. **गणितातील ' शून्य ' भारतानेच जगाला दिले आणि आजचे विज्ञान-विश्व केवळ ह्या शून्यामुळेच निर्माण होऊ शकले.** इसवी सन ३०० पूर्वीचा शिलालेख नाणे घाटात सापडला. त्यावरील लेख पाहता इ. स. ३०० पूर्वी तर

भारतीयांना अंक निश्चित माहिती होते हे अनुमान निघते. शुक्र युजुर्वेदामध्ये परार्ध $१०^{१२}$ पर्यंत संख्यांचा उल्लेख आहे. प्राचीनकालच्या 'मैत्रयणी', 'काटक' ह्या संहितात तसेच पंचविंश ब्राह्मण, सांख्यायन, श्रौतसूत्र इ. ग्रंथांतही संख्यांच्या नावाचा उल्लेख आहे. इ. स. पूर्वीच्या १०० सालच्या 'ललित विस्तार' या बौद्धग्रंथात $१०^{५३}$ तल्लक्षण या संख्येचा उल्लेख आहे. दशांकी संख्या पद्धती भारतीयांना माहिती असल्याचा इ. स. पूर्व ६ व्या शतकापर्यंतचा पुरावा उपलब्ध आहे.

ही गणितशास्त्र आणि खगोलशास्त्राची वाढ पुरातन काळापासून बऱ्याच काळापर्यंत भारतात अव्याहतपणे चालू होती. इ. स. ४७६ मध्ये आर्यभट हा ज्योतिर्विद होऊन गेला. संशोधकांची ही परंपरा इ. स. ११५० पर्यंत म्हणजे प्रसिद्ध गणिती व 'लीलावती' या ग्रंथाचा कर्ता भास्कराचार्य ह्याच्यापर्यंत अखंड चालू होती.. ह्या साखळीतील काही दुवे सारांशाने असे देता येतील :

१ आर्यभट २ लल्ला ३ पद्मनाभ (बीजगणित) ४ श्रीधर ५ महावीर ६ भास्कराचार्य.

भास्कराचार्य हाही प्रसिद्ध गणिती होऊन गेला. गुरुत्वाकर्षणाची कल्पना भास्कराचार्यांस होती. गुरुत्वाकर्षणाच्या कल्पनेचे जनकत्व न्यूटनला दिले जाते. तो १७ व्या शतकातला तर भास्कराचार्य हा १२ व्या शतकांतील, हे लक्षात घ्यायला हवे.

दुर्बिणीचा शोधक गॅलीलिओ १६ व्या शतकातील. त्याने दुर्बिणीचा शोध १६१० मध्ये लावला आणि तरी देखील मोठ्या लोक-विरोधाला त्याला त्या काळी युरोपात तोंड द्यावे लागले. याउलट त्याच्या कितीतरी अगोदरपासून आमच्या ज्योतिर्विदांना राजदरबारी मान होता. भास्कराचार्य हा उज्जैनीच्या वेधशाळेचा प्रमुख होता.

आमच्याकडे वेधशाळा होत्या, धर्मपीठे होती, धाडस होते, चिकित्सक वृत्ती होती, संशोधकाची दृष्टी होती, सारे सारे काही होते. कुठे लोप पावले हे सारे ! की ही सारी प्रज्ञा एकाएकी नष्ट झाली ! इ. स. ६०० च्या सुमारास अरबांनी हे ज्ञान आमच्याकडून घेतले. पुढे त्याचा युरोपात प्रसार झाला.

तरीपण प्रश्न राहतोच की एवढे सारे असूनही युरोपात जे आधुनिक विज्ञान उदयास आले ते आमच्याकडे का जन्मास आले नाही. एवढी पुण्याई असताना ती शाखे भारतभूमीत का टिकून राहिली नाहीत ?

याचे उत्तर एकच. नंतरच्या काळात आमच्यावर एका मागून एक परकीय आक्रमणे झाली. कोणतीच राज्यसत्ता स्थिर नव्हती. या काळात आमचे बहुतांश बुद्धिवैभव राजकारणाकडे खेचले गेले तर उरलेले कर्मकांडाकडे ओढले गेले. त्यावर गंज चढत गेला. हे सारे थेट १९ व्या शतकापर्यंत घडत गेले. १९ व्या शतकाच्या अखेरीस आमच्या चिकित्सक वृत्तीला चालना मिळू शकली आणि आमच्यातून रामानुजनसारखे पहिले गणिती बाहेर आले. लंडनच्या रॉयल सोसायटीने त्यांना F. R. S. पदवी दिली.

अस्थिर किंवा परकी राज्यसत्ता बुद्धिवंतांना वैज्ञानिक क्षेत्रापासून कशी दूर नेते याची बरीच उदाहरणे देता येतील. लोकमान्य टिळक गणिताचे गाढे अभ्यासू. कलन शास्त्रावर (Calculus) त्यांचे संशोधन सुरू झाले होते. पण परिस्थितीमुळे ते अपरिहार्यपणे राजकारणांत शिरले.

वैज्ञानिक प्रगतीसाठी आमच्या शासनाने आणि समाजाने जास्तीत जास्त अनुकूल परिस्थिती निर्माण केली तर आमचे शास्त्र आणि शास्त्रज्ञ जगाच्या मागे न राहाता रेसभर पुढेच राहतील. १९ एप्रिल १९७५ ला आर्यभटाने अवकाशात झेप घेऊन हाच संदेश आम्हा भारतीयांना दिला आहे.

**संदर्भ :**


(1) The Illustrated weekly of India. Vol XCV I18 Sunday May 4, 1975

(२) भारतीय ज्योतिषशास्त्र अथवा भारतीय ज्योतिषशास्त्राचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास. लेखक कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित.

(३) The Treasury of Mathematics : Henrietta Midonick.

(४) महाराष्ट्रीय ज्ञानकोश. विभाग आठवा. संपादक: डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर.

(५) महाराष्ट्रीय ज्ञानकोश : विज्ञानेतिहास. संपादक : डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर.

(६) भारतीय संस्कृति-कोश. प्रथम खंड संपादक : पं. महादेवशास्त्री जोशी.

(७) अभिनव मराठी ज्ञानकोश संपादक : गणेश रंगो भिडे.

For lasting wear
For lasting satisfaction
For elegance and delight
the choice of the elite

PITTIE FABRICS
for
facinating designs
in
captivating colours

Retail Counter
at
Zilla Parishad Building
Poona 11

For Drafting Machines in
a various models,
Minidrafters,
Internal Grinding Machine,
Quick Change Chucks, Collets,
Floating Reamer Holders,
Reduction Sleeves etc· etc.,

Remember
'PITTIE'

The Make Renowned
For Satisfaction

*Manufactured by*

# The Raja Bahadur Motilal Poona Mills Ltd.

**POONA 1**

**Local Authorised Dealers**

JAY FABRICS,
Opposite : Vishrambaug Wada P. O,

GOYAL VASTRA NIKETAN,
714, Narayan Peth, Laxmi Road,

**Registered Office**

Hamam House, Ambalal Doshi Street, Bombay 400 001
Phone 255697

# मी स्वेटर विणते !

कु. प्रज्ञा भागवत
द्वितीय वर्ष शास्त्र

अशीच एक उन्हाळ्याची कंटाळवाणी, रटाळ सुट्टी. आश्चर्य वाटतंय ना कंटाळवाणी म्हटलं म्हणून ? पण खरंच मला सुट्टीत अगदी कंटाळा येतो— कुणी मैत्रिणी गावाला गेलेल्या असतात. कुणी गावाहून नुकत्याच आलेल्या असतात... तर कुणी जाऊ घातलेल्या असतात.

अन् दुसरी गोष्ट अशी, की त्यांच्या माझ्यात कित्येक किलोमीटरचं अंतर असतं. मग ते बसच्या लाईनीत उभं रहायचं, तिची प्रतीक्षा करायची आणि मग ४।५ तासांचा प्रवास करून मैत्रिणींशी फक्त अर्धातासच गप्पा मारून परतायचं— परत पुन्हा त्याच वैतागवाण्या प्रोसिजरनं घरी यायचं... हूं !

अशा पद्धतीनं ३६ मैत्रीणींना भेटायचं म्हणजे मला फक्त बसस्टॉपवरच रहायची वेळ येणार. त्यापेक्षा दुपारच्या वेळी दिवाणावर लोळत लोळत हातात सुंदर कादंबरी घ्यायची, शेजारी वाटीत बर्फाचे तुकडे ठेवायचे... ते चघळत चघळत कादंबरीत रंगून जायचं. आहाऽऽ! काय सुंदर कार्यक्रम असायचा माझा...

आणि अशा या सुंदर अत्यानंद मिळवून देणाऱ्या कार्यक्रमावर दादाच्या त्या वाक्यानं पाणी पडलं— आणि मग वाटीतल्या बर्फासारखं माझ्याही काळजाचं पाणी पाणी झालंय हे दाखवण्यासाठी मला चक्क ग्लिसरीनचा उपयोग करायची वेळ आली... आणि मग माझ्या डोळ्यातलं पाणी बघून दादाची अवस्था मात्र बर्फासारखी झाली.

बिच्चारा ! कित्ती दिवसांनी फील्डअेरियातून आला होता.

"गधडे, लोळत काय पडलीयस ? जरा काही तरी उद्योग करा. शिवण शीक. भरतकाम शीक. ते ३ वर्षांपूर्वी शालिनीच्या लग्नात रुखवतासाठी करायला घेतलेलं शटलवर्क पुरं कर..." इत्यादी इत्यादी बोलून झाल्यावर मग—

"थोडी फुगलीय नुसती म्हशीसारखी..." बापरे ! खरंच फुगलेय का काय ते बघण्यासाठी ताडकन् आरशासमोर जाऊन उभी राहिले. पण चक्क मी त्या आरशात संपूर्ण व्यवस्थित मावत होते.

हुश्श ! देवा गं ! नशीबानं म्हशीसारखी झाले नव्हते अजून. पण मग आता काय करावं बरं ?...या विचारात मी प्रत्येक दिवशी एक असे ६ सिनेमे आणि दोन-चार नाटकं पाहून घेतली. हो ! उरलेल्या सुट्टीत मला काही तरी करायचं होतं ना ! मग एकदा कामाला लागलं की नंतर मला वेळ कसा मिळाला असता ?

आणि सुचली...एकदम फॅन्टास्टिक आयडिया मनात आली. आतापर्यंत आपलं सायन्ससाईडमुळे दुपारचं कॉलेज असायचं. पण आता चक्क आठवड्यातला एक दिवस stat pr: ct च्या निमित्तानं सूर्योदय बघायला लागणार होता. नाही तर सूर्यास्त बघूनच, असाच सूर्योदय दिसत असावा...पण फक्त पूर्वेला अशा समजुतीत मी वावरत असे. असो ! तर सांगायचा मुद्दा...एरवी आठवड्यातून एक दिवस ५ चा गजर लावून ६ वाजता उठता येणं सहज शक्य होतं हो ! पण थंडीच्या दिवसात ?... ते कसं जमलं असतं ? मग थंडीत, दर गुरुवारी भल्या पहाटे ७ च्या बसनी कॉलेजला जायचं ! म्हणजे नुसत्या शालीवर भागणार नव्हतं.

तेव्हा मनात एक विचार नक्की ठरला. बस्स ! एक सुंदर (?) स्वेटर विणायचा. निश्चय होताच डिक्लेअर करून टाकला. तेव्हा दादा म्हणाला, "तुझ्यापेक्षा थोडी लुकडी आणि थोडी जाड अशा दोन मैत्रीणी आजूबाजूला मार्जिनसाठी ठेव. म्हणजे सैल झाला तर जाडीला अन् घट्ट झाला तर लुकडीला बक्षीस देता येईल." झालं ! प्रथम ग्रासे मक्षिकापातः ! पण तरीही मी मनाला अजिबात लावून न घेता हौशीनं लोकर आणायला दुकानात गेले.

आहाहा ! एकेक इतके सुंदर सुंदर रंग पाहिले... की मी फक्त पहातच राहिले. अबोली, गुलाबी, किरमिजी आकाशी...सारे रंग मला खुणावीत होते...तर लाल, जांभळा, मरून कलर्स उत्सुकतेने बघत होते. आईग्ग ! काय करावं बाई काहीच सुचेना. कुठला रंग निवडावा ?

शेवटी एका इंग्लिश कलरनं माझं लक्ष वेधून घेतलं. सगळ्यांना मागे टाकून हा off white माझ्या मनात ठसला. चला रंग तर पक्का झाला. अय्या ! पण किती

...१०

लोकर लागेल याचा कुठे अंदाज विचारून आले होते? आता काय करावं? शेवटी दुकानदारालाच विचारलं, "काय हो माझ्याएवढ्या मुलीला स्वेटर करायला किती लोकर लागेल?" आणि ते सुंदर ऑफव्हाईट १० औंसाचे बॉल्स घेऊन मोठ्या दिमाखात घरी आले.

"हाय! काय सुंदर कलर आहे वन्सं!" वहिनी चित्कारली. "पण... च्यायला कलर तर टॉप आहे, पण आपला स्वेटर तयार झाला, की लोकांना सांगायची वेळ येईल की हा पूर्वीचा ऑफ व्हाईट होता म्हणून. युसलेस मुलगी आहेस झालं!" दादिटल्याचा रिमार्क पास झाला.

"तर काय! म्हशीला सांगितलं होतं, गडद रंग निवडून आण. पण जरा अक्कल वापरील तर ना!" आईसाहेब खेकसल्या, "आणि वेळच्या वेळी जाऊन रंग बदलून आणलास तर ठीक आहे. नाही तर मलाच तुझ्यासाठी लोकर आणावी लागेल. तेव्हा आताच्या आता जाऊन दुसरा रंग घेऊन ये." हाय रे देवा! मातोश्रींनी फर्मानच काढल्यावर मुकाट्यानं घशाशी आलेला आवंढा गिळून मी परत दुकानात गेले.

"क्यों बहेनजी, ये कलर आपको पसंद नहीं है?" दुकानदारानं मिस्किलपणे विचारलं. आता याला काय सांगू कर्म? "नहीं! वैसी तो कोई बात नहीं है! मगर ये कलर भाभीजीको पसंद नहीं है" असलं गुळमुळीत उत्तर देऊन मी पुन्हा त्या रंगील्या दुनियेत प्रवेश केला.

सगळे सुंदर सुंदर फेंट कलर्स अगदी निरुत्साहानं तोंड उतरवून बसले होते. आणि डार्क कलर्स मला वाकुल्या दाखवून खिजवत होते.... परमेश्वरा... काय करावं? कुणाला निवडावं? (नाही म्हणजे रंगालाच बरं का)... आणि मग स्वयंवरातल्या राजकन्येची मनःस्थिती कशी होत असेल याची पुसटशी जाणीव झाली. शेवटी माझ्यापुढे इतका ढीग झाला, की तो दुकानातला पोऱ्या त्या ढीगामागे लपला गेला. शेवटी निकराचा प्रयत्न म्हणून त्यानं मला एक बऱ्यापैकी रंग दाखवला. आता जर आपण रंग पसंत केला नाही, तर सगळे लोक हसणार, मूर्खात काढणार! छेः! शेवटी मग माझ्या इतक्या वेळच्या रटाळ पसंतीचं खापर मी त्या दुकानदारावरच फोडलं.

"अय्या! किती छान! काय हे? आधीच दाखवला असतात, तर इतका ढीग दाखवायची वेळच आली नसती" वगैरे वगैरे बोलून...मी सुटका करून घेतली. त्या रंगीबेरंगी दुनियेतून आणि मग रस्त्यातून जाता जाता संयोगितेने शेवटी, सर्वांत शेवटी उभ्या असलेल्या पृथ्वीराजालाच का माळ घातली असावी याचा उलगडा झाला.

अशा रीतीनं 'ती' (लोकर) एकदाची घरी आली. आता मग किती नंबरच्या सुया वापराव्यात, काठ कसा करावा, डिझाईन कोणतं घ्यावं,... वगैरे वगैरे चर्चित मी अन् वहिनीनं चक्क मंगळागौरीपेक्षा जास्त जागरण केलं.


जनरल इंग्लिश कोर्स

(बोलणे-लिहिणे)

मॅट्रिक, नॉन-मॅट्रिक, कॉलेज

व

शाळा-विद्यार्थ्यांसाठी

जास्त माहितीसाठी भेटा

पिटमन्स क्लासेस

लक्ष्मी रोड, सेवासदन जवळ, पुणे

छंद आणि कमाईसाठी

रेडिओ सर्व्हिसिंग शिका

(प्रॅक्टिकलसह-तीन महिने)

बॅचेस : सकाळी-संध्याकाळी

जास्त माहितीसाठी भेटा

प्रिमियर इलेक्ट्रिक क्लासेस

लक्ष्मी रोड, सेवासदनजवळ, पुणे

आणि एक स्वेटर फॉर्म्युला तयार केला.

× × ×

" अय्या काय करायला घेतलंयस ? "

" स्वेटर गं ! थंडीच्या दिवसांसाठी."

" पण इतक्या लवकर ? "

" अग आत्ताच करून ठेवतेय. पुढे कॉलेज सुरू झाल्यावर कुठे वेळ मिळणार आहे करायला ? " अशा प्रकारे चाललेल्या माझ्या अन् आदितीच्या गप्पांमध्ये दादासाहेबांनी तोंड खुपसलं.

" त्याचं असं आहे... ७५ च्या मे मध्ये करायला घेतलेला स्वेटर ७६ च्या थंडीसाठी नक्कीच वापरता येईल. तोवर गेल्याच वर्षी डिसेंबरमध्ये पटकवलेले २ जुने (च) स्वेटर आमच्या ताईसाहेब वापरणार आहेत बरं का ! शेवटच्या जुन्या शब्दावर जोर देत दादासाहेब बडबडले.

आणि मग हे असं वारंवारच व्हायला लागलं. हो ! आता इतक्या मैत्रिणी. म्हणजे जवळजवळ daily एकीची भेट. त्यातून मी एक सुंदर (?) स्वेटर बनवत होते ना ! मग भेटायला येणाऱ्यांची गर्दी वाढतच चालली होती.

सारखं तेच तेच " पुढच्या वर्षी वापरायला मिळणार " ऐकून इतकी वैतागले, इतकी वैतागले की " आत्ता १५ दिवसात करून दाखवते, वाटलं तरी काय तुम्हा लोकांना ? " असं बोलून गेले.

माय गॉड ! या भयंकर प्रतिज्ञेनंतर मी खाडकन शुद्धीवर आले.

च्यायला ! (Sorry, चुकले हं ! आमच्या आईला तेवढं Please सांगू नका मी हा शब्द उच्चारला म्हणून. ' साली ' सवयच वाईट लागलीय ) भलतीच प्रतिज्ञा करून बसलेय. आता कसं व्हायचं ?

पण तरी जिद्दीनं (?) बसले. पहिल्या दिवशी पुढच्या भागाचा संपूर्ण काठ करून झाला. आता वीण घालायची. पिक्चरही मन लावून बघत नाही इतकी ती वीण मन लावून शिकले. पुढे ४-५ दिवसांत पहिला भाग तयार झाला. झालं ! पंधरातले ४ दिवस फक्त पहिल्या उजव्या भागानेच खाल्ले होते. अजून डावा भाग, मागचा प्रचंड मोठा भाग, दोन लांब लांब बाह्या, कॉलर, बटण पट्ट्या, ...आई गं, कसं व्हायचं या ' प्रश्ने'चं अन् प्रतिज्ञेचं ?

पण नाही. हिंमत हाटायची नव्हती ! सुरवातच तर आहे. लागणारच इतका वेळ मनाची आपली समजूत घातली. पण मनात टोचणी चालूच होती, भलतेच शब्द उच्चारल्याची.

" फिरोज दारूवाला यास अखेर फाशी झाली " दादा मोठ्यानं वाचत होता.


*With Compliments From :*

**Maharashtra Suppliers**

**HOSIERY MERCHANTS**

- ☆ **Cotex Hosiery factory,**
- ☆ **Stretchlon-nylon Socks,**
- ☆ **Omtex Hosiery Mills,**
- ☆ **Cali-ber Socks**

180, Budhwar Peth,
Poona 411002

**ETALIA**

**Men's Wear**

52 Budhwar Peth,
Laxmi Road, Poona 411 002

♣ ♣

**Suit Specialists at reasonable rates**

**Best Tailor in Town**

♣ ♣

*Ask for 1 Day Delivery*

"आई ग ! सुटला," इति मी.

"सुटला काय मूर्खे ? फाशी झाली म्हटलं तर" दादा चिरकला.

"असं काय रे ! माझा टाका सुटलाय सुईवरचा ! वहिनी ! ए वहिनी ! आधी धावत ये !"

बिचारी खरंच स्वैपाकातून धावत आली. पाहिलं तर हात कणकीनं माखलेले.

"ए वहिनी, लवकर हात धू नं, ! माझा टाका सुटलाय"

"वन्स ! मी सांगते तसा तो घ्या उचलून." म्हणून बिचारी बराच वेळ सांगत होती. पण छे ! नुसत्या थिअरीवर कसं भागणार होतं ?

"वहिनी प्रॅक्टीकली करून दाखव ना गं !"

"अहो ! तुमच्या लक्षात आलं असलं, तर द्यां ना त्यांना तेवढा टाका उचलून."

आणि काय गंमत. खरंच दादानं तो टाका मला पटकन उचलून दिला ! दिला मात्र, अन् एक विजयी हास्य फेकीत अंघोळीला चालायला लागला.

"असू दे ! आमचा पहिलाच टाका सुटलाय हं ! मला काय माहीत हे कसं करायचं असतं ते. इतकं काही हिणवायला नकोय."

आताशी मी हा दुसरा भाग करायला घेतलेला असतो. दहा दिवस उलटून गेलेले असतात. माझं अवसान गळत गळत चाललेलं असतं.

आणि मग "सारखा किती बाई स्वेटर विणीत बसायचा" म्हणून वहिनीला घेऊन दोनतीन सिनेमे-नाटकं बघून झाली.

आता एव्हाना १५।२० दिवस उलटून गेलेले होते. माझा उत्साह मावळत चालला होता.

"वन्स, मी देऊ का विणून थोडा"

"नको बाई वहिनी ! माझा मीच विणणार आहे."

एव्हाना महिना उलटला होता. पुढचे दोन भाग करून झाले होते. आता फक्त मागचा भाग, दोन्ही बाह्या, कॉलर अन् बटणपट्ट्या इतकंच काय ते करायचं उरलेलं होतं.

कॉलेज सुरू व्हायचे वेध लागलेच होते. कादंबऱ्या नाटकं-सिनेमे, मैत्रिणींशी गप्पा यांचा मोह टळत नव्हता. कुठं जायला निघाले की त्या अर्ध्या स्वेटरची आठवण येऊन घाम फुटायचा.

इकडे आतापर्यंत आईसाहेब शान्तपणे बघत होत्या. पण आता ती देखील, "गधडी स्वतः करणार नाही, दुसऱ्याला करू देणार नाही" इ. इ. बोलू लागली.

पण तरीही मी खंबीरपणे स्वेटर करतच राहिले. रोज बसमधून जाता येताना विणीतच होते. पण तरी आता Sem System असल्यानं सारखी 'ट्यूट'स चाललेली. बरं एकीकडे धम्माल करणंही चाललेलं. आता तुम्हीच सांगा, कसा वेळ मिळावा ? पण नाही ! हे समजून घेतील, तर ती आमच्या कडची माणसं कसली !

पण तरी हो नाही करता करता... एकदांचा तो ऑगस्टमध्ये पुरा झाला. मी घालून बघितला. आणि हाय ! तो स्वेटर माझ्या जाड्या मैत्रिणीलाही सैल झाला असता इतक्या त्याच्या बाह्या प्रचंड झाल्या होत्या— चक्क डबल बाह्या— आणि लुकड्या मैत्रिणीला घट्ट झाला असता इतका त्याचा गळा निरुंद झाला होता.

मग मी idea च केली. कुणाकडे म्हणजे अगदी कुण्णाकडे काहीच बोलले नाही. मी स्वतः कॉलेज, प्रॅक्टिकल्स, ट्युटोरिअल्स मध्ये busy होतेच. दादाही Field Area त निघून गेलेला. लोक माझा स्वेटर करणं विसरले होते. म्हणतात ना, Public memory is very short.

हिवाळा आला. आता याचं मेलं काहीतरी करायलाच हवं म्हणून बॅगमधून बाहेर काढला... कुठंकुठं काय काय करावं लागणार याचा अंदाज यावा म्हणून घालून पाहिला. घातला तर काय आश्चर्य ! एकदम छान बसला की... आरशासमोर जाऊन खात्री करून घेतली. थंडीनं बाह्या आक्रसल्या अन् उबेनं गळा रुंद झाला की काय ? काही म्हणजे काहीच समजेना... दिसत तर होता सुंदर पुन्हा आरशात पाहिलं... माझ्या प्रतिबिंबामागंच वहिनींचं हसरं प्रतिबिंब दिसलं... एकदम ट्यूब... च्यायला ! ( ? ) वहिनीनं कधीतरी परस्पर उसवून पुन्हा विणला वाटतं...

पण हे कुणाला सांगू नका हं !

# तिसावी मुलाखत

**मारुती माने**
तृतीय वर्ष कला
आणि
**विजयकुमार शौनक**
द्वितीय वर्ष कला

'नमस्कार'!

'राम राम!!'

'तुम्ही ग्यानबा खिलारी का?'

'मला कसं काय वळकलं? तसा ग्यानबाचा दरारा हाय म्हना!'

ग्यानबा, तुम्ही फार दारू पिता म्हणे?'

'मंग! प्यालो तर कुनाच्या बाच काय जातंय? म्या कमावतो, म्याच घालवनार.'

'तुम्हाला पगार किती हो ग्यानबा?'

'शंभर, तीस अन् पाच बोटाचं पाच.'

'काम काय करता?'

'चमड्याच्या कारखान्यात हाय कामाला.'

'तुमचा पगार इतका कमी? घरात चार पोरं अन् बायको, कसं काय भागतं हो ग्यानबा तुमचं?'

'ह्ये बगा, तीस पस्तीसाची दारू, चार-पाच रुपयाची बिडीकाडी, पावशॅपलचे वीसपंचवीस आन् आठ-दहा रुपये आकड्याचे, उरलेले समदे घरातच की हो!'

'अहो एवढ्यात त्यांनी काय करावं?'

'ज्यानं-त्यानं आपआपलं पघून घ्यावं.'

'ग्यानबा, तुमची मुलं काय करतात हो?'

'थोरला रामूदादाच्या भट्टीवर जाळ घालीत बसतोय. तिकडच खातो, पितो अन् झोपतो.

'दुसऱ्या प्याराचंबी तसंच. सुरयाभय्याच्यां हाटलात टेबल पुसतोय, त्योबी हाटलातच खातो अन् रहातो. थोरली प्वार हाय! सकाळच्या पारीला जाती अन रातची धा-पंद्रा रुपडे घिऊन येती. धाकटं प्वार रडत रडत आईला सोबत करतं. तसं पगा आमची फ्यामिली लइ ब्येस हाय!'

'कुटुंबनियोजनावर तुमचं काय मत?'

'ह्ये पगा, चार प्वारं जालीत. समदी कामधंद्याला लागलीत. आज अजूनही चार झाली तरी उपाशी मरायची न्हाईत. आज दुनियेत आमच्या प्वारांची लई गरज हाय,'

'काय हो ग्यानबा, तुम्हाला ह्या मुलांच्या भवितव्याची काहीच काळजी वाटत नाही?' आता मात्र ग्यानबाचा चेहेरा लालबुंद झाला आणि शिरा ताणत कठोरपणे म्हणाला, 'आता येक करा हिथून आले तसे जावा.'

आम्ही गोंधळलो, बावचळलो, आणि पुन्हा विचारते झालो. 'ग्यानबा तुमच्या, मुलाच्या भवितव्याचं काय?' ग्यानबा त्याच पट्टीत म्हणाला, 'मी साळत तिसऱ्या यत्तेत व्हतो. एका साहेबानं माझ्या बाला हाच प्रश्न इचारला. माझ्या बानं मोठ्या आशेनं सांगितलं ह्याला साहेब करीन.

'पन...'

'पण काय ग्यानबा?' माझी उत्सुकता ताणली गेली...

'काय सांगू माजं करम. त्या दिवशी म्या शाळंत निघालो. माझा बा पाटलाच्या दारात लाकडं फोडत व्हता. लाकडावरचा घाव चुकला अन्... बा लंगडा झाला... ...अगदी जल्माचा! अन एक महिन्याच्या आत उपाशी तडफडून मेला. मग माजं अन आईच प्वाट जाळण्यासाठी साळच दप्तर खुंटीला. आन धा वर्स पाटलाची जनावर राखली. एक दिस जनावर शेतात घुसली आन् गुराऐवजी पाटलान ह्या ग्यानबाची पाठ सोलली. गाव सोडलं, हिकडं आलो, दोन वर्स हातभट्टीला जाळ घातला. एक दिस एका दारुड्याच्या नादानं चमड्याच्या कारखान्यात आलो. लगीन जाल एक दिस आन् चार पोरंबी जाली त्याचं त्ये आणि...तर... म्या काय सांगू?'

'ग्यानबा, भिऊ नका, मी तुमच्या मुलासाठी अवश्य काही तरी करीन.'

'माजा या गोष्टीवर इश्वास न्हाई. लईजनाकडं म्या आसेनं पाह्यलं. वाटलं कुनीतरी माझ्या पोरांचा उद्धार करील. पन...जाऊ दे!'

पण ग्यानबा, हे सारं तुमचं दुःख मी जनतेपुढे मांडीन!'

'व्हय सायिब! लइ जनांनी मांडलं की. त्याच्या-बदली त्यांला बक्सीशी बी मिळाली. पर म्या आन् माजी पोर... !

'अहो पण ही तुमची मुलाखत मी छापीन.'

'व्वा! व्वा!! मंग लई ब्येस व्हईल. तुमालावी बक्सीसी मिळल. अवो सायब, ही माजी तिसावी मुलाखत हाय... !'


शुभेच्छा!

हॉटेल विश्वकमल

लॉजिंग–बोर्डिंग–रेस्टॉरंट

♠ ♠ ♠

प्लॉट नंबर ४७५,
स्वारगेट जकात नाक्यासमोर,
पूना-सातारा रोड, पुणे ९
फोन नं.: ४१३२८
४३२८८

Vidya Commerce House

374–A Shanwar Peth,
Opp. Kanya Shala, Poona 30

♠ ♠ ♠

COMMERCE BOOK DEPOT
COMMERCE LIBRARY
COMMERCE GUIDANCE CENTRE

शुभेच्छा! फोन नं.: ४१११९
४१२१६

ऑटोमोटिव्ह सर्व्हिसेस

अशोक हाउस, टिळक रोड,
पुणे २

टाटा डिझेल वाहने व स्पेअर पार्टस्
यांचे
अधिकृत विक्रेते

शाखा : सातारा, सांगली, कराड.

Shri. G. S. Hasabnis
Agent
( Code No. 2061951 )

The Life Insurance Corporation of India

★

Residence : Hasabnis Lane
445, Shaniwar Peth, Pune 30
Office : Ganapati Chowk,
42 Budhwar Peth, Pune 2

# चलो दिल्ली !

**भूपाल वाव्हळ**
प्रथम वर्ष वाणिज्य

दिवाळीची सुट्टी लागताक्षणीच आम्हाला २ कॅपम्स् करावे लागले. त्यांत दुसरा कॅम्प ( Combined Leadership Camp ) हा दिल्लीच्या निवडीसाठी होता. यासाठी आलेले कॅडेट्स् [ छात्र सैनिक ] विविध बाबतीत प्राविण्य मिळविलेले होते. या सर्वांमधून ७२ कॅडेट्स्, ( ५५ मुले आणि १७ मुली ) निवडल्या होत्या. नंतर पुन्हा प्री–रिपब्लीक–डे ( Pre Republic Day) कॅम्पमध्ये निवडलेल्या कॅडेटस्ना खास प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणानंतर...अखिल भारतीय पातळीवर आंतर-राज्य स्पर्धांसाठी आणि प्रजासत्ताक दिनाच्या संचालनासाठी १६ राज्यांचे संघ ( दल ) भारताच्या राजधानीत ९ जानेवारीस दाखल झाले. एन्. सी. सी. प्रमाणे इतरही अनेक कॅम्प्स् आले होते. सर्व ठिकाणी छावण्या उभारलेल्या होत्या. लष्करी गाड्या ये-जा करीत होत्या. इकडे-तिकडे रणगाडेही दिसत होते. क्षणभर आपण युद्धभूमीवर असल्याचा भास होत होता. या वातावरणात एक प्रकारची शिस्तबद्धता होती.

एन. सी. सी. साठी स्वतंत्र मैदान दिले गेले होते. सर्व कॅडेटसमध्ये उत्साह आणि औत्सुक्य पसरले होते. दुसऱ्या दिवसापासून आंतर–राज्य स्पर्धा सुरू झाल्या. प्रत्येक राज्य आपापल्या परीने स्पर्धा जिंकण्याचा प्रयत्न करीत होते. यामध्ये राजस्थानपासून आसामपर्यंत आणि काश्मीरपासून तामीळनाडू–केरळपर्यंतच्या सर्व राज्यांनी भाग घेतला होता. दिवसभर अशा स्पर्धांमध्ये वेळ गेल्यावर रोज संध्याकाळी सर्वजण सांस्कृतिक कार्यक्रमास भव्य शामियान्यामध्ये एकत्र येत होते आणि आपआपल्या राज्यातील वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम सादर करीत होते. राजस्थानी मुले–मुली आपला पेहराव करीत तर काश्मिरी मुले–मुली आपला पेहराव करीत. त्यामुळे आता आम्ही नुसत्या पेहरावावरून कोण कुठल्या राज्याचा आहे हे सहज ओळखू शकत होतो. स्पर्धा चालू असेपर्यंत मला राष्ट्रीय एकात्मतेचे भाव फार थोड्या प्रमाणात आढळले. कारण जो तो आपले राज्य पुढे आणण्याच्या प्रयत्न करीत होता. अखेर या स्पर्धा १८–१९ जानेवारीच्या सुमारास संपल्या व २६ जानेवारीची प्रजासत्ताकदिनाच्या संचलनाची तयारी सुरू झाली.

यासाठी आर्मी विंग, नेव्हल विंग, एअर विंग, गर्ल्स विंग आणि ज्युनियर विंग्ज बनविले गेले. तेथील एअर विंगमध्ये सर्व राज्यातील निवडक ७२ मुले होती. या वेळेस मात्र मी राष्ट्रीय एकात्मतेचा अनुभव घेतला. प्रत्येकजण आपले, आपल्या विंगचे, एन. सी. सी. चे संचलन चांगले व्हावे या करिता धडपडत होता. आम्हाला इंडिया गेट ते रेड फोर्टपर्यंत संचलन करावे लागले. हे अंतर सुमारे ३० कि. मी. असून त्यासाठी २॥ तास १४ पौंडी रायफलसह सतत मार्चिंग करावे लागले. आमच्या मानवंदनेचा स्वतः राष्ट्रपतींनी स्वीकार केला.

आमच्या छात्रसेनेच्या कॅम्पला चीफ ऑफ दी स्टाफ्स, जनरल टी. एन. रैना, ॲडमिरल एस. एन. कोहली आणि एअर चीफ मार्शल ओ. पी. मेहरा भेट देऊन गेले. आमचा पारितोषिक वितरण समारंभ भारताच्या माननीय पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या शुभहस्ते पार पडला. तीन स्पर्धांत अजिंक्यपद मिळवून प्राप्त झालेल्या तीन ट्रॉफीसह महाराष्ट्र एन. सी. सी. संघ परतला.

## साबा फिल्म्स्

हिंदी, मराठी ( १६ मि. मि.)
चित्रपटांचे वितरक व
प्रदर्शक ( नॉन कमर्शिअल )

संपर्क : ५७२ नारायण पेठ,
केसरी वाड्याजवळ, पुणे ३०

# अंतर

**विजय माळगावकर**
पदवीपूर्व कला

पलीकडल्या फलाटावर गाडी आली. माणसे खचाखच भरलेली ही गाडी एखाद्या लठ्ठ मारवाडणीसारखी हळू-हळू डुलत आली आणि मोठमोठ्याने श्वास सोडीत उभी राहिली. पिंजऱ्यातून सोडलेल्या उंदराप्रमाणे माणसे गाडीतून पटापट बाहेर पडली. ती गाडी काय पुटपुटत होती कोण जाणे! ती माझ्यासारखाच विचार करीत असावी. इतक्यात--

" आवं, त्यो हामाल बघा. कसा घसारला, बघा तरी!" मी त्या हमालाला पाहिलं होतं, पण मी काही बोललो नाही की हसलो नाही.

" हं..." पुन्हा मी गप्प झालो.

" तिकडं बघा, त्यो...न्हाई.. त्यो...न्हाय पर मी म्हनते ती दोघे चालल्याती बघा. त्यात त्यो पलिकल्डा बापे हाये का बाई वं?"

मला बोलते करण्याचा 'हिचा' प्रयत्न आहे हे मी ओळखलं.

" मला न्हाय म्हाईत." मी गुरकलो. आज माझ्या बोलण्यात तुसडेपणा का आला कोण जाणे! पण आला खरा.

" पन मी म्हनते. इतकं काही मनाला लावून घ्यायला नको. आपल्या संजूचाच इचार करतायसा न्हवं? पर त्येचं टाळकं थोड्या दिसानं जाग्यावर यील. तुम्हास्नी कशाला इत्का इचार करायला". मी अगदी गप्प होतो.

तो जागेवर येईल. पण आता नाही. मला नंतर न्यायला पण येईल. पण मीच त्यावेळी नसेन कदाचित्! मला त्याचं काही काही नको. तुमच्या त्या वकिलांच्या खोट्या दुनियेत मला जिवंतपणी पाऊलही टाकायचं नाही.

" अरे! मी सुद्धा नोकरी केली. शिक्षकाची केली. तीही इंग्रजांच्या काळात! पण मी अजूनपर्यंत खोटं बोललो नाही. वकिली केली म्हणजे खोटं बोलायचा काय पतकर घेतलेला असतो? तुला एवढा वाढवला, मोठा केला, 'एलेल बी' केला. अरे, चार टोकं एकमेकांना जोडून तयार केलेलं धोतर नेसलो आणि शाळेत अनवाणी गेलो. का तर तुझ्यासाठी! तुझ्या टायफाईडच्या दुखण्याच्या वेळी डॉक्टरांना पाचशे रुपये देऊन तुला बरे केले. शाळेला, कॉलेजला पाण्यासारखा पैसा दिला होता. मी कधी उपाशी, कधी अर्धपोटी राहिलो. आणि तू मला घराबाहेर काढलंस? अरे, मला सुद्धा काही आशा होत्याच ना? पण त्यात तुझा काय दोष? तू काही हाडाचा वाईट नाहीस. मग कोणी? तुझ्या बायकोने? नाही... माझी सून तर सती अनुसया आहे. मला अभिमान आहे. मग तू असा का फिरलास?

" पण त्यात तुझं काही चुकले नाही. चुकलं माझंच. तू चारचौघांबरोबर गप्पा मारीत होतास. त्यात तुझं सर्व काही बोलणं खोटं होते. मला ते आवडले नाही. मी ताड-कन् उठलो आणि तुला वाटेल तसा बोललो. माझा माझ्या-वर ताबा राहिला नव्हता. पण मी रे काय करू? माझं तोंड रहात नाही म्हणून तू मला एवढं प्रायश्चित द्यावेस? मी बोलून चालून म्हातारा माणूस! मला कसली म्हणून कसलीच आठवणच रहात नाही. म्हणून तू मला हे प्रायश्चित्त दिलंस? अन् इतकं?

" मी जर तुझी काळजीच घेतली नसती तर! वाढवलंच नसतं तर! जर वाढवलं तर मग माझा तुझ्यावर हक्क नाही? कसा नसेल? असायलाच पाहिजे. पण तेही आहेच. मी माझं कर्तव्य केलं. तू काय केलंस हे वेगळं! म्हणून माझं कर्तव्य पार पाडल्याचा आनंद तरी मला होतोय. मी कसोटीला उतरलो. मी आता तुझ्या घरात पाणीसुद्धा पिणार नाही, हीच माझी प्रतिज्ञा!

" आता फक्त एवढीच इच्छा आहे की मरतेसमयी मात्र एक पाण्याचा घोट तोंडात घाल. पण मी ती तरी इच्छा का करावी? पण नाही. जेवताना स्वतःचीच जीभ चावली तर मी कोणावर रागवू?

" तू मात्र रागवू नकोस. अरे, तुझ्यासाठी किती कष्ट

घेतले, ते कष्ट तू विसरलास ? म्हणून तू मला हाकलून दिलेस ? आणि तुझ्या आईलाही ? पण तिलाच तुझा पुळका आला. हरकत नाही. आईचेच मन ते ! माझ्या नंतर ती कोणाकडं बघेल ? अर्थातच ती तुझ्याकडेच येणार. तिला मात्र तू चांगली सांभाळ. एवढी मात्र मला भीक घाल ! संजू... !"

"चला, गाडी आली."

"अं, कोणती ?

"असं काय करताय ? आपली गाडी आली."

"आपली ? आपल्याला गाडी कुठंय ? हां हां ! संजूची!"

"असं काय करतायसा ? याड लागलंय का तुम्हास्नी ? आपली म्हंजी कोल्हापूरची गाडी. पुनं-कोल्हापूर गाडी."

मला जवळ जवळ ओढीतच नेले. सामान लावून जाग्यावर बसलो. पुन्हां तोच विचार ! मी विचार करीत होतो. आता आपल्याला कुठं पुणं पहायला मिळणार ? मी ते पुण्याचं दृश्य डोळे भरून पहात होतो.

कोल्हापूर आलं. कोल्हापूर... माझं जीवन जिथं गेलं ते शहर. कितीतरी गोष्टी पाहिल्या, अनुभवल्या, सोसल्या इथं...

"हमाल ! ओ हमालदादा !"

"कुठं जायचंय साहेब ?"

"पाणखाजिन्यात, सचू पहिलवानाचा वाडा."

"चला की वं."

पुढं हमाल. मागं मी अन् ही. निःशब्द पदयात्रा. चालताना हमाल म्हणतो "सचू एवढा पैलवान ... कोल्हापुरात दरारा व्हता त्याचा. पण प्वारापुढं काय चाललं नाही... गेला घर सोडून... म्हाईत हाय नव्हं संमद तुम्हास्नी ?"

अन् मला आठवलं. दादांचं अन् माझा पटलं नाही. मी तालीम करावी अन् शेती पाहावी असं त्यांचं म्हणणं. मला ते पटत नव्हतं. मी शाळेत नोकरी धरली. अन् एक दिवस दादा कुठंसं निघून गेले. ते परत आलेच नाहीत...जसा मीही संजूच्या घरी परत जाणार नाही... अशाच प्रतिज्ञेनं.


*With Best Compliments From :*

MODERN CAFE

**364/65, Shivaji Nagar,**
**POONA 411005**

**Tel. : 55777**

☆
☆☆

**JOSHI REFRESHMENTS**

438, Raviwar Peth,
Poona 411 002,
Tel. 23766

Phone : 41299

**Sandhya Auto Agency**

Dealers :

**Automobile Spare Parts**

***Specialist in :***

**Leyland and T M B Spares**

*Address* :

6, Poona Satara Road.,
POONA 411 009

# मनोरुग्ण : एक परिचर्चा

महाविद्यालयात मानसशास्त्र शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी मानसशास्त्राच्या क्षेत्रातील काही माहिती प्रत्येकापर्यंत पोचवणे आवश्यक आहे. या दृष्टीने यंदाच्या विद्यार्थ्यांनी हा उपक्रम सुरू केला आहे.

मनोविकृतीविषयी प्रत्येकाला जिज्ञासा असते, समज-गैरसमजही असतात. परंतु आपण इतर भौतिक शास्त्रांच्या बाबत जशी जागरूकता व जिज्ञासा ठेवतो आणि पारंपारिक कल्पना दूर टाकायला शिकतो, तीच गोष्ट मानसशास्त्राच्या बाबतीत मात्र अजूनही दैवधीनच राहिली आहे.

आपण रस्त्याने पुष्कळदा दृश्य पाहतो...वेडेवाकडे आविर्भाव करणारी, अंगावर चिंध्या लोंबणारी, भकास भयाण मुद्रेची व्यक्ती केसाच्या झिंज्या विखरून चाललेली असते. बडबडत असते कधी स्वतःशी कधी कुणाशी तरी. चार पोरं तिच्या मागे लागतात, चिडवतात, दगड मारतात, आरडाओरड करतात. अशा वेळी या प्राण्याची दया आली तरीही आपण काय करायला पाहिजे हे बहुतेकांना माहीत नसतं.

या दिशेनं टाकलेलं हे एक पाऊल आहे.

## मनोविकृती : काही गैरसमजुती

मनोविकृत असा शब्दप्रयोग वापरला की लगेच एकदम वेगळ्याच अर्थाने अशा व्यक्तीकडे पाहू लागतात. वास्तविक मनोविकृत हा शब्द इतका काही भयानक नाही. मानसशास्त्राच्या दृष्टीने विचार करता सर्वसामान्य माणसापेक्षा मनोविकृत मनाची घडण वेगळी झालेली असते व त्यामागे कारणेही अनेक असतात. पण सामान्य माणसे हे लक्षात घेत नाहीत. मनोविकृत म्हटले की हा वेडा असे समजून काही लोक त्याला हसतात तर काही त्याची कीव करतात. त्याला जवळ जवळ वाळीत टाकल्याप्रमाणे वागवतात. त्यामुळे त्याला आजूबाजूची परिस्थिती असाध्य वाटून तो खरोखरच आपण मनोविकृतीने ग्रासलो गेलो आहोत असे समजू लागतो व वेगळे राहण्याचा प्रयत्न करतो. अशा व्यक्तीस जर सहानुभूतीने, सौजन्याने आणि प्रेमाने वागवले तर तथाकथित मनोविकृती कमी होण्यास फार मदत होईल. व शेवटी तो मनोविकृतीपासून बरा होण्याची शक्यता निर्माण होईल.

१८ व्या शतकापर्यंत मनोविकृती म्हणजे जादूटोणा आहे असे मानले जाई. मध्ययुगीन समाजात, माणसाला भूतबाधा होते, तो सैतानाकडून पछाडला जातो म्हणून तो वेड्यासारखा वागतो, अशी कल्पना प्रचलित होती. काही वेळा त्या मनोविकृतीत आपण मानव नसून लांडगा वा इतर प्राणी आहोत असा भ्रम होई, व म्हणून तो इतरांवर ओरडे व गुरगुरे. अशा वेळी त्याच्यावर उपचार करण्याऐवजी त्याचे हातपाय कापले जात. पूर्ण मनोविकृत झालेल्या माणसाच्या कवटीला भोक पाडत किंवा त्याच्यावर अघोरी उपचार करत. असे केले म्हणजे त्यामध्ये असलेला सैतान निघून जाईल असे मानत. रोग्याला देवासमोर नेऊन अंगारे लावणे, देवाला नवस करणे या गोष्टी आजही आपण पाहतोच. वास्तविक मनोविकृती असलेल्या माणसाला असे करण्याचा काहीच उपयोग नसतो. कारण खरे पाहता अघोरी शिक्षा करून मनोविकृती जाणार कशी ?

पण नंतरच्या काळात हिपोक्रेटीस या ग्रीक वैद्यकीय तज्ज्ञाने मेंदूत काही मानसिक प्रक्रिया होऊन मनुष्यात मनोविकृती निर्माण होते असा शोध लावला. शिवाय भूत-

पिशाच्चबाधा हे खरे नाही असा तत्कालीन समजुतींना धक्का देणारा विचार मांडला. त्याने मनोविकृत माणसाला संगीत ऐकवणे, स्नान घालणे व त्याच्याशी सहानुभूती व गोडी गुलाबीने वागणे असे उपाय सुचवले. पण त्याचा परिणाम असा झाला की हिपोक्रेटीसजवळ मोहिनीविद्या आहे असे समजून लोक त्याची हेटाळणी करू लागले.

आजही थोड्याफार प्रमाणात अशाच प्रकारच्या गैर-समजूती आढळून येतात. एक म्हणजे व्यक्ती पुस्तकातून जी लक्षणे वाचते ते स्वतःला लागू पडतात असे समजते. म्हणून स्वतःला मनोविकृतीने पछाडले आहे अशी भावना निर्माण होते. तसेच मनोविकृती ही लाजिरवाणी गोष्ट आहे अशी समजूत असते. म्हणून घरात एखाद्याला वेड लागले तर ते लपवून ठेवले जाते किंवा स्वतःला आयुष्यात काही मानसिक त्रास झाला तरी लोक मानसतज्ज्ञांकडे जात नाहीत. मनोविकृती ह्या अनुवंशिक आहेत अशी समजूत आहे. बरेचदा अनुवंशिकतेपेक्षा अनुकरणामुळे विकृत वर्तन झालेले असते. सर्व मनोविकृती ह्या काही आनुवंशिक नाहीत. पण तरीही लोक अज्ञानाने तसे वागतात व त्या घरातील व्यक्तीशी विवाह करणे टाळतात. तसेच असे मानले जाते की, मनोविकृती ही लैंगिक प्रेरणामुळे निर्माण होते व हस्तमैथुनामुळे निर्माण होते. परंतु ते सर्व चुकीचे आहे. प्रत्यक्षात हस्तमैथुनामुळे अशा व्यक्तीमध्ये एक-प्रकाराची अपराधी भावना निर्माण होते व त्यामुळे त्याचे समायोजन बिघडते. तसेच काही लोक असे मानतात की श्रेष्ठ बुद्धीची माणसे ही मनोविकृत असतात. परंतु खरे पाहता श्रेष्ठ बुद्धीच्या माणसाचे सामाजिक समायोजन हे चांगले असते. शिवाय व ज्याच्या मेंदूला काही कारणाने इजा पोचली असेल तर त्याची विकृती असाध्य होते व त्यामुळे विकृत व्यक्तीशी सर्वजण संपर्क टाळू लागतात व त्याला सहानुभुतीपूर्ण प्रेमाची वागणूक देणे तर बाजूला राहते पण त्याचे सामाजिक संबंध कमी होऊ लागतात. तो एकाकी पडतो व त्यामुळे त्याची विकृती बळावते. त्यामुळे मनोविकृतीविषयीच्या गैरसमजूती दूर होणे आवश्यक आहे.

**रंजना नांदे**
तृतीय वर्ष कला

## मनोविकृतीच्या कल्पनांचा इतिहास

फार पूर्वीपासून मनोविकृतींचे अस्तित्व व त्यांची जाणीव समाजामध्ये आहे, मनोविकृती ही सामाजिक निकषांनी ठरत गेलेली गोष्ट आहे. प्रत्यक्षात विकृतीचे अस्तित्व असते ही गोष्ट जरी खरी असली तरी विकृती कशाला म्हणायचे यामध्ये बदल होत गेलेला आहे. जो कपडे फाडतो आरडा-ओरड करतो, स्वतःला तसेच दुसऱ्यांना इजा करतो, निरर्थक बडबड करतो, अपशब्द वापरतो व ज्याला नीतिमूल्यांची जाणीव नसते अशाच व्यक्तीला पूर्वी विकृत समजले जाई. आता मात्र 'विकृत' ह्या शब्दाची व्याप्ती ही वाढलेली आहे. त्यामागची कल्पना बदललेली आहे. चिंताग्रस्तता, स्वप्नाळूपणा ह्यासारख्या वर्तनप्रकारांचा — की जे वर्तनप्रकार समाजाकडून खपवून घेतले जातात— त्यांचाही समावेश आता मनोविकृतीत करण्यात येतो.

समाजामध्ये अनेक गैरसमजुती असतात. ह्या गैर-समजुतींमागे समाजाच्या काही विशिष्ट कल्पना असतात व ह्या कल्पनांमधूनच त्या व्यक्तीला मिळणारी उपचारपद्धती व त्याला इतर लोकांकडून मिळणारी वागणूक ही ठरत असते. व्यक्तीमध्ये अगर व्यक्तीच्या वर्तनात काही जरी वेगळे घडले की ते देवाच्या माथी मारण्याची प्रवृत्ती ही प्राचीन काळी होती व आजही थोड्याफार प्रमाणात दिसून येते. एकदा जर त्याच्या वर्तनाचा अर्थ तुम्ही त्याच्या अंगात देव आला किंवा सैतान शिरला असा लावला की त्याला समाजाकडून मिळणारी वागणूक ही पूर्णपणे बदलते. हे सामाजिक निकषांमुळे घडते. त्यामुळेच दोन मनोविकृतांना समाजाकडून मिळणाऱ्या वागणुकीत केवढातरी फरक आपल्याला आढळेल. वरील सर्व गोंधळात मानसोपचार तर होत नाहीतच परंतु सैतान अंगात आलेल्या व्यक्तीचे मात्र अत्यंत शारीरिक हाल होतात. त्या उपचारांनी मनोविकृत बरा होण्याऐवजी त्याची अवस्था आणखीनच वाईट होते. अशा प्रकारे प्रत्येक कल्पनेनुसार वेगवेगळी उपचारपद्धती व वर्तनपद्धती आपल्याला आढळते. अंगात सैतानाचे अस्तित्व मानून शारीरिक छळ करणे, अंगात देव आहे असे म्हटल्यावर पूजा करणे, वेडा माणूस ढोंग करतो आहे असे मानल्यावर त्यांचे ढोंग फोडायचा प्रयत्न करणे, त्यांना शिक्षा देणे, चेटके आहेत असे

मानल्यावर जाळणे अगर जीभ, हातपाय कापणे, वेड्यांना तुरुंगात टाकणे, साखळदंडाने मारणे, वेड्यांची कीव करणे, सहानुभूतीने वागविणे, मनोरुग्ण हे रुग्ण आहेत व ते उपचाराने बरे करता येण्यासारखे आहेत असे मानल्यावर Mental Hospital मध्ये दाखल करणे ह्या अनेक अवस्थांतून मनोविकृतीच्या आधुनिक कल्पना विकसित झाल्या.

मनुष्य हा रानटी अवस्थेत असल्यापासून भोवतालच्या जगाचा अन्वय लावायचा प्रयत्न करीत होता व आजही तो तेच करीत आहे. तो स्वत्वाच्या आधारे बाकी सर्व गोष्टींचा अन्वय लावण्याचा प्रयत्न करीत होता. ज्यावेळी एखादी गोष्ट कशी, का हे कळत नाही, जेव्हा व्यक्तीची इच्छा व त्याचा प्रभाव ह्यातील कार्यकारणभाव कळत नाही, तेव्हा व्यक्ती त्याचे कारण इतरत्र शोधत असते. त्यावेळी जादूटोणा हे कारण प्रथम सुचले. १८ व्या शतकापर्यंत मनोविकृती ही कशाने होते अगर व्यक्तीच्या वर्तनामागचे कारण काय ह्यातील कार्यकारणभाव न कळल्याने त्याला जादूटोणा मानत व भूतबाधा दूर करण्यासाठी अघोर उपचार करीत, त्याला समाजाकडून वाईट वागणूक मिळत असे. मुख्यतः शारीरिक हाल होत. हा त्यातील पहिला टप्पा होय.

दुसरा टप्पा हा धर्म होय. धर्माच्या अनुषंगाने सर्व गोष्टींचा अन्वय लावण्याचा प्रयत्न या टप्प्यात दिसतो. ह्यामध्ये जास्त नियमबद्धता आहे. ईश्वराच्या व इच्छेच्या कल्पनेतून यातील नियमांची जाणीव विकसित झालेली आहे आणि नियम पाळावे हे नुसते न सांगता त्यामुळे पुण्यसंचय होतो व मोक्षप्राप्ती होते हेही सांगितले जाते. ह्या अवस्थेमध्ये मनोविकृतांवर उपचार हे देवळात अगर धर्मगुरूंकडून केले जात. ह्यामध्ये विकृती म्हणजे ईश्वराचा कोप असे मानले जाऊन ह्यासाठी धार्मिक कृत्ये करणे, आख्यान ऐकविणे अगर मंत्राचे पाणी अंगावर शिंपडणे ह्यासारखे उपचार रोग्यावर केले जात.

आता तिसरी अवस्था शास्त्र की जेथे माणूस व्यक्ती-निरपेक्ष विचार करतो व दोन गोष्टींमध्ये आढळणारा कार्य-कारणभाव सार्वत्रिकपणे लावण्याचा प्रयत्न करतो. ह्या अवस्थेत मनोविकृतीची शरीरशास्त्रीय कारणे सांगून कोणत्या रीतीने उपचार केल्यास मनुष्य सुधारेल या कल्पनेचा समावेश होतो. त्यातूनच Mental Hospitals व विविध उपचारपद्धती रोग्याला मिळू लागली. मनोविकृतांकडे मनोरुग्ण म्हणून पाहण्यास सुरुवात झाली. तो रुग्णाइत असून शुश्रुषा केल्याने त्याला बरे करता येते, ह्या कल्पनेने त्याला मनोरुग्णालयात दाखल केले जाऊ लागले. अशा प्रकारे जादूटोणा, धर्म, आणि शास्त्र या अवस्थांतून ही कल्पना बदलत गेली.

यानंतर विकृती विषयीचा दृष्टीकोन मानवतावादी झाला, सहानुभूतीपर झाला. मनोरुग्ण हे दुष्ट राक्षस नाहीत, ते गुन्हेगारही नाहीत, ते व्याधिपीडित आहेत व या गोष्टीकडे कधीही दुर्लक्ष होता कामा नये हे पीनेलने सांगितले. मनोरुग्णांच्या साखळदंडांना, खोड्यांना काढून टाकून देऊन अंधारकोठड्यातून त्याने रुग्णांना सोडविले. हवेशीर प्रकाशित खोल्या, स्वच्छता, प्रेमळ सहानुभूतीची वागणूक यामुळे मनोविकृतात नजरेत भरण्याइतकी सुधारणा आढळून आली. पुढे पुढे मनोरुग्णालयांना इतर रुग्णालयांचा दर्जा प्राप्त झाला व मनोविकृतीविषयीचे गूढतेचे, अज्ञानाचे, भीतिचे वातावरण निवळून 'मनोविकृत' हे आजारी असल्याची भावना जनतेत पसरू लागली. डोरोथिया डिक्स हिने मनोरुग्णांइतांच्या मूक दुःखांना वाचा फोडली व त्यांची दयनीय अवस्था सुधारण्यासाठी अविरत प्रयत्न केले.

'मनोविकृती' विषयीच्या कल्पनांचा विचार करणे आवश्यक आहे कारण त्यामुळेच व्यक्तीवर केले जाणारे उपचार व त्याला समाजाकडून मिळणारी वागणूक ठरत असते. अशी वागणूक व्यक्तीच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग असते. आजपर्यंत 'मनोविकृती' विषयीच्या कल्पनेत बदल होत गेलेला आहे. तरी आजही काही विपरीत कल्पना समाजात आहेत त्या चुकीच्या कल्पना बदलल्या पाहिजेत.

**माधुरी साठे**
तृतीय वर्ष कला

## मनोविकृतीची लक्षणे

समाजास विकृतीची लक्षणे माहीत असली म्हणजे समाजाची जागरूकता सुधारते आणि विकृती झालेल्या

व्यक्तीवर ताबडतोब उपचार करणे शक्य होते.

मनोविकृतीची लक्षणे शारीरिक आजाराच्या लक्षणांप्रमाणे निश्चित व स्पष्ट नसतात. कारण सामान्य व विकृत व्यक्तींचे वर्तन व मानसिक जीवन यांच्यातील सीमारेषा ठरविणे कठीण असते. तरीही आपण मनोविकृतीच्या लक्षणांचा थोडक्यात विचार करू. मनोविकृत व्यक्तीविषयी गैरसमज व शास्त्रीय दृष्टिकोण यांत फरक आहे.

लक्षणांमुळे एक रोग दुसऱ्या रोगाहून वेगळा आहे हे ओळखता येते. बाह्य लक्षणांवरूनच औषधयोजना करावी लागते. कारण शारीरिक लक्षणे फारच कमी प्रमाणात आढळतात. मानसिक लक्षणांची सुरवात अस्पष्ट असून ती नकळत होत असते. लक्षणे हळू हळू प्रगट होतात. या व्यक्तींना समाजाशी योग्य प्रकारे समायोजन करता येत नाही.

मनोविकृतीची लक्षणे शारीरिक व मानसिक अशा दोन्ही प्रकारची असतात. त्यांचे गंभीर लक्षणे व सौम्य लक्षणे असे दोन प्रकार पडतात. थोडा ताप येणे, अपचन, पोट दुखणे, निरुत्साह, अस्वस्थता, निराशा, झोप न येणे, छातीत उगीचच धडधडणे इ. सौम्य प्रकारांबरोबरच कित्येकदा अंधत्व येणे, अर्धांगवायू, बहिरेपणा इ. गंभीर प्रकारचीही लक्षणे असू शकतात. यात अर्थातच इंद्रियजन्य कारण नसून मानसिक कारण असते. परंतु सौम्य लक्षणे असताना गंभीर विकृती असू शकते. तसेच गंभीर लक्षणे असतानाही सौम्य विकृती असू शकते.

कोणतीही गोष्ट प्रमाणात झाली तर तो माणूस सर्वसामान्य ( normal ) माणसांत मोडतो. पण तीच कृती अतिरिक्त प्रमाणात झाल्यास ती विकृती मानली जाते. जी माणसे स्वभावधर्मीय मर्यादांमुळे व कांही ऐंद्रिय दोषांमुळे योग्य प्रकारे समायोजन करण्यास असमर्थ असतात ती आयुष्यात समस्या निर्माण झाल्यावर निरनिराळ्या शारीरिक लक्षणांचा वापर करून समस्यांना तोंड देण्याचा प्रयत्न करतात. मानसिक विकृतीत सामान्यपणे पुढील लक्षणे आढळतात :

( १ ) **भ्रम**— व्यक्तीचे चमत्कारिक व दृढ विश्वास म्हणजेच भ्रम होय. व्यक्तीला प्रत्यक्ष परिस्थिती समजावून सांगितली तरी ती पटत नाही. व्यक्ती स्वतःचा भ्रम सोडायला तयार होत नाही; कारण त्यामुळे तिचे संरक्षण होत असते. तसेच स्वतःच्या भावनांचे प्रक्षेपण ( Projection ) दुसऱ्या व्यक्तीवर त्यांना करता येते. आत्मगौरव, न्यूनत्व यांचे भ्रम होतात किंवा आपल्याला रोग झाला आहे असाही भ्रम होऊ शकतो.

( २ ) **मानसिक दुखणी**— ही रोगभ्रमापेक्षा सौम्य असतात. गखादी गोष्ट नको असेल तेव्हा ते आजारपण नुसतेच इतरांकडून कौतुक करून घेण्यापुरतेच उपयोगी पडते. भोवतालची सामाजिक परिस्थिती नियंत्रित करण्यासाठीही त्याचा उपयोग होतो. कित्येकदा आईवडिल स्वतःच्या आजारपणाचे भांडवल करून मुलांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवतात.

( ३ ) **अवस्तुबोधन**—यामध्ये व्यक्तीला प्रत्यक्षात आवाज झाला नाही तरी तो ऐकू येतो किंवा कसलाही वास नसला तरीही या लोकांना निरनिराळे वास येतात. गोड वस्तूही त्यांना कडू लागतात.

( ४ ) **स्थिरभ्रम**—यात आपल्याला संपूर्ण वस्तुस्थितीचा विपरीत अर्थ प्रतीत होतो. आपण कोण आहोत, कुठे आहोत, भोवताली काय आहे या सर्वच गोष्टी एका केंद्राभोवती गुंफल्या जातात. आपण राजा आहोत असे पक्के घेतले की चंद्रमौळी झोपडीचाच राजवाडा होतो.

( ५ ) **भावनिक प्रतिक्रिया**—यात भावना अतिरिक्त प्रमाणात व्यक्त केल्या जातात तर काही वेळा व्यक्तच केल्या जात नाहीत. क्षुल्लक गोष्टींसाठीही या व्यक्ती तासन्तास रडत किंवा हसत बसतात.

( ६ ) **स्वतःच्या स्थितीविषयीचे ज्ञान**— या व्यक्तींना आपण कोण, कुठल्या आहोत याची जाणीवच नसते. त्यांना स्वतःची काळजी घेता येत नाही. अतिरिक्त भीती, अनिवार्य कल्पनात व्यक्ती रमलेली असते.

शाळेत पहिल्या बाकावरचा मुलगा चांगला आणि हुशार समजला जातो. पण हा चांगला मुलगा दिवास्वप्न पाहणारा, एकलकोंडा असू शकतो. चांगला चांगला म्हणून त्याच्या मनावर इतके ठसवले गेलेले असते की या शहाणपणासाठी त्याला मोठीच मानसिक किंमत द्यावी लागते. यासाठीच कोणत्याही गोष्टीचा अतिरेक टाळायला हवा.

स्मृती, विचार, कल्पना आणि स्वत्वाची जाणीव सुस्थितीत असणे हे सुसंगत मानसिक जीवनाचे प्रमुख लक्षण आहे.

शारीरिक संस्थांवर मानसिक ताण व आघात यांच्यामुळे विपरीत परिणाम होतात. तेव्हा कोणती शारीरिक व मानसिक लक्षणे दिसून येतात याबद्दल वेळीच जागरूकता

दाखवल्यास उपचार करणे सोपे होते व दुखणे विकोपाला जात नाही.

**विद्या देवडीकर**
तृतीय वर्ष कला

## मनोविकृतीचे प्रकार

सर्वसामान्य वर्तनापेक्षा वेगळे वर्तन म्हणजे विकृत वर्तन. सर्वसामान्य वर्तनाच्या चौकटीतून आपण विकृत वर्तन बघत असतो. ज्यांच्यामध्ये सामाजिक समायोजन नाही, व्यक्तिमत्त्व स्थिर नाही, सामाजिक बुद्धिमत्ता नाही अशा व्यक्तीचे वर्तन विकृत होय.

सर्वसामान्य लोकांचा अभ्यास केला तर बहुसंख्य लोक ठराविक प्रकारचे आयुष्य जगत असताना दिसून येतात. सामाजिक वर्तनामध्ये समाजाने ठरवून दिलेल्या रूढी, परंपरा व्यक्ती पाळत असतात. ज्यांचे भावनिक जीवन सर्वसामान्य पातळीवरचे आहे अशा व्यक्तींच्या गटाला Average group म्हणतात. याउलट गटातील व्यक्ती या बुद्धीमान आहेत, श्रेष्ठ आहेत, ज्यांचे सामाजिक समायोजन चांगले झालेले आहे, भावनिक स्थैर्य चांगले आहे, तसेच समाजाच्या कल्याणासाठी अशा व्यक्तींच्या गटाला Superior group म्हणतात. अशी माणसे १०% आढळतात. ज्या गटातील व्यक्ती या मर्यादित बुद्धिमत्ता असलेल्या, भावनिक दृष्ट्या अस्थिर अशा असतात त्यांच्या गटाला विकृत गट म्हणतात. त्यांचे व्यक्तित्व विघटन झालेले असल्याने ही माणसे समाजाला त्रासदायक व जबाबदारी म्हणून राहिलेली असतात. या विकृत गटातील व्यक्तींचे चार प्रकार आहेत—

( १ ) मानसनसीय विकृत ( २ ) चित्तविकृत ( ३ ) बुद्धिमंदता ( ४ ) समाजविघातक व्यक्तिमत्त्व.

(१) **मानसनसीय विकृत**—कठीण परिस्थिती निर्माण झाली की काही माणसाचं भान नाहीसे होते. काही सुचत नाही, हातपाय थरथरतात, घाम फुटतो, चक्कर येते, तोल जातो इ. शारीरिक लक्षणे दिसून येतात. ही शारीरिक लक्षणे ज्या व्यक्तींमध्ये मर्यादेबाहेर जास्त टिकून राहतात, त्यांना मानसनसीय विकृत म्हणतात. या व्यक्तींमध्ये अस्वस्थता, अपुरेपणाची जाणीव, एकाग्रतेचा अभाव, चिंता, स्मृतिभ्रंश, अनिवार्य विचार इ. कृती दिसून येतात. डोकेदुखी, थकवा, कारक-वेदक क्षमतांचा अभाव इ. लक्षणे यांच्यात आढळतात. ही त्यामानाने सौम्य प्रकारची विकृती असून यातील लक्षणे रोग्याला व इतरांना जरी त्रासदायक असली तरी धोकादायक नसतात. उपचार करून घेण्यासाठी ते स्वतःच येतात. मानसनसीय विकृतांच्या बाबतीतील लक्षणे प्रमाणाबाहेर गेलेली असतात. सर्वसामान्यांच्या मध्ये धोकादायक परिस्थिती किंवा अपयश आले असता दिसून येणारी लक्षणे अल्पकाळ टिकतात, तर विकृतांच्यामध्ये ही लक्षणे आयुष्यभरही टिकून राहतात.

( २ ) **चित्तविकृत**—ज्यांना आपण वेडे म्हणतो त्या व्यक्ती या प्रकारात येतात. ही गंभीर प्रकारची मनोविकृती आहे. या विकृतीमुळे व्यक्तिमत्त्वाचे विघटन होते व त्यामुळे सामाजिक संबंध बिघडतात. या रोग्याचे वर्तन व लक्षणे अनाकलनीय असतात. त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करणे आवश्यक असते. हे रोगी स्वतःची काळजी घेण्यास असमर्थ असतात, त्यामुळे इतरांना त्यांच्यापासून त्रास होतो. त्यांच्या वर्तनाने इतरांच्या जीविताला धोका पोहोचतो. तसेच रोगी स्वतःच्या कृत्यांना कायदेशीररीत्या जबाबदार नसतात. नैतिक व सामाजिक बंधने या लोकांना लागू पडत नाहीत. सामाजिक जबाबदारी, तर्क यांना न जुमानता चित्तविकृत व्यक्ती जगत असते. या रोग्यांमध्ये भास, भ्रम दिसून येतात. भावनिक प्रतिक्रिया निर्माण करणारी परिस्थिती व प्रतिक्रिया यांमध्ये संबंध न राहणे, विभ्रमावस्था, असंबद्ध भाषा, स्मृतिभ्रंश इ. लक्षणे दिसून येतात. सर्वसामान्य माणूस या रोग्याशी संपर्क साधू शकत नाही, हे रोगी स्वतःच्या अशा निराळ्याच विश्वात वावरत असल्याने त्यांची समजूत घालून किंवा जबरदस्तीने त्यांचे विचार आपण बदलू शकत नाही.

(३) **बुद्धिमंदता**— यामध्ये येणारे लोक ज्यांची बौद्धिक वाढ खुंटलेली आहे असे असतात. त्यांना शालेय शिक्षण अशक्य असते. अशी माणसे प्रौढपणी स्वतःला पोसण्यास असमर्थ असतात. या विकृतीच्या लोकांची जन्मतःच बौद्धिक वाढ खुंटलेली असते. ते इतरांवर अवलंबून असतात.

*With Best Compliments From*

# Ajay Engineering Works

15-A, Poona Bombay Road,
Bhale Estate, Wakadewadi,
Poona 411003 Phone 58871

♠ ♠ ♠

*MANUFACTURERS OF*

**Air Lub**
**&**
**Fuel Oil Filter Equipments**

*With Best Compliments From*

# VENUS

★ ★ ★

**House of Men's Wear**
**&**
**Tailoring**

☆

Near Common Wealth Building
Laxmi Road, Poona 30

Phone by Courtesy 58770

*First Time In Poona..*
*For the Fastest Delivery in*

- ☆ **Color Film Processing**
- ☆ **Color Printing**
- ☆ **Flash & Industrial Photography**

**Contact :**

# CROMEX

**COLOR LABORATORY**

1201-E, Opp. Fergusson College
[ Main Gate ] Poona 4

त्यातल्या त्यात जर बुद्धिमत्ता बरी असेल तर त्यांना लिहिता-वाचता येते, सोपे गणित सोडविता येते. अशी मुले जास्तीत जास्त पाचव्या इयत्तेपर्यंत जाऊ शकतात. स्वतःची काळजी घेण्यास ते असमर्थ असतात. अशा व्यक्ती मुळात गुन्हेगार व अनैतिक नसल्या तरी आपल्या कृत्यांच्या परिणामाची जाणीव नसल्याने बारीक सारीक गुन्हे, लैंगिक गुन्हे त्यांच्या हातून घडतात. अतिशय मंद असणाऱ्या मुलांना चालता येत नाही. प्राण्यांपेक्षा सुद्धा खालच्या पातळी-वरची त्यांची बुद्धिमत्ता असते. लहान मुलासारखी त्यांची काळजी घ्यावी लागते. ते बहुधा अल्पायुषी असतात.

(४) **समाजविघातक व्यक्तिमत्त्व**– गुन्ह्यांच्या तीव्रतेनुसार गुन्हेगारीचे तीन गट पडतात. (अ) सौम्य गुन्हे— उदा. भुरटी चोरी, सायकलला दिवा न लावता रात्री रस्त्यावरून जाणे इ. (ब) दारू पिऊन दंगा करणारे, मारामारी करणारे व (क) कत्तल, दरोडे, खून करणारे. या खेरीज समाजविघातक व्यक्तिमत्त्वामध्ये Psychopath या प्रकारच्या व्यक्ती असतात. विकृत व्यक्तिमत्त्वाचे लोक बुद्धिमान व आकर्षक असतात समाजाची बंधने पाळण्यास या लोकांनी विरोध केलेला असतो. व्यक्तिमत्त्व विकृत लोक स्वार्थी, भावनिक दृष्ट्या अस्थिर असतात. आपली कोणतीही इच्छा, गरज कोणत्याही मार्गाने ते पूर्ण करतात. आपल्या कृत्यांच्या परिणामाची त्यांना पर्वा वाटत नाही. आपले वर्तन गैर आहे, हे समजूनसुद्धा सुधारण्याची त्यांची वृत्ती नसते. नैतिक कल्पनांचा विकास झालेला नसतो. तसेच त्यांची विवेकशक्ती निष्क्रिम असते.

गुन्हेगाराला शिक्षा झालीच पाहिजे असे सर्वसामान्य लोकांना वाटते. गेल्या काही वर्षांत वस्तुनिष्ठ व सहानुभूति-पूर्वक दृष्टिकोन गुन्हेगारांविषयी निर्माण झालेला आहे. काही सामाजिक व मानसिक कारणांनी गुन्हे घडतात. त्यांना शिक्षा न करता त्यांच्यावर उपचार केले पाहिजेत, असा दृष्टिकोन निर्माण झालेला आहे.

हे मनोविकृतींचे ढोबळ प्रकार झाले. यांतील प्रत्येक प्रकारामध्ये अनेक उपप्रकार आहेत. विकृतीचे नक्की निदान करण्यासाठी मानसोपचार तज्ज्ञाकडे जाणे आवश्यक असते.

**शैलजा सोनटक्के**
तृतीय वर्ष कला

## मनोविकृतीवरील उपचारांचे प्रकार

आपल्या समाजामध्ये मनोविकृती असणे ही एक शरमेची गोष्ट आहे असे सामान्यतः मानले जाते. आपल्या कुटुंबातील कोणी तरी 'मनोविकृत' आहे ही गोष्ट शक्यतो लपवून ठेवण्याची प्रवृत्ती सर्वत्र दिसते. समाजापासून हे गौप्य सुरक्षित ठेवले पाहिजे असाच विचार सर्वत्र दिसून येतो.

या सामाजिक न्यूनभावनेमुळे अनेक मनोविकृतांना आवश्यक ते सहाय्य वेळेवर मिळू शकत नाही. त्यामुळे ही विकृती अधिक बळावते. व्यक्तीच्या मनामध्ये अनेक अपेक्षा, इच्छा, आकांक्षा, ध्येये असतात, जी त्या व्यक्तीला काही वेळा प्राप्त होत नाहीत. त्यामुळे विषमायोजन होण्याची शक्यता असते. त्यामुळे मनोविकृती निर्माण होते. एखाद्या व्यक्तीला शारिरिक व्याधी असेल तर आपण त्याला हीन समजत नाही, त्याचा संपर्क टाळीत नाही. पण एखादा मनो-विकृत असेल तर मात्र आपण त्याला हीन मानून चार हात दूरच राखतो. त्यामुळे अशा लोकांची विकृती जास्त बळावते.

**उपचार पद्धतींची वैशिष्ट्ये—**

(१) रुग्ण व्यक्तीचे शारीरिक आरोग्य सुधारण्या-साठी प्रथम रोग्याला वैद्यकीय तज्ज्ञाकडे नेऊन जरूर ती औषधयोजना व शस्त्रक्रिया व इतर उपचार केले पाहिजेत.

(२) रुग्ण व्यक्तीचे मानसिक आरोग्य सुधारून त्याची समायोजन क्षमता वाढविली पाहिजे.

**मानसोपचार पद्धती** (Psycho-therapy):– अलीकडच्या काळात ह्या पद्धतीचा उपयोग मोठ्या प्रमाणात करण्यात येतो. एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होऊन माणसे एकमेकांना धीर देत असतात. त्याला मानसोपचार पद्धती म्हणतात. आधुनिक मानसोपचार पद्धती ह्याच मानसशास्त्रीय तंत्राचा अधिक व्यापक, व्यवस्थित व डोळस उपयोग करीत असते. केवळ ढोबळ मानाने उपचार करण्याऐवजी मानवी मानसिक प्रक्रियांबाबत सिद्ध झालेल्या प्रमाणित पद्धतीनुसार मानसोपचार केले जातात. मानसो-पचार पद्धतीचा उपयोग रुग्णालयात व बाह्यरुग्णालयातही केला जातो.

**मानसोपचार पद्धतींची वैशिष्ट्ये**– (१) या पद्धतीमध्ये रुग्ण व्यक्तीला आपल्या जीवनसमस्या काय आहेत व प्रत्यक्ष वर्तन कसे होत आहे ह्याबाबत अधिक

स्पष्ट जाणीव करून दिली जाते.

( २ ) व्यक्तीवर पडलेला ताण कमी केला जातो.

( ३ ) व्यक्तीच्या अनिष्ट सवयी, वर्तन व प्रतिक्रिया प्रबंध बदलण्याचा प्रयत्न केला जातो. या उद्दिष्टांसाठी दोन गोष्टींची आवश्यकता असते [ १ ] या कामी रुग्ण व्यक्तीचे संपूर्ण सहकार्य मिळविणे आवश्यक असते अर्थात चित्तविकृत रुग्णांशी खरा संपर्क साधणे हे सर्वाधिक महत्त्वाचे असते. [ २ ] मानसोपचाराच्या यशस्वितेसाठी रुग्ण व्यक्तीचा विश्वास व श्रद्धा मानसोपचार तज्ज्ञाला मिळविता आली पाहिजे. चिकित्सक व रुग्ण यांमधील व्यक्तिगत आंतरक्रियात्मक संबंध स्नेहाचे व जिव्हाळ्याचे असावेत.

**उपचारांमधील इतर पद्धती**

**वैद्यकीय उपचार पद्धती**—रुग्ण व्यक्तीच्या विकृतीनुसार औषधयोजना केली जाते. तथापि मनोरुग्णासाठी काही खास उपचार केले जातात (१) Shock-therapy ( २ ) मानसशल्य चिकित्सा [ Psycho-surgery ] ( ३ ) रासायनिक चिकित्सा [ chemo-therapy ] हे उपचार विशेष महत्त्वाचे आहेत :

Shock-therapy रुग्ण व्यक्तीच्या मज्जासंस्थेवर विशिष्ट प्रकारचे तीव्र शॉक देऊन तिच्या कार्यपद्धतीमध्ये मूलभूत बदल घडवून आणणे हे त्या पद्धतीचे वैशिष्ठ आहे ह्यासाठी ( १ ) इन्शुलिन शॉक व ( २ ) विद्युत शॉक:— ह्यांचा उपयोग केला जातो.

( १ ) इन्शुलिन शॉक :— डॉ. साकेल यांनी रुग्णांच्या शरीरात इन्शुलिन टोचून त्याला शॉक देण्याची ही पद्धत शोधून काढली. इन्शुलिनमुळे रक्तातील शर्करांश कमी केल्यास रोग्याला गुंगी येते आणि ह्या गुंगीनंतर रोग्याच्या मनोविकृतीत विशेषतः स्थिरभ्रम व विषण्णमनस्कता [ Schizophrenia ] ह्या विकृतींत सुधारणा होते.

( २ ) विद्युत शॉक ह्या पद्धतीचा वापर बऱ्याच प्रमाणात करतात. रुग्णाला शांत झोपायला सांगतात व त्याच्या डोक्याला इलेक्ट्रॉड लावतात आणि ७० ते १३० शक्तीचा विद्युत–प्रवाह ०·१ ते ०·५ सेकंदापर्यंत सोडतात. रुग्णाला ह्यामुळे त्रास होत नाही. कारण विद्युत प्रवाहाचा वेग नसावेगाहून अधिक असल्याने रोग्याची तात्काळ शुद्ध जाते. रुग्णाला येणारा झटका ३० ते ६० सेकंद असतो. रोगी १० ते ३० मिनिटापर्यंत बेशुद्ध असतो. त्याला दिलेल्या शॉकची स्मृती नसते. असे शॉक आठवड्यातून २ ते ३ वेळा देतात.

( २ ) मानसशल्य चिकित्सा [ psycho–surgery ] ह्या शस्त्रक्रियेमध्ये अनेक प्रकार आहेत. ह्यांना विविध नावे आहेत. ही शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यास रुग्णाच्या मनावरील ताण संघर्ष, अनिवार्य विचार, चिंता कमी होते. तथापि व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा आकृतीबंध बदलतो. तो उथळ, भावनाबधिर बनतो. इतरांच्या भावनांच्या बाबतीत उदासीन बनतो. तो अधिक अपरिपक्व, पोरकट बनतो. त्याचे भावनिक जीवन शुष्क बनते. ह्या उपचारामधून फायदा होत नसल्यामुळे कित्येकदा विपरीत परिणाम घडतात. ह्यामुळे ही पद्धत फारशी वापरली जात नाही.

**रासायनिक चिकित्सा पद्धती** – [ cheme–therapy ] ह्या पद्धतीमध्ये रासायनिक औषधे येतात. ह्यामध्ये परि-शामके ] Tranquilizersk ] किंवा उत्तेजक मोडतात.

Tranquilizers— हे सर्पगंधा या भारतीय वनस्पतीच्या मुळापासून बनलेले औषध असून उत्तम परिशामक असल्याचे दिसून येते. प्रक्षुब्ध रुग्णांना शांत करण्यासाठी ह्याचा उपयोग होतो. Schizophrenia विकृतीच्या काही प्रकारांमध्ये शिवाय व्यक्तीचे विपरीत भास, भ्रम चिंताग्रस्तता ह्यांवरही गुण येतो. Schizophrenia मध्ये ह्याचा चांगला उपयोग होतो ह्या शिवाय चिंता निरोधक औषधेही वापरली जातात.

**उत्तेजके**—खिन्नता विकृतीसाठी उत्तेजके व रासायनिक औषधे निघाली आहेत. ह्या औषधांमुळे आशादायित्व, आनंदीपणा निर्माण होतो. एकूण रासायनिक पद्धती हा नवा उपक्रम ठरला आहे ह्यामुळे अनेक रुग्णांची सेवा घरी होऊ शकते ह्याशिवाय अनेक उपचार पद्धतींचा शोध लागलेला आहे.

**जयश्री जोशी**
तृतीय वर्ष कला

## मनोरुग्णांसाठी उपलब्ध असलेल्या सेवा

आज आपण विज्ञानयुगामध्ये वावरत असल्याने आपले मनोरुग्णांविषयीचे विचार आता तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ,

...१२

पूर्वग्रहरहित असे आहेत. त्यामानाने प्राचीनांचे विचार पूर्वग्रहदूषित, अंधश्रद्धायुक्त आणि अतार्किक होते. मनोरुग्ण हे सैतानाने पछाडलेले असतात, हा पूर्वीचा समज बदलून आता त्यांच्याकडे मानसिक-रुग्ण या नात्याने पाहण्यात येते. गेल्या दीडशे वर्षात मनोरुग्णांविषयीच्या समाजाच्या वृत्ती बदलत चाललेल्या आहेत. आधुनिक युगामध्ये निदाने व उपचार यामध्ये ज्ञानानुसार बदल झालेले आहेत.

मनोरुग्णांच्या बाबतीत प्रथमतः रुग्णांचे मानसिक-आरोग्य सुधारणे ही सेवेची पहिली पायरी होय. त्याचप्रमाणे रुग्णांमध्ये झालेली सुधारणा टिकाऊ स्वरूपाची असावयास पाहिजे. मानसिक आरोग्य सुधारणे म्हणजे मनोरुग्णांची समायोजनक्षमता वाढविणे, त्याच्या चुकीच्या कल्पना सुधारणे, त्याची परिपक्वता व व्यक्तित्वसंघटन यांमध्ये सुधारणा घडविणे. त्याचप्रमाणे रुग्ण व्यक्तीचे शारीरिक आरोग्य सुधारणे व औषध-योजना करणे, शस्त्रक्रिया करणे आवश्यक असते. मनोरुग्णाला जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे सुधारण्यासाठी प्रयत्न करणे म्हणजे सेवा होय. या सेवेचे दोन प्रकार असतात. ते म्हणजे ( १ ) वैयक्तिक सेवा ( २ ) संस्थात्मक सेवा.

मनोरुग्णालय हा सेवेचा सर्वात प्रगत मार्ग आहे. या सेवेचा फायदा मनोरुग्णांना व पर्यायाने समाजालाही होत असतो. मनोरुग्णांवर उपचार करण्यासाठी मोठ्या रुग्णालया-मध्ये मनोवैज्ञानिक चिकित्साविभाग असतात. पूर्वीच्या काळची मनोरुग्णालये म्हणजे मनोरुग्णांचे कैदखाने असत. यामध्ये आता सुधारणा झाली आहे. जेव्हा मनोरुग्णांची प्रकृती तीव्र प्रकारची असते, समाजाला धोकादायक असते, अशा वेळी रुग्णांना रुग्णालयातच दाखल करणे आवश्यक असते.

एखाद्या कुटुंबामध्ये एखादी व्यक्ती मनोविकृत असेल तर त्या व्यक्तीच्या वर्तनामुळे कुटुंबातील लोकांना त्रास होतो. जेव्हा ही व्यक्ती आक्रमक बनते, त्यावेळी त्या रुग्णाला शांत करणे घरातील लोकांना अशक्य असते किंवा त्यास शांत करण्यासाठी काय केले पाहिजे हे त्यांना माहीत नसते. विकृत व्यक्तीचे वर्तन लाजिरवाणे वाटते. रुग्णालयातून जी सेवा उपलब्ध असते, ती सेवा घरी करता येत नाही. म्हणून अशा मनोविकृतांना हॉस्पिटलमध्ये दाखल करणे आवश्यक असते. मनोरुग्णाचा रुग्णालय-प्रवेश हा त्याच्या उपचाराचा व सेवेचा एक आवश्यक भाग असतो. विशेषतः मनोविकृतांवरील उपचार हे सर्वंकष असावे लागतात.

रुग्णालयामधून रुग्णांना शॉक द्यावे लागतात. तसेच इन्शूलिनचे डोस किंवा इतर उपचार पद्धतींचा वापर करावा लागतो ते संस्थात्मक पातळीवरच शक्य होते.

एखाद्या रुग्णाच्या विकृतीचे निदान करताना त्याच्या विकृतीचे स्वरूप निश्चित करणे हा मुख्य उद्देश असतो. या स्वरूपनिश्चितीसाठी त्याची जीवशास्त्रीय, मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय तपासणी आवश्यक असते. या माहि-तीच्या संकलनासाठी व मूल्यमापनासाठी विविध तंत्रज्ञांची गरज असते. उदा० मनोविकृतिशास्त्रज्ञ, विकृतीचिकित्सक, सामाजिक कार्यकर्ते इत्यादी तंत्रज्ञांनी व वैद्यकशास्त्रज्ञांनी एकत्र येऊन निदान करणे इष्ट असते.

मनोविकृती शास्त्रज्ञाला प्रथमतः रुग्णाला विश्वासात घ्यावे लागते. रुग्णाशी स्नेहाचे, जिव्हाळ्याचे संबंध निर्माण करावे लागतात. या रुग्णांचा पूर्वेतिहास जाणून घ्यावा लागतो. या रुग्णांना सहानुभूतीची आवश्यकता असते. रुग्ण व्यक्तीला आपल्या जीवनसमस्या काय आहेत व आपले प्रत्यक्ष वर्णन कसे होत आहे याबाबत अधिक स्पष्ट जाणीव करून द्यावी लागते. मनोविग्रहामुळे त्याच्या मनावर पडणारे ताण कमी करून विग्रहांचे विसर्जन करावे लागते. त्याच्या अनिष्ट सवयी व वर्तनाच्या रीती बदलणे, सामाजिक आंतरक्रियात्मक व्यवहारातील त्याची क्षमता सुधारणे, वस्तुस्थिती, वर्तनमूल्ये इ. बाबतच्या त्याच्या गृहीत कल्पना सुधारून त्यात बदल घडवून आणणे, त्याचे जीवन एकंदरीने अर्थपूर्ण व समाधानकारक होईल असा मार्ग शोधून काढणे, या गोष्टी मनोविकृतीशास्त्रज्ञाला कराव्या लागतात. या दिशेने त्याचे कार्य चालू असते. हे काम खाजगी वैयक्तिक पातळीवर केले जाते.

तसेच उपचार व सेवा करण्यासाठी सुयोग्य वातावरण निर्माण करावे लागते. रुग्णाचे पुनर्वसन व रोग्याचा संपर्क मार्गदर्शककेंद्रांशी राहील अशी व्यवस्था करणारे कार्यकर्ते या प्रकारच्या कार्यात विशेष प्रशिक्षण घेतलेले असतात.

पूर्वी मांत्रिक व देवऋषी यांच्याकडून उपचार केले जात. हे लोक अधिभौतिक व आधिदैविक मानवी, पाशवी इत्यादी सर्व प्रकारचे उपाय योजत. परंतु रुग्णाला सुधारण्याच्या बाबतीतील अघोरी उपचारांमध्ये मांत्रिकाचे अज्ञान, चुकीच्या कल्पना व भावना दिसून येत. त्यामुळे

मांत्रिकाचे अघोरी उपचार हे सेवा होऊ शकत नाहीत. खाजगी व्यवसाय करणारे मनोविकृतिशास्त्रज्ञ व मानसोपचारतज्ञ यांच्याकडून तसेच मार्गदर्शक केंद्रांमधून सेवा उपलब्ध असतात. मनोरुग्णांसाठी औषधोपचार अजूनही मोठ्या प्रमाणात उपलब्ध नाहीत. जसजसे औषधोपचार प्रगत होत जातील तसतसे मनोरुग्णांवर उपचार करणे सोपे होईल व त्यांचा सुधारसंभव व सेवा वाढीस लागेल.

**सुषमा अरगडे**
तृतीय वर्ष कला

## मानसिक आरोग्य

आजचे युग हे चिंतेचे, व्यग्रतेचे युग समजले जाते. जीवनात निर्माण होणाऱ्या संघर्षाला तोंड देणे, मानवाला कठीण जात आहे. व्यक्तीच्या आयुष्यात अनेक कारणांनी ताण निर्माण होतो तसेच प्रत्येक व्यक्तीची स्वतःची जीवनमूल्ये वेगळी असतात. प्रत्यक्षात मानलेली मूल्ये व व्यवहारात रूढ असलेली मूल्ये यात भेद आढळल्यास संघर्ष निर्माण होतो व त्यामुळे व्यक्तीचे मानसिक आरोग्य धोक्यात येते. व्यक्तींमध्ये मनोविकृती निर्माण होते. आयुष्यात निर्माण होणाऱ्या ताणाला यशस्वीपणे तोंड देण्याची शक्ती व्यक्तीमध्ये असणे आवश्यक आहे.

मनोविकृतींची भयानकता, त्यांची विविधता, त्यांच्या समाजातील लागणीचे प्रमाण यांचा विचार केल्यास, सर्वसामान्य माणसांनी समाजातील मनोविकृतींच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी काहीतरी विधायक कृती करण्याची नितांत आवश्यकता आहे, हे स्पष्ट होते. मनोविकृती ही सर्व जगातील लोकांची समस्या आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर हा प्रश्न सर्वच राष्ट्रांच्या चिंतेचा विषय झाला आहे. तीन प्रमुख आंतरराष्ट्रीय संस्था मानसिक आरोग्यविषयक प्रश्नांबाबतचे काम करीत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेचे पहिले प्रमुख संचालक डॉ. ब्रॉक चिशोम म्हणतात की, माणसाला पूर्णपणे समजून घेणे व ज्यामुळे तो इतरांबरोबर जगू शकेल अशा पद्धतीचा विकास करणे, ही सध्याच्या अनिश्चिततेच्या व धोक्याच्या काळात मानववंशाची अत्यंत निकडीची गरज आहे. युनेस्को व दि वर्ल्ड फेडरेशन फॉर मेंटल हेल्थ या संस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर अतिशय महत्त्वाचे कार्य करीत आहेत.

मनोविकृतीबाबतच्या कार्याचे दोन भाग पडतात. पहिला प्रतिबंधात्मक व दुसरा विधायक. प्रतिबंधात्मक उपायातील जननशास्त्रविषयक उपाय काही मनोविकृती स्पष्टपणे अनुवंशिक स्वरूपाच्या असतात. तसेच इतर काही मनोविकृतींमध्ये अनुवंशिक घटकांचा प्रभाव पडत असावा असे वाटते. यासाठी विवाहपूर्व वैद्यकीय तपासणी व मार्गदर्शन हा मार्ग महत्त्वाचा व उपयुक्त ठरेल.

**मानसशास्त्रीय प्रतिबंधात्मक उपाय**—आवश्यक क्षमतांचा विकास होणे आवश्यक आहे. जीवनात यशस्वी समायोजनासाठी बौद्धिक, भावनिक, सामाजिक क्षमतांचा योग्य प्रमाणात विकास होणे आवश्यक आहे. योग्य विकासाची लक्षणे पुढीलप्रमाणे :

१. **समतोल**— व्यक्तीला भावनांचा समतोल राखता आला पाहिजे. भावनिक बधिरता किंवा उद्रेकी आविष्कारही असू नये. भावनांचे योग्य प्रसंगी योग्य प्रमाणात प्रकटीकरण व नियंत्रण करता येणे अवश्य आहे. भावनांचे दडपण सर्वांच्याच मनावर पडत असते. तथापि त्यामुळे गांगारून जाऊन नित्याचे व्यवहार सोडू नये. विघातक भावनांपेक्षा विधायक भावनांना जीवनात प्राधान्य मिळावे.

२. **विविधता व संपन्नता**— समाजात वावरताना इतरांचे हक्क, जबाबदाऱ्या, वासना समजून घेऊन त्यांचा आदर करणे इष्ट असते. आपले व्यक्तिमत्त्व संपन्न असायला हवे. व्यक्तीच्या सामाजिक जीवनात सभ्यता व प्रामाणिकपणा हवा. इतरांच्या गुणांची स्पष्ट कौतुक करायची वृत्ती हवी.

३. **व्यक्तिमत्त्वाची एकात्मता**— जीवनाच्या सर्व अवस्थांमध्ये व्यक्तिविकास सुरळीत व निरोगी व्हावा. जीवनामध्ये सामंजस्य प्रस्थापित झालेले असावे. व्यक्तिगत अपरिपक्वता, परस्परविरोध, समान उद्दिष्टांचा अभाव यांमुळे जीवनात विघ्ने उत्पन्न होतात. संकटप्रसंगी इतरांचा भावनिक आधार मिळणे आवश्यक असते. बालवयातच नव्हे तर प्रौढ वयातही अशा भावनिक आधारांची फार

आवश्यकता असते. मानवी जीवनात नैतिक, सामाजिक मूल्याने निश्चित दिशा व स्थैर्य येत असते. ज्याला कशाचाच विधिनिषेध नसतो त्याचे जीवन हेलकावे खात असते.

मानसिक आरोग्य चांगले असणे म्हणजेच समाधान व शांतता यांची शक्यता व्यवहारात उतरविणे.

**जयश्री माजगावकर**
तृतीय वर्ष कला


Step in for all kinds of your requirements in Stationary, Cutlery, Provisions, Grainary etc.

K. N. SHAH

363/64, J. M. Road
POONA 411 005

*Choose The Most Exciting Course Choose*

TELEPHONE OPERATOR'S COURSE

- ONE MONTH DURATION,
- TOTAL FEES Rs. 56/-
- PRACTICAL TRAINING ON PBX BOARD
- CERTIFICATES AWARDED

*Contact :*
**Premier Institute**
Near Telephone Exchange
Bajirao Road, Poona 2

Phone : 26033

DECO-MAT
**Authorised Dealer :
Madura Coats Ltd.**

★

**Suppliers In Materials For Tailoring And Readymade Garment Mfg.**

★

226 Nana Peth
Poona-411 002

*With Best Compliments From :*

UNITED TRADING CORPORATION

83/1 Parvati, Sahakar Nagar,
Opp. Gandhi Training College,
POONA 411 009

*Authorised Dealers In :*

**Bajaj Electrical Appliances**
Also

*DEALERS IN :*

**Steel & Wooden Furniture and Electrial Appliances.**

# अधुरे स्वप्न : एका कळीचे

कु. शशिकला हरनोळ
द्वितीय वर्ष कला.

कळी उमलण्या अगोदरच कोणीतरी तिच्या पाकळ्या ओढून-ताणून तिला उमलवले. तेव्हा तिचे ते कोवळे वय होते. तिला पूर्णपणे यौवन देखील प्राप्त झालेले नव्हते. फुलवताना तिला असंख्य वेदना झाल्या. तरीही ती काहीच बोलू शकत नव्हती. कारण... कारण आपण बहरलो आहोत, फुलवो आहोत, आपले कौतुक केले जाते या एकाच सुखद जाणिवेने ती आनंदित होत होती. आपले कोवळे वय ती विसरून गेली होती. काट्यांची देखील तिला जाणीव नव्हती. ती स्वतःच्या सौंदर्यावर, यौवनावर, अलिशान जीवनावर नितांत खूष होती. बाह्य जगाची तिला पर्वाच नव्हती. आपला तोरा मिरवीत ती भटकणार होती. सर्वांचे लक्ष खिळवून घेणार होती. आपण गळून खाली पडताना तर हे काटे आपल्या अंतःकरणास फार मोठी जखम करतील किंवा आपले जीवन येता-जाता ठोकरल्या जाणाऱ्या दगडाप्रमाणे होईल, अशी कल्पना देखील तिला कधी शिवली नाही. अशी कल्पना तिच्या मनात डोकावेल तरी कशी ? कारण... कारण अशी कल्पना करण्या इतपत तिची विचारशक्ती मोठी नव्हती. अशा कल्पनेची तिला जाणीवच नव्हती. शिवाय असे विचार, अशी कल्पना मनात येण्याइतके तिचे वयही नव्हते. त्यातच निसर्ग तिला साथ देत होता. त्यामुळे तर तिच्या आनंदाला, बहराला पारावारच राहिला नव्हता. आपल्या सौंदर्याच्या डौलात ती मिरवत होती, नाचत होती, बागडत होती. स्वतःला ती फार भाग्यवान समजत होती. या आनंदात या सुखात तिला स्वतचे भानही राहात नसे. ती स्वतःला विसरून जाई परंतु हे सुख, हे भाग्य तिला फारच थोडे दिवस लाभले. निसर्गालाही तिचा हेवा वाटू लागला. तिच्या या सुखी जीवनाला कुणाची तरी दृष्ट लागली. कोणीतरी तिचे सुखी जीवन गढूळ केले. आणि... आणि मग काय ? दिवसेंदिवस ती मुरझू लागली.

यौवनाचा आनंदसुद्धा तिने पूर्णपणे लुटला नव्हता. सौंदर्याचा साजदेखील यत्किंचितही उतरवला गेला नव्हता. आपल्या भावना, आपले दुःख ती मुक्तपणे सहन करीत होती. दुःख चव्हाट्यावर येऊ नये म्हणून हसण्याचा प्रयत्न करी. परंतु मनाच्या आत ती पोखरली जात होती. तो बहर, ते सुखी जीवन डोळ्यापुढे तरळत होते. तिचे एकाकी मन आक्रंद करी. डोळ्यात कुठेतरी आसवे चमकत. तिच्या दुःखांना वाट फोडत. तिच्या दुःखात सहभागी होईल असा तिला कोणी सोबती नव्हता. आणि असता तर प्रथम तिला हे सांगावे लागले असते की, "मी कळी असतानाच, माझी पूर्ण वाढ होण्याअगोदरच मला जुलमाने फुलवले गेले आणि पश्चात्ताप करण्यासाठी असे रस्त्यावर सोडून दिले." आपल्या जीवनाची अशी विस्कळीत अवस्था सांगण्यास तिचे मन धजत नव्हते. हे सांगण्यास तिला फार मोठा अपमान वाटत होता. हे जग निंदेने कुत्सित नजरेने आपल्याकडे बोट दाखवीत आहे याची तिला चागलीच खंत वाटत होती. एके काळी जगाकडे ती तुच्छतेने, गर्वाने पहात होती. तीच आता मदतीसाठी दीनवाणी याचना करीत होती, पदर पसरवीत होती.

तिचे स्वप्न तिच्या आशा-आकांक्षा पूर्ण होण्याअगोदरच एका दुष्टाची दृष्ट तिच्या सुखी जीवनाला लागली त्या दुष्टाने तिला बहारातून उठवून विरहाच्या दरीत ढकलले होते. तिच्या स्वप्नाचे उंच उंच विशाल मनोरे पायाखाली तुडवले जात होते. रोज ती स्वप्नाचे एकावर एक महाल रचीत होती, रंगरंगोट्या करून त्याला सजवीत होती. अचानक सजवलेला महाल धडधड कोसळताना पाहून तिचे मन होरपळून गेले. तरीही ती हसण्याचा प्रयत्न करीत होती. हसण्याशिवाय तिला दुसरा मार्गच नव्हता. कशानकशात ती स्वतःला गुंतवून ठेवी. जुने दिवस विसरण्यासाठी धडपड करी. त्यावेळी तिच्या मनात विचार येई की, देवाने एखादी जादूची कांडी फिरवावी की ज्यामुळे गतस्मृती विसरून नवजीवन प्राप्त होईल.

कळी उमलवणाऱ्याने तिचा, उमलवल्यानंतर कधीच विचार केला नाही. परंतु बिचाऱ्या कळीला हे फार फार उशीरा कळाले. तेव्हा वेळ निघून गेली होती.

तो प्रवाह तिला थांबवता आला नाही. त्या प्रवाहाने फार मोठी आणि फार पुढे झेप घेतली होती. परंतु... तिला उमलवणारा केव्हांच दूर झाला होता.ती गतस्मृतीच्या आठवणीने अश्रू निखळत होती. गतस्मृती उफाळून येत होत्या. दुःखाची झळ वरचेवर जाणवतच होती. भावना असह्य झाल्या की बिचारी अश्रूंचा बांध फोडी. परंतु ती कोणाजवळही आपले दुःख व्यक्त करू शकत नव्हती. दुःखाच्या खोलीचा अंदाज घेत म्हणायची, "देवा ! तू आणखीन किती रे परीक्षा घेणार आहेस ? किती सत्त्व पाहाणार आहेस ?" जणू देवाजवळही तिच्या प्रश्नाचे उत्तर नव्हते. परंतु तिला तडफडताना पाहाताना नियतीला कठोर आनंद वाटत होता.

उमलवणाऱ्याची रोज ती चकोराप्रमाणे वाट पाही. आज ना उद्या त्याला निश्चित आठवण येईल. एक दिवस निश्चित तो आपली विचारपूस करण्यात येईल, सांत्वन करेल, थोपटेल. कोमजलेले मन पुन्हा टवटवीत होईल. अशी एक ना दोन किती तरी स्वप्नं रंगवीत होती. मनाशी आशा बळावत होती. आशेचे तंतू मोठे चिकट आणि चिवट असतात. त्या आशा-आकांक्षा मनाशी बाळगून संध्याकाळ झाली की ती विसाव्यासाठी पानाआड होई. विसावा तो कुठला ? कायमचीच निद्रा लागली तर बरे होईल, असे वारंवार वाटे. असले जीवन तिला नको होते. परंतु, तिच्या भावना, तिचे स्वप्न तोडण्या फोडण्यात नियती आनंद भोगत होती. उषःकाल होताच ती गेलेला दिवस विसरून आलेल्या प्रातःकाळात रमून जाण्याचा प्रयत्न करी. कृत्रिम टवटवी आणून त्याची वाट पाही. तिचे डोळे सैरावैरा भिरभिरत; त्याचा शोध घेत. थोडा पावलांचा ध्वनी आला तरी ती दीनवाणी नजर चमकली जाई. किती आतुरतेने तिचे डोळे त्या आवाजांचा कानोसा घेत. वाट पाहतच निराशेने तिला पानात दडावे लागे. इतर कळ्या आपल्याकडे निंदेने,:कुचेष्टेने पाहात आहेत असे तिला वाटे. त्यांच्या नजरेशी नजर भिडविण्याइतपत देखील तिच्यात धैर्य नव्हते. फार मोठी जखम झाली होती तिच्या हृदयाला-जखमेवर खपली तर बसत नव्हतीच पण ती जखम दिवसेंदिवस चिघळतच होती.

एक......एक दिवस असा उगवला की अचानक दुरूनच तो येताना दिसला. तो बऱ्याच अंतरावर होता. इकडे आनंदाला जणू भरतीच आली होती. कुठे लपू नि कुठे नको असे झाले होते तिला. एका पानाआड स्वतःला लपवून घेतले तिने. भावनांना तर भरते आले होते नुसते. तो जवळ येईल. आपल्याला खूप खूप शोधेल. आपण दिसलो नाही तर मोठमोठ्याने टाहो फोडेल. देवाजवळ याचना करील, निराश होईल. इकडे-तिकडे सैरावैरा नजर धावेल त्याची. घडलेल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप होईल त्याला. आपल्या सारखेच अश्रू ढाळेल तो. आक्रोश करून आपल्या नावाने दर्दभऱ्या किंकाळ्या फोडेल. एक ना अनेक. कितीतरी विचार. मग त्याला अशा अवस्थेत पाहाणे आपल्याला अशक्य होईल. मग हळूच पानाआडून आपण निघून त्याच्यावर लटका राग दाखवून गतस्मृती जागृत करून देऊ. आपल्या अशक्त शरीराकडे पाहून तो व्याकूळ होईल. तो स्वतःवरच खूप रागावेल. खूप पश्चात्ताप होईल त्याला. हळुवारपणे कुरवाळेल मला.माझी मग क्षमा मागेल व आपण रडत रडत आपली विरहकथा व्यक्त करू. आपले हाल ऐकून त्याचे मन हळहळेल. आपल्याला थोपटेल. कुरवाळेल. "यापुढे असे विरहाच्या दरीत ढकलून जाणार नाही." असे तो बोलत राहील. मावळलेला दिवस पुन्हा उगवेल. गेलेला बहर पुन्हा येईल... क्षणार्धात अनेक भावना उंचबळून येत होत्या. जणू त्या आनंदाला भरतीच येत होती. भानच हरपले होते तिचे.

परंतु...परंतु फक्त स्वप्न रंगविण्यासाठीच देवाने तिला जन्म दिला होता की काय कुणास ठाऊक ? लाजत-मुरडत लटक्या रागाने त्याला ती सामोरी जाणार तोच क्षणभर तिला असे वाटले आपणास भोवळ येऊन आपण दुःखाच्या गर्तेत पडत आहोत. तो...हो ! तोच तिच्या शेजारी असलेल्या कळीला उमलवत होता. तिच्या अवती-भवती फिरत होता. तिच्याशी क्रीडा करीत होता.

त्या... त्या दिवसापासून तो तिला त्या ठिकाणी नियमित येताना दिसायचा. नंतर तिलाही अर्धवट फुलवून पुढच्या कळीकडे वळणार हे माहीत असून सुद्धा का कोण जाणे बिचाऱ्या कळीला त्याच्या बद्दल प्रीतीच वाटे. तिच्या जीवनाचा स्वामी होता ना तो ! ती सर्व विसरण्याचा प्रयत्न करी. त्या आठवणी पुसल्या जात नव्हत्या. पण पोळ्यातील मधमाशाप्रमाणे त्या घोंघावत होत्या. आठवणीने तिच्या मनाचा कब्जा घेतला होता. दुःख सहन करण्याची हद्द संपली होती. जगणे असह्य झाले होते.

विचारात असतानाच कुठून तरी मंद अशा वाऱ्याची

झुळुक आली. त्यासरशी ती भानावर आली. सूर्य मावळतीला आला होता. न जाणो किती वेळ अशा विचारात घालविला ! जणू ती मंद वाऱ्याची झुळुक तिच्या सांत्वनासाठीच आली होती. तिचे ओले डोळे कोरडे करण्यासाठीच आली होती.

बिचारी कळी गतस्मृती हृदयाच्या एका कप्प्यात खोलवर रुजविण्या खेरीज काहीच करू शकत नव्हती. आणि ती त्याला विसरूही शकत नव्हती.


*With Best Compliments From :*

**Coal and Coke Trading Co.**

230-B, Mangalwar Peth,
POONA-11

पुण्यात राहाण्याची उत्तम सोय

**★ हॉटेल भूषण ★**

जंगली महाराज देवळाजवळ,
रेव्हेन्यू कॉलनी, मॉडर्न कॉलेजजवळ,

शिवाजीनगर, पुणे ४११००५
फोन : ५७७२५

गंध मधुर धुंद किती, सोऽहम् अगरबत्ती !

**सोऽहम् अगरबत्ती**

निरनिराळ्या सुवासात व
वेगवेगळ्या छटांत

हिना, मोगरा, गुलाब, केवडा,
सदाबहार व पारिजातक

उत्पादक : एस्. दिवेकर आणि कं.
६३५ सदाशिव पेठ, पुणे ३०

Phone : 55022

Hotel

**SAPNA**

573/7, Jangli Maharaj Road
Near Sambhaji Park
POONA 5

*WITH COMPLIMENTS FROM*

# Gee Pee Industries
# &
# Gobsons ( India ) Ltd.

**19, CHAKLA STREET, BOMBAY 400 002**

**Manufacturers of YOYO goods, Underwears ( gents and ladies ), Nylon briefs, Leg briefs (cotton and nylon ), Girdle belts and Protectors, Tee-shirts ( cotton and nylon)**

**For your Comfort use YOYO Underwears and briefs**

*Visit :* LADIES PARADISE
49 / 5, Ganpati Chowk, Laxmi Road, Poona 411 002

*For Creative Ideas*
*Printing at par Excellence*

**VISIT**

## IDEAL PRINTERS

1170 / 13–A 'Sushil', Shivajinagar
POONA 411 005

★

*Designing & Printing of Invitation Crads is our speciality*

*With Compliments From :*

## Shri Sai
## Service Station
## &
## Poona Coffee House

♠ ♠ ♠

889/90 Jangali Maharaj Road
Deccan Gymkhana,
Poona 411 004

Phone : 50042

# रोना ? नहीं.... सोना !

**रवींद्र महाजन**
पदवीपूर्व वाणिज्य

विधाताकी बनायी हुई यह दुनिया मानो एक अजायबघर है। जो जिस दृष्टिसे, जिस चीजकी ओर देखेगा, उसे वह चीज वैसी ही नजर आएगी। इस अजायबघरमें स्वर्गीय सौंदर्यकी झलक दिखानेवाली अनुपम प्रकृति है, और उजाड रेगिस्तान भी। नयनमनोहारी शबनम भी है, और अँधेरेमें भडकते शोले भी। दल-दलको खिला देनेवाली फूलोंकी मुक्त, मुग्ध हँसी भी है, और तडपते हुए, दिलके अरमानोंका आइना 'रोना' भी।

लोग अक्सर हँस-मुख रहनेकी चेष्टामें लगे रहते हैं और आम तौरपर रोना पसन्द नहीं करते। दुनियामें प्रतीत होनेवाला सौंदर्य इन्सान के मनके आइनेमें प्रतिबिंबित हो उठता है, और वही सौंदर्य मुक्त-मुस्कान के रूपमें प्रकट होता है!

लेकिन 'रोना' जैसी चीज़ के लिए इन्सान के मनमें इतना उच्च स्थान नहीं है। ऐसा क्यों? अगर इस प्रश्नपर आप विचार करें, तो उत्तर साफ है कि आँसू बहाना बुज़दिलीपन माना जाता है और इसीलिए आदमी रोकर बुज़दिल बनना नहीं चाहता। पर ज़रा विचारके देखिये सचमुच यह रोना याने ईश्वरका इन्सान को दिया हुआ सबसे बडा वरदान साबित होगा।

इन्सानके अन्दर जो ग़म का बोझ है, वह रोने से हल्का हो जाता है। कोई न हो तो अपने इस साथी को वह अपना ग़म दे सकता है। हँसी सिर्फ खुशियाँ बाँट लेती है, और इसीलिए वह हमारी सच्ची साथिन है। इसीलिए इन्सान के दुखदर्दोंको उँडेलनेका महत्त्वपूर्ण साधन है रोना!

जन्मतेही बच्चा रोता है, जो उसके नीरोग होनेका सबूत माना जाता है! रोनेका माहात्म्य अवर्णनीय है। काश, कि आम आदमी अपने साथ होनेवाली ईश्वरकी सबसे पहली देनको अशुभसूचक मानकर न अस्वीकृत करता। वेदनाओंकी आगसे जलनेके बाद मनुष्य अगर रोनेका धुवाँ न छोडे, तो, जिंदगीपर आमादा होनेकी नौबत उसपर आ गुज़रेगी। न वह अपना काम ठीकसे कर पाएगा, और न ही व्यवस्थित रूपसे जी सकेगा। इसीलिए दृष्टिज्ञानके बाद आँखोंका दूसरा महत्त्वपूर्ण उपयोग है रोना।

अगर इस जहान में जीना हो तो रोनेकी कला आत्मसात करनी चाहिए। वैसे तो रोना विशेष रूपसे ग्रहण करनेकी आवश्यकता नहीं है, क्योंकि, ईश्वरने अन्य ऐहिक भोगी चीजोंका बाँट-बखरा इन्सानोंमें शायद तोल मोल कर न किया हो, पर रोना तो हरेक को दिया है। ईश्वरकी यह सबसे अनमोल देन है। फिर भी मैं 'कला' शब्दका प्रयोग कर रहा हूँ क्योंकि रोनेके अनेक प्रकार हैं, और कब कहाँ रोना चाहिए, यह इन्सानको सदैव ध्यानमें रखना चाहिये। वह एक कला ही है।

अगर मनुष्य अपने ही ग़म के लिए रोए, तो वहाँ रोना उसका दुख बाँट लेगा। अगर दूसरोंके उजडते आशियाने देखकर उसका दिल रोने लगेगा तो वह उसकी सहृदयताका प्रतीक होगा। और सच तो यह है कि इन्सानको हमेशा दूसरोंके लिए ही रोना चाहिए। किसीने ठीक कहा है—

> "स्वयं के लिए रो जितना चाहे,
> बनेंगे आँसू तिरसूल।
> संसार के लिए रो, जितना बन सके,
> बनेंगे आँसू फूल।।"

इन्सानको रोना चाहिए। रोना एक सहज प्रवृत्ति है। और आजकल परिवर्तनशील कालकी दैन्यावस्थाही इन्सानको 'रोना' सिखाती है, यह बतलाना बेजा न होगा।

इसीलिए जब जब किसीकी दिलको व्याकुल बनानेवाली वेदना की कसक मेरे हृदयमें उछलकर आ जाती है तो आँसू सहजही मेरी आँखोंसे झरने लगते हैं।

'रोना' मानवका एक सबसे अच्छा मित्र, ईश्वरकी सबसे बडी देन और दिलमें उबलती हुई भावनाओंका चमकदार आइना है।

इसे संभालकर रखिएगा। खोइएगा नहीं।

# सुनिये आपबीतियाँ

**राणी आवटे**
प्रथम वर्ष कला

कॉलेजवाले लडकोंका बडा होस्टेल। दोपहरका समय होने पर भी बडी चहल-पहल है। कहीं सीटी बज रही है, तो कहीं प्रति किशोरकुमार आवाज लगा रहे हैं। कहींसे बाथरूम-सिंगरोंकी आवाज गूँज रही है, तो किसीके बुल्बुल-तरंगपर "तन डोले मेरा मन डोले" सुनाई दे रहा है। कहीं कोई ( absent minded ) सिगरेटी धुएँकी लकीरोंमें अकेले अपनेही में खो गया है। कहींसे जोरोंसे हँसी कानोंपर आ रही है।

ऐसा ही एक कमरा नं. १३। अशोक, मुकुंद तथा दिलीप गप्पें हाँक रहे हैं। बातें यादोंपर आती हैं। बातोंही बातोंमें दिलीपको एक किस्सा याद आता है।

सुनिये! क्या हुआ, भैयाको दादर जाना था। इसलिये मैं और भैया पूना स्टेशन गये थे। गाडीके आनेपर भैया बैठे, कुलीने सामान लगा दिया। बादमें गाडी निकली तो बाय बाय, माँको प्रणाम वगैरा कहना हो गया, और मैं निकला। प्लॅटफॉर्मसे निकलते समय जब T.C. ने टिकट माँगा, तो जेबसे निकालकर उसे दे दिया और जैसेही सीटी बजाते हुए इधर-उधर देख रहा था, तो T. C. की आवाज सुनायी दी "क्यों भाई! मजाक उडा रहे हो क्या? यहाँ पूनाके प्लॅटफॉर्मपर खडे हो और टिकट दे रहो हो दादरका!"

देखा तो सच। भूलसे मैं भैयाका और भैया मेरा टिकट लिये हुये चल पडे थे! अब क्या करें? मैंने T. C. से माफी माँगकर उसे सब बता दिया। मेरी ओर पैरोंतक देखकर वह भला आदमी जान गया कि, महोदय मुश्किलमें फँस गये हैं। और बोला, "जल्दी शिवाजीनगर स्टेशनपर जाइये! गाडी मिल जाएगी।" भागते हाँफते मैं रिक्षासे शिवाजीनगर पहुँचा और देखता क्या हूँ कि, गाडी स्टेशनके बाहर चली गयी थी। हरे राम! अब क्या किया जाय कुछ सूझता नहीं था। तबतक गाडी हाथसे छूटी थी। कुछ भी नहीं कर सकते थे। तुमही बता दो मैंने क्या किया होगा?।

"कुछ समझमें नहीं आता। फिर हुआ क्या?" अशोकने पूछा।

"अरे, मैंने टिकट रिफंड कर लिया। पैसे थोडे कम मिले, भैयाको वहाँ जुर्माना देना पडा! लेकिन पूरा नुकसान तो रुक गया न!"

* * *

फिर अशोक अपने बचपनकी याद हँसी दबाकर सुनाने लगा। तुम्हारी यह बात है लेकिन मैं तो बडी मुश्किलमें फँसा था। बचपनमें मैं गाँवमें स्कूल जाता था। दोपहर बारासे शाम साढेपाँच बजेतक स्कूल रहता था।

| (१८) श्री. एन. जे. इनामदार | ,, |

तसेच जिमखान्याच्या अंतर्गत येणाऱ्या विविध विभागांचे अहवाल खालीलप्रमाणे आहेत:—

## मॉम

'मॉम' ह्या हस्तलिखित नियतकालिकाचे हे पाचवे वर्ष. 'मॉम' हे महाविद्यालयात सुरू झालेले पहिले हस्तलिखित नियतकालिक. 'मॉडर्न महाविद्यालय' यातील आद्याक्षरे घेऊन 'मॉम' हे नाव धारण करणारे हे हस्तलिखित विद्यार्थिवर्गात तर प्रिय आहेच पण पुण्याच्या सर्व स्थानिक वृत्तपत्रांतून त्यास वेळोवेळी सचित्र प्रसिद्धी मिळाली असल्याने 'मॉम' शिक्षणप्रेमी पुणेकरांच्या मनापर्यन्त पोहोचले आहे.

'मॉम' साठी स्वतंत्र काचफलक आहे. 'मॉम' महिन्यातून दोनदा नियत दिनांकांना ( दिनांक ५ व २० ) नियमितपणे प्रकाशित होते. विद्यार्थिनींच्या लेखनगुणास, हस्ताक्षर, चित्रकलादी गुणांना विशेष वाव मिळावा म्हणून १९७२–७३ पासून 'मॉम' चा महिला विशेषांक प्रकाशित होऊ लागला. ह्या अंकातील लेखन, रेखाटन, सजावट इ. सर्व विद्यार्थिनीच करतात. हा अंक प्रतिवर्षी समारंभपूर्वक प्रसिद्ध केला जातो. या वर्षीच्या महिला विशेषांकाचे प्रकाशन सौ. नलिनी लिमये यांच्या शुभहस्ते झाले. या अंकाचे संपादन कु. उज्ज्वला पारसनीस यांनी केले होते.

या वर्षी 'मॉम' चे पहिल्या सत्रात सहा आणि दुसऱ्या सत्रात पाच असे अकरा अंक निघाले. विनोद विशेषांक, कविता विशेषांक ही मॉमची नेहमीची वैशिष्ट्ये.

# आमचे वादस्पर्धांतील उत्तुंग यश



यशोधरा भालेराव











उज्वला पारसनीस

अविनाश धर्माधिकारी

( वरून ) ढाल क्र.(१) कला आणि वक्तृत्व मंडळ वादस्पर्धा, भोर.
ढाल क्र.(२) आंतर महाविद्यालयीन शारदा करंडक कथा-कथन स्पर्धा, अहमदनगर.
ढाल क्र.(३) कविवर्य मोरोपंत आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा, बारामती.



कु. यशोधरा भालेराव लखनौ येथे आंतर विद्यापीठ वादस्पर्धेतील पारितोषिक स्वीकारताना

# वर्गप्रतिनिधी



खुर्चीवर ( डावीकडून ) : श्री. कोठारी, श्री. सोळंकी, प्रा. आपटे (कार्याध्यक्ष), डॉ. गाडगीळ, प्राचार्य लिमये डॉ. कुलकर्णी, श्री. रानभरे, श्री. डोलारे, श्री. धैर्यवान.
उभे १ ली ओळ ( डावीकडून ) : श्री. खेर, श्री. मोदी, श्री. गोखले, श्री. बागमार, श्री. सावंत, श्री. आरु, श्री. भगत, श्री. कपोते, श्री. गाडवे, श्री. नगरकर.
उभे २ री ओळ ( डावीकडून ) : श्री. बडद (सेवक), श्री. पवार (सेवक). श्री. भोसले, श्री. सरनाईक श्री. गोळे, श्री. हेगडे, श्री. पासलकर ( सेवक ), श्री. कदम ( सेवक ) श्री. काटकर (सेवक).

## पुणे विद्यापीठ युवक महोत्सव, : कोपरगाव

### अभिनंदन



श्री. अजित दरेकर
तृतीय वर्ष कला, अभिनयाचे
पहिले पारितोषिक



युवक महोत्सवात द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या 'सायलेन्स ! खटला चालू हाय' एकांकिकेतील यशस्वी कलाकार.

अहमदनगर येथील सारडा महाविद्यालयात झालेल्या शारदा करंडक कथाकथन-स्पर्धेतील विजयी स्पर्धकांच्या कथाकथनाचा रंगदार कार्यक्रम ' मॉम ' ने पहिल्या सत्रात सादर केला.

या वर्षी ' मॉम ' ने ' कॉम ' आणि ' सायन्स न्यूज ' ह्या नियतकालिकांच्या संपादक मंडळाच्या सहाय्याने ' असे निघते वृत्तपत्र ' या विषयावर दि. ४ जानेवारी १९७६ रोजी एक छोटे शिबिर घेतले. शिबिराच्या अध्यक्ष-स्थानी वृत्तविद्या संस्थेचे प्रमुख श्री. ल. ना. गोखले होते. या निमित्ताने ' मॉम ' चा वृत्तपत्रासारखा अंक काढण्यात आला.

' मॉम ' चा आणखी एक लक्षणीय उपक्रम म्हणजे ' दलित विशेषांक '. महाविद्यालयात स्थापन झालेल्या ' मॉडर्न मित्र मंडळाचे ' उद्‌घाटन कुलगुरू प्रा. देवदत्त दाभोळकर यांच्या शुभहस्ते दि. २९ जानेवारी १९७६ रोजी झाले. त्या निमित्ताने श्री. मारुती माने व श्री. विजयकुमार ' रौनक ' यांनी संपादित केलेल्या दलित विशेषांकाचे प्रकाशनही त्याच वेळी प्रा. दाभोळकरांनी केले.

महाविद्यालयातील भित्तीपत्रकांची ' दारूबंदी विशेषांकाची ' स्पर्धा महाविद्यालयाने पहिल्या सत्रात घेतली होती. त्या स्पर्धेत ' मॉम ' ला दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले हे नमूद करण्यास आनंद होतो.

वृत्तपत्र विशेषांकाचे आणि दलित विशेषांकाचे पुण्यातल्या सर्व वृत्तपत्रांनी आवर्जून कौतुक केलेले आहे. ' मॉम ' म्हणजे मॉडर्नचा मानबिंदू असे समीकरण रूढ झाले आहे.

## नाट्य–विभाग

महाविद्यालयाचा नाट्य-विभाग या वर्षी अनेक कारणांनी गाजला. महाराष्ट्रीय कलोपासक या संस्थेच्या वतीने झालेल्या पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत महाविद्यालयाने व. पु. काळे यांची ' निरंजन, मला उत्तर हवंय ' ही एकांकिका सादर केली. या एकांकिकेचे दिग्दर्शन कु. नीरा लाळे ह्या विद्यार्थिनीने केले होते. एक अभिनव उपक्रम म्हणून पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धा झाल्यानंतर स्पर्धेचे परीक्षक श्री. मधू लोखंडे व श्री. देविदास बागूल यांच्यासमवेत एकांकिकेत भाग घेणारे कलावंत आणि इतर विद्यार्थी यांच्या चर्चेचा एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या वेळी एकांकिकेची निवड, दिग्दर्शन, अभिनय, तांत्रिक बाजू इ. गोष्टींवर मनमोकळी चर्चा झाली. या चर्चेतील काही सूचना आणि बरेचसे आत्मपरीक्षण यांमुळे नाट्यविषयात रस घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा बराच फायदा झाला.

नाट्य-विभागाने कोपरगाव येथील पुणे विद्यापीठ आयोजित युवक महोत्सवात ' सायलेन्स ! खटला चालू हाय ' ही एकांकिका सादर केली आणि द्वितीय क्रमांक मिळवला. त्यातही विद्यार्थी श्री. अजित दरेकर यांना अभिनयाचे प्रथम क्रमांकाचे पदक व कु. शैलजा सोनटक्के हिला दुसऱ्या क्रमांकाचे पदक मिळाले ही अभिमानाची गोष्ट होय.

मराठी रंगभूमीवरील प्रसिद्ध नट, दिग्दर्शक व नाटककार डॉ. श्रीराम लागू यांच्याशी ' रंगभूमी व इतर संबंधित प्रश्न ' या विषयावर खास चर्चा नाट्य विभागाने आयोजित केली. अभिनेत्याची तयारी एकूण जीवनातच कशी घडत जाते आणि अभिनय त्याच्या एकूण व्यक्तित्वाचा एक प्रकारे कसा भागच आहे याबाबत डॉ. लागू यांनी सांगितले. त्याबरोबर अभिनयाच्या संदर्भात चित्रपट आणि रंगभूमी यांतील वेगळेपण त्यांनी स्पष्ट केले.

# वादविवाद मंडळ

वक्तृत्वाच्या माध्यमातूनच नेता आणि समाज यांत संबंध प्रस्थापित होत असतो. या दृष्टीने नेतृत्व वक्तृत्वाशी जवळून संबंधित आहे. म्हणून वक्तृत्व-कलेला असाधारण महत्त्व आहे. ह्याच दृष्टीने वादविवाद मंडळाने यंदाच्या वर्षी विशेष कार्य केलेले आहे, स्पृहणीय यश संपादन केलेले आहे.

वादविवाद मंडळाच्या इतिहासात १९७५-७६ हे वर्ष विक्रमी वर्ष ठरले आहे, हे नमूद करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. महाविद्यालयाने काही निवडक स्पर्धांत भाग घेतला व स्पर्धकांनी विजय संपादन करून महाविद्यालयाच्या कीर्तीत अनमोल भर घातली.

( १ ) अहमदनगर येथील पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या शारदा करंडक कथाकथन स्पर्धेत कु. उज्ज्वला पारसनीस आणि कु. यशोधरा भालेराव यांनी भाग घेतला. कु. पारसनीस यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले व संघास प्रथम क्रमांक मिळून महाविद्यालयास **शारदा करंडक** मिळाला.

( २ ) बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या कवी मोरोपंत वादविवाद आणि वक्तृत्व स्पर्धेत श्री. अविनाश धर्माधिकारी आणि कु. उज्ज्वला पारसनीस यांनी भाग घेतला. श्री. अविनाश धर्माधिकारी यांना वादविवाद-स्पर्धेत दुसरे आणि वक्तृत्व-स्पर्धेत विषयातले पहिले बक्षीस मिळाले. त्याचप्रमाणे दोन्ही स्पर्धांत त्यांना प्रेक्षकांनी उत्स्फूर्तपणे दिलेली बक्षिसे मिळाली.

कु. उज्ज्वला पारसनीस ह्यांना वादविवाद स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. महाविद्यालयाच्या संघाला वादस्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला आणि महाविद्यालयाला करंडक मिळाला.

( ३ ) भोरच्या ‘ साहित्य, वक्तृत्व आणि कलामंडळाने ’ घेतलेल्या वादस्पर्धेत-महाविद्यालयाला उपविजेते-पदाची ढाल मिळाली. कु. उज्ज्वला पारसनीस आणि श्री. अविनाश धर्माधिकारी यांनी या स्पर्धेत भाग घेतला. कु. पारसनीस यांना द्वितीय क्रमांकाचे आणि श्री. धर्माधिकारी यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

( ४ ) वाडिया महाविद्यालयातर्फे घेतल्या जाणाऱ्या ‘ हिज हायनेस राजा ऑफ सांगली, गोखले चषक वादस्पर्धामधे कु. यशोधरा भालेराव आणि श्री. भालचंद्र चिणे यांनी भाग घेतला. कु. भालेराव यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

( ५ ) कोपरगाव येथील युवक महोत्सवात झालेल्या परिसंवादात श्री. अविनाश धर्माधिकारी यांना तृतीय क्रमांक मिळाला.

( ६ ) पुणे विद्यापीठ आयोजित ‘ जयकर करंडक ’ वादविवाद स्पर्धेत महाविद्यालयाच्या कु. यशोधरा भालेराव यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

( ७ ) या वर्षापासूनच सुरू झालेल्या आणि पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या बँक ऑफ बडोदा वक्तृत्व स्पर्धेत कु. यशोधरा भालेराव यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले व महाविद्यालयाला ढाल मिळाली.

( ८ ) लखनौ येथे फेब्रुवारी १९७६ मध्ये झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत भाग घेण्यासाठी कु. यशोधरा भालेराव या आमच्या विद्यार्थिनींची पुणे विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून निवड झाली. तिने लखनौ येथील स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून महाविलयाबरोबरच पुणे विद्यापीठासही यशश्री प्राप्त करून दिली आहे.

( ९ ) वरील स्पर्धांखेरीज कै. न्या. रानडे वादस्पर्धेत श्री. अविनाश धर्माधिकारी आणि कु. यशोधरा भालेराव यांनी व कै. डॉ. हिवाळे वादस्पर्धेत श्री. अविनाश धर्माधिकारी आणि श्री. चंद्रशेखर खिरे यांनी महाविद्यालयाच्या वतीने भाग घेतला.

वरील सर्व स्पर्धांत भाग घेणाऱ्या विद्यार्थि-विद्यार्थिनींना प्राचार्य, जिमखाना प्रमुख आणि डॉ. नवलगुंदकर यांनी मार्गदर्शन केले आणि प्रोत्साहन दिले. त्यामुळे वादविवाद मंडळ या वर्षी महाविद्यालयाचे यशोबिंदू ठरले.

## कला–मंडळ

१९७५–७६ या वर्षी कलामंडळाने आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे आपल्या कार्याची तीन सूत्रे योजिली होती.

(अ) विविध आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांकरिता विद्यार्थी पाठविणे.

(आ) कलागुण असलेल्या विद्यार्थ्यांना वाव मिळावा याकरिता सर्व कलाकार विद्यार्थि-विद्यार्थिनींच्या सराव-बैठका घेणे. विद्यार्थ्यांची चित्रे व छायाचित्रे काचफलकावर लावणे.

(इ) संगीत व इतर कलांसंबंधी विद्यार्थ्यांची जाण वाढावी याकरिता प्रथितयश कला-विज्ञांचे छोटेसे भाषण व त्या कलाप्रकाराचे प्रत्यक्षीकरण असे कार्यक्रम आयोजित करणे.

या वर्षीचे यशस्वी विद्यार्थी—

(१) श्री. विकास पुरंदरे (द्वितीय वर्ष वाणिज्य)– रोटरॅक्ट आंतरमहाविद्यालयीन वादन स्पर्धा : तबला-वादनात प्रथम क्रमांक.

(२) श्री. सदानंद हर्डीकर (तृतीय वर्ष वाणिज्य)–पुणे विद्यापीठातर्फे आयोजित आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव : चित्रकलेत उत्तेजनार्थ प्रमाणपत्र.

**विशेष कार्यक्रम**

(१) सतारनवाज उस्ताद उस्मानखां यांनी सतारवादनाकरिता युरोपचा यशस्वी दौरा केला. त्यांच्या-बरोबर तबला-साथीकरिता मॉडर्नचे श्री. विकास पुरंदरे (द्वितीय वर्ष वाणिज्य) गेले होते. या उभयतांचा सत्कार, श्री. उस्मानखाँ यांचे ‘ सतार ’ या वाद्याबद्दल छोटेसे भाषण, व त्यानंतर सतारवादन असा कार्यक्रम २३ सप्टेंबर ७५ ला झाला. अध्यक्षस्थानी डॉ. ना. र. मारुलकर होते.

(२) दि. २३ जानेवारी ७६ या दिवशी प्रा. कमलाकर परचुरे (फर्गसन् महाविद्यालय) यांचे गझल संगीत प्रकार यावर भाषण व त्यानंतर त्यांच्या पत्नी सौ. श्यामा परचुरे यांच्यासमवेत त्यांचे गझलगायन. तबल्याची साथ श्री. विकास पुरंदरे यांची होती.

* * *

वरील विविध स्पर्धा, उपक्रम इत्यादींसाठी आम्हांस माननीय प्राचार्य लिमये, प्रा. स. य. गंभीर यांचे मार्गदर्शन, आणि प्राध्यापकवर्ग, कार्यालयीन कर्मचारी, सेवक, आणि विद्यार्थी ह्यांचे सहकार्य मिळाले. ह्या सर्वांचे आभार.

**कु. जयश्री करंदीकर**
**श्री. रमेशकुमार रामपाल**
विद्यार्थि-प्रतिनिधी.

**प्रा. पद्माकर आपटे**
कार्याध्यक्ष-जिमखाना

## वार्षिक स्नेहसंमेलन

या वर्षी स्नेहसंमेलन आगळ्या आणि नावीन्यपूर्ण पद्धतीने साजरे केले गेले.

संमेलनप्रसंगी खालील स्पर्धा घेण्यात आल्या व त्यांतील विजयी विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली.

(१) चित्रकला (२) हस्ताक्षर (३) रंगावली (४) निबंध (५) पत्रलेखन (६) अभिनय (७) कवितावाचन (८) रंगभूषा (९) संगीत (१०) सामान्यज्ञान (११) वेषभूषा (१२) वक्तृत्व (१३) समस्यापूर्ती (१४) पुष्पपात्ररचना.

या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी भाग घेतला. दि. २९-२-७६ रोजी प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. प्रदर्शन विभागांत विज्ञान शाखेकडील विद्यार्थ्यांनी शास्त्रीय उपकरणे व प्रयोग यांचे मांडलेले प्रदर्शन कौतुकास्पद होते. चित्रे, फोटो, वस्तुसंचय इ. गोष्टींमुळे प्रदर्शनास चांगला उठाव आला होता. संमेलनाच्या विद्यार्थ्यांना विशेष आवडलेला भाग म्हणजे अल्पोपाहार. दि. १ व २ मार्च ७६ या दोन दिवशी अल्पोपाहार आयोजित करण्यात आलेला होता. त्याच वेळी फनी गेम्सची योजना केली होती. त्यामध्येही विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला.

संमेलन यशस्वी करण्यासाठी माननीय प्राचार्य, उपप्राचार्य प्रा. गंभीर यांचे मार्गदर्शन, तसेच प्राध्यापक वर्ग, कार्यालयीन कर्मचारी, सेवक आणि विद्यार्थी यांचे सहकार्य मिळाले सर्वांना त्याबद्दल धन्यवाद.

**कु. जयश्री करंदीकर**
**श्री. रमेशकुमार रामपाल**
विद्यार्थि-प्रतिनिधि

**प्रा. पद्माकर आपटे**
कार्याध्यक्ष
वार्षिक स्नेहसंमेलन

## शारीरिक शिक्षण विभाग

शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस संघनायकांकरिता दि. १० ते २० जुलै या काळात नेतृत्व शिक्षण शिबिर घेण्यात आले व १ ऑगस्टपासून शारीरिक शिक्षणाचे तास नियमितपणे सुरू झाले. २५० विद्यार्थी व १२० विद्यार्थिनी असे एकूण ३७० विद्यार्थी शारीरिक शिक्षण घेत होते. याकरिता विद्यार्थी-विद्यार्थीनींचे तीसच्या संख्येचे सहा गट करण्यात आले. प्रत्येक गटाचे नेतृत्व एकेका संघनायकाकडे देण्यात आले. या गटांना सत्य, धर्म-न्याय इत्यादी नावे देण्यात आली होती. तीनही विद्याशाखांतील विविध स्तरांवरील विद्यार्थ्यांना एकमेकांशी स्नेह- संवर्धन करण्याची संधी या गटयोजनेमुळे मिळाली व सहकार्य, स्वयंशिस्त, एकता आणि पारस्परिक स्नेह टिकून राहिला.

शारीरिक शिक्षणाच्या तासांच्या वेळी खालील उपक्रम घेण्यात आले— (१) रोड रनिंग, (२) क्रॉस कण्ट्री, (३) सराकिट रनिंग, (४) जिमॅनॅस्टिक्स्, (५) यौगिक पद्धतीचा व्यायाम, (६) बास्केट बॉल, फूट बॉल, व्हॉली बॉल (मुलांसाठी) व थ्रो बॉल व व्हॉली बॉल (मुलींसाठी) यांसारखे छोटे मोठे खेळ. या व्यतिरिक्त दर आठवड्यास फिटनेस टेस्ट घेण्यात आली. यामध्ये ६ मि. ३० सेकंदांत एक मैल अंतर तोडणे (मुलांकरिता), व ८०० मीटर अंतर ३ मिनिटांत पूर्ण करणे (मुलींकरिता) याची चाचणी घेण्यात आली. तसेच या वर्षी

### NOBEL PRIZE WINNERS

#### KANTOROVICH - ECONOMICS

Dr. Kantorovich of the U. S. S. R. has been awarded the Nobel Prize in Economics jointly with Dr. Tjalling Koopmans of U. S. for the year 1975. Dr. Kantorovich is a Professor at the Siberian Department of the Soviet Academy of Sciences. He worked on 'Problems of the Socialist Economy, Price Formation, the Theory of Rent Efficiency and on Capital Investments.'

'शारीरिक शिक्षणाने उंची वाढवा' या व यासारख्या विषयांवर शारीरिक शिक्षण संचालक यांनी व्याख्याने दिली. दिवाळीच्या सुटीत 'ॲथलेटिक ट्रेनिंग कॅम्प' घेण्यात आला व जवळ जवळ १५ विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घेतला. याशिवाय क्रीडांगण-सफाई, गाजर-गवत-उच्चाटन यांसारखे सेवात्मक कार्यक्रमही विद्यार्थ्यांनी हाती घेतले.

गटागटांमध्ये फुटबॉल व व्हॉली-बॉलचे सामने घेण्यात आले व त्यात 'न्याय' या गटाने विजेतेपद मिळविले.

दूर राहणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता जवळच्या महाविद्यालयात पी. टी. ला जाण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली.

१५ ऑगस्ट व २६ जानेवारी या कार्यक्रमात पी. टी. च्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. तसेच मा. प्रा. मो. भा. लिमये व इतर प्राध्यापकवर्ग आणि सन्मान्य पाहुणे यांच्या उपस्थितीत १८ जानेवारी ७६ या दिवशी 'शारीरिक शिक्षण दिन' अत्यंत उत्साहाने साजरा करण्यात आला.

खालील विद्यार्थ्यांनी या वर्षी उत्तम गटनायक म्हणून काम केले :—

| | |
|---|---|
| (१) श्री. पी. एम्. आवटे | द्वि. व. वाणिज्य |
| (२) श्री. ए. डी. काळे | तृ. व. कला |
| (३) श्री. आर. एम्. गांधी | पदवीपूर्व शास्त्र |
| (४) कु. प्रतिभा बुधकर | प्र. व. वाणिज्य |
| (५) कु. भारती उपाध्ये | ,, |
| (६) कु. माधुरी बर्वे | पदवीपूर्व वाणिज्य |

**श्री. अविनाश ठकरार**
द्वि. व. वाणिज्य

**कु. विनीता बापट**
प्र. व. वाणिज्य

**श्री. किरण लागू**
शारीरिक शिक्षण संचालक

## NOBEL PRIZE WINNERS

### TJALLING KOOPMANS : ECONOMICS

Dr. Tjalling Koopmans, an American, has been awarded the Nobel Prize in Economics jointly with Dr. Leonid Kantorovich of U. S. S. R. for the year-75. Dr. Koopman's 65, has shown that on the basis of certain criteria of efficiency, it is possible directly to make important deductions concerning optimum price systems. Dr. Koopmans is at present working at Yale University.

## राष्ट्रीय छात्र संघटना ( N. C. C. )

१९७५-७६ या शैक्षणिक वर्षात आपल्या महाविद्यालयातील एकूण २५७ विद्यार्थि-विद्यार्थिनींनी छात्र-सेनेच्या विविध विभागामध्ये ( Units ) दाखल होऊन छात्रसेनेचे प्रशिक्षण संपादिले. विद्यार्थ्यांची विभागानुसार विभागणी खालीलप्रमाणे :—

| | | |
|---|---|---|
| ( १ ) | १ महाराष्ट्र सिग्नल कंपनी | ३१ |
| ( २ ) | ३ महाराष्ट्र एअर स्क्वाड्रन | २२ |
| ( ३ ) | ३ महाराष्ट्र आर्म्ड स्क्वाड्रन | ३ |
| ( ४ ) | १२ महाराष्ट्र बटालियन | ९४ |
| ( ५ ) | ३ महाराष्ट्र नेव्हल युनिट | ६९ |
| ( ६ ) | २ महाराष्ट्र गर्ल्स् बटालियन | ३७ |
| | एकूण | २५६ |

श्री. भूपाल वान्हळ या विद्यार्थ्याची दिल्ली येथील प्रजासत्ताक दिन संचलनासाठी निवड झाली. खालील विद्यार्थी सर्वोत्तम छात्रसैनिक म्हणून निवडलेले गेले आहेत.—

| विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | दर्जा | विभाग |
|---|---|---|---|
| श्री. जे. बी. गोखले | प्र. व. शास्त्र | सार्जंट | १ महाराष्ट्र सिग्नल कं. |
| श्री. बी. आर. वान्हळ | प्र. व. वाणिज्य | कॅडेट | ३ महाराष्ट्र एअर स्क्वाड्रन |
| श्री. आर. व्ही. नवले | तृ. व. वाणिज्य | कॅडेट कॅप्टन | ३ महाराष्ट्र नेव्हल युनिट |
| कु. सुरेखा ठाकूर | प्र. व. कला | कॅडेट | २ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन |
| श्री. ए. व्ही. माळवे | प्र. व. वाणिज्य | कॅडेट | ३ महाराष्ट्र आर्म्ड स्क्वाड्रन |
| श्री. परमजितसिंग पंजाबी | प्र. व. शास्त्र | सार्जंट | १२ महाराष्ट्र बटालियन |

प्रा. अ. लु. पाथरे हे छात्र सेनेच्या नाविक दलाचे एन्. सी. सी. ऑफिसर आहेत.

प्रा. पद्माकर आपटे
Officer-in-Charge.

## NOBEL PRIZE WINNERS

### BEN MOTELSON : PHYSICS

Prof. Ben Motelson ( Denmark ) has been awarded the Nobel Prize in Physics with Prof. Aage Bohr (Denmark) and Prof. Rainwater of Columbia University U. S. A. for the year 1975. Prof. Motelson was born in 1926 in Chicago. He is Professor at Nardisk Institute of Copenhagen and a visiting Professor at the University of California. The nobel prize has been awarded for the work on ' How certain particles affect atomic nuclei. '

# राष्ट्रीय सेवा योजना

यंदाच्या वर्षी मॉडर्न कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेने चौथ्या वर्षात पदार्पण केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या काही स्वरूपामध्ये मूलभूत बदल करून कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

यंदाच्या वर्षी कार्यक्रमाची सुरुवात आपल्या महाविद्यालयात नव्याने आलेले प्राध्यापक डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांच्या व्याख्यानाने झाली. त्यांच्या व्याख्यानाचा विषय " राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे व जीवनातील तिचे महत्त्व " असा होता.

पथकाचा प्रथम सत्रातील प्रमुख कार्यक्रम म्हणजे पर्वती–पाचगाव येथील वृक्षारोपण. त्या कामासाठी एक दिवसाची एकूण आठ शिबिरे घेण्यात आली. त्या वेळी चर खणणे, खड्डे खणणे व वृक्षारोपण करणे ही प्रमुख कामे झाली. वृक्षारोपणाच्या कार्यक्रमासाठी वनखात्याचे फार मोठे साह्य व सहकार्य आपल्या पथकाला मिळाले.

रिमांड होम व अंधशाळा येथे विद्यार्थ्यांचे गट नियमितपणे जात होते. नारळीपौर्णिमा, दसरा व मकरसंक्रान्त या दिवशी वरील ठिकाणी विशेष कार्यक्रम विद्यार्थ्यांनी साजरे केले.

या वर्षापासून एस. पी. कॉलेजजवळील ' मूकबधिर विद्यालया 'मध्ये विद्यार्थ्यांनी काम केले. तेथील फन-फेअरच्या तयारीसाठी आपल्या पथकातील मुलांनी मदत केली.

यंदाच्या वर्षी प्रथम सत्रातील प्रमुख कार्यक्रमांमध्ये चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. विषय होता " रा. से. योजना : सद्यःस्थिती व वैशिष्ट्ये ". पुणे विद्यापीठाचे कुलगुरू मा. देवदत्त दाभोलकर, एस. पी. कॉलेजचे प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर; पुणे विद्यापीठाचे युवक कल्याण अधिकारी श्री. थोरात, मुख्य अधिकारी श्री. राजा, तसेच निरनिराळ्या कॉलेजचे राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्राध्यापक व विद्यार्थी, नगर येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे संयोजक प्रा. मुनशी व आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य मो. भा. लिमये हे या शिबिराला हजर होते. या चर्चासत्राचे संचलन प्रा. के. पं. मंगळवेढेकर यांनी केले. शिबिरातील चर्चेमध्ये प्रा. श्री. लिमये; प्रा. मुनशी, विद्यापीठ अधिकारी, प्राध्यापक, विद्यार्थी, तसेच पिसोळी गावातील ग्रामस्थांनी भाग घेतला. मा. देवदत्त दाभोलकर यांनी अध्यक्षीय भाषणात राष्ट्रीय सेवा योजनेकडून काय अपेक्षा आहेत याचे मर्मग्राही विवेचन केले. चर्चेनंतर श्री. मुनशी यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची वाटचाल याबाबत अनुभवाचे बोल सांगितले.

कॉलेजमध्ये दोन वेळा झालेल्या रक्तदान मोहिमेत विद्यार्थ्यांनी भाग घेतला व रक्तपेढीस योग्य ते सहकार्य दिले.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया, राहुरी शाखा, येथील प्रमुख श्री. ए. जी. शास्त्री यांचे भाषण आयोजित करण्यात आले. त्या वेळी श्री. शास्त्रींनी राहुरीला भेट देण्याचे निमंत्रण दिले होते. त्यानुसार कॉलेजमधील काही विद्यार्थी ( पथकातील ) श्री. शास्त्री यांनी राहुरी परिसरात केलेल्या कामाची पाहणी करण्यासाठी गेले होते.

आंतरराष्ट्रीय महिला वर्षानिमित्त मध्यप्रदेश सरकारतर्फे खचरोड, ता. पाचाळसी, जिल्हा उज्जैन या ठिकाणी पश्चिम विभागीय शिबिर आयोजित करण्यात आले होते. पुणे विद्यापीठातर्फे आपल्या कॉलेजमधील विद्यार्थिनी कु. संजीवनी रांजेकर ( तृ. व. वाणिज्य ) आणि कु. लता कांबळे ( द्वि. व. कला ) शिबिराला गेल्या होत्या. याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

" गलिच्छता आणि रोगराई " विरुद्ध युवकांची मोहीम : यंदाच्या वर्षी या मोहिमेखाली पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील कॉलेजांसाठी शिबिरे आयोजित करण्यात आली. आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ' उंड्री ' ( हडपसरजवळील ) ह्या गावी दिनांक १८ ते २८ नोव्हें. १९७५ अखेर शिबिर आयोजित केले.

शिबिरासाठी महाविद्यालयाच्या एन. एस्. एस्. पथकातील ३० विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. शिबिरामध्ये लो. टिळक आयुर्वेद महाविद्यालयातील २६ विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. शिबिराच्या काळात ग्रामसफाई, रस्तेसफाई, आरोग्याचे महत्त्व गावकऱ्यांना समजावून देणे इत्यादी कार्यक्रम करण्यात आले. रोज सकाळी श्रमदानाचा कार्यक्रम नियमित होत असे. श्रमदानाच्या कार्यक्रमात "वडाची वाडी" येथे शाळाबांधणीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. रा. से. योजनेतर्फे गावकऱ्यांना देशभक्तीपर 'शहीद' हा चित्रपट दाखविण्यात आला. त्याचप्रमाणे डॉ. शेंडये यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या मदतीने 'दंतयज्ञ' साजरा केला. तसेच कोंढवा येथील कुष्ठरोग केंद्रास भेट दिली.

या शिबिराला प्रा. गोसावी, प्रा. गोखले, प्रा. आपटे, प्रा. बनसोडे, यांनी भेटी दिल्या. तसेच पुणे विद्यापीठाचे डॉ. पाटील व श्री. पवार यांनी शिबिरार्थींशी राष्ट्रीय सेवा योजनेविषयी प्रश्नोत्तर रूपाने चर्चा केली.

प्रा. नाहळदे व टिळक कॉलेज येथील श्री. यशपाल मनराल यांनी शिबिर व्यवस्थित पार पाडण्यास बहुमोल सहाय्य केले.

आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून 'उंड्री' येथील झालेल्या शिबिराची माहिती युवक मित्रांना देण्यात आली. या कार्यक्रमामध्ये श्री. दीपक घुबे, राजेंद्र गुंड, विराज उपाध्ये, कु. विद्या ओझर्डे व कु. सुमन चव्हाण या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी भाग घेतला होता.

"जुन्या वास्तूंचे संरक्षण व स्वच्छता" या मध्यवर्ती सरकारच्या योजनेखाली पुण्यातील रा. से. योजनेच्या सर्व पथकांनी शनिवारवाड्याचा परिसर सुशोभित करण्याचे ठरविले होते. या मोहिमेमध्ये आपल्या कॉलेजने भाग घेऊन प्रत्येक रविवारी (६ रविवार) शनिवारवाडा दक्षिण भाग स्वच्छ करण्याचा कार्यक्रम हाती घेतला.

१५ ऑगस्ट व २६ जानेवारी रोजी पिसोळी येथे ध्वजारोहण व श्रमदान, तसेच कॉलेज आवारातील गाजरगवत निर्मूलन, चर्चासत्रे इत्यादी नियमित कार्यक्रम घेण्यात आले.

मा. प्राचार्य मो. भा लिमये, उपप्राचार्य डॉ. भीमराव कुलकर्णी व डॉ एल. एच्. गाडगीळ आणि सल्लागार समितीचे सदस्य प्रा. गोसावी, प्रा गोखले, प्रा. नाहळदे ह्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व साह्य पथकास मिळाले.

---

## NOBEL PRIZE WINNERS

### AAGE BOHR : PHYSICS

Prof. Aage Bohr of Denmark has been awarded the Nobel Prize in Physics, with Prof. Ben Motelson also of Denmark and Prof. Rainwater of Columbia University U. S. A., for the year 1975. Prof. Aage Bohr was born in Copenhagen in 1922. After building up a career in the teaching profession he became Professor of Physics in the University of Copenhagen in 1956. Thereafter he became Director of the Institute of Theoritical Physics (The Niels Bohr Institute) since 1965 and Director of NORDITA since 1975. The Nobel prize has been awarded for the work on 'How certain particles affect atomic nuclei?'

# कला संघटना

या वर्षीच्या संघटनेच्या कामासाठी पुढील सदस्यांचे मंडळ होते—

प्राचार्य मो. भा. लिमये, अध्यक्ष

प्रा. मुकुंद महाजन, कार्याध्यक्ष

प्रा. सु. व्यं. धायगुडे, प्रा. सौ. गावसकर

प्रा. कु. भारती वर्दे, प्रा. कु. परब—प्राध्यापक सदस्य

श्री. भरत देशपांडे, कु. माधुरी साठे, कु. सीमा वाव्हळ, श्री. विजय तडवळकर, कु. संध्या साठे, कु. निशा वायंगणकर व श्री. संतोष धैर्यवान,– विद्यार्थि प्रतिनिधी.

याखेरीज मंडळास श्री. मारुती माने, श्री. दीपक घुबे आणि श्री. संभाजी शिंदे या विद्यार्थ्यांचेही विशेष साह्य मिळाले.

## NOBEL PRIZE WINNERS

### THREE SCIENTISTS SHARE NOBEL PRIZE IN MEDICINE

Dr. David Baltimore, Dr. Howard Martin Temin and Dr. Renato Dulbecco, all Americans, have been jointly awarded the Nobel Prize in Physiology or Medicine for cancer research discoveries.

Although the three are acquainted, they worked independently on the project " the interaction between tumor viruses and the genetic material of the cell " and came to the same findings about viruses and cancer.

37 years old Dr. Baltimore is presently at the Massachusetts Institute of Techonology.

Dr. Temin, 40, born in Philadelphia, is presently at the University of Wisconsin.

Dr. Dulbecco, 61, born in Catanzaro, Italy, was educated and worked originally at the University of Torino. In 1949, he went to U. S. as Senior Research Fellow at the California Institute of Techonology and became a U. S. citizen. Dr. Dulbecco is presently at the Imperial Cancer Fund Laboratory, in London.

१९७५–७६ मधील कार्यक्रमांचा आढावा सारांशाने पुढे दिला आहे.

| दिनांक | कार्यक्रम | वक्ते | अध्यक्ष |
|---|---|---|---|
| १ ऑगस्ट १९७५ | उद्घाटन (लो. टिळक पुण्यतिथी) | डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे | डॉ. भीमराव कुलकर्णी |
| २५ ऑगस्ट १९७६ | ' आधुनिक भारतीय स्त्री' या विषयावर परिसंवाद | सौ. कमल पाध्ये (प्रमुख वक्त्या), कु. माधुरी साठे, कु. सुमन जोशी, कु. नयना कारखानीस, श्री. सुधीर पुरोहित, कु. सुलोचना रेंघे, कु. निशा वायंगणकर, श्री. मारुती माने, श्री. दीपक घुबे, कु. उज्ज्वला पारसनीस, कु. यशोधरा भालेराव (सर्व विद्यार्थी). | डॉ. सौ. श्यामला बनारसे |
| ५ सप्टेंबर १९७५ | शिक्षक-दिन | श्री. अजित दरेकर, कु. शीला शिर्के, श्री. संतोष धैर्यवान, कु. माधुरी साठे, प्रदीप कदम. | सौ. हेमा लेले, माजी विद्यार्थिनी. |
| १६ सप्टेंबर १९७५ | हिंदी दिवस (संभाषण वर्गाचे उद्घाटन) | श्री. वि. शं. गोखले, | डॉ. भीमराव कुलकर्णी |
| २ ऑक्टोबर १९७५ | म. गांधी जयंती (गांधी विचार परिसंवाद) | डॉ. जी. एन्. जोशी (प्रमुख वक्ते). विद्यार्थी वक्ते श्री. भरत देशपांडे, कु. ज्योती राऊत, कु. सीमा वाव्हळ, श्री. प्रदीप शहा, कु. कल्पना सोमवंशी, कु. निशा वायंगणकर, श्री. मारुती माने, कु. शीला शिर्के, श्री. चारुचंद्र भिडे. | डॉ. भीमराव कुलकर्णी |
| ११ ऑक्टोबर १९७५ | परिसंवाद ' मनोविकृतीचे मानसशास्त्र ' | कु. रंजना नांदे, कु. माधुरी साठे, कु. शैलजा सोनटक्के, कु. विद्या देवडीकर, कु. जयश्री जोशी, कु. सुषमा अरगडे, व स्मिता माजगावकर. | डॉ. सौ. श्यामला बनारसे |
| ११ डिसेंबर १९७५ | ' मानवी हक्क '(व्याख्यान) | डॉ. शं. ना. नवलगुंदकर | डॉ. भीमराव कुलकर्णी |
| १२ जानेवारी १९७६ | दि प्रिन्सिपल्स ऑफ व्हर्सिफिकेशन : दि ट्रॅडिशनल थिअरी. | डॉ. एस. नागराजन् | प्रा. मो. भा. लिमये |

१६ जानेवारी १९७६ 'मिश्र कवि-संमेलन' — श्री. जलील इलाहाबादी व कु. सुरैयाबानू (उर्दू); श्री. परशराम रोहडा, प्रा. गोवर्धन शर्मा व श्री. एम्. कमल (सिंधी); श्री. प्रतापसिंह खेतवाल व श्री. किशोर वासवानी (हिंदी); कु. वासंती पटवर्धन व कु. लता भिसे (मराठी); व श्री. रामनारायण-दास सोळंकी (गुजराती) — प्रा. मुकुंद महाजन

३० जानेवारी १९७६ 'फिल्म शो' — मानसशास्त्रीय फिल्म्स

वरील सर्व कार्यक्रमांत विद्यार्थ्यांचा सहभाग आणि उत्साह प्रकर्षाने दिसून आला.

मार्चमध्ये मळवलीजवळच्या तीन निवडक खेड्यांचे आर्थिक-सामाजिक सर्वेक्षण घेतले जाणार आहे.

संघटनेच्या ग्रंथालयात सुमारे ११७ ग्रंथ असून द्वितीय व तृतीय वर्ष कला या वर्गांचे विद्यार्थी ग्रंथालयाचा लाभ घेतात.

प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थि-मित्र या सर्वांच्या सहकार्यामुळेच संघटना यशस्वीपणे कार्य करीत आहे. या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

**मुकुंद महाजन**
कार्याध्यक्ष

## शास्त्र-संघटना

१९७५-७६ चे शास्त्र संघटनेचे कार्यकारी मंडळ खालीलप्रमाणे—

अध्यक्ष— प्राचार्य मो. भा. लिमये
उपाध्यक्ष— डॉ. ल. ह. गाडगीळ
कार्याध्यक्ष— प्रा. किशोर काशिद
सदस्य प्राध्यापक— अ. वि. रायरीकर,
प्र. दि. कुलकर्णी,
र. वि. गंधे

सहाय्यक विद्यार्थि-प्रतिनिधी— श्री. बी. के. मोदी, श्री. आर. ए. दास, श्री. वाय. व्ही. शिंत्रे, श्री. व्ही. व्ही. वर्तक, श्री. जे. एम्. कुलकर्णी, कु. उर्मिला रणदिवे, कु. भारती सोनटक्के.

फेब्रुवारी १९७५ मध्ये संघटनेच्या सभासदांनी मुंबईच्या "भाभा अणु केंद्रास" भेट दिली. "सायन्स न्यूज" हे नामाभिधान धारण करणारे भित्तिपत्रक हे संघटनेचे खास वैशिष्ट्य आहे. आकर्षक व रसपूर्ण मजकूर यामुळे हे भित्तिपत्रक केवळ शास्त्रच नव्हे तर कला व वाणिज्य शाखेचे विद्यार्थीही आवडीने वाचतात. अणुबाँब, अल्कोहोलचे दुष्परिणाम इत्यादी चालू घडामोडीवरील लेखांबरोबरच विद्यार्थ्यांच्या लेखांनाही यात प्रसिद्धी दिली जाते. "सायन्स न्यूज"च्या यशाचे श्रेय सर्वश्री विनायक वर्तक व राजन दास या विद्यार्थिद्वयाकडे जाते.

या वर्षाच्या पहिल्या सत्रात शास्त्र शाखेकडील विविध विषयांची ओळख होण्याच्या दृष्टीने 'फिल्म शो' आयोजित केला होता.

या शैक्षणिक वर्षात काही नामवंत व्यक्तींची व्याख्याने विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी व विविध विषयांची त्यांना तोंडओळख व्हावी म्हणून आयोजित केली होती. ती खालीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| प्रा. म. रा. राईलकर | – | भूमितीतील काही संकल्पना |
| प्राचार्य मो. भा. लिमये | – | वाणिज्याची मूलतत्त्वे |
| प्राचार्य एम्. जी. शहा | – | स्थापत्य महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यासंबंधी. |
| डॉ. एस्. जी. सैनानी | – | वैद्यकीय महाविद्यालय |

२ ऑक्टोबर १९७५ रोजी निरनिराळ्या संघटनांतर्फे दारुबंदी विशेषांक प्रदर्शित करण्यात आले. त्यात " सायन्स न्यूज "ला प्रथम क्रमांक मिळाला, ही गोष्ट नमूद करण्यास आम्हांस आनंद वाटतो.

त्याचप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील ' मॉम ' या भित्तिपत्रकाने आयोजित केलेल्या ' असे निघते वृत्तपत्र ' या कार्यक्रमाच्या चर्चेत शास्त्र संघटनेने सक्रिय भाग घेतला. शिवाय आपल्या महाविद्यालयात स्नेहसंमेलना-निमित्त भरविण्यात आलेल्या प्रदर्शनास शास्त्र संघटनेने भरघोस सहकार्य दिले.

**प्रा. किशोर काशिद**
कार्याध्यक्ष

## वाणिज्य संघटना

वाणिज्य शाखेतील द्वितीय व तृतीय वर्ष वर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अशा ह्या संघटनेचे हे तिसरे वर्ष.

**संघटनेची कार्यकारिणी**

अध्यक्ष : प्राचार्य मो. भा. लिमये.
कार्याध्यक्ष : प्राध्यापक अ. गो. गोसावी.
प्राध्यापक सभासद : प्राध्यापक सौ. माधवी मित्रा, प्राध्यापक एन्. एफ. कर्नावट.
विद्यार्थि-सचिव : श्री. प्रकाश भावसार ( तृ. व. वा. ), कु. जयश्री गुर्जर ( तृ. व. वा. ), श्री. विनोद गुजर ( द्वि. व. वा. ), श्री. सतीश ओगले ( द्वि. व. वा. )

**विविध उपक्रम :**

व्याख्याने—( १ ) प्राचार्य मो. भा. लिमये ह्यांचे ' कॉम 'च्या ' Advertising ' ह्या विशेष अंकाच्या प्रकाशन समारंभ प्रसंगी The role of Advertising in Modern Commerce ह्या विषयावर व्याख्यान.

( २ ) प्रा. ए. डी. पुराणिक ( रीडर वैकुंठ मेहता को. ऑ. इन्स्टिट्यूट ) ह्यांचे ' रोजगार हमी योजना ' ह्या विषयावर व्याख्यान.

( ३ ) श्री. व्ही. एन्. जगदाळे ( मॅनेजमेंट कन्सल्टंट ) ह्यांचे ' मॅन पॉवर प्लॅनिंग अँड डेव्हलपमेंट ' ह्या विषयावर व्याख्यान.

( ४ ) श्री. एस्. एन्. गडाम ह्यांचे ( काम्प्युटरचा व्यवहारात उपयोग ) ह्या विषयावर व्याख्यान.

**नियोजित व्याख्याने—**

प्रा. विलास जोशी ह्यांचे ' डेलिगेशन ऑफ ॲथॉरिटी ' ह्या विषयावर आणि डॉ. सुधीर वनारसे ह्यांचे ' औद्योगिक मानसशास्त्र ' ह्या विषयावर व्याख्याने आयोजित केली आहेत.

**औद्योगिक भेटी—**

पहिल्या सत्रात मे. राजाबहादूर मोतीलाल मिल्स लि. पुणे व मे. किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लि. खडकी आणि दुसऱ्या सत्रात स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लि. खडकी, या उद्योग समूहांना भेटी दिल्या.

**नियोजित भेटी—**

फेब्रुवारी महिन्यात मे. किर्लोस्कर न्युमॅटिक्स् लि. हडपसर, येथे भेट आयोजित करण्यात आली आहे.

**लघुपट—**

दि. २८ ऑगस्ट १९७५ रोजी वाणिज्य, शास्त्र व खेळ ह्या विषयांचे लघुपट दाखविण्यात आले.

**पुस्तक पेढी—**

ह्या वर्षी तृ. व. वाणिज्य वर्गातील विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील पुस्तकांव्यतिरिक्त जादा पुस्तक देण्याची व्यवस्था करण्यात आली. ग्रंथालयात सुमारे ८५१ रु. च्या ५१ ग्रंथांची भर टाकली गेली.

**हस्तलिखित :** पहिल्या सत्रात दोन अंक प्रकाशित करण्यात आले. त्यातील एक खास अंक दारुबंदी सप्ताहाच्या निमित्ताने काढण्यात आला. दुसऱ्या सत्रात तिसरा अंक प्रकाशित करण्यात आला असून चौथा खास अंक फेब्रुवारी महिन्यात प्रकाशित झाला.

हस्तलिखिताच्या मुखपृष्ठासाठी घेण्यात आलेल्या स्पर्धेत श्री. कोळमकर ( प. पु. वाणिज्य ) यांचे मुखपृष्ठ सर्वोत्कृष्ट ठरले.

' कॉम 'चे हया वर्षीचे संपादक मंडळ :

**संपादक :** श्री. रमण सोळंकी (इन-चार्ज), कु. यशोधरा भालेराव, श्री. हेमंत आलबाल, कु. सुषमा जोशी. **विशेष सहाय्य :** श्री. शशांक खोपकर, श्री. विजय कोळमकर, श्री. प्रकाश भावसार.

**प्रशिक्षण वर्ग :** ऑक्टोबर महिन्यात तृतीय वर्ष वाणिज्य वर्गातील २३ विद्यार्थ्यांना सहकार प्रशिक्षण केन्द्रातर्फे चालविल्या जाणाऱ्या अल्पमुदत वर्गास पाठविण्यात आले. त्या वर्गाचा अभ्यासक्रम उत्साहाने यशस्वी करून त्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन केले.

**व्यवसाय मार्गदर्शन वर्ग :** दरवर्षीप्रमाणे हया वर्षीही व्यवसाय मार्गदर्शनाचा कार्यक्रम मार्च महिन्यात आयोजित केला आहे.

**वक्तृत्व स्पर्धा :** फोरम ऑफ फ्री-इंटरप्राईजची सेठ वालचन्द वक्तृत्व स्पर्धा वाणिज्य संघटनेतर्फे घेण्यात आली. कु. कोल्हे, कु. अरविंदा ठकरार व श्री. भालचंद्र चिंगे यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांची बक्षिसे मिळाली. श्री. चुत्तर व श्री माने यांना उत्तेजनार्थ बक्षिसे मिळाली.

**प्रा. अ. गो. गोसावी**
कार्याध्यक्ष

# नियोजन चर्चामंडळ

१९७५–७६ साठी नियोजन चर्चामंडळाच्या व्यवस्थापन समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश होता :

| | |
|---|---|
| प्राचार्य मो. भा. लिमये | अध्यक्ष |
| उपप्राचार्य डॉ. भीमराव कुलकर्णी | उपाध्यक्ष |
| प्रा. अ. लु. पाथरे | कार्याध्यक्ष |
| डॉ. राजेंद्र व्होरा | प्राध्यापक सदस्य |
| प्रा. र. बा. शहा | प्राध्यापक सदस्य |
| श्री. भरत देशपांडे | विद्यार्थि प्रतिनिधी |
| श्री. मारुती माने | विद्यार्थि प्रतिनिधी |
| कु. ज्योती राऊत | विद्यार्थि प्रतिनिधी |
| कु. उषा भटेवरा | विद्यार्थि प्रतिनिधी |

ह्या वर्षी नियोजन चर्चामंडळाने खालील कार्यक्रम घडवून आणले :—

३० जुलै १९७५ रोजी गोखले अर्थशास्त्र संस्थेतील प्रा. द. पां. आपटे यांच्या हस्ते मंडळाचे उद्‌घाटन आणि 'सामाजिक-आर्थिक संशोधनाचे नियोजनामधील स्थान' या विषयावर त्यांचे व्याख्यान.

२७ ऑगस्ट १९७५ रोजी गोखले अर्थशास्त्र संस्थेतील प्रा. सौ. कुमुदिनी दांडेकर ह्यांचे 'लोकसंख्येचे नियोजन : समस्या आणि भवितव्य' ह्या विषयावर व्याख्यान.

२७ डिसेंबर १९७५ रोजी मंडळाच्या सभासदांची आर्वी (जुन्नर, जि. पुणे) येथील 'विक्रम उपग्रह भूमि-केंद्र' पाहाण्यासाठी व त्याचा योजनांतर्गत झालेला विकास अभ्यासण्यासाठी शैक्षणिक सहल.

३० डिसेंबर १९७५ रोजी वैकुंठ मेहता संस्थेतील प्रा. ए. डी. पुराणिक ह्यांचे 'वीस कलमी आर्थिक कार्यक्रम' ह्या विषयावर व्याख्यान.

१२ जानेवारी १९७६ रोजी गोखले अर्थशास्त्र संस्थेचे प्रा. नीलकंठ रथ ह्यांचे 'ग्रामीण पतपुरवठ्याचा प्रश्न व ह्या योजना काळातून पतपुरवठ्यात झालेली प्रगती' या विषयावर व्याख्यान.

**प्रा. अ. लु. पाथरे**
कार्याध्यक्ष

# विद्यार्थी सहकारी भांडार अहवाल
# १९७० ते ७६

मॉडर्न महाविद्यालयाच्या स्थापनेबरोबरच जून ७० पासून विद्यार्थी सहकारी भांडाराची स्थापना करण्यात आली. प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकाकडून भांडारासाठी रुपये पाच अनामत म्हणून घेण्यात येतात. यातून जमा होणारा पैसा भांडवल म्हणून वापरण्यात येतो. विद्यार्थी जेव्हा महाविद्यालय सोडतो तेव्हा त्याची अनामत रक्कम त्याला परत करण्यात येते.

महाविद्यालयाच्या कार्यालयाजवळ भांडारासाठी स्वतंत्र विक्री व्यवस्था करण्यासाठी कौंटरस् बांधण्यात आलेली आहेत. तेथेच वेगवेगळ्या वस्तू मांडण्यासाठी काचेच्या शोकेसेस आहेत.

विद्यार्थी सहकारी भांडारातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लागणारे सर्व साहित्य माफक दरात पुरविण्यात येते. त्यात प्रामुख्याने सर्व प्रकारच्या वह्या, अकाउन्टन्सी जर्नल्स्, नकाशांच्या रूपरेषा, आखीव व कोरे कागद, शास्त्रविभागातील विद्यार्थ्यांकरिता सर्व विषयांच्या प्रयोगवह्या, गणित आणि पदार्थविज्ञान यांच्या प्रयोग-पुस्तिका व प्रयोगशाळेत लागणारे साहित्य यांचा समावेश आहे.

जून १९७५ पासून विद्यार्थी भांडाराची खरेदी-विक्री पाहण्याठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग विद्यार्थ्यांच्यामधूनच नेमण्यात आला आहे. या विद्यार्थ्यांना महिना ३० रुपये वेतन देऊन आर्थिक सहाय्य करण्यात येते. सर्वश्री विक्रम शिंदे, प्रकाश विद्वत, घनश्याम रिसबूड, सुधीर पुरोहित व शशिकांत मुनोत यांनी सुरुवातीला भांडारात सेवक म्हणून काम केले. यंदाच्या वर्षापासून भांडाराचे खरेदी-विक्री प्रमुख म्हणून श्री. एस्. बी. कवडे यांना नेमण्यात आले व त्यांना सर्वश्री अनिल काळे, ए. टी. जाधव व उद्धव जोशी ह्यांचे सहकार्य लाभले.

जुलै ७५ पासून महाविद्यालयाच्या सर्व विभागांना लागणारी स्टेशनरी व इतर साहित्य पुरविण्याची जबाबदारी भांडाराकडे सोपविण्यात आलेली आहे. तसेच वर्गपाठ लिहिण्यासाठी विद्यार्थ्यांना लागणारे कागद भांडारामार्फत मोफत पुरविण्यात येतात. निरनिराळ्या प्रकारचे नमुना अर्ज व विद्यापीठ परीक्षांचे नमुना अर्ज यांची विक्री भांडारामार्फत करण्यात येते.

वर्गप्रतिनिधींचे संयोजक मंडळ निर्माण करण्यात येऊन भांडाराची व्यवस्था पूर्णतः त्यांच्याकडे सोपविण्याचा विचार आहे.

गेल्या पाच वर्षातील खरेदी विक्रीची आकडेवारी पुढीलप्रमाणे—

| सन | खरेदी | विक्री |
|---|---|---|
| १९७०–७१ | ७२६९=६० | ४४५२=९० |
| १९७१–७२ | १०९८२=५८ | ७९५७=६३ |
| १९७२–७३ | १२००४=५१ | ११८८९=८९ |
| १९७३–७४ | १४३९७=३५ | १२११०=१६ |
| १९७४–७५ | १९४४२=५० | १८१८६=३६ |
| १९७५–७६ (डिसेंबर ७५ अखेर) | १२९५०=१५ | ९३०४=६५ |

**प्रा. म. आ. कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

## मॉडर्न महाविद्यालय : माजी विद्यार्थी संघ

मॉडर्न महाविद्यालय माजी विद्यार्थी संघाची स्थापना २६ जानेवारी १९७३ रोजी झाली. यंदाचे हे चवथे वर्ष. मागील वर्षाप्रमाणेच या वर्षी डॉ. भीमराव कुलकर्णी, उपप्राचार्य, हे कार्याध्यक्ष होते. प्रा. श्रीरंग जोगळेकर यांनी कार्यवाह म्हणून काम पाहिले. माजी विद्यार्थ्यांचे वार्षिक स्नेहसंमेलन दरवर्षी जानेवारी महिन्यात महाविद्यालयात भरते. यावर्षी २६ जानेवारी १९७६ रोजी माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन झाले. माजी विद्यार्थ्यांची परस्पर ओळख, विविध करमणुकीचे कार्यक्रम, खेळ आणि अल्पोपहार असा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. स्नेहसंमेलन सकाळी ८ वाजता सुरू होऊन दुपारी १ वाजता संपले. या वर्षी माजी विद्यार्थी संघातर्फे एखादा प्रसिद्ध वाद्यवृंद किंवा नाटकाचा कार्यक्रम करण्याचे ठरविले आहे. त्यातून मिळणाऱ्या नफ्यामधून ' माजी विद्यार्थी संघ निधी ' उभा करण्याचे ठरले आहे.

गेल्या वर्षाप्रमाणेच या वर्षीसुद्धा पुणे विद्यापीठ बहिःशाल व्याख्यानमाला योजनेतर्फे 'स्त्री-उत्कर्ष-वर्ष'-निमित्त एक व्याख्यानसत्र आयोजित केले होते.

त्यामध्ये खालील व्याख्यात्यांची व्याख्याने झाली :

| दिनांक | वक्ते | विषय |
|---|---|---|
| २२ जानेवारी १९७६ | ह. भ. प. धुंडामहाराज देगलूरकर (हस्ते व्याख्यानसत्राचे उद्घाटन) | संत जनाबाई |
| १ फेब्रुवारी १९७६ | श्री. श्री. ज. जोशी | कालच्या व आजच्या पिढीतील स्त्री-जीवन |
| २ ,, ,, | डॉ. हेमंत इनामदार | नाथीबाई ठाकरसी |
| ३ ,, ,, | डॉ. शं. ना. नवलगुंदकर | स्त्रीस्वातंत्र्य : एक सिंहावलोकन |
| ४ ,, ,, | बॅ. सौ. सुनीती पुंगलिया | कौटुंबिक कायदा |
| ५ ,, ,, | डॉ. वि. रा. करंदीकर | पुण्यश्लोक अहिल्याबाई |
| ६ ,, ,, | डॉ. सरोजिनी बाबर | लोकसाहित्यातील स्त्री-जीवन |
| ७ ,, ,, | प्रा. सौ. लीला अर्जुनवाडकर | संस्कृत साहित्यातील स्त्री |
| ८ ,, ,, | डॉ. सौ. श्यामला वनारसे | आंतरजातीय विवाह |

या सर्व कार्यक्रमांची कार्यवाही माजी विद्यार्थी संघातर्फे केली होती.

या वर्षी माजी विद्यार्थी संघाच्या कार्यकारिणीमध्ये श्री. एस्. भाटिया, श्री. हे. चिं. मोरगावकर, श्री. एस. एन्. पुरंदरे, श्री. न्यायाधीश, श्री. निवर्गी, श्री. व्ही. जी. सावंत, श्री. शिखरे, कु. छाया जोगळेकर, कु. लता कुबेर, कु. मीना जोग व कु. सुरेखा तगारे हे सभासद होते.

त्याचप्रमाणे प्रा. व्ही. जी. जोशी, प्रा. चंद्रकांत कुलकर्णी, प्रा. ए. जी. गोसावी, श्री. द. गो. बापट आणि श्री. य. पां. देशपांडे हे सन्माननीय सदस्य होते.

संघटनेचे सर्वच कार्यक्रम यशस्वी होण्यास संघटनेचे अध्यक्ष प्राचार्य लिमये यांनी वेळोवेळी योग्य ती मदत व सल्ला दिला. त्याचप्रमाणे उपप्राचार्य डॉ. भीमराव कुलकर्णी, प्रा. व्ही. जी. जोशी, प्रा. चंद्रकांत कुलकर्णी, प्रा. ए. जी. गोसावी, श्री. द. गो. बापट आणि श्री. य. पां. देशपांडे यांचेही अनमोल साहाय्य झाले. त्यामुळे पुढच्या वर्षी संघटनेच्या कार्यास अधिक गती मिळेल असा विश्वास वाटतो.

**प्रा. श्रीरंग जोगळेकर**
कार्यवाह

## मॉडर्न मित्रमंडळ

महाविद्यालयातील सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना सर्वतोपरी सहाय्य करणे, त्यांच्या समस्या महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापकवर्ग व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मदतीने सोडविणे हे प्रमुख उद्दिष्ट 'मॉडर्न मित्र मंडळाच्या' स्थापनेमागे आहे. पुस्तकांच्या, वाचनालयाच्या, शिक्षणातील इतर अडचणींच्या, शिष्यवृत्तीसंबंधीच्या समस्या इ. चा विचार करून त्या यथाशक्ती सोडविण्याचे कार्य करणे हेच मॉडर्न मित्रमंडळाचे ध्येय आहे. गेले वर्षभर असे मंडळ अस्तित्वात असावे असे मनोगत होते. त्या दृष्टीने प्रयत्न झाले आणि २९ जानेवारी ७६ रोजी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू मा. देवदत्त दाभोलकर यांच्या शुभहस्ते मंडळाची स्थापना झाली त्याच वेळी 'दलितवर्गाच्या समस्या' ह्या विषयावर झालेल्या परिसंवादात विद्यार्थ्यांनी मांडलेले महत्त्वपूर्ण विचार या अंकात इतरत्र ग्रथित केलेले आहेत.

पुढील वर्षी हे मंडळ परिपूर्ण आकार घेईल व आपले कार्य जोमाने सुरू करील अशी आशा वाटते. त्यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थी व आर्थिक दृष्ट्या मागासलेले विद्यार्थी बहुसंख्येने भाग घेतील असाही विश्वास वाटतो.

| | | |
|---|---|---|
| **प्रदीप कदम** | **माधुरी आबनावे** | **लक्ष्मण कांबळे** |
| द्वितीय वर्ष कला | पदवीपूर्व शास्त्र | तृ. व. वाणिज्य |

## नियतकालिक जाहिरात स्पर्धा

यंदा नियतकालिकासाठी जाहिराती गोळा करण्याची अभिनव स्पर्धा घेण्यात आली. या नाविन्यपूर्ण उपक्रमास विद्यार्थ्यांनी फारच उत्साहजनक प्रतिसाद दिला. जवळजवळ रु. ४,५०० च्या जाहिराती विद्यार्थ्यांनी मोठ्या परिश्रमाने गोळा केल्या. स्पर्धेत भाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन.

विद्यार्थ्यांना या जाहिराती गोळा करताना आपोआप जाहिरात व्यवहाराचे ज्ञान झाले, एक आगळा अनुभव मिळाला. विद्यार्थ्यांना परिश्रमाचा मोबदला म्हणून प्रत्येकाने गोळा केलेल्या जाहिरातींच्या रकमेच्या दहा टक्के कमिशन देण्यात येईल.

याव्यतिरिक्त सर्वाधिक रकमेच्या जाहिराती जमविणाऱ्या खालील विद्यार्थ्यांना, विद्यार्थ्यांनी गोळा केलेल्या जाहिरातींच्या रकमेच्या २॥ टक्के इतक्या रकमेची पारितोषिके देण्यात येतील—

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | श्री. अविनाश ठकरार | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| द्वितीय क्रमांक | श्री. बा. द. गोखले | पदवीपूर्व वाणिज्य |

**श्री. चारुचंद्र भिडे** ( विद्यार्थी–प्रतिनिधी, नियतकालिक ) **प्रा. सुरेश दातार**


## तुमची पुस्तके : एक ऋणानुबंध

सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षेत आम्ही हार्दिक सुयश चिंतितो. परीक्षा झाल्यावर आपली पुस्तके महाविद्यालयाच्या ग्रंथालयास भेट द्या. अनेक होतकरू विद्यार्थ्यांची ज्ञानपिपासा ही पुस्तके भागवतील व हे विद्यार्थी तुम्हाला दुवा देतील.

महाविद्यालयाच्या ग्रंथपालांजवळ ही पुस्तके द्या. तुम्हाला हवीत त्या वेळी तुमची पुस्तके तुम्हाला ते परत देतील.

## तुमचे भांडार : एक सहकारी संघटना

तुम्हाला लागणाऱ्या वस्तू महाविद्यालयाच्या तुमच्या भांडारातूनच घ्या. महाविद्यालयाचा प्रत्येक विद्यार्थी या भांडाराचा भागधारक आहे.

विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी भांडारात सर्व प्रकारची स्टेशनरी, शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांना लागणारी जर्नल्स, डिसेक्शन बॉक्सेस, वेट बॉक्सेस व कला आणि वाणिज्यच्या विद्यार्थ्यांना लागणारे मॅप-सेट्स, अकौंटन्सी वह्या, भूगोलाची जर्नल्स, ट्युटोरिअल शीट्स् व शारीरिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लागणारे बनियन्स, पी. टी. शूज, सॉक्स, हाफ पँट्स् वगैरे वस्तू योग्य किमतीत मिळतील.

**प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय**

## नाट्य प्रशिक्षण शिबिर

पुणे विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण केंद्राने मॉडर्न महाविद्यालयात दि. १४ फेब्रुवारी १९७६ ते दिनांक २२ फेब्रुवारी १९७६ या कालावधीत एक नाट्य शिक्षण शिबिर आयोजित केले. शिबिराचे संचालन मुंबईचे अमोल पालेकर आणि अनुया पालेकर या पतिपत्नींने केले. दररोज दुपारी चर्चा-प्रात्याक्षिकांच्या द्वारा अभिनय आणि अभिनयाची सामग्री शरीर आणि आवाज यांचे उपयोजन याबाबत शिक्षण दिले गेले. दररोज संध्याकाळी पुण्यातील विविध नाट्य-ललितकला संस्यांमार्फत प्रयोग, प्रात्यक्षिके आणि व्याख्याने असे कार्यक्रम झाले. त्यातील महत्त्वाचे कार्यक्रम म्हणजे फिल्म आणि टी. व्ही इन्स्टिटयूट या संस्थेचे संचालक श्री. मूर्ती, नाट्यदिग्दर्शक श्री. अमोल पालेकर संगीतकार श्री. भास्कर चंदावरकर आणि डॉ. जब्बार पटेल यांची व्याख्याने, श्री. सुहास तांबे यांचे एकांकिका वाचन, महाराष्ट्रीय कलोपासकने सादर केलेली 'आवाज'ही एकांकिका, 'प्रतिमा' या नृत्यनाट्यातील प्रभा मराठे यांनी सादर केलेले काही प्रवेश, 'महाविद्यालयीन रंगभूमी' आणि 'वृत्तपत्रीय नाट्यसमीक्षा' यावरील चर्चा, 'पी. डी. ए.'ने सादर केलेले उत्स्फूर्त नाट्यदर्शन इत्यादी.

**डॉ. वि. भा. देशपांडे**

## व्यवसाय मार्गदर्शन शिबिर

तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना पुढील जीवनात मार्गदर्शक ठरणारे व्यवसाय मार्गदर्शन शिबिर गेली दोन वर्षे भरविण्यात येते आहे. असे शिबिर ह्या वर्षी दिनांक १९, २०, व २१ मार्च रोजी भरविण्यात येत आहे. अर्ज कसा करावा, लेखी परीक्षा, बौद्धिक व सामान्यज्ञान चाचणी परीक्षा कशा द्याव्यात, मुलाखत कशी घेतली जाते इत्यादी गोष्टींचे शिबिरात मार्गदर्शन केले जाते. पुण्याच्या औद्योगिक क्षेत्रातील नामवंत व्यक्तींचे सहकार्य याकरिता प्रतिवर्षी लाभते. श्री. देव, पर्सनल डायरेक्टर, गरवारे नॉयलॉन्स श्री. वैद्य, एक्झिक्युटिव्ह (फिनान्स), किर्लोस्कर ब्रदर्स, डॉ. कौशिक, मॅनेजमेंट कन्सलटंट, श्री. सुब्रमण्यम्, किर्लोस्कर कन्सलटंट, ब्रिगे. वाकणकर, एक्झिक्युटिव्ह (अॅडमिनिस्ट्रेशन) किर्लोस्कर न्यूमॅटिक्स, श्री. भावे, कमिशनर ऑफ पोलिस, पुणे आणि श्री. भाऊसाहेब नेवाळकर या ख्यातनाम व्यक्तींचे मार्गदर्शन लाभत आहे.

**प्रा. सुरेश दातार**

## रक्तदान

महाविद्यालयात दिनांक ६-९-७५ आणि १०-१-१९७६ रोजी रक्तदानाचा कार्यक्रम झाला. त्या-वेळी प्राध्यापक आणि विद्यार्थी मिळून एकूण अनुक्रमे ३२ आणि ५९ व्यक्तींनी रक्तदान केले. विशेष म्हणजे त्यात ३ माजी विद्यार्थी समाविष्ट आहेत. तसेच दि. २१-१-७६ रोजी औंध कॅप येथील पूना चेस्ट हॉस्पिटल-मध्ये झालेल्या विशेष शस्त्रक्रियेच्या वेळी आमच्या ८ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

रक्तदानात सहभागी होऊन सामाजिक जबाबदारी उचलणाऱ्या या सर्व व्यक्तींचे अभिनंदन.

## पालक मेळावा

नवनवीन अर्थपूर्ण उपक्रम करण्यात नेहमीच पुढे असलेल्या मॉडर्न महाविद्यालयात २६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी एक आगळा मेळावा आयोजित करण्यात आला होता.

विद्यार्थी, प्राध्यापक आणि पालक हे शिक्षणाच्या प्रक्रियेतील तीन महत्त्वाचे घटक असतात. यापैकी विद्यार्थी व पालक यांचा संबंध नेहमी येत असतो. मॉडर्न महाविद्यालयाने आयोजित केलेल्या मेळाव्याचा मुख्य उद्देश पालक आणि प्राध्यापक, पालक आणि संस्थाचालक यांच्यात जवळीक निर्माण करणे हा होता. शिवाय आपला पाल्य ज्या संस्थेत

शिक्षण घेतो ती संस्था व ज्या प्राध्यापकांची नावे 'वेगवेगळ्या संदर्भा'त घरी उच्चारत असतो ते प्राध्यापक प्रत्यक्ष पाहणे आणि त्यांना भेटणे जरूर आहे, असे बऱ्याच पालकांना वाटते. ही संधी प्री-डिग्रीमध्ये शिकणाऱ्या मॉडर्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या पालकांना उपलब्ध झाली होती.

मॉडर्न महाविद्यालयाच्या आजवरच्या परंपरेप्रमाणे हा समारंभ हृद्य, नेटका, जवळीक निर्माण करणारा ठरला. पालकांचा उत्तम प्रतिसाद हा त्याचा खास विशेष. पालक फार मोठ्या संख्येने व उत्साहाने उपस्थित राहिले होते. त्यांचे स्वागत करण्यास प्रसन्नचित्ताने प्राध्यापक मंडळी हजर होती. सर्व समारंभात प्राध्यापकांनी व प्राचार्य लिमये यांनी दाखवलेल्या आदरामुळे व अगत्यामुळे सर्व पालक भारावून गेले होते.

समारंभातील प्रमुख भाग म्हणजे महाविद्यालयाची अत्यंत अल्प काळात झालेली प्रगती दर्शविणारे निवेदन. पाच वर्षांपूर्वी ७०० विद्यार्थि-संख्येवर सुरू झालेल्या या महाविद्यालयाने पाच वर्षांत २३०० पर्यंत मजल मारली आहे. ही प्रगती केवळ संख्यात्मक नसून गुणात्मक दृष्ट्या पाचही वर्षे महाविद्यालय कशी चौफेर घोडदौड करीत आहे याचे चित्र प्राचार्य लिमये यांनी पालकांपुढे सादर केले. 'शिस्त आणि वक्तशीरपणा' याबाबत आमची ख्याती असून त्यात कोणतीही तडजोड आम्ही करीत नाही हे या महाविद्यालयाचे खास वैशिष्ट आहे, असे प्राचार्य लिमये यांनी अभिमानपूर्वक सांगितले व पालकांनी त्यास टाळ्या वाजवून प्रतिसाद दिला. जबरदस्त आत्मविश्वास आणि दूरदृष्टी तसेच करडी शिस्त आणि कामाचा झपाटा या गुणांचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे प्राचार्य लिमये. त्यांच्या नेतृत्वाखाली ही प्रगती निःसंशय असामान्य असल्याचे मत सर्व पालकांनी व्यक्त केले. संस्थेच्या भावी योजनांची प्राचार्य लिमये यांनी पालकांना कल्पना दिली व शक्य ती मदत करण्याचे पालकांना आवाहन केले.

त्यानंतर पालकांचे छोटे छोटे गट करून प्राध्यापकांनी सर्व पालकांना महाविद्यालयातील विविध विभाग आस्थापूर्वक दाखवले. ते पाहून आपण आपला पाल्य याच कॉलेजात घातला हे फारच चांगले झाले असे मत बहुसंख्य पालकांनी व्यक्त केले. पालकांनी काही उपयुक्त सूचना केल्या असून त्यांची नोंद करण्यात आली आहे.

समारंभाचा शेवटचा भाग म्हणजे कॉफीपान. या वेळी सर्व प्राध्यापक व विशेषतः प्राचार्य लिमये, उपप्राचार्य डॉ. भीमराव कुलकर्णी व डॉ. गाडगीळ हे सर्व पालकांमध्ये मिसळून दिलखुलास वार्तालाप करीत होते. समारंभाच्या शेवटी अत्तर-गुलाब देऊन हा 'स्वागत समारंभ' संपला. या 'तरुण' महाविद्यालयाची चौफेर घोडदौड होण्यास कारणीभूत असलेल्या प्राचार्य लिमये यांना पाहिल्याचा व भेटून बातचित केल्याचा सुखद अनुभव सर्व पालक बरोबर घेऊन गेले; अगत्य आणि जिव्हाळा यांनी भारावून गेले.

## पालक मेळावा : एक प्रतिक्रिया

प्राचार्य श्री. लिमये, दि. ४-३-१९७६

स. न. वि. वि.

आपण आपल्या महाविद्यालयात दि. २६ फेब्रुवारी १९७६ रोजी संध्यासमयी आयोजित केलेल्या पालक मेळाव्यात माझे पाल्य, कु. ज्योती कुलकर्णी (द्वितीय वर्ष साहित्य) व कु. सुनंदा कुलकर्णी (प्रथम वर्ष साहित्य) यांचा पालक या नात्याने आपल्या निमंत्रणानुसार हजर होतो.

आपल्या महाविद्यालयातर्फे आयोजित केलेल्या या आगळ्या उपक्रमामुळे व त्याच्या संयोजन कौशल्यामुळे मी भारावून गेलो. प्रसन्न वातावरणात पालकांना आपल्या महाविद्यालयाची दिलेली थोडक्यात पण मुद्देसूद माहिती, आपण व आपल्या प्राध्यापक वर्गाने आपल्या महाविद्यालयाच्या निरनिराळ्या विभागांचा करून दिलेला परिचय व

त्यानंतरचा छोटासा पण सुरेख कॉफीपानाचा कार्यक्रम व या सर्व उपक्रमात असलेली पालकांबद्दलची आत्मीयता, संस्थेबद्दल प्रेम आणि तळमळ व महाविद्यालयाबद्दल पालकांच्या मनामध्ये जिज्ञासा जागृत करण्याची इच्छा ही खरोखरीच अभिनंदनीय आहे. आपण खऱ्या अर्थाने पालकांना महाविद्यालयाची ओळख करून दिली, असे म्हणावे लागेल.

ज्या महाविद्यालयात पालक आपले पाल्य पाठवितात, त्या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची सर्वांगीण उन्नती कशी होईल, विद्यार्थी हा फक्त पुस्तकी किडा न राहता तो या समाजातील चांगला घटक कसा होईल, याकडे आपले महाविद्यालय योग्य लक्ष पुरविते व त्या विद्यार्थ्यांची शारीरिक तसेच मानसिक पातळी वाढविण्याकरिता त्याला सर्वतोपरी मार्गदर्शन केले जावे याकरिता त्याच्या दैनंदिन प्रगतीची नोंद कशाप्रकारे ठेवण्यात येते, ही माहिती ऐकून व पाहून, " गुरूजन हेच खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांचे भाग्यविधाते आहेत " ही उक्ती सार्थ वाटली.

आपण व आपल्या सहकाऱ्यांनी केलेल्या या आगळ्या पण उपयुक्त प्रयोगापासून स्फूर्ती घेऊन इतर महाविद्यालयांतून देखील अशा स्वरूपाच्या उपक्रमास पुढे वाढता प्रतिसाद मिळेल ही सदिच्छा ! पुन्हा एकदा आपले व आपल्या सहकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून हे पत्र पुरे करतो.

कळावे.

शुभेच्छांसह आपला
**व. ल. कुलकर्णी**

## शैक्षणिक गुणवत्ता पारितोषिक विजेते

| अ. क्र. | नाव | | रुपये |
|---|---|---|---|
| १ | कु. जोगळेकर छाया शंकर (तृतीय वर्ष वाणिज्य) | एप्रिल १९७५ मध्ये झालेल्या पुणे विद्यापीठाच्या तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत विद्यापीठात २ री | १५१·०० |
| २ | श्री. लुंकड पारसमल इंद्रभान (पदवीपूर्व वाणिज्य) | एप्रिल १९७५ मध्ये झालेल्या पुणे विद्यापीठाच्या पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत विद्यापीठात ९ वा | १५१·०० |

## प्राध्यापक निधी पारितोषिके

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | कु. राणे शालिनी भास्कर | महाविद्यालयात पदवीपूर्व साहित्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल | २५·०० |
| ४ | श्री. न्यायाधीश विनयकुमार हरी | महाविद्यालयात पदवीपूर्व शास्त्र परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५·०० |
| ५ | श्री. लुंकड पारसमल इंद्रभान | महाविद्यालयात पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५·०० |

| अ. क्र. | नाव | | रुपये |
|---|---|---|---|
| ६ | कु. पेंढारकर पद्मजा शंकर | महाविद्यालयात प्रथम वर्ष साहित्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| ७ | कु. गोडसे नीलिमा अनंत | महाविद्यालयात प्रथमवर्ष शास्त्र परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| ८ | श्री. ओगले अविनाश गणेश | महाविद्यालयात प्रथमवर्ष वाणिज्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| ९ | कु. रेंघे सुलोचला माधव | महाविद्यालयात द्वितीय वर्ष साहित्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| १० | श्री. वाळुंज वसंत एकनाथ | महाविद्यालयात द्वितीय वर्ष शास्त्र परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| ११ | कु. कुलकर्णी कीर्तिमालिनी दत्तात्रेय | महाविद्यालयात द्वितीय वर्ष वाणिज्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| १२ | कु. कुलकर्णी शालिनी एकनाथ | महाविद्यालयात तृतीय वर्ष साहित्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| १३ | श्री. ठकार श्रीराम गणेश | महाविद्यालयात तृतीय वर्ष शास्त्र परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| १४ | कु. जोगळेकर छाया शंकर | महाविद्यालयात तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |

## देणगीतून दिलेली पारितोषिके

| | | | |
|---|---|---|---|
| १ | " रावसाहेब भागवत पारितोषिक " श्री. ठकार श्रीराम गणेश | विद्यापीठाच्या तृतीय वर्ष शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात भौतिक विषयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ४०–०० |
| २ | " वासुदेवराव ताटके पारितोषिक " श्री. लुंकड पारसमल इंद्रभान | विद्यापीठाच्या पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ६०–०० |
| ३ | " कै. रावबहादूर दत्तात्रय बळवंत राजोपाध्ये पारितोषिक " श्री. लुंकड पारसमल इंद्रभान | विद्यापीठाच्या पदवीपूर्व परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ६०–०० |
| ४ | " वासुदेव व्यंकटेश पारितोषिक " कु. कुलकर्णी शालिनी एकनाथ | तृतीय वर्ष साहित्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |

| अ. क्र. | नाव | | रुपये |
|---|---|---|---|
| ५ | " वासुदेव पंडित पारितोषिक " | | |
| | कु. कुलकर्णी शालिनी एकनाथ | तृतीय वर्ष साहित्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ६२–५० |
| | श्री. ठकार श्रीराम गणेश | तृतीय वर्ष शास्त्र परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ६२–५० |
| | कु. जोगळेकर छाया शंकर | तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | ६२–५० |
| ६ | " नारायण भागवत पारितोषिक " श्री राणे प्रमोद रामचंद्र | महाविद्यालयात प्रथम वर्ष शास्त्र परीक्षेत जीवशास्त्र विषयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ६०–०० |
| ७ | " कै. प्रा. अश्विनीकुमार फडके पारितोषिक " | | |
| | श्री. न्यायाधीश विनयकुमार हरिभाऊ | पदवीपूर्व शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात गणित विषयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ५०–०० |
| | श्री. लुंकड पारसमल इंद्रभान | पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात गणित विषयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ५०–०० |
| ८ | " मातोश्री मुळाबाई कर्नावट पारितोषिक " श्री. खासनीस सुधाकर दत्तात्रय | पुणे विद्यापीठाच्या तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत ॲडव्हान्स अकौंटिंग ॲंड ऑडिटिंग विषयात सर्वात जास्त गुण मिळविल्याबद्दल | ५१–०० |
| ९ | " श्री. व श्रीमती छगनलाल ठकरार पारितोषिक " श्री. लुंकड पारसमल इंद्रभान | महाविद्यालयातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यास शिक्षणासाठी | ५१–०० |
| १० | " सौ. लक्ष्मीबाई ताटके पारितोषिक " कु. गोडसे नीलिमा अनंत | महाविद्यालयात प्रथमवर्ष शास्त्र परीक्षेत गणित विषयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ६०–०० |
| ११ | " चंद्रकांत मोरेश्वर शिंदे पारितोषिक " श्री. परळे सुहास गोविंद | महाविद्यालयात तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत संख्याशास्त्र ह्या विषयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ६०–०० |

## माजी विद्यार्थी पारितोषिके

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कु. कुलकर्णी शालिनी एकनाथ | तृतीय वर्ष साहित्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| २ | श्री. ठकार श्रीराम गणेश | तृतीय वर्ष शास्त्र परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| ३ | कु. जोगळेकर छाया शंकर | तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |

## राष्ट्रीय शिष्यवृत्ती

१. श्री. भावे दिलीप नारायण, पदवीपूर्व शास्त्र, २. श्री. जाधव विजय दशरथराव, पदवीपूर्व शास्त्र, ३. कु. कोल्हे साधनादेवी आनंदा, प्रथमवर्ष शास्त्र, ४. श्री. न्यायाधीश विनयकुमार हरीभाऊ, प्रथमवर्ष शास्त्र, ५. श्री. लुंकड पारसमल इंद्रभान, प्रथमवर्ष वाणिज्य, ६. श्री. पुरंदरे संजय नारायण, प्रथमवर्ष वाणिज्य, ७. कु. शुक्ला सुहासिनी रामकृष्ण, तृतीयवर्ष शास्त्र.

## राज्य सरकारची गुणवत्ता शिष्यवृत्ती

१. कु. इनामदार वासंती गंगाधर, पदवीपूर्व कला, २. श्री. साठे नितीन पद्माकर, पदवीपूर्व शास्त्र, ३. कु. आठल्ये पद्मजा सदाशिव, पदवीपूर्व वाणिज्य, ४. श्री. महाजन राजेन्द्र वसंत, पदवीपूर्व वाणिज्य, ५. कु. मेहता मीनाक्षी माधव, पदवीपूर्व वाणिज्य, ६. श्री. महाजन हृषीकेश कृष्णनाथ, प्रथम वर्ष वाणिज्य, ७. श्री. सहस्रबुद्धे संजीव गोपाळ, प्रथम वर्ष वाणिज्य, ८. कु. शिरोळे अलका मारुतीराव, प्रथम वर्ष वाणिज्य, ९. श्री. मोघे जगदीश मुकुंद, द्वितीय वर्ष शास्त्र, १०. श्री. शिंपी अरुण खंडू, द्वितीय वर्ष शास्त्र, ११. श्री. धाक्रस भानुदास दत्तात्रय, द्वितीय वर्ष वाणिज्य, १२. श्री. ओगले अविनाश गणेश, द्वितीय वर्ष वाणिज्य, १३. श्री. साठे प्रसाद बाळ, द्वितीय वर्ष वाणिज्य, १४. कु. कारखानीस नयना पुरुषोत्तम, तृतीय वर्ष कला, १५. श्री. कट्टी सुरेन्द्र रघुनाथ, तृतीय वर्ष वाणिज्य, १६. कु. केळकर वसुधा श्रीनिवास, तृतीय वर्ष वाणिज्य.

## प्राथमिक-माध्यमिक शिक्षकांच्या मुलां-मुलींना मिळणारी शिष्यवृत्ती

कु. रणदिवे उर्मिला भास्कर, द्वितीय वर्ष शास्त्र.

## अपंग विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती

कु. लाखणगांवकर ज्योती वसंतराव, प्रथमवर्ष वाणिज्य.

## राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती

१. श्री. भीर नथू मारुती, पदवीपूर्व शास्त्र, २. कु. राणे शालीनी भास्कर, प्रथम वर्ष कला, ३. श्री. बोचरे अर्जुन कोंडाजी, प्रथम वर्ष शास्त्र, ४. श्री. दाते विश्वास पुरुषोत्तम, प्रथम वर्ष शास्त्र, ५. श्री. कुलकर्णी भगवान वसंतराव, प्रथम वर्ष शास्त्र, ६. श्री. कुलकर्णी विजय दत्तात्रय, प्रथम वर्ष शास्त्र, ७. श्री. नारविलकर श्रीनिवास शरद, प्रथम वर्ष शास्त्र, ८. कु. तिखे नीलिमा रामचंद्र, प्रथम वर्ष शास्त्र, ९. श्री. देशपांडे संजय नारायण, प्रथम वर्ष वाणिज्य, १०. श्री. लघाटे चंद्रशेखर यशवंत, प्रथम वर्ष वाणिज्य, ११. श्री. मुंदडा मधूसुदन मोहनलाल, प्रथम वर्ष वाणिज्य, १२. श्री. बंड नारायण भानुदास, द्वितीय वर्ष शास्त्र, १३. श्री. ढेकणे शहाजी हरीभाऊ,

द्वितीय वर्ष शास्त्र, १४. श्री. कुलकर्णी जयंत वसंत, द्वितीय वर्ष शास्त्र, १५. श्री. शिंगटे प्रकाश आप्पासाहेब, द्वितीय वर्ष शास्त्र, १६. श्री. सुत्रे ज्ञानेश्वर दत्तात्रय, द्वितीय वर्ष शास्त्र, १७. श्री. दगडे वसन्त भगवानराव, तृतीय वर्ष शास्त्र, १८. श्री. कुलकर्णी अजितकुमार वसंत, तृतीय वर्ष शास्त्र, १९. श्री. मांडे मल्हारी सीताराम, तृतीय वर्ष शास्त्र, २०. कु. माने शीला हनमंत, तृतीय वर्ष शास्त्र, २१. श्री. पलुसकर चंद्रशेखर श्रीपाद, तृतीय वर्ष शास्त्र, २२. श्री. पाटील बाबूराव नाना, तृतीय वर्ष शास्त्र, २३. श्री. शिंदे नारायण मारुती, तृतीय वर्ष शास्त्र, २४. श्री. वाघ दिनकर बळवंत, तृतीय वर्ष शास्त्र, २५. कु. यंदे सुनीता रघुनाथ, तृतीय वर्ष शास्त्र, २६. श्री. भावसार प्रकाश नारायण, तृतीय वर्ष वाणिज्य. २७. कु. उर्सेकर इंद्रायणी गणेश, तृतीय वर्ष वाणिज्य.

## स्वातंत्र्यसैनिक शिष्यवृत्ती

१. श्री. जोशी वामन बाळकृष्ण, पदवीपूर्व कला, २. श्री. मोहिते जयन्त विष्णुपंत, पदवीपूर्व वाणिज्य, ३. श्री. चिखले रघुनाथ बबन, प्रथम वर्ष शास्त्र, ४. कु. देशपांडे नंदिनी शंकर, प्रथम वर्ष वाणिज्य, ५. श्री. शहा पंकज शांतीलाल, प्रथम वर्ष वाणिज्य, ६. कु. सांगळे प्रतिभा विश्वनाथ, प्रथम वर्ष वाणिज्य, ७. श्री. मुंडले शशिकान्त श्रीपाद, प्रथम वर्ष वाणिज्य, ८. श्री. संकपाळ रामचन्द्र विष्णु, तृतीय वर्ष कला, ९. श्री. कटारिया अनिलकुमार चुनीलाल, तृतीय वर्ष वाणिज्य, १०. श्री. कवितकर बाबा भिकोबा, तृ. व. वाणिज्य.

## सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत

१. श्री. पगार अशोक वसंतराव, प्रथम वर्ष शास्त्र, २. श्री. पी. शिवबालन, प्रथमवर्ष वाणिज्य, ३. कु. कदम विद्या उद्धवराव, द्वितीय वर्ष कला.

## राष्ट्रीय क्रीडा नैपुण्य शिष्यवृत्ती

इनामदार श्रीरंग जनार्दन, तृतीय वर्ष वाणिज्य.

## विशेष अभिनंदन !

सेवानिवृत्त झाल्यावर महाविद्यालयात प्रवेश घेऊन आमचे विद्यार्थी श्री. बेंद्रे यांनी वयाच्या ६२ व्या वर्षी बी. कॉम्. पदवी मिळविली. त्यांचे विशेष अभिनंदन

---

या नियतकालिकाकरिता महाराष्ट्र शासनाने सवलतीच्या दराने
उपलब्ध करून दिलेला कागद वापरण्यात आला आहे.

# GLORIOUS FIVE YEARS
# OF
# THE
# STAFF ACADEMY

The Principal and the Staff members were very keen to establish a forum for the teachers to present Papers, exchange ideas and have Seminars and discussions on various academic problems in the presence of their Colleagues from other faculties and in the presence of experts in the field.

The idea was considered from all angles and it was decided in a Staff meeting held on 15·3·71, to establish a Modeen College Staff Academy. The first paper was read by Principal M. B. Limaye on 28·7·1971. The first session was chaired by Shri C. V. Jog, Custodian, Bank of Maharashtra, Poona. Ever since then, it has continued very successfully for all these years up-to-date. The President of this Staff Academy is the Principal himself, who has very appropriately placed, the most useful objectives and intention of the Academy to be the development of inter-disciplinary interest among the Staff members. The second useful aim of this Academy is that it attempts to flourish and nourish a ground or forum for frank and free discussion, to encourage the members to prepare, submit and debate Papers/Articles in the field of their own subjects.

With these objectives eminent persons and experts in different fields of subjects and knowledge are always invited at our Academy meetings and we are not only very much enlightened but also benefited by their most valuable participation and proper guidance. A glance at the actual working of the Staff Academy during the last five years as shown in the yearwise activities chart given below will make it abundently clear.

**Modern College of Arts, Science & Commerce, Poona 5.**

# STAFF ACADEMY

**Index 1971-72**

| Day & Date | Title | Speaker | Chairman |
|---|---|---|---|
| Wednesday 28 July-71 | A Review of working of the Nationlized Commercial Banks in India. | Prin. M. B. Limaye | Shri C. V. Jog, Custodian, Bank of Maharastra, Poona. |
| Saturday 14 Aug-71 | Little Magazines in Marathi | Dr. B. B. Kulkarni | Dr. R. S. Walimbe, Head of the Dept. of Marathi Uuniversity of Poona, Poona-7. |
| Wednesday 22 Sept. 71 | Chemical Co-ordination | Dr. S. Y. Paranjape | Dr. Leela Mulherkar, Head of the Dept. of Zoology University of Poona. |
| Saturday 16 Oct. 71 | The Role of College Teachers in present circumstances | Open Discussion | Prin. D. A. Dabholkar, Fergusson College, Poona. |
| Wednesday, 8 Dec. 71 | Cultural Deprivation & poverty. | Dr (Mrs) S. Vanarase | Prof. (Dr.) M. N. Palsane. |
| Saturday 29 Jan. 72 | Does Literature Matter ? | Prof. S. R. Raykar | Prof. M. G. Desai, Department of English, Fergusson College, Poona. |
| Friday 25 Feb. 72 | Radio Activity | Dr. L. H. Gadgil | Dr. H. J. Arnikar, Head of the Dept. of Chemistry, University of Poona, Poona. |
| Friday 10 March, 72 | The American system of Education structure and courses of studies (Talk) | Prof. (Dr.) Bilss, Visiting Prof. of Poetry, University of Poona, Poona-7. | Dr. D. K. Garde, Head of the Dept. of Politics, and Public. Adm. University of Poona, Poona-7, |

**Modern College of Arts, Science & Commerce, Poona 5.**

# STAFF ACADEMY

**Index 1972-73**

| Day and Date | Title | Speaker | Chairman |
|---|---|---|---|
| Wednesday, 19 July, 72 | Some Aspects of Mathematics | Prof. P. S. Chirputkar | Prin. M. N. Bhat, Head of the Dept. of Mathematics, Abasaheb Garware College, Poona 4. |
| Wednesday, 23 Aug, 72 | Fungi-Friends and Foes. | Dr. A. K. Pande | Prof. M. N. Kamat, Maharashtra Association of the Cultivation of Sc. Poona 7. |
| Wednesday, 27 Sept. 72 | Economic History of India during the 19th Century | Prof. M.A.Kulkarni | Dr. A. R. Kulkarni Head of the Dept. of History. University Poona. Poona 7. |
| Monday 16 Oct. 72 | The Student Unrest | Open discussion | Prin. N. G. Suru, Poona. |
| Wednesday, 13 Dec. 72 | Mrutyunjaya Nirala Ka Yugakavitva | Prof. S.D.Sangoram | Dr. Anand P. Dixit, Head of the Dept. of Hindi. University of Poona, Poona 7. |
| Wednesday, 7 Feb. 73 | Income Tax and Professors | Prof. N. K. Godbole | Shri D. G. Pradhan, Add. Commissioner of Income Tax, Poona Region, Poona. |
| Monday, 26 Feb. 73 | The Theory of Relativity | Shri A.G. Deshpande | Dr. M. R. Bhiday, Head of the Dept. of Physics, University of Poona. |
| Wednesday, 14 March, 73 | Question Box | Open Discussion | Prin. M. B. Limaye |

Modern College of Arts, Science & Commerce, Poona 5.

# STAFF ACADEMY

## Index 1973–74

| Day & Date | Title | Speaker | Chairman |
|---|---|---|---|
| Wednesday 11 July, 73 | Panchayati Raj in Developing Countries | Dr V. G. Nandedkar | Dr. N. R. Inadmdar, Dept. of Politics, University of Poona, Poona-7. |
| Thursday 9 Aug. 73 | The Marxist Theory of the Origin of Poetry | Prof. S. V. Dhaygude | Prin. K. P. Mangalvedhekar, S. P College, Poona-30 |
| Friday 21 Sept. 73 | Brain Mechanisms and personality ( Lecture meeting ) | Dr. H. V. Sardesai | Prin. N. G. Suru, Poona |
| Wednesday 3 Oct. 73 | Some aspects of Geomedical study of Leprosy in Maharashtra | Prof. P. D. Apte | Prof. V. S. Gananathan, Head, of the Dept. of Geography, University of Poona. |
| Wednesday 5 Dec. 73 | Infinity-A Concept in pure Mathematics | Prof. C. G. Kulkarni | Dr. V. S. Huzurbazar, Head, of the Dept. of Mathematics and Statistics, University of Poona |
| Wednesday 23 Jan 74 | Modern Trends in Auditing | Prof. M. R. Bhave | Shri. M. K. Soman. Director-Secretary, Formica India Ltd., Poona |
| Thursday 28 Feb. 74 | Genetics : What is it About ? | Prof. S. M. Katdare | Dr. Suresh Goel, Dept of Zoology University of Poona |
| Tuesday 12 March 74 | Neglect of intelligence in the Field of Education ( Talk ) | Dr. D. N. Gokhale | Shri V. T. Tatke Poona. |

## Modern College of Arts, Science & Commerce, Poona 5.

# STAFF ACADEMY

### Index 1974–75

| Date | Title | Speaker | Chairman |
|---|---|---|---|
| 31 July, 74 | Nuclear Fission | Prof. S. Y. Gambhir | Prof. R. G. Takawale, University of Poona, Poona-7 |
| 31 Aug. 74 | War on Inflation | Prof. M. S. Mahajan | Prof. P. V. Patwardhan, Vice-Principal, B. M. C. C. Poona |
| 27 Sept. 74 | Consumers' protection and the Role of Consumers' Co-operative Stores | Prof. A. G. Gosavi | Dr. G. S. Kamat, V. M. N. Institute of Co-op. Management, Poona 16 |
| 14 Oct. 74 | Roses in December Autobiography of M. C. Chagla | Discussion and Appreciation | Prof. G. P. Pradhan, M. L. A. |
| 19 Dec. 74 | Statistical Quality Control | Prof. K. T. Kashid | Dr. J. V. Tatke, Statistician, Hindustan Antibiotics Pimpari, Poona. |
| २२ जाने. ७५ | आजचे नव-नाटक काही प्रश्न | परिसंवाद | श्री. सतीश आळेकर<br>डॉ. विद्याधर पुंडलीक<br>श्री. चित्तरंजन कोल्हटकर |
| 24 Jan. 75 | What is Poetry ? | Prof. A. R. Natu | Dr. S. Nagarajan, Professor and Head of the English Department University of Poona, Poona-7 |
| 20 Feb. 75 | The Earth's Atmosphere and Disastrous Weather phenomena occuring in it. | Prof. S. L. Chorghade | Prin M. B. Limaye |
| ८ मार्च ७५ | कलकत्ता आणि वंगरंगभूमी | डॉ. वि. भा. देशपांडे | प्रा. पा. ना. कुलकर्णी<br>मराठी विभाग प्रमुख<br>राजाराम कॉलेज, कोल्हापूर, |

**Modern College of Arts, Science & Commerce, Poona 5.**

# STAFF ACADEMY

**Index 1975–76**

| Day & Date | Title | Speaker | Chairman |
|---|---|---|---|
| Thursday 24-7-75 | Delegation of Authority | Prof. S. G. Datar | Dr. P. C. Shejwalkar, Director, Institute of Management Dev. and Research, Poona University, Poona-7. |
| Thursday 25-9-75 | " उच्च शिक्षणातील पेच प्रसंग " | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| Monday 13-10-75 | Examination Reforms | Dr. S. N. Nagarajan, Professor & Head of the Dept. of English University of Poona, Poona-7. | Prin. M. B. Limaye |
| Wednesday 15-10-75 | Examination Reforms | Dr. H. J. Arnikar, Professor & Head of the Dept. of Chemistry, University of Poona-7. | Prin. M. B. Limaye |
| Wednesday 22-10-75 | Some Problems of Second Language speakers | Mrs. M. Marathe | Dr. G. E. Bentley (Jr), Department of English University of Poona |
| Thursday 30-10-75 | ( i ) Modern Evaluation technique. ( ii ) Evaluation of the Modern Evaluation technique. | Shri Pawar & Shri Sali, Evaluation Officer Maharashtra State Board of Higher Education, Poona. | Prin. M. B. Limaye |
| Thursday 12-2-76 | Know thy heart | Dr. Ashok Kanetkar, Aundh Chest Hospital. | Prin. M. B. Limaye |
| Thursday 11-3-76 | Liberal thought in Maharashtra | Dr. R. M. Vora, Felicitation followed by talk. | Prof. V. M. Sirsikar, Mahatma Gandhi Prof. of Politics, and Head of the Dept. of Politics & Public Administration, University of Poona. |
| End of March 76 | Seminar : Examination Reforms. | | |

In an academic year, per term, three paper reading-cum-discussion sessions are arranged and one session of discussion on an open topic is arranged.

The papers/Articles for discussion are always properly circulated well in advance in the Staff Common room. As mentioned above, experts in the subject are requested to participate in the discussion along with the Staff members.

We have so far held 42 Sessions in five years.

| | | | |
|---|---|---|---|
| 1971-72. ...... | 8 Sessions | 1974-75... | 9 Sessions |
| 1972-73. ... | 8 Sessions | 1975-76... | 9 Sessions |
| 1973-74. ... | 8 ,, | | |

The members of the Staff have always extended their whole hearted co-operation to this very important activity of the College. The Staff Academy by now has become a way of life with the Staff members.

We are very happy to state that so far in the last five years we were not required to allot the work of reading a paper to any Staff member, on the other hand they are voluntarily coming forward to write and present a paper.

The Academy desires to edit the Papers/Articles and make the same available in the form of Proceedings Volume. It is proposed to have a well-furnished and equipped Auditorium at the College Campus for our Staff Academy meetings.

**Chairman** | **Principal and President**

**Staff Academy** | **Staff Academy**

श्रीज्ञानेश्वर महाराज सप्तम् शताब्द जयंति
शके १८९७ निमित्त
श्रीमत् स्वामी सत्यदेवानंद सरस्वती ( क्षेत्र आळंदी )
यांच्या हस्ताक्षरातील

स्वरूपानंद – बोधिनी

# श्री ज्ञा ने श्व री

( विरामचिन्हीत संहिता )

**ग्रंथ वैशिष्टच : परिचय व नम्र निवेदन**
**पत्रकाची आजच मागणी करा**

☐ पृष्ठ संख्या (डबल क्राऊन) अंदाजे ७०० पाने
☐ मूळ किमत १८ रुपये ☐ प्रसिद्धपूर्व सवलतीची किमत १५ रुपये

प्रस्तुत ' स्वरूपानंद-बोधिनी ' ज्ञानेश्वरीचा ग्रंथ, आम्ही येत्या गुरुपौर्णिमेला किंवा ( अगदी अपरिहार्य कारण असल्यास ) शके १८९८ च्या गोकुळ अष्टमीस आपणांस सादर करीत आहोत.

सवलतीच्या प्रती मर्यादीतच असल्यामुळे फक्त १० रुपये भरून आपल्या नजिकच्या बुकसेलर्सकडे ग्रंथाची नोंद करतां येईल अथवा

**रसिक साहित्य ☐ व्हीनस बुक स्टॉल**
आप्पा बळवंत चौक, पुणे ४११ ०३०
फोन : ५४१६६, ५६२६९

**अनमोल प्रकाशन**
अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११ ००२

# मॉडर्न महाविद्यालय

## उपक्रम संयोजन

## १९७५–७६

| | |
|---|---|
| १ जुलै १९७५ | शैक्षणिक वर्ष १९७५–७६ प्राध्यापक बैठक (Staff Meeting.) |
| ७ जुलै १९७५ | पदवीपूर्व वाणिज्य वर्गातील विद्यार्थ्यांना उद्देशून प्राचार्यांचे भाषण.<br>पदवीपूर्व साहित्य वर्गातील विद्यार्थ्यांना उद्देशून डॉ. भीमराव कुलकर्णी ह्यांचे भाषण.<br>पदवीपूर्व विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांना उद्देशून उपप्राचार्य डॉ. गाडगीळ यांचे भाषण, |
| ८ जुलै १९७५ | निरनिराळ्या प्राध्यापकांची शारीरिक शिक्षण, ग्रंथालय, खेळ इत्यादी विषयांवर मार्गदर्शनपर भाषणे, |
| २४ जुले १९७५ | प्राध्यापक अभ्यास मंडळ<br>प्रा. एस्. जी. दातार यांचे 'डेलिगेशन ऑफ पॉवर' या विषयावर व्याख्यान.<br>प्रमुख पाहुणे:–डॉ. पी. सी. शेजवलकर |
| ३० जुलै १९७५ | नियोजन चर्चा मंडळाचे उद्‌घाटन,<br>उद्‌घाटक व वक्ते–प्रा. द. पां. आपटे. गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे–४<br>विषय–सामाजिक आर्थिक संशोधनाचे नियोजनामधील स्थान. |
| १ ऑगस्ट १९७५ | लोकमान्य टिळक पुण्यतिथी<br>डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते साहित्य संघटनेचे उद्‌घाटन.<br>शारीरिक शिक्षण नेतृत्व प्रशिक्षण शिबिराचा प्रारंभ. |
| ५ ऑगस्ट १९७५ | 'मॉम' या हस्तलिखित भित्तिपत्रकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन.<br>क्रीडा व्यवस्थापन समितीची बैठक |

| | |
|---|---|
| ७ ऑगस्ट १९७५ | शारीरिक शिक्षण तासांचा प्रारंभ.<br>राष्ट्रीय सेवा योजना–<br>उद्घाटक–प्राचार्य बाळ गाडगीळ, फर्ग्युसन महाविद्यालय. |
| ९ ऑगस्ट १९७५ | वाणिज्य संघटनेचे उद्घाटन.<br>'कॉम' च्या पहिल्या अंकाचे प्रकाशन. |
| ११ ऑगस्ट १९७५ | वर्गप्रतिनिधींच्या निवडणुका.<br>शास्त्र संघटनेचे उद्घाटन व भाषण.<br>प्रा. म. रा. राईलकर.<br>विषय–Concepts in Mathematics |
| १५ ऑगस्ट १९७५ | स्वातंत्र्यदिन–ध्वजारोहण,<br>शास्त्र संघटनेच्या भित्तिपत्रकाचे प्रकाशन.<br>हस्ते–डॉ. ल. ह. गाडगीळ.<br>एन्. सी. सी. स्वातंत्र्यदिन संचलन. |
| १६ ऑगस्ट १९७५ | शास्त्र संघटनेच्या पुस्तकपेढीच्या कार्यास प्रारंभ<br>हस्ते–श्री. द. गो. बापट. |
| १७ ऑगस्ट १९७५ | राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे प्रा. डॉ. नवलगुंदकर यांचे भाषण |
| १९ ऑगस्ट १९७५ | वाणिज्य संघटनेतर्फे व्याख्यान<br>वक्ते–प्रा. ए. डी. पुराणिक<br>विषय–रोजगार हमी योजना. |
| २१ ऑगस्ट १९७५ | राष्ट्रीय सेवा योजना–रक्षाबंधन. |
| २४ ऑगस्ट १९७५ | राष्ट्रीय सेवा योजना–पर्वती–पाचगाव प्रकल्प–वृक्षारोपण. |
| २५ ऑगस्ट १९७५ | साहित्य संघटनेतर्फे परिसंवाद<br>विषय–आधुनिक भारतीय स्त्री<br>अध्यक्षा–सौ. कमल पाध्ये. |
| २७ ऑगस्ट १९७५ | नियोजन चर्चा मंडळातर्फे व्याख्यान<br>वक्त्या–प्रा. सौ. कुमुदिनी दांडेकर, गोखले अर्थशास्त्र संस्था पुणे–४<br>विषय–लोकसंख्येचे नियोजन–समस्या आणि भवितव्य. |
| २८ ऑगस्ट १९७५ | कलामंडळ–'संगीत संध्या'<br>महाविद्यालयातील सर्व कलाकारांचा कार्यक्रम. |

| | |
|---|---|
| ३० ऑगस्ट १९७५ | मॉडर्न महाविद्यालय चतुर्थश्रेणी सेवक आयोजित सत्यनारायणाची महापूजा |
| ३१ ऑगस्ट १९७५ | राष्ट्रीय सेवा योजना पर्वती–पाचगाव–वृक्षारोपण. |
| ५ सप्टेंबर १९७५ | साहित्य संघटना–शिक्षक दिन<br>प्राध्यापकांचा विद्यार्थ्यांतर्फे सत्कार.<br>राष्ट्रीय सेवा योजना–शिक्षक दिन<br>पिसोळी येथील शिक्षकांचा कार्यक्रम. |
| ६ सप्टेंबर १९७५ | रेड क्रॉस रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदानाचा कार्यक्रम. |
| ७ सप्टेंबर १९७५ | राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम<br>पर्वती–पाचगाव–अंधशाला–रिमांड होम. |
| ९ सप्टेंबर १९७५ | वाणिज्य संघटना–<br>किर्लोस्कर ऑइल इंजिन्सला भेट. |
| १४ सप्टेंबर १९७५ | राष्ट्रीय सेवा योजना–पर्वती–पाचगाव–वृक्षारोपण. |
| १६ सप्टेंबर १९७५ | 'मॉम'च्या हिंदी विशेषांकाचे प्रकाशन.<br>साहित्य संघटना–<br>हिंदी दिनानिमित्त प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सचिव<br>श्री. वि. शं. गोखले यांचे व्याख्यान. |
| १८ सप्टेंबर १९७५ | वाणिज्य संघटनेतर्फे व्याख्यान<br>वक्ते–श्री. जगदाळे व्ही. एन्.<br>विषय–मॅनपॉवर प्लॅनिंग अँड डेव्हलपमेंट |
| २१ सप्टेंबर १९७५ | राष्ट्रीय सेवा योजना–पिसोळी श्रमदान |
| २३ सप्टेंबर १९७५ | कलामंडळातर्फे व्याख्यान व प्रात्यक्षिक<br>सतार–द्वारा–उस्ताद उस्मानखाँ व विद्यार्थी श्री. विकास पुरंदरे. |
| २५ सप्टेंबर १९७५ | 'स्टाफ अॅकॅडेमी' तर्फे व्याख्यान<br>वक्ते–तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी<br>विषय–उच्च शिक्षणातील पेचप्रसंग. |
| २८ सप्टेंबर १९७५ | राष्ट्रीय सेवा योजना चर्चासत्र<br>अध्यक्ष–कुलगुरु प्रा. देवदत्त दाभोळकर. |

| | |
|---|---|
| २९ सप्टेंबर १९७५ | शास्त्र संघटनेतर्फे व्याख्यान<br>वक्ते-प्राचार्य मो. मा. लिमये<br>विषय–वाणिज्य. |
| २ ऑक्टोबर १९७५ | साहित्य संघटना–गांधीजयंतीनिमित्त विद्यार्थ्यांचा परिसंवाद<br>अध्यक्ष–डॉ. ग. ना. जोशी. फर्ग्युसन महाविद्यालय पुणे. |
| ३ ऑक्टोबर १९७५ | पुरुषोत्तम करंडक परीक्षकांशी चर्चा, श्री. देवीदास बागूल व श्री. मधू लोखंडे. |
| ६ ऑक्टोबर १९७५ | मॉम, कॉम व सायन्स न्यूज तर्फे कथाकथनाचा कार्यक्रम<br>(आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत–पुरस्कार मिळविलेल्या विविध महाविद्या-लयांतील विद्यार्थ्यांद्वारा). |
| ११ ऑक्टोबर १९७५ | साहित्य संघटना–विद्यार्थ्यांचा परिसंवाद ' विद्यार्थ्यांमधील मनोविकृती '<br>अध्यक्ष–डॉ. सौ. श्यामला वनारसे |
| १३ ऑक्टोबर १९७५ | प्राध्यापक अभ्यास मंडळ–डॉ. एस्. एन्. नागराजन यांचे<br>' एक्झामिनेशन रिफॉर्म्स' या विषयावर भाषण<br>अध्यक्ष–प्राचार्य लिमये. |
| १४ ऑक्टोबर १९७५ | ग्रंथालय सरस्वतीपूजन.<br>हस्ते–मा. प्राचार्य मो. मा. लिमये. |
| १५ ऑक्टोबर १९७५ | प्राध्यापक अभ्यास मंडळ.<br>डॉ. एच्. जे. अर्णीकर यांचे 'एक्झामिनेशन रिफॉर्म्स ' या विषयावर भाषण.<br>अध्यक्ष–प्राचार्य मो. मा. लिमये. |
| १६ ऑक्टोबर १९७५ | वाणिज्य संघटनेतर्फे राजा बहादूर मिल्सना औद्योगिक भेट. |
| २२ ऑक्टोबर १९७५ | प्राध्यापक अभ्यास मंडळ.<br>प्रा. (सौ.) मराठे यांचे ' सम प्रॉब्लेम्स ऑफ सेकंड लँग्वेज स्पीकर्स ' या विषयावर भाषण.<br>अध्यक्ष–श्री. जी. ई. बेंटले. (अमेरिकेतून आलेले व्हिझिटिंग प्रोफेसर) |
| ३० ऑक्टोबर १९७५ | प्राध्यापक अभ्यास मंडळ.<br>सर्वश्री पवार आणि साळी यांची व्याख्याने.<br>विषय–(१) मॉडर्न इव्हॅल्यूएशन टेक्निक.<br>(२) इव्हॅल्युएशन ऑफ मॉडर्न इव्हॅल्युएशन टेक्निक.<br>अध्यक्ष–प्राचार्य मो. मा. लिमये. |

| | |
|---|---|
| १९ नोव्हेंबर १९७५ ते २८ नोव्हेंबर १९७५ | राष्ट्रीय सेवा योजना–वार्षिक शिबिर.<br>अस्वच्छता आणि रोगराईविरुद्ध युवकांची झुंज या मोहिमेतील शिबिर. |
| १० डिसेंबर १९७५ | साहित्य संघटना–मानवी हक्कदिन व्याख्यान.<br>प्रा. डॉ. शं. ना. नवलगुंदकर. |
| १२ डिसेंबर १९७५ | लोकल इन्क्वायरी कमिटीची महाविद्यालयास भेट. |
| १५ डिसेंबर १९७५ | वाणिज्य संघटना : सेठ वालचंद हिराचंद १० वी वक्तृत्व स्पर्धा |
| २१ डिसेंबर १९७५ | 'राष्ट्रीयीकृत बँकांचे कार्य' या विषयावर श्री. ए. जी. शास्त्री (सेंट्रल बँक ऑफ इंडिया) यांचे भाषण.<br>राष्ट्रीय सेवा योजना–<br>शनवार वाडा साफसफाई प्रकल्पाचे डॉ. एस. डी. पाटील यांच्या हस्ते उद्घाटन. |
| २५ डिसेंबर १९७५ | राष्ट्रीय सेवा योजना–शनवारवाडा प्रकल्प. |
| २७ डिसेंबर १९७५ | शास्त्र संघटना व्याख्यान.<br>वक्ते–प्राचार्य शहा (अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे)<br>विषय–इंजिनियरींग कॉलेज प्रवेशासंबंधी. |
| २८ डिसेंबर १९७५ | राष्ट्रीय सेवा योजना–शनिवार वाडा प्रकल्प. |
| ३० डिसेंबर १९७५ | नियोजन मंडळ व्याख्यान<br>वक्ते–प्रा. ए. डी. पुराणिक. वैकुंठ मेहता इन्स्टिटयूट.<br>विषय–वीस कलमी आर्थिक कार्यक्रम. |
| ४ जानेवारी १९७६ | 'असे निघते वृत्तपत्र'<br>मॉम, कॉम, सायन्स न्यूज या भित्तीपत्रकांनी आयोजित केलेला परिसंवाद.<br>अध्यक्ष–श्री. ल. ना. गोखले, वृत्तविद्या संस्था प्रमुख.<br>राष्ट्रीय सेवा योजना–शनिवार वाडा प्रकल्प. |
| ८ जानेवारी १९७६ | द्वितीय वर्ष कला (इतिहास) व पदवीपूर्व कला या वर्गातील विद्यार्थ्यांची भारत इतिहास संशोधक मंडळास भेट. |
| १० जानेवारी १९७६ | रेड क्रॉस रक्तपेढीसाठी रक्तदानाचा कार्यक्रम. |
| ११ जानेवारी १९७६ | राष्ट्रीय सेवा योजना–शनिवार वाडा प्रकल्प. |
| १२ जानेवारी १९७६ | नियोजन चर्चा मंडळ–व्याख्यान.<br>वक्ते–प्रा. नीळकंठ रथ, गोखले अर्थशास्त्र संस्था.<br>विषय–ग्रामीण पतपुरवठ्याचा प्रश्न. |

| | |
|---|---|
| १२ जानेवारी १९७६ | साहित्य संघटना व्याख्यान.<br>वक्ते–डॉ. नागराजन, पुणे विद्यापीठ.<br>विषय–प्रिन्सिपल्स ऑफ व्हर्सिफिकेशन. |
| १५ जानेवारी १९७६ | राष्ट्रीय सेवा योजना–तिळगूळ समारंभ.<br>रिमांड होम, अंधशाळा व लेप्रसी हॉस्पिटल या ठिकाणी. |
| १६ जानेवारी १९७६ | साहित्य संघटना–<br>संमिश्र कवि संमेलन (मराठी, उर्दू, हिंदी, सिंधी व गुजराथी) |
| १७ जानेवारी १९७६ | नाट्यविभाग परिसंवाद<br>वक्ते–डॉ. श्रीराम लागू.<br>विषय–अभिनय. |
| २१ जानेवारी १९७६ | द्वितीय वर्ष कला (इतिहास) व पदवीपूर्व कला या वर्गातील विद्यार्थ्यांची<br>पेशवे दप्तराम भेट. |
| २२ जानेवारी १९७६ | वाणिज्य संघटना व्याख्यान.<br>वक्ते–प्रा. एस्. एन्. गेडाम.<br>विषय–Computers in business |
| २२ जानेवारी १९७६ | स्त्री उत्कर्ष-वर्ष व्याख्यान सत्र.<br>उद्‌घाटन व भाषण–ह. भ. प. धुंडामहाराज देगलूरकर.<br>विषय–संत जनाबाई. |
| २३ जानेवारी १९७६ | कलामंडळ-गझल गायनाचा कार्यक्रम.<br>गायक–प्रा. कमलाकर परचुरे. फर्ग्युसन महाविद्यालय. |
| २५ जानेवारी १९७६ | राष्ट्रीय सेवा योजना. शनिवारवाडा प्रकल्प. |
| २६ जानेवारी १९७६ | प्रजासत्ताक दिन ध्वजवंदन. एन्. सी. सी. प्रजासत्ताक दिन संचलन.<br>राष्ट्रीय सेवा योजना–पिसोळी ध्वजवंदन.<br>माजी विद्यार्थी मेळावा. |
| २९ जानेवारी १९७६ | मॉडर्न मित्रमंडळाची स्थापना व मॉमच्या दलित विशेषांकाचे प्रकाशन.<br>' दलित विद्यार्थ्यांच्या समस्या ' या विषयावर परिसंवाद.<br>प्रमुख पाहुणे मा. प्रा. देवदत्त दाभोळकर कुलगुरू पुणे विद्यापीठ.<br>वाणिज्य संघटना–स्वस्तिक रबर कारखान्यास औद्योगिक भेट. |

| | |
|---|---|
| १ ते ८ फेब्रुवारी १९७६ | ' स्त्री उत्कर्ष वर्ष '<br>व्याख्यान सत्र.<br>वक्ते व विषय पुढीलप्रमाणे :– |
| १ फेब्रुवारी १९७६ | श्री. श्री. ज. जोशी–कालच्या व आजच्या पिढीतील स्त्रीजीवन |
| २ फेब्रुवारी ... ... | डॉ. हेमंत इनामदार–नाथीबाई ठाकरसी. |
| ३ फेब्रुवारी ... ... | डॉ. शं. ना. नवलगुंदकर–स्त्रीस्वातंत्र्य : एक सिंहावलोकन. |
| ४ फेब्रुवारी ... ... | बॅ. सौ. सुनीती पुंगलिया–कौटुंबिक कायदा. |
| ५ फेब्रुवारी ... ... | डॉ. वि. रा. करंदीकर–पुण्यश्लोक अहिल्याबाई. |
| ६ फेब्रुवारी ... ... | डॉ. सरोजिनी बाबर–लोकसाहित्यातील स्त्री-जीवन. |
| ७ फेब्रुवारी ... ... | प्रा. सौ. लीला अर्जुनवाडकर–संस्कृत साहित्यातील स्त्री. |
| ८ फेब्रुवारी ... ... | डॉ. सौ. श्यामला वनारसे–आंतरजातीय विवाह. |
| ७ फेब्रुवारी १९७६ | जिमखाना दिन.<br>प्रमुख पाहुणे–प्राचार्य मो. भा. लिमये आणि सौ. लिमये. |
| १२ फेब्रुवारी १९७६ | प्राध्यापक अभ्यास मंडळ.<br>डॉ. अशोक कानिटकर यांचे ' नो युवर हार्ट ' या विषयावर भाषण.<br>अध्यक्ष–प्राचार्य लिमये. |
| १५ फेब्रुवारी ७६ ते<br>२२ फेब्रुवारी १९७६ | पुणे विद्यापीठ निरंतर शिक्षण केन्द्र आयोजित<br>नाट्य शिक्षण शिबिर.<br>संचालक–श्री. अमोल पालेकर व सौ. अनुया पालेकर.<br>संयोजक–वि. भा. देशपांडे. |
| २६ फेब्रुवारी १९७६ | ' पालक मेळावा '<br>शास्त्र संघटना व्याख्यान.<br>वक्ते–डॉ. जी. एस्. सैनानी ससून हॉस्पिटल पुणे.<br>विषय–वैद्यकीय महाविद्यालयातील शिक्षणक्रम. |

| | |
|---|---|
| २९ फेब्रुवारी, १ मार्च व २ मार्च १९७६ | वार्षिक स्नेहसंमेलन |
| ७ मार्च १९७६ | अर्थशास्त्र विभाग :–परिसंवाद.<br>विषय–रोजगार हमी योजना.<br>वक्ते–श्री. प्रभावळकर. डॉ. गावसकर. प्रा. शरद कुलकर्णी.<br>अध्यक्ष–प्रा. व्ही. डी. देशपांडे. |
| ११ मार्च १९७६ | स्टाफ ॲकॅडेमी.<br>डॉ. व्होरा यांचा सत्कार व त्यांचे व्याख्यान.<br>विषय–महाराष्ट्रातील उदारमतवाद. |
| १२ मार्च १९७६ | वाणिज्य संघटना–तृतीय वर्ष वाणिज्य वर्गातील विद्यार्थ्यांना निरोप समारंभ. |
| १३ मार्च १९७६ | शास्त्र संघटना–तृतीय वर्ष शास्त्र वर्गातील विद्यार्थ्यांना निरोप समारंभ. |
| १६ मार्च १९७६ | साहित्य संघटना–तृतीय वर्ष साहित्य वर्गातील विद्यार्थ्यांना निरोप समारंभ |
| १९–२०–२१ मार्च १९७६ | तृतीय वर्ष–कला, शास्त्र, वाणिज्य विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शन शिबीर. |
| २१ मार्च १९७३ | महाविद्यालयातर्फे तृतीयवर्ष कला, शास्त्र व वाणिज्य–विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत निरोप व शुभेच्छा. |
| २२ मार्च १९७६ | संस्थेचे हितचिंतक व समाजातील निरनिराळ्या स्तरांतील मान्यवर व्यक्तींच्या उपस्थितीत ५ वर्षांच्या प्रगतीचा आढावा, भविष्यकालीन योजना व उत्कृष्ट यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत सत्कार. |
| २७–२८ मार्च १९७६ | प्राध्यापक चर्चा मंडळातर्फे (Staff Academy) परीक्षापद्धतीत सुधारणा या विषयावर चर्चा सत्र. |
| २९ मार्च १९७६ | प्राध्यापक कुटुंबियांचे स्नेहसंमेलन. |
| ३० मार्च १९७६ | शैक्षणिक वर्षाअखेरीची प्राध्यापक बैठक. |

• • •

# एक नम्र आवाहन

## प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

### शिवाजीनगर, पुणे ५

**शुभारंभ**

१६ मे १९३४ या दिवशी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली व त्याच वर्षी ४ जूनला मॉडर्न हायस्कूलचा शुभारंभ झाला. अल्पावधीतच या शाळेने शिक्षणक्षेत्रात उत्तम नावलौकिक मिळवून उज्ज्वल यशपरंपरा निर्माण केली. हायस्कूलच्या स्थापनेपासून १९६८ मध्ये स्थापिलेल्या शिशुविद्यामंदिरापर्यंत संस्थेने जे शैक्षणिक कार्य केले त्याची परिणती म्हणजे १९७० साली स्थापन झालेले मॉडर्न महाविद्यालय होय.

**ध्येयधोरण**

समाजाच्या सर्व थरातील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षणाची सुसंधी उपलब्ध करून देणे आणि त्यातून शिस्तप्रेमी, स्वावलंबी, सुसंस्कृत व कार्यक्षम नागरिक निर्माण करणे ही संस्थेची मूलभूत प्रतिज्ञा. मॉडर्न महाविद्यालयाने हेच ध्येय प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा चालविली असून त्यात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मॉडर्न महाविद्यालय हे सुरुवातीपासूनच अद्ययावत व परिपूर्ण स्वरूपाचे असावे या दृष्टीने महाविद्यालय सुरुवातीपासूनच स्वतःच्या नवीन आणि भव्य इमारतीत सुरू झाले. साहित्य, शास्त्र व वाणिज्य या तिन्ही शाखांनी युक्त असे हे महाविद्यालय उभे करताना संस्थेने आतापर्यंत सुमारे १९ लाख रुपये खर्च केले आहेत आणि त्यात प्रयोगशाळा व ग्रंथालय यांच्या विकासाकडे विशेष लक्ष पुरविले आहे.

महाविद्यालयाची गुणवत्ता प्रामुख्याने उत्कृष्ट अध्यापकवर्गावर अवलंबून असते हे ध्यानी घेऊन संस्थेने पहिल्याच वर्षी दीर्घानुभवी, व्यासंगी व आपापल्या विषयात लौकिक मिळविलेल्या प्राध्यापकांची नियुक्ती केली. त्यामुळे आरंभापासून आतापर्यंत विद्यापीठ निकालांमध्ये 'मॉडर्न'चे नाव अग्रभागी झळकताना दिसत आहे. इतकेच नव्हे तर सांस्कृतिक व क्रीडाक्षेत्रातही आमच्या महाविद्यालयाने नेत्रदीपक कामगिरी बजावलेली आहे.

**आमची आकांक्षा**

महाविद्यालयाची अशी उल्लेखनीय वाटचाल होत असली तरी याच्याही पुढे जाऊन विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी आणखी काही भरीव कार्य करणे आम्हाला अत्यंत अगत्याचे वाटते. या हेतूने महाविद्यालयाने अनेक महत्त्वाकांक्षी योजना आखलेल्या आहेत. त्यांचे थोडक्यात स्वरूप असे :—

- सर्व दृष्टींनी सुसज्ज ग्रंथालय आणि त्यासाठी स्वतंत्र इमारत.
- विद्यार्थी—विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृहे.
- महाविद्यालयाशी जवळीक वाढविण्याच्या दृष्टीने प्राचार्य, प्राध्यापक व अन्य सेवकांसाठी निवासस्थानांची सोय.
- गरीब विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी एक मोठा निधी उभारणे.
- विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कलागुणांना अधिक वाव देण्यासाठी अत्याधुनिक पद्धतीचे सुसज्ज सभागृह.
- क्रीडाविषयक प्रावीण्य व आवड वृद्धिंगत करण्यासाठी पॅव्हेलियन

● शास्त्र व इतर विभागातील उपकरणांची दुरुस्ती, त्यांची देखभाल व नवीन उपकरणनिर्मिती यासाठी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव देण्यासाठी व शिकत असताना शिक्षणखर्च भागविण्याच्या दृष्टीने द्रव्यार्जनाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी एक सुसज्ज वर्कशॉप.

## उपाययोजना

या सर्व योजना यशस्वी करण्याकरिता संस्थेला आर्थिक पाठबळ मिळणे किती आवश्यक आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. या संदर्भात हे नमूद करणे अगत्याचे वाटते की, मॉडर्न महाविद्यालयाने आपल्या परीने स्वतःहून यासाठी पाऊल उचलले आहे. यासंबंधीची थोडक्यात कल्पना अशी:—

● विद्यापीठ अनुदान मंडळाने पुढील चार वर्षात आमच्या योजनांसाठी पाच लक्ष रुपयांचे अनुदान देण्याचे मान्य केले आहे.

● 'मॉडर्न'चे प्राध्यापक व कार्यालयीन सहकारी सेवक येत्या चार वर्षात ७५,००० रुपयांची रक्कम जमवून ती संस्थेकडे ठेव म्हणून ठेवणार आहेत. त्याची प्रत्यक्ष कार्यवाही सुरू झालेली आहे.

● काही बँकांनी सुलभ अटींवर आम्हास कर्ज देण्याचे मान्य केले आहे.

## तथापि

आमच्या प्रयत्नांना आर्थिक व तंत्रविषयक मर्यादा पडणे स्वाभाविक आहे. याचसाठी महाराष्ट्रातील उद्योगपतींना, विचारवंतांना व शिक्षणप्रेमी नागरिकांना आम्ही आर्थिक मदतीचे आवाहन करीत आहोत. त्याचप्रमाणे संस्थेचे माजी विद्यार्थी, पालक व हितचिंतक यांनीही या महत्त्वाच्या कार्यात आम्हाला शक्य तितकी अधिकात अधिक सक्रिय मदत करावी, असे आमचे आवाहन आहे.

आम्ही विनम्रपणे सांगू इच्छितो की, मदत अल्प असो किंवा मोठी असो आम्ही तिचा कृतज्ञतापूर्वक स्वीकार करू. कारण मदतीचे कोणतेही पाऊल महाविद्यालयाच्या प्रगतीस हातभारच लावणार, यात शंका नाही. त्याचबरोबर हेही नमूद केले पाहिजे की, सर्व प्रकारच्या मदतीचा विनियोग योग्य त्या शैक्षणिक कार्याकरिता अत्यंत काटेकोरपणे करण्यात येईल. शिस्त, पद्धतशीरपणा व काटेकोरपणा ही आमच्या महाविद्यालयाची वैशिष्ट्येच आहेत.

## मदतीचें स्वरूप

**(अ) देणगी:**—रु. १०१ किंवा त्याहून कितीही अधिक रक्कम देणगीच्या रूपाने आपण देऊ शकता. यापेक्षा कमी रकमेच्या देणग्यांचा अनादर केला जाणार नाही. हितचिंतकांना विशिष्ट हेतूने 'मोठी' रक्कम देणगी म्हणून द्यावयाची असल्यास त्या संदर्भात संस्थेचे कार्यवाह व महाविद्यालयाचे प्राचार्य त्यांच्याशी समक्ष भेटीत चर्चा करतील. अशा देणगीचेही आम्ही मनापासून स्वागत करू.

**(आ) ठेव :**—कमीत कमी रु. ५०० किंवा त्यापुढे शंभराच्या पटीत कितीही रक्कम संस्थेकडे ठेवरूपाने आपण ठेवू शकता. याबद्दल खालीलप्रमाणे व्याजही देण्यात येईल :—

(१) २४ महिन्यांपर्यंत – ७ टक्के
(२) ६० महिन्यांपर्यंत – ८ टक्के
(३) ६० महिन्यांच्या वर – ९ टक्के

**(इ) वस्तू :**—देणगी, ठेव याव्यतिरिक्त पुस्तके, फर्निचर इ. अभ्यासोपयोगी वस्तूंचीही आम्हास आवश्यकता आहे. त्याबद्दलची कल्पना अशी :—

(१) पुस्तकांचा संच –
(क) साहित्यशाखेतील विद्यार्थ्यांसाठी – रु. १००
(ख) शास्त्रशाखेतील विद्यार्थ्यांसाठी – रु. २५०
(ग) वाणिज्यशाखेतील विद्यार्थ्यांसाठी – रु. १२०

देणगीदारांनी वर दाखविल्याप्रमाणे पुस्तकांसाठी रक्कम दिल्यास त्यातून पुस्तके घेऊन त्यावर देणगीदारांचे नाव टाकून ती गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना देण्यात येतील.

(२) ग्रंथालयाकरिता पुस्तक-कपाट-(सुमारे १५० पुस्तकांसाठी) रु. ५५०.

(३) अभ्यासिकेत विद्यार्थ्यांसाठी (अ) टेबल व खुर्च्या-रु. ६०० (एक टेबल व सहा खुर्च्यांसाठी).

(आ) एक टेबल व एक खुर्ची रु-१५०.

(४) तसेच वर्गात लावण्याच्या सूचनाफलकासाठीदेखील देणगीचा कृतज्ञतेने स्वीकार केला जाईल.

देणगीदारांनी वरीलप्रमाणे रक्कम दिल्यास त्याप्रमाणे कपाट, खुर्ची वगैरे विकत घेतले जाऊन त्यावर देणगीदार व्यक्तीच्या नावाची पट्टिका लावली जाईल.

## विकासाची वाटचाल

आपण ज्या महाविद्यालयास आर्थिक व अन्य प्रकारचे साहाय्य करणार आहात त्याच्या विकासाची, उज्ज्वल यशपरंपरेची व तेथील अभिनव उपक्रमांची आपणास कल्पना यावी यासाठी सूत्ररूपाने एक छोटासा अहवाल खाली देत आहोत :-

**(क) विद्यार्थी संख्या :-**१९७०-७१ ला ७०८ संख्या होती ती आता २२८८ झाली आहे.

**(ख) परीक्षांतील यश –** अगदी पहिल्या वर्षापासून आमचे विद्यार्थी **विद्यापीठ परीक्षांत** पहिल्या दहा क्रमांकामध्ये यश मिळवीत आहेत.

१९७१-(१) कु. हेमा अभ्यंकर-पदवीपूर्व साहित्य परीक्षेत चौथा क्रमांक. (२) कु. प्रतिमा कान्हेरे-पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत चौथा क्रमांक. (३) श्री. श्याम वाघ-पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत सहावा क्रमांक.

१९७२-कु. पद्मिनी जोगळेकर-पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत आठवा क्रमांक.

१९७३-(१) कु. ज्योती राऊत-पदवीपूर्व साहित्य परीक्षेत दहावा क्रमांक. (२) घनःश्याम डाळवाले-बी. कॉम्. परीक्षेत कॉस्ट अकौंटिंग विषयात सर्वप्रथम.

१९७४-(१) सौ. हेमा लेले (हेमा अभ्यंकर)-बी. ए. परीक्षेत सर्वप्रथम व सर्व पारितोषिकांची मानकरी. (२) श्री. रवींद्र गुर्जर-बी. कॉम्. परीक्षेत| ॲडव्हान्स्ड कॉस्टिंगमध्ये सर्वप्रथम. (३) कु. पद्मजा पेंढारकर-पदवीपूर्व साहित्य परीक्षेत सातवा क्रमांक (४) कु. नीलिमा गोडसे-पदवीपूर्व शास्त्र परीक्षेत सातवी आणि पदवीपूर्व साहित्य, शास्त्र व वाणिज्य परीक्षेत आठवी.

१९७५-(१) कु. छाया जोगळेकर-बी. कॉम्.मध्ये सर्वप्रथम. (२) श्री. पारसमल लुंकड-पदवीपूर्व वाणिज्यमध्ये ९ वा क्रमांक.

## क्रीडाविषयक

(१) आंतरमहाविद्यालयीन बॉल बॅडमिंटनमध्ये उपविजेतेपद, १९७२. (२) श्री. श्रीरंग इनामदार-पुणे विद्यापीठ संघातर्फे सहभाग आणि महाराष्ट्र राज्य खो खो संघ कर्णधार, १९७३; छत्रपती शिवाजी ॲवॉर्ड, १९७५. (३) श्री. महादेव नरवडे-आंतरमहाविद्यालयीन क्रॉस कंट्री रेसमध्ये दुसरा क्रमांक, १९७२. (४) कु. भारती शहा व सुरेखा वाळवेकर-राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत निवड, १९७३. कु. शहा बॉल बॅडमिंटनची कर्णधार, १९७२. (५) श्री. अनिल पांढरे-वेस्टर्न इंडिया मुष्टियुद्ध अजिंक्यपद, १९७५.

## N. C. C.; N. S. S.

(१) कु. संजय निघोजकर (१९७१) व संजय कदम (१९७३) २६ जानेवारीच्या दिल्ली येथील संचलनासाठी निवड. (२) श्री. विक्रमादित्य शिंदे व कु. पद्मजा घोडके (१९७३), श्री. ठकार, कु. संजीवनी रांजेकर (१९७५) यांची अबू, उज्जैन इ. ठिकाणी भरलेल्या अखिल भारतीय शिबिरासाठी निवड.

## सांस्कृतिक

अशाच प्रकारे संगीत अभिनय, वक्तृत्व, इत्यादी कलांमध्येही आमच्या विद्यार्थ्यांनी आंतरमहाविद्यालयीन पातळीवर अत्यंत उल्लेखनीय यश मिळविले आहे.

## काही महत्त्वाचे उपक्रम

(१) महाविद्यालयाने वैयक्तिक लक्ष व शिस्त यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याची शैक्षणिक प्रगती दाखविणारे 'प्रोग्रेस रजिस्टर' तयार केले असून त्याचा काटेकोरपणे उपयोग केला जातो.

(२) मागास विद्यार्थ्यांसाठी पुस्तके, अधिक मार्गदर्शन, वैयक्तिक मार्गदर्शन इत्यादी उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.

(३) कला, शास्त्र व वाणिज्य या तीनही शाखांसाठी तीन स्वतंत्र भित्तीपत्रके नियमितपणे प्रसिद्ध होत असतात.

(४) प्राध्यापकांचा 'स्वाध्याय' निरंतर चालू राहावा या दृष्टीने 'प्राध्यापक अभ्यासमंडळ' (स्टाफ ॲकॅडेमी) गेली चार वर्षे कार्यरत आहे. नियमितपणे दर महिन्यास प्राध्यापकांचे निबंधवाचन आणि चर्चा असा कार्यक्रम असतो. चर्चेकरिता त्या त्या विषयातील तज्ज्ञांना सन्मानपूर्वक निमंत्रण दिले जाते व त्यांच्या उपस्थितीत ही चर्चा होते. 'प्राध्यापक अभ्यास मंडळा'चे हे कार्य विद्यापीठ अनुदान मंडळाच्या 'फॅकल्टी इम्प्रुव्हमेंट प्रोग्रॅम' या योजनेनुसार चालू आहे. आतापर्यंत अशी ३५ चर्चासत्रे घडवून आणण्यात आली आहेत.

## आमचा प्राध्यापक वर्ग

आपल्या विषयात नाणावलेला असा तज्ज्ञ प्राध्यापकवर्ग या महाविद्यालयास लाभलेला आहे. त्यामध्ये–

(अ) ९ प्राध्यापकांनी डॉक्टरेट पदवी मिळविलेली आहे.

(आ) १० प्राध्यापक डॉक्टरेटसाठी अध्ययन करीत आहेत.

(इ) १६ प्राध्यापकांना पदव्युत्तर अध्यापनाचा अनुभव आहे.

(ई) १७ प्राध्यापक शैक्षणिक आणि अन्य स्वरूपाचे ग्रंथलेखन करणारे आहेत.

## नवी क्षितिजे

● जून १९७६ मध्ये एम्. कॉम्. साठी पदव्युत्तर केंद्र सुरू करण्याचा संकल्प पक्का झाला असून त्याची तयारी सुरू आहे.

● नवीन शैक्षणिक आकृतिबंधामुळे महाविद्यालयावर इयत्ता १२ वीची नवी जबाबदारी येणार आहे. ही जबाबदारी अत्यंत समर्थपणे सांभाळण्याचे महाविद्यालयाने ठरविले आहे.

● १० वीची परीक्षा पास झाल्यानंतर महाविद्यालयात शिक्षण घेऊ न शकणारे विद्यार्थी व तरुण यांच्यासाठी छोटे मोठे सर्टिफिकेट व डिप्लोमा अभ्यासक्रम सायंमहाविद्यालयाद्वारे चालू करण्याचा आमचा मानस आहे.

## आणि म्हणून

आपणास नम्र विनंती की, आपण आमच्या या शैक्षणिक कार्यास यथाशक्ती हातभार लावून आमचे शैक्षणिक उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या कामी आम्हास साहाय्य करावे.

## सूचना

देणगीचा धनादेश (चेक) अथवा रक्कम प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे ५ यांच्या नावे काढावा आणि तो पुढील पत्त्यावर पाठवावा:

'प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे. द्वारा–प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, पुणे ५.'

आपला आमच्यावर लोभ आहेच. तो वृद्धिंगत व्हावा व या आवाहनाला आपल्याकडून योग्य प्रतिसाद मिळावा ही विनंती.

आपल्याकडून पत्ररूपाने प्रोत्साहन मिळाल्यास आम्हास आनंद वाटेल.

**वि. शं. गोखले**
सेक्रेटरी

**मो. भा. लिमये**
प्राचार्य

Don't burn the Paper
in waste . , . . . . . . , .
Turn to us and
earn the best.
The Paper which is
waste for you
is Best for us.

**HINDUSTAN
WASTE
PAPERS**

565, SHIVAJINAGAR NEAR CORPORATION BLDG. POONA 411 005.